THE

INDIAN UNREST

BY

MR. VALENTINE CHIROL.

मि. व्हालेंटाईन चिरोल–कृत

हिंदुस्थ नांतील अ वस्थता

या इंग्रजी पुस्तकाचें

मराठी भाषांतर

उत्तर र्ध

सन १९११ इ.

[illegible]

Printed at the "Jainendra Press."

AND

Published by M. G. Dongre.

KOLHAPUR.

अनुक्रमणिका.

भाग १३ वा.

राज्यव्यवस्थेंतील सुधारणा.

सन १९०९ सालच्या इंडियन काउन्सिलस् ॲक्ट-अन्वयें, व्हाइसरायसाहेबांच्या कायदे-काउन्सिलाचा जसा विस्तार झाला आहे, त्याचप्रमाणें प्रांतिक सरकारांच्या (मुंबई, मद्रास वगैरे इलाख्यांच्या गव्हरनरांच्या) कायदे काउन्सिलांचीहि वाढ झाली आहे. ह्मणून, प्रांतिक काउन्सिलापासून हिंदी [illegible] काउन्सिल ओळखतां यावें ह्मणून, ह्याला इंपेरियल [illegible] (वरिष्ठ कायदे-काउन्सिल) असें नांव आतां [illegible] ठेवलें आहे. ह्या काउन्सिलाची पहिली बैठक [illegible] (१९१० [illegible]) [illegible] [illegible] करितांना, लॉर्ड मिंटोसाहेब [illegible] [illegible] कीं "ही बैठक आठवण ठेवण्यासारखी" [illegible] [illegible] ह्या बैठकीचे [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] होता. [illegible] [illegible] त्या आसनावर विराजमान झाले तेंव्हा, [illegible] केल्या बाजूला वॉरन हेस्टिंग्जसाहेबांची तसबीर [illegible] मुळें, प्रेक्षकांच्या मनाला नेहमीं [illegible] सर्व, काउन्सिलचे सर्व सभासद (व्हे [illegible]

वाटोळ्या टेबलाभोंवतीं, फारसा दरबारी थाट न ठेवितां बसत असत. परंतु, आंतां तें टेबल काढून टाकण्यांत आलें असून, वाढलेल्या काउन्सिलांतील ५९ सभासदांची बसण्याची सोय, अध्यक्षाकडे तोंड करून, अर्ध-वर्तुळाकार अशा दोन रांगांत केली होती. बहुतकरून ही मंडळी प्रांतवारीनें बसत असे; व हिंदी सभासदांचे चेहरे व केव्हां केव्हां त्यांचे पोषाख ह्यांवरून ह्या काउन्सिलांत हिंदुस्थानांतील नाना प्रकारच्या लोकांच्या प्रतिनिधींचा खरोखर प्रवेश झाला आहे, ही गोष्ट एकदम नजरेस पडे.

बरद्वानचे महाराज उच्चवर्गांतील बहुतेक बंगालीलोकांप्रमाणें, सर्वांसारखाच दिसून येणारा, यूरोपियन पद्धतीचा पोषाख करितात. परंतु, पतियाळ्याच्या कुंवरसाहेबांनीं आपल्या शीख पूर्वजांचा जरतारी पोषाख व पट्यापट्यांची पगडी कायम ठेविली आहे. शिवाय, ह्यांची अंगकांठीहि उंच असून, शरीर पुष्ट आहे. त्यामुळें, बरद्वानच्या महाराजापेक्षां कुंवरसाहेबाकडे पहाणारांचें लक्ष लवकर जात असे. पंजाबांतील तिवानाचे मलिक उमार हयातखान ह्यांचा तो धीट [illegible] चेहरा व [illegible] [illegible]सारखी ती मुद्रा पाहिली, म्हणजे उत्तरेकडील शौर्यशाली पठाण लोकांची जशी आठवण होई, त्याचप्रमाणें मह: [illegible] [illegible] ([illegible]) तो नाजुक चेहरा पाहिला, म्हणजे [illegible] [illegible] नष्ट झालेल्या मुसलमानी राज्यांतील हे कोणी [illegible] [illegible]चे गृहस्थ आहेत, असें तेव्हांच वाटे. [illegible] [illegible] अध्यक्ष [illegible] [illegible] [illegible] [illegible], [illegible] [illegible] [illegible]मुळें [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] त्यांस विनंति करणारे [illegible]

मदनमोहन मालवीय यांनीं पांढरा शुभ्र **स्वदेशी** पोषाख चढविला होता. मि. भूपेंद्रनाथ ह्या बंगालच्या दुसऱ्या एका **जहाल** राजकारणी पुरुषानें **स्वदेशांत** सूत कांतून विणलेल्या कापडाचा, परंतु यूरोपियन पद्धतीनें शिवलेला पोषाख धारण केला होता. अशा ह्या पोषाखांतील तफावतीमुळें, पंडितजींच्या स्वदेशाभिमानात्मक मतांचा प्रखरपणा पाहणारांच्या डोळ्यांस जसा भासत होता, तसा बाबूजींच्या मतांचा नव्हता. पुणेरी पगडी घातलेले, दक्षिणी ब्राह्मण मि० गोखले यांचा चलाख, पाणीदार व बुद्धिमान् चेहरा अधिक लक्ष देण्यासारखा होता. शिक्षणाच्या दृष्टीनें मि. गोखले जेवढे पौर्वात्य आहेत, तेवढेच पाश्चिमात्यहि आहेत (ह्मणजे, त्यांचें शिक्षण दोन्ही तऱ्हेनें चांगलें झालें आहे); व ब्रिटिश राज्यापूर्वी हिंदुस्थानांत ज्या जातीच्या हातीं राजसत्ता होती, त्या जातींत त्यांचा जन्म झाला आहे. काउन्सिलांत जमलेल्या बऱ्याच मुसलमानगृहस्थांनीं फेज नांवाच्या तांबड्या टोप्या घातल्या होत्या. त्यावरून, तीन वर्षांपूर्वी; सिमल्यास लॉर्ड मिंटोसाहेबांनीं स्वतःहोऊन मुसलमानलोकांस जें वचन दिलें होतें, त्याप्रमाणें ह्या बाबतींततरी आपले प्रतिनिधी निवडण्याचा पूर्ण हक्क त्यांना खरोखर मिळाला आहे, असें दृष्टोत्पत्तीस येत होतें. पारशीलोकांच्या त्या काळ्या रंगाच्या [illegible] उभ्या टोप्या व [illegible] लोकांचे रेशमी रुमाल, [illegible], [illegible] काउन्सिलांत सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांचा प्रवेश [illegible] असें कोणाच्याहि नजरेस येत होतें. ह्या मंडळींत [illegible] [illegible] हे गृहस्थ असून, [illegible] [illegible] [illegible] नसल्याकारणानें, हिंदु[illegible] [illegible] [illegible] प्रतिनिधित्व [illegible] त्यांच्याकडे [illegible]

फक्त दोन महत्वाचे अपवाद खेरीजकरून, निरनिराळ्या धंद्यांचे व वर्गांचे प्रतिनिधी ह्या काउन्सिलांत असून, त्यांची संख्या भिन्न भिन्न जाती व धर्म ह्यांच्या प्रतिनिधींच्या संख्येहून कोणत्याहि दृष्टीनें कमी नव्हती. वर नांवानें सांगितलेल्या दोन तीन मोठ्या जमीनदारांखेरीज, जमीनदार लोकांचे आणखीहि बरेच प्रतिनिधी काउन्सिलांत दिसत होते; व असें होणें हिंदुस्थान-सारख्या देशांत अगदीं स्वाभाविक आहे. कारण, येथें शेतकी हा सर्वांत मुख्य धंदा असल्यामुळें, जमीन धारण करणाऱ्या लोकांच्या ह्मणण्यास विशेष मान मिळाला पाहिजे. राजकीय चळवळी करण्याची जी एक नवीन टूम हिंदुस्थानांत अलीकडे निघाली आहे, तीपासून हे लोक आजपर्यंत बहुतेक अलिप्त राहिले होते खरें; परंतु, ह्याचकारणामुळें त्यांना आपले प्रतिनिधी योग्य तितके निवडून पाठविण्याचा हक्क मिळाला नसता, तर मोठा अन्याय झाला असता. शहरांत राहून धंदे करणाऱ्या (वकील, डाक्टर, शिक्षक, वर्तमानपत्रकार वगैरे) लोकांची बरीच निराशा झाली, हें खरें आहे. ह्या लोकांना असें वाटतें की, सार्वजनिक कामें करण्याची पात्रता अंगीं असण्यास, फक्त पाश्चिमात्य शिक्षणाचीच — किंवा ज्याला बहुधा निव्वळ चुकीनें लोक पाश्चिमात्य तऱ्हेचें शिक्षण समजतात त्याचीच — आवश्यकता आहे, असें [illegible] मानिलें पाहिजे. तथापि, [illegible] [illegible] आणि हिंदी [illegible]

ह्या काउन्सिलांत इंग्रजी अधिकाऱ्यांकडे जीं नवीन चमत्कारिक कामें आलीं होतीं, तीं बजाविण्याची पात्रता त्यांच्या अंगीं कितपत आहे, ह्याबद्दल नवीन कौन्सिलांच्या बैठकी होण्यापूर्वीं इंग्रज लोकांना मोठा संशय असून, त्याबद्दल अगदीं उघडपणें सर्व ठिकाणीं चर्चा चालू होती. ज्या लोकांना सार्वजनिक रीतीनें वादविवाद करण्याचें कधींहि शिक्षण मिळालेलें नाहीं त्यांचा, अथवा ज्यांना अशी संवयहि नाहीं त्यांचा, कुशाग्रबुद्धीच्या राजकारणपटु हिंदी लोकांशीं वाग्युद्ध करितांना, टिकाव लागणार नाहीं, अशी भीति पडली होती; व ती गैरवाजवीहि नव्हती. पण, ह्या अशा भीतीचें वास्तविक कांहींच कारण नव्हतें, असें आतां, निदान वरिष्ठ कौन्सिलच्या पहिल्या बैठकीच्या अनुभवावरून तरी, सर्व लोक ह्मणूं लागले आहेत. आरंभीं आरंभीं, फक्त लिहून आणलेल्या टिपणांच्या आधारावरूनच आपलीं भाषणें करण्याची प्रवृत्ति बऱ्याच सरकारी सभासदांच्या ठिकाणीं दिसून येत होती, हें खरें आहे. तसेंच, सामनेवाल्यावर चलाखीनें पेंच करणें व त्यांच्या पेंचाची चतुराईनें तोड करणें, वगैरे गोष्टी इंग्लंडमध्यें पार्लमेंट-सभेंत जशा दृष्टीस पडतात, तशा येथें दृष्टीस पडण्यास, खरोखर पहिल्यापासून अखेरपर्यंत, कोठेंच जागा नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. बहुतेक हिंदी सभासद आपलीं भाषणें आगाऊच मोठ्या काळजीनें तयार करून ठेवीत, व टाइप केलेल्या किंवा प्रसंगीं छापील कागदावरून तीं वाचून दाखवीत. पुष्कळ वेळां अशा भाषणांच्या नकला, दोनदोन तीनतीन दिवस [illegible] वर्तमानपत्रांना देऊन [illegible] असत [illegible]

[illegible]

करण्याचा आपला बेत आयत्यावेळीं रहित करून, मौन धारण केलें असलें, तरी ज्या लाडक्या वर्तमानपत्राकडे आपलें भाषण पूर्वींच पाठवून दिलेलें असेल, त्याला आपला बेत बदलल्याची सूचना वेळेवर न दिल्यामुळें, तें न झालेलें भाषण सटीक छापून प्रसिद्ध होऊन जाई. कित्येक प्रसंगीं, अध्यक्षांच्या हुकुमावरून व मध्येंच कोणी हरकत घेतल्याकारणानें, मोठ्या आवडीनें तयार केलेले भाग भाषणांतून नामदार सभासदांना अजीबात गाळून टाकावे लागत; तरी पण, मूळचें तयार झालेलें भाषण, फेरबदल न होतां, जशाचें तसें छापलें जाई. ज्या विषयावर हिंदी सभासदांना बोलावयाचें असेल, तो विषय ज्या खात्याचा असेल त्या खात्याला, आपण कोणत्या मुद्यांवर काय बोलणार आहों, याचा मोघखारा अगोदर कळवून ठेवण्याची वहिवाट असे. त्यामुळें, हिंदी सभासदांचेंच अनुकरण करून, आंकड्यांनीं ओतप्रोत भरलेलीं, लांबलचक उत्तरें मोठ्या मेहनतीनें तयार करून, तीं वाचून दाखविण्याची प्रवृत्ति, आरंभीं-आरंभीं, सरकारी सभासदां-मध्येंहि दिसूं लागली होती. आणि वास्तविक घटनेंतर, [illegible] [illegible] सभासदांना [illegible] उपयोगाची मात्र झाली असती. [illegible] सरकारी सभासदांना धीर येऊन, [illegible] हिंदी सभासदांप्रमाणेंच, [illegible] साधी भाषणें [illegible] पुढें [illegible] प्रकारें [illegible] [illegible] दिलें.

[illegible]

झिरझिरीत झालेल्या विषयावर, मि. भूपेंद्रनाथ बोस यानीं जें मोठें आवेशयुक्त भाषण केलें, त्याला मि. लॉयननीं उत्तर दिलें. मि. गोखले यानीं आपल्या कांहीं मित्रांस पूर्वींच बजावून ठेविलें होतें कीं, हिंदी राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं अलंकारयुक्त, आवेशी भाषणें करण्याची जी पद्धत धरली आहे, तिचा कौन्सिलच्या शांत वातावरणांत कांहींएक उपयोग होणार नाहीं. आणि, प्रस्तुत प्रसंगीं, इतर वेळेप्रमाणेंच अनुभव आला. अखेरच्या दोन दिवशीं, कौन्सिलांतील वादविवाद हरतऱ्हेच्या गैरलागू विषयांवर भरकटत चालला होता; व कौन्सिलांतील काम चालण्यासंबंधाचे जे नवीन नियम झाले आहेत, त्यांप्रमाणें असा हा वादविवाद बहुतेक निष्कारण होता. तथापि, ह्या वरील प्रसंगींतरी निदान, ह्या असल्या वादविवादापासून एक फायदा झाला. फाळणीच्या तक्रारीऐवजीं पुढें मांडण्यास दुसरें कांहीं गाऱ्हाणें बंगालच्या मुत्सद्यांजवळ नाहीं असें नसतें, तर आतां ह्या प्रश्नास अखेरची समाप्ति मिळाली पाहिजे, असें कोणासहि वाटलें असतें. कारण, मि. लॉयनच्या भाषणानेंच गरीब बिचाऱ्या भूपेंद्रबाबूची अगोदरच धूळधाण झाली होती; आणि, त्यांत आणखी मौलवी सय्यद शमसूल हुडा व मि. मझरूल हक ह्या दोघांच्या साध्या पण जोरदार रीतीनें केलेल्या उत्कृष्ट भाषणांनीं त्यांत चांगलीच भर पडली. ह्या दोन मुसलमान गृहस्थांपैकीं पहिले पूर्वबंगालतर्फे व दुसरे बंगालप्रांताच्या वतीनें [illegible] निवडून आलेले आहेत.

हिंदी सभासदांपैकीं [illegible] मंडळी— [illegible] मध्यें [illegible] घेत होते, [illegible]

[illegible]

बरोबरीच्या सभासदांचीं तीं सफाईदार— व कधीं कधींतर अगदी त्रासदायक होणारीं, लांब लांब भाषणें फक्त ऐकत बसत. परंतु, अशावेळीं त्यांच्या चेहऱ्यावरमात्र थोडाबहुत कंटाळा आल्याचीं चिन्हें दिसल्याशिवाय राहत नसत. तथापि, जेव्हां जेव्हां या लोकांना मध्यें बोलण्याचा प्रसंग येई, तेव्हां तेव्हां त्यांचीं भाषणें लहानच असत; परंतु, त्यांचा परिणाममात्र चांगला झाल्या-शिवाय रहात नसे. मतें घेण्याचा ज्या ज्या वेळीं प्रसंग आला, त्या त्या वेळीं बहुतकरून हे लोक सरकारच्या धोरणास पुष्टि देत. आणि, कोणत्याहि प्रसंगीं, सरकाराकडील बहुमत किरकोळ आहे, असें दिसून आलें नाहीं. ज्या सूचनेला सरकार विरुद्ध असे, तिचें समर्थन करणाऱ्या सभासदांची संख्या कधींहि २० पर्यंत गेली नाहीं. बहुधा ती १६ आणि २० यांच्या दरम्यान असे. दक्षिणआफ्रिकेंतील हिंदीलोकांच्या स्थितीबद्दल जो ठराव मि. गोखले यांनीं पुढें आणिला होता, त्यावरच कायतें सर्व हिंदी सभासदांचें एकमत झालें असतें, यांत मुळींच संशय [illegible]. परंतु, तो ठराव सरकारनें मान्य होऊनच [illegible], कोणीं विरुद्ध नाहीं [illegible] मतें न घेतां, तो [illegible]

[illegible] सरकारी सभासद निरनिराळ्या खा-[illegible] अधिकारी असतात. परंतु, हल्लींच्या पद्धती [illegible], [illegible] पुष्कळांचा अर्थाअर्थी संबंध नसतो, [illegible] विवाद त्यांना सतत ऐकत [illegible] [illegible], ही वेळ त्यांची [illegible] [illegible]

त्यांच्या हातून होत नाहीं, हा एक नवीन पद्धतींत मोठा दोष आहे; व तो काढून टाकण्याची तजवीज करावी लागणार आहे. पार्लमेंटांतील लोकप्रतिनिधींनींच नव्हें, तर राज्यव्यवस्थेंतील सर्व मोठमोठ्या खात्यांच्या कायम अधिकाऱ्यांनीं पार्लमेंटांतील वादविवाद ऐकत बसलें पाहिजे, अशासारखा प्रकार हिंदुस्थानांत आहे. शिवाय, प्रधानमंडळीच्या खासगी खोल्या, लायब्ररी, तंबाखू ओढण्याच्या व विश्रांति घेण्याच्या जागा वगैरे ठिकाणीं, मतें घेण्याची वेळ येईपर्यंत मध्यंतरीं सांपडणाऱ्या वेळांत, स्वस्थपणानें हापिसचें काम करण्याची जशी विलायतेंत सोय आहे, तशीहि तेथें नाहीं. पण इतक्यानेंच संपलें नाहीं. तर, हिंदुस्थानांतील थोड्या दिवसांच्या **हिंवाळ्यांतच**, खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांस बाहेर फिरतीवर जाऊन, आपल्या ताब्यांतील खात्याची वार्षिक तपासणी करणें शक्य असतें; व त्याप्रमाणें वहिवाटहि आहे. पण, ह्याच मुदतींत कौन्सिलची बैठक असते. ह्या असंबद्धपणाचा कळस सेनाधिपति व त्यांचे मुख्य मदतनीस यांच्या बाबतींत झाला आहे. सैन्यासंबंधाचे प्रश्न चर्चेसाठीं वरिष्ठ कौन्सिलांत आणण्याची परवानगी नाहीं. परंतु, सरकारपक्षाला आपल्या मतांची केव्हां गरज पडेल ह्याचा नेम नाहीं, ह्मणूनच केवळ त्यांना प्रत्येक दिवशीं कौन्सिलांतील वादविवाद ऐकत बसावें लागलें. त्यामुळें, कौन्सिलच्या बैठकींच्या दरम्यान एक दोन वेळां जी कांहीं थोडीशी सवड मिळाली होती, त्यावेळींच कायतें त्यांना बाहेर जाऊन, सैन्यखात्याचें काम पाहतां आलें. परंतु, सर्व वेळ त्यांना कामकाजास खिळून राहावें लागल्यामुळें, बाहेर फिरून सैन्याची [illegible] वगैरे करण्याचें त्यांचें मुख्य काम त्यांनीं वास्तविक

करावयास पाहिजे होतें, तें मुळींच झालें नाहीं. खरोखर ह्मटलें तर, हिंदुस्थानच्या मुख्य सेनापतीनें हिंदी लष्कराशीं जितका संबंध ठेवितां येईल, तितका ठेवण्याची हल्लीं जशी आवश्यकता आहे, तशी बंडाच्या वेळेपासून आजपर्यंत कधींच नव्हती, असें सर्व लोकांचें ह्मणणें आहे. तशांत, हल्लींचे सेनापति सर ओमूर क्री साहेब तर हिंदी लष्कराला फारच प्रिय आहेत. ह्मणून, त्यांच्यासारख्या सेनापतीनें हिंदी लष्कराचा परिचय करून घेणें विशेष महत्वाचें आहे, असें ह्मटलें पाहिजे.

वरिष्ठ कौन्सिलचें काम चालण्याच्या हल्लींच्या पद्धतींतील दुसरा ढळढळीत दोष ह्मटला ह्मणजे, कौन्सिलच्या बैठकी अनियमित वेळीं झाल्याकारणानें, बाहेरील प्रांतांतून येणाऱ्या सभासदांची मोठी गैरसोय होते. दोन बैठका होण्याच्या दरम्यान एकतर त्यांना कलकत्त्यास रखडत बसून, आपल्या घरच्या कामाचें नुकसान करून घ्यावें लागतें; अथवा दुसरा मार्ग ह्मणजे, आपलें घर आणि राजधानीचें ठिकाण यांमध्यें, इकडून तिकडे आणि तिकडून इकडे, असा रेलवेचा प्रवास करण्यांत दिवसांचे दिवस घालवावे लागतात. कारण, हिं[illegible] विस्तीर्ण देशांत, २४ तासांहून कमी प्रवास कधीं घडला, असें होत नाहीं ह्मटलें तरी चालेल. उदाहरणार्थ, कलकत्त्या[illegible]न मुंबईस [illegible]ण्यास जवळ जवळ ४८ तास खर्च करावे [illegible] हल्लींची व्यवस्था बदलून, सर्व [illegible] [illegible] कौन्सिलचें सर्व काम, [illegible] [illegible]

लच्या सभेला हजर राहण्याचे बंद होतील. कारण, त्यांना स्वतःचीं पुष्कळ मोठालीं कामें असून, त्यांची त्यांना हेळसांड करितां यावयाची नाहीं. आणि, असे सभासद कौन्सिलला येईनासे झाले, ह्मणजे त्याचें खरें प्रातिनिधिक स्वरूप बरेंच नष्ट होऊन जाईल इतकेंच नाहीं, तर राजकारणांत पडण्याचा ज्यांचा केवळ धंदाच आहे, अशा लोकांचें खास वर्चस्व होऊन, कौन्सिलचा सध्यांचा सर्व चांगुलपणा लयास जाईल. कौन्सिलच्या कामाचा समारोप करितांना, ही अडचण कांहींशी दूर करण्याकरितां, लॉर्ड मिंटोसाहेबानीं एका नवीन योजनेचें स्वरूप सभासदांना समजावून दिलें. परंतु, ही योजना इष्ट हेतु कसातरी तडीस नेईल किंवा नाहीं, ह्याबद्दल शंका आहे. दुसरी विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, कौन्सिलचें काम चालत असतांना, व्हाइसराय साहेबांनीं स्वतः अध्यक्ष-स्थान स्वीकारणें इष्ट आहे कीं काय? ह्या कामाकडे लागणारा वेळ तिकडे देण्याची जरी त्यांना सवड असली, तरी बादशा-हाच्या प्रत्यक्ष प्रतिनिधीनें सार्वजनिक वादविवादाच्या समरांगणांत येणें बहुतकरून वाजवी होणार नाहीं, असें दिसतें. दिवसेंदिवस कौन्सिलच्या कामांतील घासाघीस वाढतच जाणार आहे; व काम चालतेवेळीं नानातऱ्हेचे मोठे नाजुक प्रश्न उपस्थित होऊन, त्यांचा निकाल अध्यक्षांनाच करावा लागेल. आतां, ह्या गोष्टी अशा आहेत कीं, त्यांचा निकाल, क्षणाचाहि विलंब न करितां, तात्काळ करून टाकला पाहिजे. तेव्हां, चांगला विचार करण्यास वेळ न मिळतां, व्हाइसरायसाहेबास आपल्या [illegible] मोठ्या [illegible] उपयोग अशा रीतीनें करावा लागावा, हें

हीं नवीन कौन्सिलें करण्याचा एक मुख्य हेतु असा आहे कीं, हल्लीं त्या ठिकाणीं सार्वजनिक कामाची पूर्ण चर्चा करण्यास उत्तम संधी मिळत असल्याकारणानें, तिच्यापासून एकंदर हिंदुस्थानदेशांतील लोकांस राज्यव्यवस्थेची चांगली माहिती होत जावी. परंतु, ह्या वादविवादाची पाहिजे तितकी प्रसिद्धि झाली नाहीं, तर मात्र हा हेतु सफल होणार नाहीं. यंदाच्या (१९१०) हिंवाळ्यांतील कौन्सिलच्या कामाची प्रसिद्धि निखालस चांगल्या रीतीनें झाली नाहीं. ग्यालरींत बसून सभेच्या कामाची हकीकत नीटरीतीनें घेण्याची विद्या अझून इकडे अगदीं बाल्यावस्थेंत आहे इतकेंच नाहीं, तर आपल्या पक्षाच्या तेवढ्या सभासदांचीं भाषणें समग्र देऊन व विरुद्ध बाजूचीं अजीबात गाळून टाकून, अथवा अगदींच संक्षिप्त रीतीनें देऊन, कौन्सिलचें काम म्हणजे केवळ क्रिकेटसारखा खेळ आहे, असें मानण्याची जी प्रवृत्ति हिंदी वर्तमानपत्रकर्त्यांच्या ठिकाणीं दिसून येते, ती सोडून देण्यास त्यांना शिकावयाचें आहे. हा दोष [illegible] उदाहरण बंगाली पत्रांत [illegible] आहे. मि० भूपेंद्रनाथांच्या बंगालच्या फाळणीवरील भाषणांतील मोठमोठाले भाग, व्हाइसरायसाहेबांच्या आज्ञेवरून, त्यांना पुष्कळ वेळां गाळून टाकावे लागले होते. तरीपण, ह्या राष्ट्रीयपक्षाभिमानी पत्रानें, [illegible] बिलकुल लक्ष न देतां, तें भाषण आपली [illegible] भूपेंद्रनाथांनीं मूळ तयार केलें होतें तसेंच [illegible] आणि, ह्या प्रश्नावरील [illegible] मात्र [illegible] आल्या. [illegible] सरकारी [illegible]

ज्यांचें काम आहे, असे मि. लॉयन व इतर हिंदी सभासद यांनीं भाषणें करून, सरकारावरील ह्या बाबतींतील आक्षेपांचें जसें उत्तम तऱ्हेनें निराकरण केलें होतें, तसें कौन्सिलच्या ह्या बैठकींत दुसऱ्या कोणत्याहि आक्षेपासंबंधानें झालें नाहीं ह्मटलें तरी चालेल. आतां, हा असा मुद्दाम पक्षपात केल्याचीं उदाहरणें जरी बाजूस ठेविलीं, तरी पुढें कौन्सिलांत होण्याऱ्या भाषणांच्या नकला अगोदरच वर्तमानपत्रांना देण्याची पद्धत बंद करून टाकण्यासाठीं जोरानें प्रयत्न केले पाहिजेत. आपले टीकाकार नक्की काय बोलणार आहेत, हें आगाऊ समजल्यापासून खरोखर फायदा होतो किंवा नाहीं, ह्या-बद्दल मोठा संशय आहे; व कदाचित् ह्यापासून फायदा असला, तरी त्याची आह्मांस मुळींच गरज नाहीं, असें पुष्कळ सरकारी सभासदांचें मत आहे. आणि, ही चाल एकदां बंद झाली, ह्मणजे आयासावांचून मिळालेल्या मजकुरास विनाकारण महत्त्व देऊन मोकळे होण्याचा मोह वर्तमानपत्रांस पडणार नाहीं, व कौन्सिलांतील भाषणांचीं सरळ मार्गानें टिपणें करून घेऊन, त्यांवरून तीं छापण्याची कला साध्य करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होईल. त्याचप्रमाणें, हिंदुस्थानसरकारच्या ग्याझेटांत कौन्सिलच्या कामाचे शब्दशः रिपोर्ट प्रसिद्ध होत असतात; पण ते हल्लींप्रमाणें फार उशिरानें प्रसिद्ध केले जाणार नाहींत, अशीहि आशा आहे.

आतां, हे सर्व मुद्दे गौण आहेत. ह्या बैठकीसंबंधानें विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी होती कीं, सभासदांमध्यें [illegible] मोठा मतभेद असला, तरी [illegible] काम साधारणपणें [illegible] — कधींकधीं [illegible] येईल इतक्या [illegible]

एकदोन प्रसंग सोडून दिले, म्हणजे एरव्हीं सर्वदा सर्व मंडळी-कडून परस्परांशीं मोठ्या प्रेमाचें वर्तन होत असे. या सर्व गोष्टींचें श्रेय मि. गोखले यांस न देणें म्हणजे अन्याय करणें, असें होईल. प्रसंग आला म्हणजे सरकारावर कडक टीका करण्यास मि. गोखले कधींहि दयामाया दाखवीत नसत. तथापि, आपलें मन अगदीं ताब्यांत ठेवून, नेमस्तपणानें भाषणें करण्याचा जो अगदीं आरंभापासून त्यांनीं पाया घातला, त्यासच अनुसरून इतर लोकपक्षाच्या सभासदांनीं आपलें वर्तन ठेविलें. सरकारच्या प्रतिपक्षाचें नेतृत्व स्वाभाविकपणेंच मि. गोखल्यांकडे आलें; व त्यांच्या ठिकाणीं असलेल्या बुद्धिसामर्थ्यास साजेशा रीतीनें, सर्वांनीं अटकळ केल्याप्रमाणेंच, त्यानीं हें काम केलें इतकेंच नाहीं, तर आपल्या अंगावरील जबाबदारी व आपली कर्तबगारी यांची पूर्ण जाणीव राखून, मोठ्या सौजन्यानें व आत्मसंयमन दाखवून, सर्वांशीं त्यांनीं वागणूक ठेविली होती. सर्व हिंदी सभासदांपेक्षां त्यांचें बुद्धिवैभव मोठें होतें, इतकेंच नाहीं, तर त्या सर्वांवर त्यांची मोठी छाप असून, त्यांच्या [illegible] होत नसत. दुसऱ्या पक्षीं, यूरोपियन [illegible] व सुस्वभावी असे. [illegible] अडचणीच्या प्रसंगांतून [illegible] विनोदात्मक वादविवादानंतर, [illegible] वेळेस [illegible] मर्यादी-[illegible]

यथायोग्य ह्मटलें आहे कीं, कौन्सिलच्या दिवाणखान्यांत लोकांच्या परस्परभेटीचा योग आला आहे. सरकारी व बिनसरकारी सभासदांच्या गांठीं पडून, उभयतांमध्यें अधिकारामुळेंच कांहीं अंशी जी एक भिंत आजपर्यंत उभी होती व त्यांची एकमेकांपासून तातातूट करीत होतीं, ती आतां ढांसळून पडली आहे. पुष्कळ गोष्टीसंबंधानें त्यांचें एकल संभाषण झालें आहे. आणि, ह्या दृष्टीनें विचार करितां, पुढें जर असाच क्रम राहिला, तर वरिष्ठ कौन्सिल हें लोककल्याणाचें एक मोठें प्रबळ साधन होऊन जाईल.

ह्या विलक्षण सभेच्या बैठकीचा जो ह्याहूनहि खोल अर्थ आहे, त्याविषयीं आतांच बोलण्याची वेळ आली नाहीं, असें वाटतें. आपल्या प्रतिपक्षाचें धोरण काय आहे, हें शोधून काढण्यासाठीं जरी सर्व मंडळी मोठ्या सावधपणानें एकमेकांशीं वागत होती, व अगदीं आरंभापासून अखेरपर्यंत जरी सभेच्या कामांत आश्चर्यचकित करणाऱ्या गोष्टी मुळींच घडून आल्या नाहींत, तरी हिंदुस्थानांतील राज्यकर्ते व प्रजा– किंबहुना हिंदुस्थान व इंग्लंड– यांच्या मधील परस्परसंबंधाच्या बाबतींत महत्त्वाचा फरक घडवून आणण्यास साधनीभूत होणाऱ्या अत्यंत पराक्रमी शक्ती तेथें उत्पन्न झाल्याचें कोणाहि सूक्ष्मदृष्टीच्या प्रेक्षकाच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहिलें नाहीं. आतां, या अद्भुत शक्तींचें स्वरूप जरी अद्यापि बहुतेक अज्ञात आहे, तरी त्या शक्ती लॉर्ड मोर्लेसाहेबाच्या राजकीय सुधारणांमुळेंच निर्माण झाल्या आहेत. आणि, कलकत्त्याच्या वरिष्ठ कायदेकौन्सिलांत त्यांचा प्रभाव अधिक स्पष्टपणें दृग्गोचर होणें हें जरी स्वाभाविक होतें, तरी सुधारून वाढविलेल्या प्रत्येक प्रांतिक कौन्सिलांतहि त्या शक्ती उत्पन्न होऊन राहिल्या आहेत.

ह्या सुधारणांमुळें जो मोठा वाद उत्पन्न झाला, त्यांत जरी साधारणपणें विकारवशता दिसून आली नाहीं, तथापि त्यांतील मुद्यांचा तपशीलवार पाढा वाचण्याचें माझें काम नाहीं. ह्या सुधारणांतील कांहींच्या आवश्यकतेसंबंधानें अथवा त्या घडवून आणण्यांत दाखविलेल्या शहाणपणासंबंधानें सर्वांचीं सारखींच मतें पडतील, असें नाहीं. तसेंच, कित्येक लोकांना असेंहि वाटण्याचा संभव आहे कीं, ज्या मार्गानें आम्हीं मोठ्या झपाट्यानें व फार दूर प्रवास करण्याचें मनांत आणिलें आहे, त्या मार्गानें निर्भयपणें पावलें टाकण्याची योग्यता हिंदी लोकांत आहे, असें अद्यापि तरी त्यांनीं जगाच्या नजरेस आणून दिलेलें नाहीं. तथापि, हिंदुस्थानांतील इंग्रजी राजसत्तेच्या पायास यत्किंचित् धोका न बसूं देतां, अथवा तिचें वर्चस्व बिलकूल कमी न होऊं देतां, येथील राज्यकारभार चालविणें व कायदेकानू करणें ह्या कामांत हिंदी लोकांची सल्लामसलत पूर्वीपेक्षां अधिक ऐकण्याची व्यवस्था करण्यासारख्या अत्यंत कठिण कामांत लॉर्ड मोर्लेसाहेबांनीं, लॉर्ड मिंटोसाहेबांच्या एकनिष्ठ साह्यानें, जी मुत्सद्दगिरी दाखविली आहे, तिची जाणीव नसणारे इंग्रजलोक विलायतेंत किंवा हिंदुस्थानांत कोणी नसतीलच, असें म्हटलें तरी चालेल. दीर्घ-परिणामी सुधारणांच्या जनकाच्या उदार अंतःकरणांत जो आशावाद [illegible] आहे, तो आतां वृद्धिंगत होऊन, त्यास इष्ट अशी गोड फळें [illegible] येतील [illegible] संभवत नाहीं; कारण, ती गोड भविष्यकाळच्या [illegible] आहेत. तथापि, [illegible] गोष्टींचा विचार केला [illegible]

[illegible]

आतां, ह्या सुधारणा किती दीर्घपरिणामी आहेत, हें दाखविण्याकरितां त्यांतील अगदीं ठळक ठळक गोष्टींचा येथें नुसता उल्लेख केला तरी पुरें आहे. ह्या सर्व सुधारणा जरी एकाच स्वरूपाच्या आहेत, तरी विचाराच्या सोयीसाठीं त्यांचे दोन वर्ग करितां येतात, ते असेः— (१) कार्यकारी कौन्सिलांसंबंधाच्या व (२) कायदेकौन्सिलांसंबंधाच्या. पहिल्या वर्गांत खालील सुधारणांचा समावेश होतोः—-

(१) व्हाइसरायसाहेबांच्या कार्यकारी कौन्सिलांत एका हिंदी समासदाची नेमणूक. मि. एस्. पी. सिंह हे बंगाली ब्यारिस्टर असून, त्यांचा धंदा फारच उत्तम चालत होता. ह्यांची नेमणूक न्यायखात्याचे 'मंत्री' ह्मणून वरील कौन्सिलांत करण्यांत आली. मि. सिंह यांनीं आपल्या ह्या अत्यंत महत्त्वाच्या कामांत मोठी हुशारी दाखवून, फार नांवलौकिक मिळविला. त्यामुळें, अशा प्रकारची नवीन पद्धत सुरू करण्याविरुद्ध प्रथमतः जे लोक होते, त्यांच्यापैकीं पुष्कळांच्या मनांतील शंकेचें निरसन होण्यास मोठें साह्य झालें. लॉर्ड मिंटो—साहेबांची कारकीर्द पुरी झाली म्हणजे त्याबरोबरच कांहीं खासगी कारणांमुळें आपण आपल्या जागेचा राजीनामा देणार आहों, असें मि. सिंह यांनीं जाहिर केलें आहे. लॉर्ड मिंटोसाहेबानंतर होणाऱ्या व्हाइसरायांस मि. सिंह यांच्या मदतीचा फायदा मिळणार नाहीं, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. (मि. सिंहाच्या मागून, मि. अली इमाम यांची नेमणूक कार्यकारी कौन्सिलांत झाली आहे.)

(२) मुंबई व मद्रास येथील गव्हरनरांच्या कार्यकारी [illegible] एकेक हिंदी समासदाची नेमणूक. [illegible], व मि. एस्. पी. चौबळ यांची मुंबईस [illegible]

झाली आहे. बंगालच्या ले० गव्हरनरास कार्यकारी कौन्सिल देण्याचें घाटत आहे; व त्याप्रमाणें कायमची व्यवस्था झाल्याबरोबर, त्यांतहि एका हिंदी सभासदाची नेमणूक होणार आहे. त्याचप्रमाणें, हिंदुस्थानच्या इतर मोठमोठ्या प्रांतांत अशीं कौन्सिलें स्थापन करण्याचा जो अधिकार सरकारच्या हातीं आहे, त्याची अमलबजावणी सुरू झाल्यावर, त्याहि [illegible] हिंदी लोकांचा शिरकाव होईल.

(३) लंडनमध्यें, सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या, "इंडिया कौन्सिल" या नांवानें बहुधा प्रसिद्ध असलेल्या कौन्सिलांत, एक हिंदु व एक मुसलमान अशा दोन सभासदांची नेमणूक. स. १९०७ सालीं, लॉर्ड मोर्ले यानीं मि. के. जी. गुप्त व मि. हुसेन बेलग्रामी, ह्या दोघांची नेमणूक केली. १९१० च्या आरंभींच, प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें मि. बेलग्रामी यानीं आपल्या जागेचा राजीनामा दिला; व त्यांच्या जागेवर मि. एम्. ए. अली बेग यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

तात्विकदृष्ट्या विचार करितां, ब्रिटिश राज्यकारभाराच्या [illegible], अशा रीतीनें हिंदी लोकांचा जो प्रवेश झाला आहे, तो लॉर्ड [illegible] यांनी म्हटल्याप्रमाणें, एक [illegible] नवीन परिणाम [illegible] आहे. तथापि, १९०९ च्या [illegible] कायद्यानें, वरिष्ठ व प्रांतिक कौन्सि- [illegible] जी ही नेमणूक झाली असेल, त्यांना [illegible]

आहे. ह्मणजे, वरिष्ठ कौन्सिलांत २१ सभासदांच्या ठिकाणीं आतां ६० पर्यंत सभासद येऊं शकतात; मद्रास व मुंबई येथील कौन्सिलांत २४ च्या ठिकाणीं पराकाष्ठा ५०; व बंगालच्या कायदेकौन्सिलांत २० च्या ठिकाणीं ५०, असे सभासद झाले आहेत. जुन्या कायद्याप्रमाणें, ह्या वरील सर्व कौन्सिलांत फक्त ३९ लोकनियुक्त सभासद येण्याची सवड होती; परंतु आतांच्या नवीन कायद्याप्रमाणें, एकंदर मिळून १३५ लोकनियुक्त सभासद पुढें येण्याची सोय झालेली आहे. तात्पर्य, पूर्वीपेक्षां पुष्कळच मोठ्या प्रमाणावर आतां लोकप्रतिनिधींचा कौन्सिलांत शिरकाव होण्यास जागा झाली आहे. तथापि, केवळ लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढली आहे ह्यापेक्षां, त्यांचे सरकारी सभासदांशीं प्रमाण ठेवण्यांत जें अत्यंत प्रगतिपर धोरण स्वीकारण्यांत आलें आहे, तें फार महत्त्वाचें आहे. ह्यापुढें, फक्त वरिष्ठ कौन्सिल खेरीजकरून, दुसऱ्या कोणत्याहि कौन्सिलांत सरकारी सभासदांची संख्या अधिक असणार नाहीं; आणि, वरिष्ठ कौन्सिलांत सुद्धां सरकारी सभासदांची संख्या थोडीशी अधिक ठेवण्यांत आली आहे, ती केवळ लॉर्ड मोर्ले साहेबांच्या आग्रहामुळेंच ठेविली आहे. खुद्द लॉर्ड मिंटो साहेबांचा विचार तर असेंहि करण्याचा नव्हता. निवडणुकीचे संघ व तिची पद्धत, ह्या संबंधाच्या नियमांत नावाजण्यासारखा लवचीकपणा ठेविला आहे, तो ठिकठिकाणच्या परिस्थितीस अनुरूप असाच आहे. आणि, सर्व मुख्य मुख्य जातींच्या व धंद्यांच्या लोकांना वाजवी तितके आपले प्रतिनिधी [illegible] कौन्सिलांत पाठविण्याचा हक्क [illegible] तितकी काळजी घेतली आहे. [illegible] हिंदुस्थानच्या [illegible]

असून, तीमुळें त्यांचे पुष्कळच पोटभाग झाले आहेत. आतां, ही गोष्ट जर लक्ष्यांत ठेविली, तर सर्व हिंदी लोकांचें मत क्वचित् अगदीं बरोबर जुळून येण्यासारखे, बहुतेक असंभवनीय, असे प्रसंग वगळले असतां, सर्व लोकनियुक्त सभासदांचें एकमत होऊन, ते सरकारी सभासदांच्या मनांत नसतील ते ठराव पास करून घेतील, हें फारच असंभाव्य दिसतें. आणि, ज्या प्रसंगीं असें त्यांचें एकमत होईल, त्या प्रसंगीं अशा विलक्षण गोष्टीकडे सरकार दुर्लक्ष करील, हें तर अधिकच असंभवनीय आहे. तथापि, पक्षभेदाच्या जोरामुळें एखादे वेळीं वितंडवादानें सरकारविरुद्ध बहुमत झाल्यास, त्याचा प्रतिकार करितां यावा म्हणून, प्रांतिक सरकारच्या हातीं व अखेरीस गव्हरनर-जनरल-इन-कौन्सिल यांच्या हातीं, कायदेकौन्सिलांतील ठराव रद्द करण्याचा अधिकार ठेविला आहेच.

म्हणून, १९०९ सालच्या "कौन्सिलें सुधारण्याच्या कायद्या"नें हिंदी कायदेकौन्सिलांच्या [illegible] [illegible] [illegible] झालें आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं. या कौन्सिलांत अत्यंत महत्त्वाचें म्हणजे वरिष्ठ-कौन्सिल, या संबंधानें आमच्या २७ नोवेंबर १९०८ च्या खलित्यांत लॉर्ड मोर्ले-साहेबांनी अगदीं स्पष्टपणें खुलासा करण्याची खबरदारी घेतली होती. [illegible]

जनरल यांच्या) कायदेकौन्सिलाची व कार्यकारी कौन्सिलाची रचना अशीच असली पाहिजे कीं, बादशाहाचा राज्यकारभार चालविणारें प्रधानमंडळ व इंग्लंडची पार्लमेंटसभा, या उभयतांच्या धोरणाप्रमाणेंच हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्याची जी जबाबदारी आपल्यावर व आपल्या कौन्सिलावर आहे, ती निरंतर अबाधितपणें बजाविली जावी." ह्मणजे, हिंदुस्थान सरकारचें कार्यकारी कौन्सिल, आजपर्यंतच्या वहिवाटीप्रमाणेंच, फक्त विलायतसरकारास जबाबदार असून, वरिष्ठ कायदेकौन्सिलचा त्यावर प्रत्यक्षपणें कोणताहि ताबा नाहीं. आणि, हाच नियम प्रांतिक सरकार व त्यांचीं कौन्सिलें ह्यांस अवश्य ते शद्बांचे फेरफार केले ह्मणजे लागू पडतो.

परंतु, सरकारच्या धोरणाची चर्चा करण्याची व राज्यकारभाराच्या आणि कायदेकानू करण्याच्या कामीं आपल्या मतांचा ठसा सरकारच्या कृत्यांवर उमटविण्याची जी अपूर्व संधि, १९०९ सालच्या "हिंदुस्थानच्या कौन्सिलांच्या कायद्या"-मुळें, लोकनियुक्त व बिनसरकारी सभासदांस मिळाली आहे, त्यामुळें सरकार व कायदेकौन्सिलें यांच्यामधील परस्परसंबंधांत अप्रत्यक्षपणानें पुष्कळच तफावत पडली आहे. पुरवणी प्रश्न विचारण्याचा आणि बजेटाच्या बाबतींतच नव्हे, तर कांहीं मुद्दाम वगळलेल्या गोष्टी खेरीजकरून, बाकीच्या बहुतेक सार्वजनिक बाबतींत ठरावरूपानें सरकारास सूचना करण्याचा जो अधिकार मिळाला आहे, त्यामुळें हिंदी कायदेकौन्सिलांच्या कामाची मर्यादा पूर्वीपेक्षां आतां फारच विस्तृत झाली आहे, यांत संशय नाहीं; आणि, नवीन सवलतींमुळें [illegible] लेखन, सरकारच्या कृत्यांवर [illegible]

शक्ति अस्तित्वांत आणणें वा न आणणें, ही गोष्ट सभासदांच्या कर्तृत्वावर, व प्रसंगीं युक्ति काढून आपला कार्यभाग उरकून घेण्याच्या त्यांच्या अंगच्या सामर्थ्यावर बरीचशी अवलंबून राहील. मद्रासचे एक हिंदु वर्तमानपत्रकार मि. रंगस्वामी आयंगार हे आपल्या एका अत्यंत मनोरंजक व निःपक्षपाती लेखांत ह्या सुधारणांसंबंधानें असें म्हणतात कीं, "आतां कौन्सिलांस जे अधिकार मिळाले आहेत, त्यांचा उपयोग काळजीपूर्वक, शहाणपणानें आणि सारासारविचार करून झाला, तर "हाऊस ऑफ कामन्स"–प्रमाणें आहि कौन्सिलांत नवीन परिपाठ व कामाच्या पद्धती हळू हळू सुरू होतील; आणि, अशा रीतीनें, त्यांचा सरकारावर प्रत्यक्ष ताबा जरी बसला नाहीं, तरी राज्यकारभाराचें धोरण व सरकारची कृत्यें ह्यांस योग्य वळण लावून, त्यांना सुमार्गे चालविण्याचें काम निदान करण्यास हे अधिकार साधनीभूत होतील. हल्लीं, हिंदुस्थान सरकारची कायदेमंडळें ज्या रचना करून दिली आहे, त्यावरून [illegible] सरकारवर ताबा मिळणें अगदीं अशक्य आहे."


[illegible] नवीन नियम ठरले आहेत, [illegible] आहे. पूर्वी [illegible] मंजूर [illegible] नाहीं; परंतु, [illegible] [illegible]

सार्वजनिक खर्च कसा करावयाचा, ह्यासंबंधानें सरकार त्यांना आपल्या विश्वासांत घेईल. वसुलाच्या महत्त्वाच्या बाबी अझूनहि कौन्सिलांच्या अधिकाराच्या मर्यादेबाहेर ठेवण्यांत आल्या आहेत, ह्यांत संशय नाहीं. परंतु, मुद्दाम वगळलेल्या बाबी खेरिजकरून, बाकीच्या कोणत्याहि बाबींसंबंधानें ठरावरूपानें आपलें मत नमूद करून ठेवण्याचा सभासदांस हक्क आहे; आणि, अंदाजपत्राच्या पहिल्या दोन वाचनांच्या वेळीं जे ठराव पास झाले असतील, त्यांप्रमाणें फेरफार करण्यास सरकार कां तयार नाहीं, ह्याचीं कारणें खुलासेवार सांगण्यास सरकारचे फडणीस बांधले गेले आहेत. अशा प्रकारच्या ज्या नवीन सवलती मिळाल्या आहेत, त्यांचा उपयोग सभासदांकडून वाजवी रीतीनें व व्यवहारास धरून असा झाला, तर त्यापासून पुष्कळच फायदा होणार आहे. कारण, मि. आयंगार यानीं ह्मटल्याप्रमाणें, "स्पष्टपणानें मान्य केलेल्या सनदशीर हक्कांपेक्षां, राज्यकारभाराच्या ज्या वहिवाटी हळू हळू पडत जातात, त्यांच्या-वरच सनदशीर राज्याची प्रगति अवलंबून असते."

सुधारणांच्या कायद्याच्या पहिल्या कच्च्या खर्ड्याचें स्वरूप लॉर्डांच्या सभेस समजावून देण्यासाठीं, लॉर्ड मोर्ले यानीं जें मोठें भाषण केलें, त्यांत विशेष अर्थपूर्ण असा एक भाग होता, तो असा— "निदान आतां तरी दुसरी कोणतीहि गोष्ट करणें शक्य नाहीं. ह्या सभेच्या एका प्रख्यात सभासदानें एके वेळीं ह्मटल्याप्रमाणें, एका [illegible] झालेल्या समाजाच्या पुनर्घटनेचें अत्यंत मोठें आणि प्रचंड काम करणें चाललें [illegible] देण्याचा [illegible] करित आहों [illegible]

जशी स्थिति होती, त्याच स्थितींत हिंदुस्थान आमच्या हातीं आलें; आणि, ज्याला आपण हिंदुस्थान ह्मणतों, तो देश ह्मणजे नानाविध जातींच्या व पंथांच्या लोकांचा एक भव्य समाज असून, पांचव्या शतकांतून निघून विसाव्या शतकांत येण्याच्या लांब प्रवासाचें काम हळू हळू व कमी अधिक लांबीच्या पल्यांनीं चाललें आहे, असें आज दृष्टीस पडतें. हें काम प्रचंड तर खरेंच; परंतु, सहानुभूति, राजकीय शहाणपण, धैर्य, मानवजातीबद्दल प्रेम, कर्तव्यनिष्ठा, व राष्ट्रीय थोरवी इत्यादि भावनांनीं प्रेरित होऊन, ह्या प्रवाशांस त्यांचा खडतर मार्ग कंठण्याच्या कामीं वाटाड्या होणें, हें काम अत्यंत वैभवयुक्त आहे, असें खास ह्मणतां येईल". ह्या कामीं आह्मांस यश येणें न येणं हें सुशिक्षित हिंदी लोकांनीं निष्ठापूर्वक केलेल्या साह्यावर बहुतेक अवलंबून राहणार. आपणांस उच्च प्रतीचें शिक्षण मिळालें असल्याकारणानें, आपण ह्या विसाव्या शतकाचें द्योतक आहों, असें त्यांचें ह्मणणें आहे. दररोजच्या राज्यकारभाराच्या कामांत, आणि ह्याहूनहि पुष्कळ घोंटाळ्याच्या कायदेकानू करण्याच्या कामांत हिंदी लोकांचा आजपर्यंत जितका निकट संबंध होता, त्यापेक्षां राज्यव्यवस्थेशीं त्यांचा पुष्कळ पटीनें अधिक निकट संबंध घडवून आणण्याचें आपलें वचन पाळण्यांत, लॉर्ड मोर्ले--साहेबांनी कंजुषपणा दाखविला नाहीं. पण आतां, त्यांच्या आशा सफळ करून दाखविण्याचें काम कार्यकारी व कायदे कौन्सिलांतील हिंदी समासदांच्याच हातीं आहे. सुधारणांमुळें हिंदीलोकांस जीं नवीन साधनें [illegible] झालीं आहेत, त्यांचा उपयोग त्यांनीं केवळ पर-

कारचीं कृत्यें हाणून पाडण्याकरितां टीका करणें व दुष्टपणानें त्यांच्या कामांत अडथळा आणणें, ह्यासाठीं न करितां, हिंदुस्थानच्या इंग्रज राज्यकर्त्यांस शहाणपणानें साह्य करून, लोकहिताच्या नवीन नवीन गोष्टी घडवून आणण्यासाठीं करावा. इंग्रज लोकांचे कांहींहि दोष असोत; परंतु, केवळ त्यांच्यामुळेंच विसाव्या शतकाचा वारा हिंदुस्थानांत वाहूं लागला आहे, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे.



भाग १४ वा.

निराश्रित वर्ग.



वाढविलेल्या कौन्सिलांमध्यें ज्या वर्गांचे खरे प्रतिनिधी येण्याची मुळींच सोय झालेली नाहीं, असा वर्ग ह्मणजे निराश्रित या नांवाखालीं मोडणारा व कायाडकष्ट करून पोट भरणारा कोट्यावधि लोकांचा समुदाय होय. हिंदुस्थानांतील सध्यांच्या सामाजिक स्थितींत असें घडणें बहुतेक अपरिहार्य होतें. ह्या सर्व लोकांची गणना खानेसुमारीच्या वेळीं हिंदु ह्या सदराखालीं होऊन, त्यामुळें एकंदर हिंदु— लोकांची संख्या फुगून जाते, हें वाजवी नाहीं. आणि, अशा लोकसंख्येच्या मानानें हिंदुलोकांस प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क मिळाला पाहिजे, असें हिंदु राजकारणी पुरुषांचें ह्मणणें असतें खरें; परंतु, निराश्रित लोकांसंबंधानें बोलण्यास आपणांस कांहींतरी हक्क पोहोंचतो, असें ह्या राजकारणी पुरुषांनीं अद्यापितरी खास दाखविलेलें नाहीं. हिंदुस्थानांतील २० (!) कोटी हिंदूंपैकी ५ कोटी लोकांची, हिंदुधर्मांतील निर्बंधांमुळें इतकी हीन–स्थिति झाली आहे कीं, तिचें वर्णन देखील करवत नाहीं. ह्या निराश्रित लोकांची अशी स्थिति ज्या सामाजिक व्यवस्थेमुळें झाली आहे, ती फार वाईट आहे, असें नुसतें तोंडानें ह्मणून, नक्राश्रु गाळण्यापलीकडे, हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेनें, आपल्या २५ वर्षांच्या ह्यातींत, ह्या हतभागी लोकांची स्थिति सुधार—

कांहीं प्रयत्न केला आहे, असें मुळींच दिसत नाहीं. ह्मणून, "आह्मी अत्यंत सुधारलेल्या, प्रगतिप्रिय व राष्ट्रीय अशा हिंदु– धर्माचे प्रतिनिधी आहों," अशी जी प्रौढी ही **राष्ट्रीय सभा** मारून, आपल्या उदारतेचें व लोकहितदक्षतेचें प्रदर्शन करित असते, तिच्याशीं वस्तुस्थितीचा जितका विरोध आहे; तितका इतरत्र आढळून येत नाहीं. हल्लींप्रमाणेंच, आणखी पुढेंहि पुष्कळ वर्षें, **निराश्रित** लोकांना असा अनुभव येण्याचा संभव आहे कीं, कौन्सिलांमधील यूरोपियन सभासद हेच आपले खरे–खरे मित्र, व आपलें हित पाहण्यास सर्वस्वी योग्य असे प्रतिनिधी होत. कारण, हे लोक परदेशस्थ असल्या-मुळेंच, ज्या हितसंबंधामुळें किंवा पूर्वग्रहांमुळें हिंदुसमाजांत अनेक अभेद्य तट (जाती) पडत जातात, त्यांच्यापासून ते अगदीं अलिप्त असतात. आतां, ह्या गोष्टीबद्दल जर कोणास शंका असेल, तर त्यानें ' सुधारणा ' ह्या प्रश्नासंबंधाच्या सरकारी कागदपत्रांचीं जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, तीं चाळून पाहावीत; ह्मणजे, " हिंदुब्राह्मणांच्या हातीं आमचें हित पाहण्याचें व आमच्या हक्कांचें संरक्षण करण्याचें काम देऊं नका; तर, ब्रिटिश राज्यकर्त्यांकडूनच ज्याप्रमाणें आमचें आज-पर्यंत प्रत्यक्ष व निःस्वार्थबुद्धीनें रक्षण होत आलें आहे, तोच क्रम पुढेंहि चालू ठेवण्यांत यावा ", अशा तऱ्हेचे अर्ज ह्या निराश्रित लोकांकडून सरकारास झाले होते, असें पाहणारास दिसून येईल.

निराश्रित लोकांस आपण साधारणपणें पारिया ह्या नांवानें ओळखतों. परंतु, वास्तविक पाहतां, पारिया हें नांव फक्त एका विशिष्ट जातीचें– ह्मणजे दक्षिण हिंदुस्थानांतील [illegible]

लोकांचें-आहे. निराश्रित वर्गांमध्यें, हिंदु समाजांतील चार उच्च अथवा शुद्ध जातींच्या बाहेरील सर्व हिंदुलोकांचा समावेश होतो. आणि ह्मणूनच, ह्या सर्वांचा आतां सरकारी कागदपत्रांत पंचम ह्मणजे 'पांचवी जात', ह्या चांगल्या दिसणाऱ्या नांवानें उल्लेख होत असतो. पुष्कळ पंचम लोकांची— विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांतील पंचमांची— स्थिति बहुतेक गुलामगिरीची आहे. कित्येकांस ते जे धंदे करितात, त्यामुळें अशा प्रकारचा बहिष्कार पडला आहे. असे लोक ह्मणजे निव्वळ भंगी व झाडूच होत असें नाहीं; तर चामड्याचा धंदा करणारे, ह्मणजे उत्तर आणि मध्य हिंदुस्थानांतील चांभार व मोची, आणि दक्षिण हिंदुस्थानांतील चाकिली व मादिगा, ह्यांचाहि समावेश त्यांत होतो. ह्या लोकांची एकंदर संख्या जवळजवळ दीड कोट आहे. शिवाय, धोबी, भंडारी, कोळण (दारू विकणारे), तेली व कित्येक ठिकाणीं तर धनगर व मेंढपाळ, हे सर्व लोक निराश्रित वर्गांत मोडतात; उच्च जातींचे हिंदुलोक त्यांना अस्पृश्य मानितात. हजारों वर्षांपूर्वीं, ज्या मूळच्या लोकांस आर्यांनीं पादाक्रांत केलें, त्यांचेच वंशज हे लोक आहेत, असा सर्वसाधारण समज आहे. मूळच्या रानटी लोकांच्या सर्व जातींस खानेसुमारीच्या वेळीं ॲनिमिस्ट ह्या सदराखालीं एकत्र घातलें असून, त्यांची संख्या ८५ लाखांजवळ आहे. हे अद्यापि हयात असलेले मूळचे लोक दूर जंगलांतून दरीखोऱ्यांत व पाहाडी प्रदेशांत राहत असून, त्यांचा अद्यापिहि हिंदुसमाजांत समावेश झालेला नाहीं. हे लोक [illegible] 'दगडमाती' वगैरेसारख्या [illegible] मूळ [illegible] विश्वास ठेवणें, [illegible]

च्याच रानटी चालीरीतीस फारच महत्त्व देतात. ह्या लोकांची सामाजिक स्थिति कनिष्ठ प्रकारची आहे खरी; तथापि, ती जवळजवळ **पंचम** लोकांच्या स्थितीप्रमाणेंच आहे, असें ह्मटलें तरी चालेल. आतां, ह्या **पंचम** लोकांना हिंदुसमाजाच्या अगदीं खालच्या पायरीवर जागा मिळालेली आहे, तरी हिंदुधर्मांतील उच्च प्रतीच्या विद्याचारसंपन्नतेचा त्यांना मुळींच फायदा मिळत नाहीं, किंवा हिंदूंच्या देवळांच्या उंबरठ्याशींहि त्यांना येण्याची परवानगी नाहीं.

हिंदुधर्मामध्यें ताठपणा आहे, ही गोष्ट खरी आहे; तरीपण त्यांत इतका लवचीकपणाहि आहे कीं, त्यामुळें **पंचम** जातींच्या लोकांची हळू हळू स्थिति सुधारत जाण्यास, मुग्धपणानें कां होईना, पण सवड मिळते; व अशा रीतीनें त्यांना आपल्या अंगावरील **अशुद्धतेची** कात कांहींअंशीं हळू हळू टाकून देऊन, नीट सांगतां येत नाहीं अशा तऱ्हेचा संबंध ब्राह्मण लोकांशीं सुद्धां ठेवितां येऊं लागतो. **अस्पृश्य** मानिलेल्या लोकांमध्येंहि पुष्कळ भिन्न भिन्न जाती आहेत, ही गोष्ट वाचकास माहीत असेलच. कारण, हळू हळू चढत जाऊन, शेवटीं हलक्या दर्जाच्या शूद्र लोकांत—ह्मणजे शुद्ध चतुर्वर्णांपैकीं अगदीं खालच्या वर्णांत, आपला शिरकाव चोरूनमारून करण्याची जशी एका दिशेनें **पंचमास** आशा आहे, त्याचप्रमाणें दुसऱ्या दिशेनें, गरीबीच्या ओढीमुळें, किंवा समाजांत कांहीं दुर्लौकिक झाल्यामुळें, ब्राह्मणांस आपल्या जातींतून पतन पावण्याची पाळी येते, ती इतकी कीं, त्यामुळें ते श्रीमंत पंचमलोकांच्या घरीं, चांगल्याशा दक्षिणेच्या आशेनें, त्यांचें उपाध्येपण करण्यास तयार होतात; व अशा रीतीनें ह्या पंचमलोकांचा समाजांतील

दर्जा वाढविण्यास ते मदत करितात. ह्यावरून असें म्हणतां येईल कीं, सांप्रत ज्यांना शूद्र मानण्यांत येतें, त्यापैकीं बहुधा निम्मे लोक, पूर्वीं केव्हांतरी, पंचमांत मोडत असावेत. तसेंच, १८ व्या शतकासारख्या जबरदस्त अंदाधुंदीच्या काळांत, 'बळी तो कान पिळी,' असा जेव्हां प्रकार होता, तेव्हां बऱ्याच पंचमांनीं--विशेषतः हलक्या जातीच्या मराठ्यांनी--मर्दुमकी करून, आपणांस नांवारूपास आणिलें; आणि, कांहींनी तर तरवारीच्या जोरावर राज्येंहि कमावली. आणि, अशा प्रकारें ज्या गोष्टी घडून आल्या, त्यांच्यापुढें जुन्या हिंदुधर्माच्या अभिमान्यांस आपली मान वांकवावी लागली. हिंदुस्थानांत ब्रिटिशसत्ता स्थापन झाल्यामुळें, शिक्षणाचा प्रसार होऊं लागला, व सर्व लोकांना समतेनें वागविण्यांत येऊं लागलें, ह्या गोष्टींचा फायदा घेऊन, ज्या कांहीं थोड्या पंचम लोकांनीं आपल्या अंगीं सरकारी नोकरी करण्याची पात्रता आणिली, त्यांच्याहि बाबतींत ह्या वरील प्रकारच्या हिंदुधर्माभिमानी लोकांस अलीकडे मूग गिळून बसावें लागलें आहे.

पण, हे असे अपवाद इतके थोडे आहेत, व ही वर चढत जाण्याची क्रिया (उत्क्रांति) इतकी सूक्ष्मपणानें व मंदगतीनें होत असून, तिच्या मार्गांत इतक्या अडचणी आहेत कीं, त्यामुळें शुद्ध मानलेल्या उच्च जातीतील हिंदू व अशुद्ध मानलेले पंचम, यांच्यामध्यें जें भयंकर अंतर आहे, तें नजरेस येण्यासारखें कमी झालेलें अद्यापि दिसत नाहीं. शिव, काली किंवा हिंदुलोकांचे इतर देव व देवता, यांची [illegible] च्या परिपाठ पंचमांनीं पाळून चालून, तरी [illegible] हिंदूंच्या [illegible]

रांत येण्याची पूर्ण मनाई असून, पूजा-अर्चा वगैरे जी कांहीं करणें असेल, ती लांबूनच करावी लागते. धार्मिक बाबतींतच ह्या पंचमांना अशा अडचणी असतात, असें नाहीं. पुष्कळ खेड्यांतून त्यांना अगदीं गांवाच्या बाहेर एकीकडे राहावें लागतें. त्यांच्या स्पर्शानें विहिरीचें पाणी विटाळेल, ह्या भीतीमुळें त्यांना गांवच्या विहिरींतून पाणी-देखील काढूं देत नाहींत. आणि, ज्या ठिकाणीं अस्पृश्य लोकांकरितां दुसरी विहीर नसते, त्या ठिकाणीं तर त्यांचे हाल कुत्रादेखील खाणार नाहीं. आणि, उन्हाळ्यांत किंवा अवर्ष-णाच्या वेळीं, ओढे, नाले वगैरेसारख्याहि ठिकाणचें पाणी आटून जाऊन, ते अगदीं कोरडे ठणठणीत पडतात, तेव्हां तर त्या बिचाऱ्यांना विशेषच त्रास पडतो. हिंदुधर्माच्या प्रव-र्तकांनीं मोठें डोकें लढवून व पुष्कळ मेहनत घेऊन, जुलमी व निष्ठुरपणाचें धर्मशास्त्र रचून, हल्लींच्या हिंदुसमा-जाची रचना घडवून आणिली आहे; व त्यामुळें, आपल्या दुर्दैवी व कष्टप्रद स्थितीचें बरोबर चित्र, त्या बिचाऱ्या पारियाच्या आयुष्यांतील हरएक प्रसंगीं, त्याच्या डोळ्यांसमोर उभें राहत असतें. माझ्या स्वतःच्या नजरेस जीं एक दोन उदाहरणें आलीं आहेत, तींच फक्त मी येथें सांगतों. ब्राह्मणास विटाळ होऊं नये, ह्मणून एखाद्या पारियानें त्याच्यापासून किती अंतरावर राहिलें पाहिजे, हें त्याच्या (पारियाच्या) अशुद्धपणाच्या प्रमाणावर अवलंबून असतें. ह्या संबंधाचे नियम जरी मोठ्या कांटेकोरपणानें घालून दिले आहेत, तरी आगगाड्या, ट्रामवे गाड्या वगैरेसारख्या अलीकडच्या प्रवासाच्या साधनांत, शिवाशिवीचा गडबडगुंडा

होत असल्यामुळें, वरील नियमांची अमलबजावणी होणें दिवसानुदिवस अधिकच कठिण होत चाललें आहे. तथापि, हिंदुस्थानाच्या दूरच्या भागांत, आणि विशेषतः दक्षिण-हिंदुस्थानांत, हे जुने नियम अद्यापिहि बहुधा पाळण्यांत येत असतात. कांहीं वर्षांमागें, कोचीनमध्यें मी एका पुलावरून जात होतों; आणि, अगदीं माझ्याचपुढें एक संभावित दिसणारा तद्देशीय गृहस्थ चालला होता. इतक्यांत तो एकदम मागें फिरला; आणि, पुलाच्या ज्या टोंकाकडून आम्ही दोघेहि आलों होतों, तिकडे धांवत जाऊन, रस्त्याच्या बाजूच्या जंगलांत शिरला, व अगदीं दिसेनासा झाला. कारण, त्यानें समोरून पुलाच्या दुसऱ्या टोंकाकडून एक ब्राह्मण पुलावर आलेला पाहिला. आतां, तो पूल जरी बराच रुंद होता, तरी त्यावरून ते दोघे जाऊं लागले असतां, ब्राह्मणास विटाळ होऊं नये म्हणून, त्या दोघांमध्यें घालून दिलेल्या नियमाप्रमाणें जितकें अंतर राहिलें पाहिजे, तितकें राहिलें नसतें; आणि मग, जातिनिर्बंधाचा भंग करून पारिया जवळ आल्यानें, त्या उच्चकुलोत्पन्न गृहस्थाचा जो रोष त्याच्यावर झाला असता, तो टाळण्याच्या हेतूनें त्यानें मागें पळ काढला होता; व ही गोष्ट त्याच्याकडून अगदीं स्वाभाविकपणें घडून आली. [illegible] संस्थानांत नेहमी असें दृष्टीस पडतें कीं, कोर्टांत खटला चालू असतां, एखाद्या पंचमाची साक्ष घेण्याची पाळी आली, तर ब्राह्मण न्यायाधीश व ब्राह्मण वकील यांस विटाळ होऊं नये म्हणून, त्या साक्षीदारास न्यायासनापासून सुमारें १०० कदमांवर उभा करितात; आणि मग, न्यायाधीश व तो पारिया साक्षीदार [illegible] शिपाई [illegible], [illegible] [illegible]

ह्या हतभागी लोकांच्या पुष्कळ जातींत गाढ अज्ञान व गलिच्छपणा असून, मनाला किळस आणणाऱ्या अशा कित्येक वाईट संवयीहि त्यांना लागलेल्या असतात; व त्यामुळें, ह्या लोकांना अद्यापिहि गांवाबाहेर एकीकडे कां रहावें लागतें, ह्या गोष्टीचा उलगडा होतो. तथापि, जी समाजव्यवस्था अशा प्रकारची स्थिति उत्पन्न करणारे निर्बंध घालून देते, किंवा अशी स्थिति आली असतां ती सहन करिते, तिच्या मस्तकावरील दोष वरील कारणामुळें निघून जाणें शक्य नाहीं. ख्रिस्ती मिशनरी लोकांनीं जे प्रयत्न करून पाहिले आहेत, त्यांवरून असें चांगलेंच निदर्शनास आलें आहे कीं, ह्या लोकांना प्रेमपूर्वक साह्य केलें, तर त्यांच्यापैकीं अगदीं नीच स्थितींत असलेल्यांची देखील झपाट्यानें सुधारणा होऊन, ते वरच्या पायरीवर येतात. उत्तर हिंदुस्थानांतील निराश्रित लोकांची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून आतां नुकतेच होऊं लागले आहेत; पण, दक्षिणहिंदुस्थानांत ह्मणाल, तर ह्या बाबतींत त्यांच्या प्रयत्नास पूर्वींच चांगलें फळ आलें आहे. मद्रासच्या बिशपसाहेबाचें असें ह्मणणें आहे कीं, गेल्या ४० वर्षांत, नुसत्या तेलंगणांत सुमारें २५०,००० पंचमांनीं ख्रिस्तीधर्म स्वीकारिला आहे. ह्याशिवाय, त्रावणकोरांत १००,००० पंचम ख्रिस्ती झाले आहेत ते निराळेच. विशेषेंकरून गेल्या २० वर्षांत, प्लेग आणि दुष्काळ ह्यांच्या तडाक्यांत लोक सांपडले असतां, भूतदयेनें प्रेरित होऊन, ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं जे प्रयत्न केले, ते चांगलेच फलद्रूप झाले आहेत. कारण, आपण अगदीं अडचणीच्या बिकट प्रसंगांत असतांना, जे लोक आपणांस मदत करण्यास पुढें आले, त्यांच्या धार्मिक गोष्टी देखील ऐकण्यास

आपण तयार झालों पाहिजे, असें पंचमलोकांना वाटणें अगदी स्वाभाविक आहे. बिशप व्हाइटहेड यानी ह्या प्रश्नाचा विशेष अभ्यास करून, तिकडे आपणास्वतःला वाहून घेतलें आहे. त्यानीं मला खात्रीपूर्वक असें सांगितलें की, निदान दक्षिण हिंदुस्थानांत तरी, निराश्रित वर्गांतील लोकांची उन्नति होण्याच्या गतीचा वेग, मुख्यत्वेंकरून, ख्रिस्ती मिशनऱ्यांकडून होणाऱ्या प्रयत्नांवरच अवलंबून आहे. ख्रिस्तीधर्माचीं तत्त्वें काय आहेत, हें जाणण्याची इच्छा करणाऱ्या व तसेंच धर्मांतर करणाऱ्या लोकांच्या वाढत्या संख्येच्या मानानें, जर ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या संस्थास बळकटी आणली व त्यांची संख्या वाढविली; तसेंच, जर मुख्यतः एतद्देशीय शिक्षक तयार केले, तर ह्या सर्व पंचम लोकांच्या सुधारणेचा काळ फारसा लांब नाहीं, अशी ह्या बिशप-साहेबांची पुरी खात्री झालेली आहे. आतां, ह्या गोष्टीचा धार्मिक व सामाजिक दृष्ट्या काय परिणाम होईल, हें तेलगु मिशनच्या ताज्या रिपोर्टावरून समजून घेतां येतें; व त्यांत जें लिहिलें आहे, तें अगदीं बरोबर आहे, असें मोठ्या आनंदानें म्हणणारे पुष्कळ गृहस्थ (मिशनरी नव्हेत असे) मिळतील, असें मला वाटतें:—

गेल्या ४० वर्षांत झालेल्या नैतिक व धार्मिक सुधारणेकडे जर आपण लक्ष पोहोंचविलें, तर मिशनरी लोकांच्या कामाचा परिणाम पाहून मनाला मोठा धीर वाटतो. पंचमलोक स्वभावतःच दरिद्री, घाणेरडे व अज्ञानी आहेत; आणि, शेंकडों वर्षें गुलामासारखी पिरडत आल्यामुळें, त्यांच्या अंगीं काहीं विशेष प्रकारचे दुर्गुण जडलेले असून, त्यावरून त्यांच्या नीच स्थितीचा व [illegible] बोध होतो, हें अगदीं खरें आहे. परंतु त्यांच्या जातीतील अत्यंत आशाजनक गोष्ट अशी आहे की, [illegible] नीच स्थितीची त्यांना पूर्ण [illegible] असून, त्यांतून [illegible]

त्यांच्या कल्याणाविषयीं कळकळ बाळगणाऱ्या व कर्तृत्ववान अशा शिक्षकांच्या देखरेखीखालीं त्यांच्याकरितां **मंडळ्या** स्थापन केल्या, तर त्यांच्या सांपत्तिक, बौद्धिक व नैतिक स्थितींत परिछिन्न सुधारणा दिसून येऊं लागते. त्यांचें गाढ अज्ञान नाहींसें होतें; ते आपलीं शरीरें व राहण्याचीं घरें वगैरे जास्त स्वच्छ व नीट नेटकीं ठेवूं लागतात; गुरांना विष घालणें व शेतांतील धान्याची चोरी करणें, ह्या दोन गुन्ह्यांकडे त्या लोकांची विशेष प्रवृत्ति असते, ती ते सोडून देऊं लागतात; बालविवाह व वेश्यागमन ह्या ज्या वाईट चाली वहुतेक हिंदुलोकांत पडल्या आहेत, त्यांचा ते लोक त्याग करूं लागतात; आपल्यापेक्षां उच्च जातींतील लोकांपुढें नाक घांसून आपण नेहमीं वागलें पाहिजे, अशी जी त्यांच्या मनाची समजूत असते, तिचा जोर बराच कमी पडतो; आणि आपण मनुष्यप्राणी असल्यामुळें, आपले हक्क काय आहेत व त्याबद्दल आपणांस कसा अभिमान वाटला पाहिजे, ह्याची जाणींव त्यांच्याठिकाणीं उत्पन्न होते. भोंवतालच्या परिस्थितींतून जर त्यांना आपली सुटका करून घेतां आली, तर आपल्या देशबांधवांपैकीं जे **उत्तम** ह्मणून गणले आहेत, त्यांच्यापेक्षां बुद्धीनें किंवा नीतीनें आपण यत्किंचित्‌हि कमी नाहीं, असें जगाच्या निदर्शनास ते लोक आणून देतात. विशेषतः, मिशनरी लोकांनीं स्थापन केलेल्या ज्या शाळांस बोर्डिंगें जोडलेलीं असतात, त्याठिकाणीं वरील प्रकार फारच चांगल्या रीतीनें दृष्टीस पडतो. अशा वसतिगृहांतील पंचमांच्या मुलांची नीतिमत्ता इतकी वाढलेली असते कीं, ती पाहून मनाला मोठा चमत्कार वाटतो. पुष्कळ शाळांतून आणि कॉलेजांतून, ख्रिस्ती झालेल्या पंचमांचीं मुलें ब्राह्मणलोकांच्या मुलांच्या बरोबरीनें विद्या संपादन करीत असतात; आणि, कांहीं मुलें तर खरोखरच ब्राह्मणांच्या मुलांना मागेंहि टाकतात.........ख्रिस्ती लोकांपासून शिक्षण मिळाल्यामुळें, पारियांची स्थिति फार सुधारली आहे, ही गोष्ट एका जिल्ह्यांतील हिंदुलोकच स्वतः अगदीं प्रांजलपणें कबूल करितात. ह्या लोकांपैकीं एकजण असें ह्मणाला कीं, "हे लोक ख्रिस्ती होण्यापूर्वी, आह्मांला नेहमीं आपल्या कोठारांस कुलपें लावून ठेवावीं लागत, आणि आमच्या वस्तू नेहमीं चोरीस जात. परंतु, आतां ती स्थिति पार बदलून गेली आहे. आह्मांला आपलीं घरेंदार खुशाल उघडीं टाकतां येतात; व आमचें कांहींएक चोरीस जात नाहीं."

हिंदुलोकांत सामाजिक सुधारणेची चळवळ अगदीं शिखरास पोहोंचली असतांना, ह्मणजे राजकीय चळवळीच्या लोंढ्यामुळें

ती थबकून जाण्यापूर्वी, ह्या निराश्रित लोकांच्या उन्नतीच्या प्रश्नासंबंधानें, सुधारणाप्रिय हिंदुलोकांमध्यें मोठ्या कळकळीनें पुष्कळ वेळां वाटाघाट होत असे. परंतु, हा प्रश्न पुनः हातीं घेऊन, त्यास खरोखरीच कांहीं मूर्तस्वरूप देण्याची मनापासून खटपट, कांहीं कांहीं हिंदु पुढाऱ्यांकडून, आणि विशेषतः नामदार गोखल्यांकडून, अगदीं अलीकडेच कायती होऊं लागली आहे. ह्या प्रश्नासंबंधानें आजपर्यंत पुष्कळ भाषणें झालीं आहेत. परंतु, बडोद्याच्या महाराजानीं दोन वर्षांखालीं जें भाषण केलें, त्यामुळें हिंदुलोकांच्या मनावर जसा परिणाम झाला, तसा इतर कोणत्याहि भाषणानें झाला नाहीं. गायकवाडसरकार हे एक हिंदु राजे आहेत; आणि त्यांचीं मतें फार उदार असून, ते तीं नुसतीं बोलून दाखवून स्वस्थ बसत नाहींत. ह्या निराश्रित लोकांच्या कल्याणाविषयीं त्यांच्या मनाला सारखी तळमळ लागून राहिलेली आहे; व तें अगदीं स्वाभाविक आहे. कारण, अठराव्या शतकाच्या धामधुमीच्या काळांत, ज्या पुरुषानें गायकवाडी स्थापन केली, त्याचा जन्म जरी खरोखर नीच जातींत नसला, तरी मराठ्याच्या एका हीन कुळींत झाला होता. प्रचलित समाजव्यवस्थेच्या अनिष्ट परिणामांवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न महाराज कधींहि करित नाहींत.

आपल्या स्वतःकरितां राजकीय बाबतींत न्याय मागण्याची प्रेरणा ज्या कारणांमुळें होते, त्याच कारणांमुळें सामाजिक बाबतींत एकमेकांशीं न्यायबुद्धीनें वागण्याची प्रवृत्ति आपल्या ठिकाणीं उत्पन्न व्हावयास पाहिजे. ... ... निराश्रित वर्गांची उन्नति करण्याचे प्रयत्न जितके अंतःकरणपूर्वक [illegible] न होतील, त्या मानानें आपल्या राष्ट्रीय आकांक्षा साध्य करून घेण्यास आपण [illegible] आहों, असें समजलें जाईल. ... ... ज्या सामाजिक निर्बंधांमुळें आमच्या समाजांत, [illegible], [illegible]

उंच होत गेलेल्या, अशा असंख्य जाती निर्माण झाल्या आहेत, ते निर्बंधच मुळीं सर्वस्वी अन्यायाचे आहेत. ह्या निर्बंधांमुळें, स्वभावतःच एका योग्यतेच्या असणाऱ्या मनुष्यप्राण्यांत उच्चनीचभाव मानण्यांत आला आहे, व त्यांच्या जाती करून टाकिल्या आहेत. आणि, ह्या अशा जातींची इमारत गुणकर्मांच्या पायावर न उभारतां, केवळ जन्माच्या तळावर रचलेली आहे. ह्मणजे, एखादा मनुष्य यदृच्छेनें श्रेष्ठ मानलेल्या जातींत जन्मास आला, तर तेवढ्याच कारणामुळें, कनिष्ठ मानिलेल्या जातींत जन्म पावणाऱ्या मनुष्यापेक्षां त्याची योग्यता अधिक आहे, असें गृहीत धरिलें जातें. समाजांत आपलें महत्त्व वाढावें, ह्मणून जातीजातींत जे तंटे निरंतर चालू आहेत, ते परस्परांमधील वैमनस्य कायम ठेवण्यास कारणीभूत होतात. ... ...
सर्व निराश्रित वर्ग प्रायः अशिक्षित आहे; परंतु, त्यांना अशी हीनस्थिति प्राप्त होण्याचें कारण त्यांच्यांतील शिक्षणाचा अभाव हें होय, असें ह्मणतां येत नाहीं. कारण, हिंदुस्थानांतील दुसऱ्या पुष्कळ उच्च ह्मणविणाऱ्या जातीहि शिक्षणाच्या बाबतींत अशाच मागासलेल्या आहेत. असें जरी आहे, तरी ह्या लोकांच्या मुलांना साधारण शाळांतून जसें जातां येतें, तसें निराश्रित लोकांच्या मुलांना मात्र जातां येत नाहीं. कारण, त्या लोकांची समजूत अशी असते कीं, ह्या लोकांना स्पर्श करणें हें मोठें पाप असून, तें अत्यंत धर्मबाह्य व अनीतीचें कर्म आहे. उदरनिर्वाहाकरितां कांहीं धंदा करावयाचा असला, तरी ह्या निराश्रित लोकांना फारच थोडे धंदे मोकळे आहेत. कारण, येथेंहि शिवाशिवीची धोंड त्यांच्या मार्गांत आडवी येऊन पडतेच. आतां, तुह्मी कोणत्याहि दृष्टीनें पाहूं लागलात, तरी तुह्मांला असें दिसून येईल कीं, समाजांतील इतर लोकांना ज्या कांहीं साधारण अडचणी असतात, त्या त्यांना असूनहि, शिवाय अस्पृश्यत्व ही एक विशेष अडचण त्यांना सोसावी लागते.

अस्पृश्यत्वाची कल्पना व धर्मगुरूंची असहिष्णुता ह्याविरुद्ध जोराचें भाषण केल्यावर, ह्या भयंकर प्रश्नास तोंड देऊन, व त्यांत पूर्ण मन घालून, त्याचा अगदीं निकाल लावून टाकण्याचें काम हातीं घ्यावें, अशी महाराजांनीं आपल्या भाषणाच्या शेवटीं हिंदुलोकांसच आग्रहाची सूचना केली, इतकेंच नाहीं, तर खुद्द सरकारासहि अखेर विनंति त्यांनीं केली.

सध्यां लोकांच्या विचारांची दिशा कोणती आहे, हें तत्काल समजण्याचीं साधनें पूर्ण अनुकूल असून, नैतिक व सांपत्तिक साधनांचा अमर्याद पुरवठा ज्यांच्यापाशीं आहे, अशा प्रकारचें राज्य सांप्रत हिंदुस्थानामध्यें स्थापन झालें आहे. तेव्हां अशा सरकारानें, सर्व मनुष्यप्राण्यांस कायद्याप्रमाणें समान हक्क आहेत इतकेंच नुसतें ह्मणून व देशांत फक्त शांतता राखून, स्वस्थ बसतां कामा नये. तर, आपल्या प्रजाजनांपैकीं भिन्न भिन्न जातींच्या लोकांना आपआपली उन्नति करून घेण्याचीं साधनें विपुल मिळत आहेत किंवा कसें, हें वेळोंवेळीं पाहण्याची सहानुभूतिपूर्वक दक्षता सरकारनें ठेविली पाहिजे. राज्यकर्त्यांचीं खरीं कर्तव्यें कोणतीं आहेत, ह्याची जागृति ज्या देशी संस्थानांना झाली आहे, त्यांपैकीं पुष्कळांस भोंवतालची परिस्थिति पाहिजे तशी अनुकूल नसल्यामुळें, किंवा मनाला भीति वाटत असल्यामुळें, नवा मार्ग काढण्याचें धैर्य होत नाहीं. आणि, " होईल तेव्हां होईल " असें ह्मणून स्वस्थ राहणें, व प्रजेच्या धार्मिक व सामाजिक बाबतींत—विशेष महत्त्वाचा किंवा भयंकर स्वरूपाचा प्रश्न उपस्थित झाल्याखेरीज--हात न घालतां, त्यांना पूर्ण स्वातंत्र्य उपभोगूं देणें, असें जें सार्वभौम सरकारचें धोरण आहे, त्यासच सर्वस्वी अनुसरून आपल्या संस्थानांचा कारभार करण्यांत, वरील राजेरजवाड्यांस कमी त्रास वाटतो. ज्या अर्थी एकंदर लोकसंख्येपैकीं सहावा भाग अगदीं कायमच्या निकृष्टावस्थेंत असून, अज्ञानांधकारांत लोळत पडला आहे, त्या अर्थी ह्या लोकांच्या उन्नतिप्रीत्यर्थ, शक्य तितके उपाय करण्याची फारच निकडीची जरूर आहे, ह्या गोष्टीकडे डोळेझांक करणें, हें कोणत्याहि राजकर्त्यांच्या बाबतींत चालणार नाहीं.

आतां, ह्या अशा विशेष लक्ष्यांत घेण्यासारख्या विनंतीचा हिंदुस्थानसरकारास अव्हेर करितां येईल काय? हा निव्वळ सामाजिक व नैतिक प्रश्न आहे, असें नाहीं; तर, त्याचें स्वरूप राजकीयहि आहे. हा प्रश्न अत्यंत जरूरीचा आहे, अशी आणीब कांहीं उच्च जातींच्या हिंदूंमध्यें ज्याप्रमाणें झाली आहे, त्याप्रमाणें निराश्रित वर्गांतील खाऊनपिऊन सुखी असलेल्या लोकांच्या मनांत, हिंदुसमाजानें आपणांस बाहेर ठेवून जो छळ चालविला आहे, त्यामुळें अस्वस्थता उत्पन्न झाल्याचीं चिन्हें दिसं, लागलीं

आहेत. अस्पृश्य मानलेल्या बहुतेक जातींतून कांहीं थोडे लोक नेहमीं उदयास येतात; व ते श्रीमंत झाले, म्हणजे पैशा-बरोबर येणारा मान त्यांना समाजांत मिळूं लागतो. आणि, अशा लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सांप्रत देशामध्यें नवीन नवीन उद्योगधंदे अस्तित्वांत येऊन, कोणाच्या स्वाधीन नाहीं, अशी स्थिति येत चालली आहे; व त्यामुळें, कित्येक अशीं उदाहरणें घडलीं आहेत कीं, सबंद जातींच्या जाती सुस्थितीप्रत पावल्या आहेत. बंगाल्यामध्यें नामशूद्र म्हणून एक जात असून, त्यांतील लोक शेतकीचा धंदा करितात. हल्लीं, बंगाल्यांत शेतकीला सारखी तेजी असल्यामुळें, ह्या गोष्टीचा फायदा वरील नामशूद्रांस आयताच मिळाला आहे. धनधान्य-संपन्नतेच्या दृष्टीनें, ह्या लोकांची स्थिति आतां सुधारत चालली असल्यामुळें, हिंदुसमाजांतील त्यांच्या हलक्या दर्जाबद्दल, त्यांच्यांतील पूर्वीची समाधानवृत्ति नष्ट होत चालली आहे. केवळ ख्रिस्ती मिशनऱ्यांचेच नाहींत, तर मुसलमान मिशन-ऱ्यांचेहि प्रयत्न त्यांच्यासंबंधानें चालू आहेत; आणि, जरी बहुतेक अस्पृश्य लोक अद्यापि हिंदुधर्मांत आहेत, तरी त्यांच्या ज्ञातींपैकीं जे कोणी ख्रिस्ती किंवा मुसलमानी धर्म पत-करतात, त्यांचा समाजांतील दर्जा एकदम वाढतो, ही गोष्ट हिंदुस्थानांतील सर्वच पंचमांप्रमाणें त्यांच्याहि लक्ष्यांत आल्या-वांचून राहत नाहीं. कारण, हिंदूंतील अत्यंत अस्पृश्य मनुष्य ख्रिस्ती किंवा मुसलमान झाल्याबरोबर, त्याच्या ठिकाणचे दोष पार नाहींसे होतात, ही गोष्ट अस्पृश्यतेविषयीं लोकांच्या किती चमत्कारिक व असंबद्ध कल्पना आहेत, हें दाखवितें. नामशूद्र लोकांवरील आपलें वजन अगदींच संपुष्टांत येत चाललें

आहे व त्यामुळें आपल्या कामास कसा धोका बसणार आहे, ही गोष्ट बंगाली राजकारणी पुरुषांच्या तावडतोब लक्ष्यांत आली; आणि ह्मणूनच, मीं पूर्वीं सांगितली आहे त्या प्रकारची एक नवीन चळवळ ह्या लोकांनीं सुरू केली. ह्या चळवळीचें असें धोरण होतें कीं, जे नामशूद्र आपल्या बाजूला येतील व आपण पसंत केलेल्या राजकीय वगैरे चळवळींत सामील होतील, त्यांच्या बाबतींत तेवढा जातिनिर्बंधांचा कडकपणा कमी करण्याचें वचन राजकारणी लोकांनीं त्यांना द्यावयाचें, व अशा रीतीनें परस्परांनीं परस्परांच्या उपयोगी पडावयाचें. सध्यां, आपल्यापुढें (इंग्रजलोकांपुढें) जो प्रश्न येऊन पडला आहे तो असा कीं, ह्या निराश्रित लोकांची उन्नति करण्याचें काम आपण स्वतः हातीं घ्यावें, किंवा दुसऱ्यांच्या हातीं जाऊं द्यावें. जर ते लोक ह्यांच्या ताब्यांत गेले, तर ह्यांच्यापैकीं पुष्कळ लोक त्यांचा उपयोग आपले स्वतःचे हेतु पार पाडण्याकरितां करून घेतील. "कधीं होईल तेव्हां होवो," असें परंपरागत चालत आलेलें आपलें धोरण एकदम सोडून देऊन, गायकवाड सरकारच्या विनंतीप्रमाणें, ह्या निराश्रित लोकांची उन्नति करण्याचें सुकार्य हिंदुस्थानसरकारानें आपल्या हातीं घेण्याची ही वेळ नाहीं काय? हल्लीं वाखाणण्यासारख्या उत्तम रीतीनें हेंच काम करित असलेल्या व अगदीं हाताशीं असणाऱ्या ख्रिस्ती मिशनरी लोकांच्या संस्थांस फक्त उत्तेजन देऊन मदत केली, तर त्यांच्याकडूनच हें काम सरकारास सहजीं करून घेतां येण्यासारखें आहे. हिंदुसमाजाच्या उच्च वर्गांतील लोकांचें धर्मांतर करविण्याच्या कामांत जर सरकारानें उत्तेजन दिलें, तर पुष्कळ भानगडी उत्पन्न होतील, हें

खरें आहे. तथापि, ज्याअर्थी जुन्या हिंदुधर्माच्या अभिमानी लोकांस असें वाटतें कीं, ह्या निराश्रित लोकांना मनुष्यप्राणी समजून, त्यांच्याशीं ज्याप्रकारचें दळणवळण ठेविलें पाहिजे, त्याप्रकारचें दळणवळण ठेवणें इतर हिंदूंना शक्य नाहीं, त्या अर्थी त्यांची उन्नति करण्याच्या कामीं, सरकारानें ख्रिस्ती मिशनरी लोकांचें साह्य घेऊन प्रयत्न केले, तर वर सांगितलेल्या प्रकारच्या कोणत्याहि अडचणी वाजवीरीतीनें येण्याचें कारण नाहीं. धार्मिकदृष्ट्या विचार केला, तर असें वाटतें कीं, ह्या कामांत ह्या देशांतील मोठमोठ्या मिशनरी संस्थांनीं मोठ्या कळकळीनें लक्ष घातलें पाहिजे. आतां त्या सर्वांनीं मिळून, एकजुटीनें मोठा प्रयत्न करण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आहे, असें दिसतें. नैतिक व सामाजिक दृष्ट्या विचार केल्यास, ज्यांना ज्यांना ह्मणून मागसलेल्या लोकांची स्थिति सुधारून त्यांचें कल्याण व्हावें, अशी इच्छा असेल, त्या सर्वांची—मग ते कोणत्याहि धर्माचे किंवा पंथाचे असोत— सहानुभूति व साह्य ह्या कामांत आह्मांस मिळालें पाहिजे, अशी मागणी ख्रिस्ती मिशनरी लोकांस चांगलीच करितां येईल. आणि राजकीयदृष्ट्या ह्मणाल, तर हिंदुस्थानांतील एवढ्या मोठ्या लोकसंख्येनें आपल्या राज्यकर्त्यांचा धर्म स्वीकारिल्यास, अशा महत्त्वाच्या गोष्टी घडून येतील कीं, त्याबद्दल विस्तारानें लिहिण्याचें मला प्रयोजन दिसत नाहीं.



भाग १५ वा.

देशी संस्थानें.

हिंदुस्थान देशाचा राज्यकारभार सुधारण्यासाठीं कोणत्या तजविजी कराव्या, ह्यासंबंधाचा जो मूळ खलिता हिंदुस्थान-सरकाराकडून स्टेटसेक्रेटरीकडे गेला होता, त्यांतील एक महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे, इकडील (हिंदुस्थानांतील) राजेरजवाडे व बडे बडे जमिनदार, इनामदार वगैरे लोक, यांचें एक "बादशाही सल्लागार मंडळ" स्थापन करणें, अशी होती. ह्या सूचनेवर नानाप्रकारचे आक्षेप निघाले. परंतु, त्या सर्वांत विशेष महत्त्वाचा आक्षेप ह्मटला ह्मणजे, हिंदुस्थानसरकार व सदरहु मंडळ या उभयतांमधील परस्परसंबंध ठरविण्यास अडचण आहे, असा होता. कारण, ब्रिटिश हिंदुस्थानच्या—ह्मणजे खुद्द ब्रिटिश अमलाखालीं हिंदुस्थानचा जो मोठा भाग आहे त्याच्या—अंतर्गत राज्यव्यवस्थेसंबंधीं विचार करूं गेल्यास, ह्या वरील मंडळा-पैकीं प्रमुख सभासदांचा तिच्याशीं अर्थाअर्थी मुळींच संबंध नसल्यानें, तिच्याबद्दल विचार करून हिंदुस्थान-सरकारास सल्लामसलत देण्याचा त्यांना मुळींच अधिकार पोहोंचत नाहीं. शेवटीं, ही अडचण टाळण्याकरितां, सदरहु प्रकारचें मंडळ स्थापन करण्याची कल्पना अजीबात सोडून द्यावी लागली. परंतु, अडचण टाळणें ह्मणजे ती केवळ लांबणीवर टाकणें, असा अर्थ होतो. आतां, नवीन केलेल्या राजकीय

सुधारणांची तात्काळ होणारी अमलबजावणी फक्त प्रत्यक्ष ब्रिटिश अमलाखालीं असणाऱ्या हिंदुस्थानापुरतीच आहे, तथापि असल्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींचा परिणाम, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें, हिंदुस्थानांतील आमच्या (इंग्रजांच्या) सर्व साम्राज्यावर झालाच पाहिजे. एकंदर हिंदुस्थानदेशाचा सुमारें १/३ भाग देशी संस्थानांनीं व्यापलेला असून, त्यांची लोकसंख्या जवळ जवळ ७ कोटी आहे. तेव्हां, हीं सर्व संस्थानें मुळींच हिशेबांत न घेणें, किंवा त्यांचा राज्यकारभार हातीं असणाऱ्या संस्थानिकांकडे अगदींच दुर्लक्ष करणें, हें मुत्सदीपणाचें, किंवा खरोखर शक्य तरी आहे काय? हिंदुस्थानांतील देशी संस्थानांच्या ताब्यांतील मुलूख व त्यांचा दर्जा, ह्या दृष्टीनें त्यांचे अनेक वर्ग पडतात. सर्वांत विस्तारानें मोठें व महत्त्वाचें संस्थान ह्मटलें ह्मणजे, हैदराबादची **निजामशाई** होय. निजामसरकारच्या ताब्यांतील मुलुखाचें क्षेत्रफळ ८२,००० चौरस मैल आहे; ह्मणजे, इंग्लंड, वेल्स व स्कॉटलंड मिळून जितका प्रदेश होतो, तेवढें हें राज्य मोठें आहे; व येथील लोकसंख्या जवळ जवळ सवा कोट आहे. पण, कांहीं संस्थानें इतकीं लहान आहेत कीं, त्यांच्या ताब्यांतील मुलूख इंग्लंडमधल्या मोठाल्या पिढीजाद सरदारांच्या मुलुखापेक्षांहिं लहान असतो. साऱ्या हिंदुस्थानद्वीपकल्पावर—दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम—हीं संस्थानें पसरलीं असल्यामुळें, व्हाइसरायसाहेबांच्या प्रत्यक्ष अमलाखालीं असणाऱ्या प्रांतांतून ज्याप्रमाणें नाना धर्मांचे, जातींचे व पंथाचे लोक असून, त्यांच्या भाषा, चालीरीती व परंपरागत रूढी भिन्न भिन्न आहेत, तोच विलक्षण प्रकार ह्या देशी संस्थानांतूनहि दृष्टीस पडतो; आणि, हे संस्थानिक ह्मटले ह्मणजे, हिंदुस्थानच्या आजपर्यं-

तच्या इतिहासांतील निरनिराळीं स्थित्यंतरें दाखविणारे चालते-बोलते पुतळेच होत. राजपुतान्यांतील संस्थानिकांमध्यें उदेपुरच्या **महाराण्यास** अग्रस्थानचा मान आहे; व त्यांच्या वंशावळी अगदीं पौराणिक काळापर्यंत जाऊन भिडतात. प्राचीन काळीं, हिंदुलोकांच्या सरदारबहादरीच्या ज्या कांहीं कल्पना होत्या, त्या अद्यापिहि ह्या रजपूत राजांनीं कायम ठेविल्या आहेत. दक्षिण हिंदुस्थानांतील म्हैसूर, कोचीन व त्रावणकोर येथील राजे देखील आपणांस रजपुतांचे वंशज म्हणवितात. उत्तरेकडून खालीं दक्षिणेंत जे आर्यलोक गेले, त्यांनीं त्यांच्यापूर्वीं तेथें गेलेल्या द्रवीडलोकांस जिंकून आपला अम्मल सुरूं केला, ह्या गोष्टीची साक्ष वरील संस्थानिकांच्या अस्तित्वावरून अद्यापिहि पटत आहे. अठराव्या शतकांतील मराठ्यांच्या अभ्युदयाचीं चिन्हें असे **शिंदे** व **गायकवाडासारखे** मराठे संस्थानिक आहेत, तसेच सतराव्या शतकांत मुसलमान लोकांच्या विजय-प्रवाहास प्रतिबंध करण्याचें सामर्थ्य प्रथमतः ज्या मराठ्या सरदारानें दाखविलें, त्या शिवाजीच्या वंशांतील **कोल्हापुरचे महाराज** आहेत. देशी संस्थानिकांपैकीं बहुतेक संस्थानिक हिंदु आहेत; तथापि मुसलमान लोकांच्या राजसत्तेस उतरतीकळा लागल्यानंतरहि, जे मुसलमान संस्थानिक जीव बचावून राहिले, अशांची संख्या कांहीं लहान नाहीं. ह्या संस्थानिकांमध्यें **निजामाचाहि** समावेश होत असून, त्याचें सामर्थ्य सर्वांत अधिक आहे. त्याचप्रमाणें, पंजाबामध्येंहि पतियाळा, नाभा व कपूरथळा येथील शीख राजे, हे रणजितसिंग व शीखलोकांनी एकजूट [illegible] दिवसांची आठवण देत असतात. [illegible]

राजा व प्रजा ह्यांचा धर्म व जात (वंश) अगदीं भिन्न असते. निजामसरकार स्वतः सुनीपंथाचे मुसलमान आहेत; परंतु, बहुतेक प्रजा हिंदुधर्माची असून, मुसलमानांतील कित्येक अत्यंत वजनदार लोक शियापंथाचे आहेत. काश्मीरचे **महाराज** हे रजपूत जातीचे हिंदु असून, मंगोलियन वंशांतील बौद्ध-धर्माच्या पुष्कळ लोकांवर राज्य करितात; आणि, ग्वालेर व इंदूर येथील संस्थानिक मराठे जातीचे आहेत, तरी त्यांच्या संस्थानांत मराठे लोक फारच थोडे आहेत.

पूर्वेकडील देशांत (एशीया खंडांत), नेहमीं आढळून येणारी राज्यव्यवस्था ह्मटली ह्मणजे, एका मनुष्याच्या हातीं सर्व अधिकार असावयाचे; व अशा सर्वसत्ताधीश राजानें आपली प्रजा ही एकाच कुटुंबांतील माणसें आहेत, असें मानून, त्यांचें पित्याप्रमाणें पालन करावयाचें. ह्याच तऱ्हेची जुनी शासनपद्धति सर्व देशी संस्थानांमध्यें थोड्या—बहुत प्रमाणानें चालत आहे. तथापि, ह्या पद्धतीच्या अंमलबजावणींत पुष्कळ ठिकाणीं तफावत पडलेली दिसून येते. आतां, ही अशी तफावत कधीं कधीं राज्यकर्त्यांच्या स्वभावांतील कांहीं विशेष गुणावगुणा-मुळें पडते; व कधीं कधीं ती सामाजिक बाबतींतील वाडवडिलां-पासून चालत आलेल्या रूढी व कल्पना ह्यांचा जोर विशेष झाल्यामुळें पडते. उदाहरणार्थ, **कोचीन** व **त्रावणकोर** संस्था-नांमध्यें, उत्तरेकडील ब्राह्मणांनीं फार प्राचीन काळीं दक्षिणेंत येऊन, तेथील द्रवीड लोकांवर जी सत्ता स्थापन केली होती, तिची खूण ह्मणून, अद्यापिहि कांहीं अगदीं पुरातन चालीरीती तिकडे पाळण्यांत येतात. रजपुतान्यांतील इतर संस्थानिकांपेक्षां उदेपुर व जयपुर येथील संस्थानिकांनीं पुरातन काळच्या

बड्या लोकांचा, ‘ जुन्यास चिकटून ’ राहण्याचा गुण अद्यापि बराच राखला आहे, असें ह्मणतां येईल. तथापि, कित्येक तरुण रजपूत संस्थानिकांनीं पालटलेला मनु ओळखून, पाश्चिमात्य तऱ्हेचें शिक्षण संपादन केलें आहे; आणि, अशा रीतीनें इतरांपेक्षां ते पुढें गेले आहेत. ज्या सुधारणेला आम्ही (इंग्रजलोक) **पाश्चिमात्य प्रगति** (यूरोपखंडांतील लोकांच्या विद्याचारसंपन्नतेमुळें त्यांची झालेली उन्नति) असें नांव देतों, तिच्या दिखाऊ भागाचा तरी **बडोदेसंस्थानांत** प्रसार करण्याच्या कामीं **गायकवाडसरकारांनीं** जितकी मजल मारली आहे, तितकी दुसऱ्या कोणत्याहि संस्थानिकानें मारली नाहीं. असें जरी आहे, तरी ग्वाल्हेरींत **शिंदेसरकार** ह्मणतील ती पूर्वदिशा जशी होते, तशीच बडोद्यास **गायकवाडसरकारच्या** ह्मणण्यानें, सर्व महत्वाच्या व आवश्यक गोष्टींत ती होते. **शिंदे** हे दुसरे एक मराठे संस्थानिक आहेत, व पाश्चिमात्य लोकांच्या सर्व चळवळी त्यांना आवडतात. आणि, ह्या गोष्टीचा प्रत्यय ह्मणजे, सर्व प्रकारच्या मर्दानी खेळांत, तसेंच बुद्धिविषयक गोष्टींतहि दिसून येणारें त्यांचें चापल्य होय. कित्येक संस्थानिक सर्व राज्यकारभार आपल्या कारभाऱ्यावर किंवा दिवाणावर सोंपवून, आपला सर्व वेळ ख्यालीखुशालींत घालवित असतात, ह्यांत संशय नाहीं. पण, कांहीं संस्थानिक असे आहेत कीं, ते आपल्या राज्यकारभारांत मोठे दक्ष असून, स्वतःच सर्व गोष्टी करण्यासाठीं धडपड करीत असतात. सर्व हिंदुस्थानांतील दक्ष अशा राज्यकर्त्यांत गणना करितां येईल, अशी जी एक मुसल्मान स्त्री राज्यकर्त्री आहे, ती **भोपाळची बेगमसाहेब** होय. ह्या बेगमसाहेबांचें शिक्षण उत्तम प्रकारचें झालेलें असून, त्या फारच [illegible]

उलटपक्षीं, **निजामसाहेब** जरी सर्व सत्ताधारी राजे आहेत, तरी आपल्या पूर्वजांपासून चालत आलेल्या उदार धोरणानेंच आपण राज्यकारभार चालविल्यामुळें, आपली प्रजा शांत स्वभावाची, समाधानी व कायद्यास भिऊन वागणारी झाली आहे, असें त्यांचें मत, त्यांच्या एका पत्रामुळें, सर्व जगास अलीकडेच कळून चुकलें आहे. "धर्माच्या आणि जातीच्या बाबतींतील भलभलत्या कल्पनांपासून ते (निजामसाहेबांचे पूर्वज) अगदीं अलिप्त होते. त्यांच्या अंगच्या शहाणपणामुळें आणि दूरदृष्टीमुळें, त्यांनीं आपल्या राज्यांत हिंदु व मुसलमान, यूरोपियन व पारशी ह्या सर्वांवर सारखी दृष्टि ठेवून, त्यांना अधिकाराच्या जागा दिल्या होत्या. आणि, राज्यांतील अधिकारी कोणत्याहि धर्माचे व जातीचे असले, तरी त्यांच्यावर पुरा विश्वास ठेविला होता. आणि, ह्याच धोरणानें मी आपला राज्यकारभार चालवित आहे, असें सध्यांचे (आतां मरहुम) **निजामसाहेब** ह्मणतात, तें अगदीं बाजवी आहे.

ह्या सर्व संस्थानिकांशीं हिंदुस्थानसरकारचें जरी सार्वभौमत्वाचें नातें आहे, तरी ह्या प्रत्येक संस्थानाबरोबर, विशिष्टपरिस्थितीप्रमाणें, हिंदुस्थानसरकारनें निरनिराळ्या स्वरूपाचे तह केले असून, त्यांतील कलमांच्या अनुरोधानें प्रत्येक संस्थानचा कारभार चालत असतो, व त्याच्यावर सार्वभौम सरकारचा ताबा राहतो. सन १९०९ सालच्या नवेंबर महिन्यांत, उदेपुर येथें लॉर्ड मिंटोसाहेबांनीं जें भाषण केलें, त्यांत सार्वभौम सरकारची वागणूक कित्येक बाबतींत देशी संस्थानांशीं कोणत्या तत्त्वांवर होत असते, ह्याचा खुलासा फारच वाखाणण्यासारख्या रीतीनें त्यांनीं केला. "संस्थानांच्या अंतर्गत कारभारांत त्यांच्या राज्यकर्त्यां

स्वातंत्र्य आहे असें अभिवचन दिलें, आणि परचक्रापासून त्यांचें संरक्षण करण्याचा पतकर घेतला, ह्मणजे अर्थात संस्थानचा कारभार चोख राहील, अशी खबरदारी घेण्याची कांहीं जबाबदारी सार्वभौम सरकारनें आपल्या शिरावर घेतली आहे, असें स्वाभाविकपणेंच ठरतें. आणि ह्मणूनच, संस्थानांत बेबंदशाही झाली असतां, ती होण्यास सार्वभौमसरकार अप्रत्यक्ष रीतीनें कारण झालें आहे, असें दूषण आपल्यास लावून घेण्यास हें सरकार कधींहि कबूल होणार नाहीं. तसेंच, दुसऱ्या अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, त्यांमध्यें एकंदर सर्व प्रजेच्या, तसेंच, सार्वभौमसरकारच्या हितसंबंधाचें रक्षण करण्याची जबाबदारी हिंदुस्थानसरकारावर आहे. रेल्वे, तारायंत्र व इतर बादशाही स्वरूपाचीं खातीं, वगैरे बाबी ह्याप्रकारच्या आहेत." ह्याचप्रसंगीं व्हाइसरायसाहेबांनीं ज्या एका गोष्टीवर शहाणपणानें मोठा जोर दिला होता, ती अशी कीं, ब्रिटनच्या राजानें देशी संस्थानिकांस जें अभिवचन दिलें आहे, त्यास अनुसरून, त्यांच्या संबंधानें आमचें धोरण ह्मटलें ह्मणजे, त्यांच्या अंतर्गत कारभारांत, तसाच प्रसंग आल्याशिवाय, मुळींच हात घालावयाचा नाहीं, असें आहे. आणि, त्यानीं त्या वेळेस सर्वांच्या निदर्शनास असेंहि आणून दिलें कीं, निरनिराळ्या संस्थानांची स्थिति नेहमीं बदलत चालली असल्याकारणानें, प्रत्येक संस्थानाशीं अगदीं एकाच धोरणानें, आणि मागील दाखल्यांच्या किंचितहि बाहेर न जातां, वागण्याचा प्रयत्न करणें धोक्याचें आहे. आणि ह्मणूनच, वादग्रस्त प्रश्न उपस्थित झाले ह्मणजे, त्यावेळी अमलांत असलेले तह, प्रत्येक प्रश्नाचें महत्व व त्यांतील बऱ्यावाईट गोष्टी, त्या ठिकाणची परिस्थिति, मागील दाखले,

आणि प्रत्येक संस्थानांत मोकासदारी, जहागिरी वगैरे ज्या मानानें असतील व तेथील प्रजेला ज्या मानानें सनदशीर हक्क प्राप्त झाले असतील, त्या मानानें–ह्मणजे त्या संस्थानच्या विशेष सुधारणेचें मान व अशाच सर्व गोष्टी पूर्णपणें लक्ष्यांत घेऊन– त्या प्रश्नांचा निकाल करण्याचा मी (व्हाइसराय) प्रयत्न करित असे. प्रत्यक्ष ब्रिटिश अमलाखालीं असलेल्या एतद्देशीय लोकांस राज्यकारभारांतील अधिकाधिक भाग देण्याचें काम आह्मीं सुरू केलें असतांनाच, मांडलिक संस्थानांशीं हल्लींपेक्षां कडक रीतीनें वागून, त्यांच्यावर अधिकाधिक दाब ठेवूं पाहणें अशक्य आहे, हें अगदीं स्पष्ट आहे. ह्या मुद्यावर लॉर्ड मिंटोसाहेबानीं आपल्या भाषणांत जोर दिला असता, तर खरोखरच फायदा झाला असता. कारण, हिंदुस्थानांतील आमच्या (इंग्रजांच्या) साम्राज्यांत राज्यकारभारासंबंधीच्या सुधारणा करून, अनुभव पाहण्याचे जे उद्योग आह्मीं सुरू केले आहेत, त्यांमध्यें देशी संस्थानांबद्दल आमच्यावर असलेली जबाबदारी मुळींच लक्ष्यांत न घेण्याची व देशी संस्थानें ह्मणजे थोड्याबहुत प्रमाणानें **टाकाऊच माल** असें समजण्याची प्रवृत्ति, हिंदुस्थानापेक्षां खुद्द विलायतेंतच, दिवसेंदिवस जास्त वाढत चालली आहे. हिंदुस्थानच्या सरहद्दीवर लढाई सुरू झाली, किंवा सौदान अथवा चीनमध्यें सैन्य पाठविण्याचा प्रसंग आला, ह्मणजे मात्र आह्मी देशी संस्थानिकांच्या राजनिष्ठेची प्रशंसा करून, त्यांची मदत मागण्यास मागें–पुढें पाहात नाहीं; आणि, असे प्रसंग उपस्थित होण्यापूर्वी, त्यांची आह्मी कधींहि सल्लामसलत घेतली नव्हती तरीं, व त्यांच्या स्वतःच्या हिताहिताचा त्यांच्याशीं प्रत्यक्षतः बिलकूल संबंध नसतांहि, आह्मीं मागितल्याप्रमाणें मदत ते,

आजपावेतोंतरी, मोठ्या आनंदानें करित आले आहेत; व अशा रीतीनें साम्राज्याच्या कार्यांतील आपला वांटा त्यांनीं उचलला आहे. उलट पक्षीं, ज्या वेळीं देशी संस्थानिकांच्या प्रत्यक्ष हितसंबंधाचे प्रश्न उद्भवतात; ज्या प्रश्नांचा संबंध प्रत्यक्ष ब्रिटिश अमलाखालील प्रजेच्याचप्रमाणें संस्थानांतील प्रजेच्याहि कल्याणाशीं असतो; सर्व हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांच्या मर-भराटीवर ज्या प्रश्नांचा साक्षात् परिणाम होत असतो, असे जकाती व चलनी नाणीं ह्यांसंबंधाचे प्रश्न उपस्थित होतात, तेव्हां विलायतेमधील व्हाइट हॉल (स्टेट सेक्रेटरीचें आफीस) व कलकत्त्याचा राजवाडा (व्हाइसराय राहण्याची जागा) ह्यांच्यामध्येंच असल्या प्रश्नांचा निकाल होऊन जात असतो. पण, त्यासंबंधानें तुमचें मत काय आहे, इतकेंसुद्धा त्यांना कोणी विचारित नाहीं. कधींकधींतर ज्या प्रश्नांचा संबंध संस्था-निकांच्या साक्षात् तिजोरीशीं येतो, अशांचा सुद्धां निकाल त्यांना न समजतांच, परभारेंच्या परभारें, करून टाकण्यांत येत असतो. उदाहरण पाहिजे असल्यास, चीनबरोबरच्या अफूच्या व्यापारासंबंधाचे नवीन करारमदार पहा. कांहीं संस्थानांतून अफूचें पीक पुष्कळ निघत असतें. परंतु, आमच्या (इंग्रजांच्या) राष्ट्राच्या सदसद्विवेकबुद्धीचें समाधान व्हावें म्हणून—खरोखर गोष्ट फार चांगली आहे—देशी संस्थानिकांस न विचारितां, किंवा त्यांचें होणारें नुकसान भरून देण्याचा हेतु नसतांहि, त्यांच्या प्रांतांतलें एक अत्यंत महत्त्वाचें पीक व संस्थानच्या उत्पन्नाची एक मुख्य बाब नाहींशी करून, व स्वतःच्या पदरास बिलकूल खार लागूं नये अशी खबरदारी घेऊन, 'दुसऱ्याच्या घरावर तुळशीपत्र' ठेवण्याचा खरा [illegible] त्यांनीं केला आहे.

गुलामगिरी एकदम नाहींशी केली, ह्मणून वेस्ट इंदिज येथील तिजोरीचें फार नुकसान झालें होतें. पण, त्याचा मोबदला ह्मणून इंग्लंडनें वेस्ट इंदिजला मोठ्या उदारपणानें दोन कोट पौंडाची मदत केली होती. आतां, ही उदारपणाची वागणूक आणि वर सांगितल्याप्रकारचें हिंदुस्थानांतील संस्थानांशीं कठोरपणाचें वर्तन, हीं एकमेकांशीं ताडून पाहिल्यावर, देशी संस्थानिकांचा सार्वभौम सरकाराविषयींचा ग्रह प्रतिकूल झाल्याशिवाय राहील काय?

अलीकडचीं कांहीं वर्षें मोठ्या त्रासाचीं गेलीं; व त्यांत राजद्रोहात्मक चळवळींनीं बाहेर डोकें काढल्यामुळें, त्यांपासून सार्वजनिक स्वास्थ्यास फारच धोका आहे, असें आढळून आलें. त्यामुळें, हिंदुस्थानांतील आमच्या राज्यकारभारांत देशी संस्थानिकांची सल्लामसलत घेणें, ही किती महत्त्वाची गोष्ट आहे, ह्याची कल्पना हल्लींप्रमाणें पूर्वीं कशानेंहि आली नव्हती, असें ह्मटलें तरी चालेल. हिंदुस्थानांत जेथें प्रत्यक्ष ब्रिटिश सत्ता चालत आहे, तेथें सरकारच्या अधिकारास धाब्यावर बसविण्याचे प्रयत्न होऊं लागले कीं, देशी संस्थानिकांच्या अधिकारावरहि गदा आल्याशिवाय राहत नाहीं. देशी संस्थानें कांहीं गच्च पेटींत घालून ठेविलेलीं नाहींत; व इंग्रजी मुलुखांत राजद्रोहात्मक चळवळी सुरू झाल्या, ह्मणजे त्यांची लाट त्याला अगदीं लागून असणाऱ्या देशी संस्थानांत जाणार नाहीं, असें कदापिहि घडावयाचें नाहीं. देशी संस्थानांस इंग्रजी मुलुखापासून तोडणाऱ्या सरहद्दी ह्मणजे निव्वळ राज्यकारभाराच्या सोयीसाठीं ठरविलेल्या रेषा असतात. संस्थानिकांची इभ्रत त्यांच्या संस्थानांमध्यें मोठी असते. पुष्कळवेळां, ह्या इभ्रतीचें मूळ परंपरेनें चालत आलेल्या जुन्या समजुतींत व रूढींत असतें. त्यामुळें, परकी राज्यकर्त्यांनीं

अशा गोष्टींचा फायदा मुळींच मिळत नाहीं. तथापि, हिंदुस्थानांत अस्वस्थता उत्पन्न होऊन, कित्येक लोकांची प्रवृत्ति राज्यक्रांति घडवून आणण्याकडे झाली आहे, ह्या गोष्टीची जाणीव कांहीं अत्यंत अनुभवी व सुज्ञ संस्थानिकांस जशी तात्काळ झाली व तिचें मर्म जसें त्यांना उत्तमप्रकारें कळून आलें, तसें इंग्रजी मुलखांतील राज्यकारभाराची जोखीम ज्यांच्या शिरावर आहे, हें त्यांना कळून आलें नाहीं. प्रत्यक्ष ब्रिटिश अमलाखालीं असणाऱ्या प्रदेशांत, ज्या पद्धतीवर दंगेधोपे व अत्याचारसुद्धां करण्याची चळवळ सुरू होऊन गुन्ह्यांची संख्या वाढली, व त्यामुळें हिंदुस्थानसरकारास तिचें उच्चाटन करण्याकरितां उपाय योजावे लागले, तोच प्रसंग कोल्हापुरच्या व पतियाळाच्या महाराजांसारख्या कांहीं संस्थानिकांवर येऊन पडला. सुमारें एक वर्षापूर्वीं (१९०९ सालांत), आपल्या राज्यांत राजद्रोहाचा शिरकाव होऊं नये, व लोकांची राजद्रोहाकडे प्रवृत्ति करणारीं पुस्तकें, वर्तमानपत्रें, हस्तपत्रकें वगैरेंचा फैलाव होऊं नये, म्हणून जयपुरचे महाराज व शिंदे सरकार यांना आपल्याच हिताकरितां बरेच सक्तीचे उपाय योजणें भाग पडलें. त्यावेळीं, अशा राजद्रोहप्रवर्तक वाङ्मयाचा प्रसार ब्रिटिश मुलखांत अगदीं राजरोसपणें होत असून, त्याविरुद्ध कोणी ब्रहि काढीत नव्हते. बंगाल्यांत बॉबगोळे फेंकण्याची सांथ उद्भवल्याबरोबर, ज्वालाग्राही पदार्थ व स्फोटक द्रव्यें ह्यांच्या संबंधाचा कायदा करण्यामध्यें बिकानेरच्या महाराजांनीं तावडतोब पुढाकार घेतला. इतर संस्थानांमध्यें सुद्धां, अत्याचाराचा प्रादुर्भाव होऊं नये, म्हणून प्रतिबंधक उपाय योजण्याचें काम चेपलि, रा[illegible] ? [illegible]

केलें आहे. तथापि, त्यांच्या सुदैवानें, बऱ्याच संस्थानिकांस त्यांच्या राज्यांत अझूनतरी ह्या कारणामुळें ह्मणण्यासारखा मोठा त्रास झालेला नाहीं. त्यामुळें, ह्या चळवळींचें खरें स्वरूप काय आहे, व एकंदर देशाचें कल्याण होण्याकरितां ह्या बाबतींत काय केलें पाहिजे, वगैरे गोष्टींचें फक्त मोठ्या लक्षपूर्वक दृष्टीनें अवलोकन करण्याची संधी त्यांना मिळाली आहे.

ता० ६ आगष्ट १९०९ रोजीं, व्हाइसरायसाहेबानीं शिरस्त्याबाहेरचा एक नवीनच मार्ग स्वीकारिला. ह्मणजे, हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत मोठ्या जोरानें सुरू झालेल्या अस्वस्थतेच्या चळवळीसंबंधानें, त्यांनीं मुख्य मुख्य संस्थानिक व मांडलिक राजे यांच्याबरोबर स्वतः पत्रव्यवहार सुरू केला, व "ज्या संकटापासून तुह्मांआह्मांस सारखीच भीति आहे, त्याचा प्रतिकार करण्याच्या हेतूनें, आपण सर्वांनीं मिळून काय केलें पाहिजे," ह्याबद्दल त्यांचीं मतें जाणण्याची व आपली त्यांस सांगण्याची त्यानीं इच्छा प्रदर्शित केली. व्हाइसराय साहेबानीं हा जो उपक्रम केला, तो कितपत शहाणपणाचा होता, ह्याबद्दल त्यावेळीं कांहीं शंका निघाली होती; कारण कीं, सध्यांच्या परिस्थितीमुळें सरकारास मनस्वी भीति वाटत आहे, असा सार्वभौम सरकाराच्या आधारावर असलेल्या सर्व देशी संस्थानिकांचा ग्रह वरील पत्रव्यवहारामुळें होण्याचा संभव होता. परंतु, व्हाइसरायसाहेबांस आलेल्या उत्तरांच्या मजकुरावरून व भाषाशैलीवरून, तशा प्रकारची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नव्हतें, असें निदर्शनास आलें. उलटें, आपणांस हिंदुस्थानसरकारानें आपल्या विश्वासांत घेतलें, ह्याबद्दल त्यांना मोठें भूषण वाटलें, आणि त्यांनींहि उलट सरकारावर पूर्ण विश्वास ठेवून, आलेल्या पत्रांचीं

उत्तरें पाठविलीं. देशी संस्थानिकांकडून आलेलीं सर्व उत्तरें एकत्र केलीं, ह्मणजे एक अत्यंत मनोवेधक व बोधप्रद पत्रव्यवहार होतो. कारण, प्रत्येक संस्थानची उत्पत्ति, परंपरेनें चालत आलेल्या समजुती व त्याचें महत्त्व ह्यामध्यें भिन्नता असल्यामुळेंच, हिंदुस्थानांतील अस्वस्थतेपासून ज्या राजद्रोहात्मक चळवळी सुरू झाल्या आहेत, त्यांच्याशीं झगडण्याकरितां कोणते उपाय योजले पाहिजेत, ह्याबद्दल निरनिराळ्या संस्थानिकांनीं आपले जे विचार प्रकट केले आहेत, त्यांना एक विशेष प्रकारचें महत्त्व येतें. हिंदी लोकांचे हक्क व स्वातंत्र्य यांची वृद्धि करण्याच्या कायदेशीर कामासाठीं जर केवळ ह्या वरील चळवळी चालू असत्या, तर हिंदी राजेरजवाडे व संस्थानिक ह्यांनीं, अशा तऱ्हेच्या अगदीं एकमतानें, त्या चळवळींविरुद्ध शब्द काढला असतां, असें वाटत नाहीं.

आतां, कोणी असें ह्मणतील कीं, "सर्वांसच धोका" आला आहे, ही गोष्ट संस्थानिकांच्या निदर्शनास लॉर्ड मिंटोसाहेबांनीं आणून दिल्यामुळें, खरोखर स्थिति तशीच आहे, असें कबूल करून, व्हाईसरायसाहेबांच्या खलित्यास उत्तर पाठविल्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतें. परंतु, राजद्रोहात्मक चळवळींचीं सूत्रें पडद्यामागून कशीं हालविलीं जात आहेत, ह्या गोष्टीची जी काळजीपूर्वक चिकित्सा त्यांनीं केली आहे, व ह्या रोग हटविण्यासाठीं त्यांच्यापैकीं बहुतेकांनीं जे उपाय अमलांत आणण्याकरितां सुचविले आहेत, त्यावरून हीं वरील राजे रजवाड्यांकडून आलेलीं उत्तरें "जी हुकुम" ह्या सदराखालीं निव्वळ येत नाहींत. आपल्या देशबंधूंचे काय उद्योग चालू आहेत, व त्यांच्या मनोवृत्ती कोणत्या प्रकारच्या आहेत, ह्यांची

बरोबर माहिती कित्येक बाबतींत ह्या संस्थानिकांना जशी असते, तशी हिंदुस्थानच्या इंग्रजी अधिकाऱ्यांस नसते. आणि, हीं जीं वर सांगितल्याप्रमाणें व्हाइसरायसाहेबांच्या खलित्यास त्यांच्याकडून उत्तरें आलीं आहेत, त्यांत त्यांनीं आपला अनुभव व आपल्या मनास पटलेल्या गोष्टी दाखल केल्या आहेत. निजामसाहेबांच्या पत्राची भाषा तर विशेष स्पष्ट व समयास अनुरूप अशीच आहे. "बेकायदेशीरपणा व बेबंदशाई यांना जोर येऊन, त्यांचा नाच एकदां सुरू झाला, ह्मणजे त्यांची मजल कोठपर्यंत जाईल, याचा नेम नाहीं. हिंदुस्थानांतील अफाट लोकसंख्येच्या मानानें, असंतुष्ट झालेले लोक फारच थोडे आहेत, हें खरें आहे. परंतु, वेळ मिळून संधी सांपडली, तर हेच थोडे लोक आपले हात सर्व देशभर लांबवितील; आणि, अद्यापपर्यंत ज्या मोठ्या जनसमूहास राजद्रोही चळवळींची मुळींच बाधा झालेली नाहीं, त्यांच्या मनांत आपल्या विषारी विचारांचें बीं पेरतील, अशी मोठी भीति आहे." रजपुतान्यांतील राजेरजवाड्यांमध्यें उदेपुरच्या म[illegible]राण्यास पहिल्या प्रतीचा मान असल्यामुळें, त्यांच्या मतास एक विशेष प्रकारची किंमत आहे. "चांगल्या रीतीनें राज्य करणें व समाजाची व्यवस्था ठेवणें ह्या गोष्टींना घातुक अशा ज्या चळवळी आहेत," त्यांना फक्त दूषण देऊन न राहतां, हे राणाजी आणखी असेंहि स्पष्ट ह्मणतात कीं, "ब्रिटिश राजछत्राखालीं हिंदुस्थानची भरभराट चांगल्या तऱ्हेनें झाली असतांहि, ह्या लोकांनीं अशा प्रकारचा [illegible]तघ्नपणा करावा, हें त्यांच्या नावालौकिकास व धर्मश्रद्धेस मोठेंच लांछन आहे." [illegible] ऐसे मराठे राजे ([illegible] सरकार) यांचेंहून[illegible] ह्मणणें कमी [illegible] नाहीं :— "हिंदुस्थानच्या भावी उन्नतीवर या गोष्टीं[illegible]

परिणाम होणार असल्यामुळें, तिला निःसंशय फार महत्त्व आहे;" आणि, "लोकांचें बरेंवाईट पाहण्याचें ज्यांचें काम आहे, व ज्यांच्या हितसंबंधांसहि मोठा धोका आहे, त्यांनीं आलेल्या संकटाशीं मोठ्या जोरानें झगडण्यासाठीं, शक्य तितक्या सर्व गोष्टी केल्या पाहिजेत; व हें त्यांचें एक विशेष कर्तव्यकर्म आहे." जयपुरचे महाराज हे जुन्या पिढीच्या हिंदु राजांपैकीं एक अत्यंत सुज्ञ राजे आहेत. त्यांना ही गोष्ट मान्य आहे कीं, "हिंदुस्थानच्या एकंदर लोकांपैकीं फारच थोड्या लोकांचीं डोकीं राजद्रोहाच्या विचारांनीं भणाणून गेलीं आहेत." परंतु, पुढें ते आणखी अर्थयुक्त रीतीनें असें ह्मणतात कीं, "कर्तृत्ववान, श्रीमंत व बिनदिक्कत वाटेल ती गोष्ट करण्यास तयार होणाऱ्या लोकांनीं ह्या थोड्याशा राजद्रोही लोकांस हातीं धरून, मोठ्या हुशारीनें काम चालविलें आहे, असें दिसतें;" आणि, "ज्या गोष्टीची जरूर आहे ती ही कीं, **सामदामदंडभेद** इत्यादि उपाय योजून, हे जे सर्वांचेच सारखे असे शत्रू आहेत, त्यांच्याशीं लढण्याकरितां व्यवस्थितपणानें व एकजुटीनें प्रयत्न झाले पाहिजेत."

तरुण हिंदु संस्थानिकांतील अत्यंत सुज्ञ मंडळीमध्यें देवासच्या राजेसाहेबांचा समावेश होतो. या राजेसाहेबांचें असें ह्मणणें आहे कीं, "ही गोष्ट सर्वांस चांगलीच माहीत आहे कीं, राजद्रोही मंडळीचे सर्व प्रयत्न सार्वभौम सरकाराविरुद्धच चालू आहेत असें नाहीं, तर हिंदुस्थानांतील सर्व प्रकारच्या कायद्यानें प्रस्थापित झालेल्या शासनपद्धतींविरुद्धहि (राज्यांविरुद्ध) ते चालू आहेत. ह्याचें कारण ह्मटलें ह्मणजे, **स्वदेशाभिमानासंबंधाच्या** त्या लोकांच्या समजुती अगदींच चुकीच्या असून,

शिवाय, **लोकसत्ताक राज्याची** स्थापना हिंदुस्थानांत व्हावी, ह्या लोकप्रिय कल्पनेनें त्यांना अगदीं मोहित करून टाकिलें आहे. पण वास्तविक ह्मटलें तर, लोकसत्ताक राज्यपद्धति येथें सुरू होण्यास लोकांच्या अंगीं जी योग्यता असली पाहिजे, ती अद्यापि मुळींच नाहीं, असें प्रत्येक विचारी हिंदी मनुष्यानें कबूल केलेंच पाहिजे." राजेसाहेबांनीं आणखी असेंहि ह्मटलें आहे कीं, आपली स्वतःची अशी खात्री होऊन चुकली आहे कीं, इतिहासावरून व "विवेकी" माणसांच्या मतावरून असें दिसतें कीं, पश्चिमखंडांत **लोकसत्ताक राज्य** ह्या शद्बांचा जो अर्थ समजला जातो, त्या दृष्टीनें पाहिलें, तर तितकी सत्ता हिंदुस्थानच्या लोकांस खचितच मिळणार नाहीं.

धर्माचें पुनरुज्जीवन व राजद्रोह ह्यांच्यामध्यें अगदीं निकट संबंध आहे, ह्मणून जें मी वारंवार मोठ्या जोरानें प्रतिपादन करित आलों आहे, तेंच दुसऱ्या एका हिंदु राज्यकर्त्यानें—ह्मणजे रतलामच्या राजेसाहेबांनीं—आपल्या पत्रांत सांगितलें आहे. "हिंदुलोकांच्या—किंबहुना सर्वच पौर्वात्य लोकांच्या—मनावर धर्माचा जितका पगडा बसतो, तितका दुसरा कशाचा बसत नाहीं," ही गोष्ट राजेसाहेब चांगली जाणतात. कोणाच्याहि धर्मांत हात न घालतां, त्या बाबतींत लोकांना पूर्ण स्वातंत्र्य उपभोगूं द्यावयाचें, असें आजपर्यंत सरकारचें धोरण आहे; व तें अगदीं वाजवी आहे. परंतु, ज्याअर्थीं राजद्रोही लोक आपल्या अत्याचारी चळवळींचा संबंध धर्माशीं जोडूं पाहण्याची खटपट करित आहेत, व साधूंचें सोंग घेऊन, लोकांत राजद्रोही कल्पनांचा फैलाव करण्याचा उद्योग सुरू

झाला आहे, त्याअर्थी धर्माच्या नांवाखालीं मोडणाऱ्या गोष्टींत हात न घालण्याचें धोरण सोडून देण्याची वेळ अगदीं येऊन ठेपली आहे. रतलामचे राजेसाहेब बेधडक सांगतात कीं, "ठगी व सती ह्या दोन्ही चालींना धर्माचें पाठबळ होतें, तरी त्या जशा बंद करण्यांत आल्या, तद्वतच जो नवीन धर्म हल्लीं लोकांना सांगण्यांत येत आहे, त्याची वाट लाविली पाहिजे. ह्या धर्मांत शिवाजीसारख्या ऐतिहासिक महापुरुषांची उपासना व 'फक्त हिंदीलोकांकरितांच हिंदुस्थानदेश' अशा मतांचा समावेश होत असतो." ते आणखी असें ह्मणतात कीं, "वरच्याप्रमाणें लिहितांना माझ्या मनाला मोठें दुःख होत आहे. परंतु, ह्या बाबतींत धर्माच्या नांवाखालीं अगोदरच पुष्कळ गोष्टी होऊन गेल्या आहेत; व हत्यारें आणि बांबगोळे ह्यांचा सुगावा लागण्याकरितां जेव्हां जेव्हां ह्मणून झाडा घेण्यांत आला, तेव्हां तेव्हां बहुधा धर्मावरील पुस्तकें सांपडलेलीं आहेत. उपाध्ये, साधू वगैरेंचा धंदा मोठा सोयीस्कर आहे; व धर्मोपदेशकांपुढें राजेलोकांनीं मान वांकविली आहे, व अद्यापिहि ते वांकवित असतात. हे लोक प्रायः धर्मतत्वांच्या अर्थाचा विपर्यास करितात, व अशा रीतीनें लोकांचीं मनें बिघडवून टाकतात. राजनिष्ठा व मित्रभाव यांनीं ओथंबलेलें एखादें मानपत्र कधींकाळीं देऊन, सरकारची खुशामत करण्याची विद्या अशा धर्मसंस्थापकांना फार चांगली साधलेली असते. तथापि, असल्या धर्माच्या प्रसारास आळा घालण्याची फारच जरुरी आहे." देशी संस्थानिक केवळ राजनिष्ठेचें शाब्दिक प्रदर्शन करून व राजद्रोहास दूषण देऊन स्वस्थ बसत नाहींत. बडोद्याचे गायकवाड खेरीज करून, बाकीच्या सर्वांनीं व्हाइसरायसाहेबांच्या सल्ल्यास

उत्तर ह्मणून, त्यांनीं विचारल्याप्रमाणें, आलेल्या संकटाचें निवारण करण्यास उत्तम उपाय कोणते, ते आपापल्या समजुती-प्रमाणें अगदीं मनापासून कळविले. गायकवाडानीं अगदीं विरुद्ध मत जरी दिलें नाहीं, तरी त्यांच्या उत्तरांत जी कांहीं अनुत्सुकता दिसून आली, तिच्यामुळें सर्व राष्ट्रीय पक्षाच्या वर्तमानपत्रांनीं महाराजसाहेबांची मोठी पाठ थोपटली. बहुतेक संस्थानिकांची अगदीं पहिली सूचना अशी होती कीं, हिंदुस्था-नांतील वर्तमानपत्रांना जें हल्लीं निरंकुश स्वातंत्र्य आहे, त्याला आळा घातलाच पाहिजे. कारण, हिंदुस्थानचे राज्यकर्ते व प्रजा ह्यांच्यामधील वैरभाव जो वाढत चालला आहे, त्याची सर्व जबाबदारी मुख्यतः मनास येईल ते बेलाशक लिहिणाऱ्या वर्तमानपत्रकर्त्यांच्या शिरावर आहे, असें ह्या संस्थानिकांचें ह्मणणें आहे. आतां, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, वर्त-मानपत्रांचा नवीन कायदा पास करून घेण्याचा विचार विलायत सरकार व हिंदुस्थानसरकार यांनीं ठरविण्यापूर्वींच कित्येक महिने, संस्थानिकांनीं ह्याप्रमाणें आपलीं मतें दिलीं होतीं. निजामसाहेबांचें असें मत आहे कीं, जीं वर्तमानपत्रें खोटीं खोटीं विधानें करतील व बातम्या फुगवून देतील, त्यांना "तीं विधानें जाहिररीतीनें परत घेण्यास, अगर सांगितल्याप्रमाणें चुकीची दुरुस्ती करण्यास" सरकारी नात्यानें भाग पाडलें पाहिजे. कारण, निजामसाहेब ह्मणतात कीं, "सार्वजनिक रीतीनें केलेल्या भलभलत्या विधानांस नुसतें तुच्छ मानून स्वस्थ बसणें, हें ह्यापुढें सुरक्षित नाहीं, अथवा इष्टहि नाहीं. कारण, एकतर असें आहे कीं, शिक्षणाचा प्रसार होत असल्यामुळें, आपल्या देशांत कोठें काय चाललें आहे, ह्यासंबंधाच्या बातम्या जाणण्याची

सर्व लोकांत हौस उत्पन्न झाली आहे; आणि, दुसरी गोष्ट अशी आहे कीं, युरोपियनलोक व हिंदी लोक यांच्यामध्यें वैरभाव उत्पन्न होईल, अथवा अडाणी आणि भोळ्या लोकांच्या मनांत सरकार व त्यांचे अधिकारी यांच्याविषयीं वैषम्य येईल, अशा तऱ्हेच्या बातम्या कित्येक वर्तमानपत्रें जाणून-बुजून पसरवित असतात." कित्येक संस्थानिकांची अशी सूचना आहे कीं, राजकीय गुन्ह्यांची चौकशी हल्लींपेक्षां झटपट रीतीनें करून, तिला इतकी प्रसिद्धिहि येऊं देऊं नये. आतां, असे उपाय प्रथमदर्शनीं जरी जुलमी किंवा दांडगाईचे वाटले, तरी "ह्या देशाच्या स्थितीला ते अगदीं योग्य आहेत." कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, "जे धर्माच्या नांवाखालीं भीक मागणारे लोक" (संन्यासी, बैरागी, गोसावी, वगैरे) साधूचें सोंग घेऊन, लोकांना राजद्रोहाचा उपदेश करित भटकत असतात, त्यांच्यावर अधिक नजर ठेविली पाहिजे, आणि देशांत ज्या राजद्रोहात्मक चळवळी चालू आहेत, त्यांच्यासंबंधाची गुप्त बातमी निरनिराळीं संस्थानें व सार्वभौम सरकार यांनीं परस्परांस अधिक चांगल्या रीतीनें देत गेलें पाहिजे. कांहीं संस्थानिकांचें असें मत आहे कीं, राजनिष्ठ लोकांस खरी माहिती देऊन धीर देण्याकरितां—ह्मणजे राजद्रोही लोकांच्या उलट दिशेनें काम करण्याकरितां—संस्था स्थापन केल्या पाहिजेत.

परंतु, शिक्षणाच्या बाबतींत कांहीं राज्यकर्ते संस्थानिक अत्यंत अधिकारयुक्त वाणीनें व वजनशीरपणानें बोलत असावेत. हल्लींच्या शिक्षणपद्धतींत धार्मिक व नैतिक शिक्षणाची व्यावहारिक शिक्षणापासून ही फारकत झालेली आहे, त्याबद्दल

त्यांना जसें वाईट वाटतें, तसें दुसऱ्या कशाबद्दलहि वाटत नाहीं. कारण, सध्यां जें अरिष्ट आलें आहे, त्याच्या बऱ्याच भागाची जबाबदारी प्रचलित शिक्षणपद्धतीवर आहे, असें त्यांचें मत आहे. देवासचे राजेसाहेब ह्मणतात कीं, "मी जें ह्मणतों तें कानाला जरी चमत्कारिक लागलें, तरी ही गोष्ट सर्वांस चांगली माहीत आहे कीं, हिंदुस्थानांतील सध्यांच्या अस्वस्थतेचें बीज शिक्षणरूपी, मानवी जातीच्या हितकर्त्याकडू-नच पेरलें जातें." दुसऱ्या एका संस्थानिकाचें मत असें आहे कीं, ज्याअर्थी शिक्षणाचा अत्यंत मोठा हेतु शील बन-विण्याचा असतो, त्याअर्थी परीक्षांच्या मोठ्या संख्येकडे न पाहतां, ह्या दिशेनें (शील बनविण्यासंबंधानें) त्यांच्याहातून जें काम होईल तें पाहून, सर्व सार्वजनिक शाळांचे नंबर लावावेत. कित्येकांचें असें जोराचें ह्मणणें आहे कीं, विद्या-र्थ्यांना राहण्याची सोय कॉलेजांतून अधिक करावी, व चांगले शिक्षक नेमण्याची अधिक काळजी घ्यावी.

आतां, ह्या पत्रांत (संस्थानिकांच्या) जीं मतें प्रदर्शित केलीं आहेत, किंवा ज्या सूचना केल्या आहेत, त्या सर्वच कोणाला पसंत पडतील, असें ह्मणतां येत नाहीं; परंतु, त्या सर्वांमध्यें जी साधारण एकवाक्यता दिसून येते, तिला महत्त्व दिल्याशिवाय चालावयाचें नाहीं. विलायतसरकार व हिंदुस्थानसरकार या दोघांनीं तरी ह्या एकवाक्यतेला निखालस महत्त्व दिलें आहे. गेल्या फेब्रुवारींत, वर्तमानपत्रांचा व छापखान्यांचा जो नवीन कायदा झाला, तो कांहीं अंशीं वरील कारणामुळें (संस्थानिकांचें एकमत झाल्यामुळें) झाला इतकेंच नाहीं, तर हिंदुस्थानांतील शिक्षणपद्ध-तीचा विचार फार लवकर झाला पाहिजे, असें जें सर्वांस वाटूं

लागलें, तेंहि कदाचित् वरील कारणामुळेंच होय. देशी संस्थानिकांचीं मतें व त्यांच्या सूचना प्रसिद्ध करण्यांत आल्यावर, खुद्द हिंदुस्थानांत त्याचा स्वाभाविकपणें मोठाच परिणाम झाला. कारण, त्यांच्यापैकीं पुष्कळांची, मोठी इभ्रत व वजन खुद्द त्यांच्या मुलखाबाहेरील प्रदेशांतहि दूरवर आहे. क्रांतिकारक मंडळीच्या तर तळव्याची आग मस्तकास जाऊन पोहोंचली; आणि, आपल्याच जातीच्या राज्यकर्त्यांच्या ह्या उद्गारांस उत्तर ह्मणून जें पत्रक छाण्यांत आलें होतें, त्याची भाषा इतकी कडक होती कीं, तशी "परके" राज्यकर्ते व "उन्हानें कोळपले अधिकारी" ह्यांच्या विरुद्ध काढलेल्या राजद्रोही पत्रकांचीहि नव्हती. एका संस्थानिकाला आलेली प्रत, "एक विशेषप्रकारचा कागद" ह्मणून, त्यानें माझ्या हवालीं केली आहे. त्याच्यावरील मथाळा असा आहे "अहो हिंदी राजांनो, काय तें ठरवा." तथापि, संस्थानिकांचा समाचार घेण्याचा मार्ग अझून आंखून टाकण्यांत आला नाहीं, अशी त्यांची खात्री पत्रकाच्या आरंभींच केली आहे, हें खरें आहे.

एकदां मातेचें मातेला मिळालें व ती स्वतंत्र झाली, ह्मणजे राज्यक्रांती-नंतर आपल्या आयुष्यक्रमाचा मार्ग दाखविण्याकरितां, कोणत्या प्रकारची शासन-पद्धति स्वीकारावयाची, हें मातेच्याच शब्दाशिवाय दुसरें कोणीहि ठरविणार नाहीं, व कोणासहि ठरवितां येणार नाहीं. ... ... बारीक सारीक मुद्यांचा विचार न करितां, आह्मी इतकें सांगतों कीं, हिंदी राष्ट्राच्या वरिष्ठ राज्यकारभाराचा मुख्य **अध्यक्ष** असणार किंवा **राजा** असणार, ही गोष्ट घडून येणाऱ्या राज्यक्रांतीच्या परिणामावर अवलंबून आहे ... ... मातेची सुटका झाली पाहिजे; एक होऊन तिची एकी झाली पाहिजे; तिच्या इच्छेला मुख्यपद मिळालें पाहिजे. आणि मग आपल्या मस्तकावर राजमुकुट धारण करून, अथवा आपल्या पवित्र अंगावर प्रजासत्ताक राज्याच्या मुख्या-धिकाराचें चिन्ह ह्मणून शेला पांघरून, आपली इच्छा की त्यास प्रकट करून

कदाचित् दाखवील.

परंतु, आतां जवळ येऊन ठेपलेल्या मोठ्या राष्ट्रीय धडपडीमध्यें आपल्या स्वतःची आहुति तरी द्या, किंवा निदान-पक्षीं बाजूला राहून तमाशा पाहा, असा, मोठे त्वेषाचे शब्द घालून त्यांना बुद्धिवाद सांगितल्यावर, ह्या ताकीदवजा उपदेशपर शब्दांकडे त्यांनीं दुर्लक्ष केल्यास काय परिणाम होईल, हेंहि सांगितलें आहे तें असें:—

अहो राजांनो, विसर पडूं देऊं नका. तुम्ही केलेल्या व न केलेल्या कृत्यांचा पुरा झाडा मागितला जाईल; आणि नवीन जन्म पावलेली प्रजा तुमच्याशीं "जशास तसें" वागल्याशिवाय राहणार नाहीं. जो कोणी आपल्या कृत्यानें लोकांचा विश्वासघात करील, आपल्या पूर्वजांचा धिक्कार करील आणि माते-विरुध्द उभा राहून आपल्या रक्तास हीनता आणील, त्याची खास राखरांगोळी करून टाकली जाईल. ... ... आम्ही थट्टेनें बोलत आहों, अशी तुम्हाला शंका येते काय? असेंच असेल, तर धिंग्र्याचें नांव ऐका आणि मुके पडा. अहो हिंदी राजेलोकांनो, देशासाठीं बळी पडलेल्या त्या पुरुषाची शपथ घालून आम्ही तुम्हाला विनंति करितों कीं, ह्या शब्दांचा तुम्ही गंभीरपणानें चांगला नीट विचार करा. तुम्हांला बरें दिसेल तें करा; पण जें पेराल तें रुजेल, हें लक्ष्यांत ठेवा. राष्ट्राचे पहिले पालनकर्ते होणें किंवा राष्ट्राचे शेवटचे प्रजापीडक होणें, हें तुमच्या हातीं आहे. म्हणून सांगतों, काय तें ठरवा.

अलीकडे हिंदी प्रजेच्या हातीं नवीन नवीन सत्ता येत चालली आहे, त्यामुळें घाबरून जाऊन, ह्या क्षुद्र सर्वसत्ताधारी पौर्वात्य राजांनीं अशीं मतें दिलीं आहेत, म्हणून त्या मतांना फारशी किंमत देण्याचें कारण नाहीं, असें ठरविण्याचा प्रयत्न कित्येक ठिकाणांहून होत असतो. आतां, अशा तऱ्हेचा प्रयत्न करणाऱ्या लोकांचीं माथीं वरच्या लोकांच्याप्रमाणें बिघडलेलीं नाहींत, हें खरें आहे. परंतु, त्यांचें म्हणणें खरें असतें, तर त्या वेळीं हे सर्वसत्ताधारी जुलमी राजे राजद्रोहासंबंधाचे आपले

विचार गुप्त ठेवित नाहींत, त्याच वेळीं उदार आणि प्रगतिपर धोरण ठेवण्याची आवश्यकता आहे, असें तेच लोक तितक्याच स्पष्टपणानें सांगत आहेत. खुद्द निजामसाहेब मोठ्या जोरानें प्रतिपादन करितात कीं, "हिंदुस्थानाच्या हल्लींच्या स्थितीशीं तोंड देण्याकरितां, लोकांची मनधरणी करणें व त्यांना दाबणें अशा दोन्ही गोष्टी एकदमच करावयास पाहिजेत, असें माझें स्वतःचें पक्कें मत आहे. राजद्रोहाची जागा शोधून काढून, त्याचीं पाळेंमुळें अगदीं साफ खणून काढलीं पाहिजेत; आणि ह्या कामांत दयामायासुद्धां दाखविण्याचें बिलकूल कारण नाहीं. परंतु, त्याचवेळीं जात, गोत, धर्म, रंग इत्यादि गोष्टी लक्ष्यांत न घेतां, राजनिष्ठ लोकांशीं वागतांना, सर्व गोष्टींत त्यांना पूर्ण सहानुभूति दाखवून, मनांत कांहींएक किंतु न बाळगतां, त्यांच्यावर विश्वास टाकिला पाहिजे." आतां, दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, हल्लींच्या काळांत एखाद्या हिंदी गृहस्थाला, पुष्कळ राजकारणी लोकांप्रमाणें, दंगाधोपा व गुन्हे करणाऱ्या लोकांच्या मतांशीं खेळण्याबागडण्यास जितकें धैर्य असावें लागतें, त्यापेक्षां अशा तऱ्हेची भाषा वापरण्यास अधिक लागतें. वर्तमानपत्रांतून वगैरे आपल्याविरुद्ध लेख येऊं लागले, ह्मणजे उच्च दर्जाच्या हिंदी लोकांस विशेष वाईट वाटतें, ह्याचें कारण कदाचित् असें असावें कीं, त्यांच्या समाजांतील भिन्न भिन्न जातींच्या अस्तित्वामुळें, वर्तमानपत्रांतील अशा टीकेच्या सर्व सामाजिक बाबतींतील निरनिराळ्या प्रकारचा छळ बहुधा रुजून बसलेला असतो. आह्मा लोकांच्या (इंग्रजांच्या) मात्र दुर्दैवानें अशी समाजव्यवस्था आमच्यांत नसल्यामुळें, अशा प्रकारचा सामाजिक छळ आह्मांस कधींच सोसावा लागत नाहीं.

आतां, सांप्रतच्या परिस्थितीमध्यें, मनाचा अत्यंत निरुत्साह करणारी एक गोष्ट अशी आहे कीं, हिंदुस्थानांतील संस्थानिकांनीं जीं मतें बोलून दाखविलीं आहेत, तीं **नेमस्त**–पक्षाच्या ज्या राजकारणी पुरुषांस सर्वतोपरि मान्य असतात, त्यांच्यापैकीं अगदीं थोड्या लोकांच्या ठिकाणीं त्या मतांस प्रसिद्धपणें पुष्टि देण्याचें मनोधैर्य दिसून येतें.

राजद्रोहाचें निर्मूलन करण्याच्या कामीं, देशी राज्यकर्ते संस्थानिक काय उपाय सुचवितात व कोणत्या रीतीनें साह्य करण्यास तयार आहेत, हें जाणण्याच्या हेतूनें, लॉर्ड मिंटो साहेबानीं जो खलिता त्यांच्याकडे पाठविला होता, त्याची त्यांनीं अगदीं निर्भयपणानें उत्तरें पाठवून, आपले विचार लाटसाहेबास स्पष्टपणें कळविले, ह्या गोष्टीवरून जो एक दुसरा बोध होतो, तो आपण (इंग्रज लोकांनीं) चांगलाच लक्ष्यांत ठेविला पाहिजे. संकट उत्पन्न होऊन त्यानें डोकें बाहेर काढल्यावर, मग हिंदुस्थानसरकारनें त्यांचा सल्ला विचारिला. आतां, मागेंच त्यांच्याशीं आह्मीं अधिक निकट संबंध ठेविला असता, व त्यांची माहिती व अनुभव ह्यांची खरी किंमत आह्मांस कळती, तर सध्यांचें संकट मुळींच आलें नसतें, अथवा त्याला इतका भयंकर जोर आला नसता, ही गोष्ट शक्य नव्हती काय? असो; निदान आतां देशी संस्थानिक व सार्वभौम सरकार या उभयतांसहि आपणासर्वांवरच संकट आलें आहे, असें कळून चुकल्यामुळें, ह्या सर्व मंडळीचा पूर्वीपेक्षां जास्त एकोपा झाला आहे. आणि ह्मणूनच, उभयतांमधील, एकजुटीनें काम करण्याच्या बुद्धीची वाढ होऊन, तीं पुढें कायम राहण्याकरितां, कांहीं तरी नवीन साधन उत्पन्न करण्याच्या कामीं, ह्यापुढें मुळींच दिरंगाई होतां कामा नये.



भाग १६ वा.

आडवे तिडवे ओघ.

हिंदुस्थानांतील अस्वस्थतेंत राजकीय स्वरूपाच्या गोष्टींचा अंतर्भाव होत असल्यामुळें, तिच्यापासून उत्पन्न झालेल्या अरिष्टांसंबंधानें मुख्यतः लिहिणें मला भाग पडलें. परंतु, हिंदुस्थानचा पाश्चात्य देशांशीं संबंध असल्यामुळें, हिंदीसमाजांतील जो जो वर्ग थोड्याबहुत प्रत्यक्षपणें त्यांच्या प्राबल्याखालीं आला, त्याच्यावर चांगला व वाईट असा दोन्ही तऱ्हेचा, जोरदार परिणाम घडून येण्यास तो संबंध कारणीभूत झाला आहे. पण असें जर न घडतें, तर आमच्या विद्याचारसंपन्नतेमध्यें नैतिकदृष्ट्या कांहींच अर्थ नाहीं, असें खरोखर आम्हांस कबूल करावें लागतें. ज्या कारणांमुळें अस्वस्थता उत्पन्न झाली आहे, त्यांत पुष्कळ विजातीय व बहुधा परस्परविरोधी अशीं कारणें आहेत. आणि, ह्या अस्वस्थतेमुळें ज्या अत्यंत घातुक चळवळी उत्पन्न झाल्या आहेत, त्यांच्यांत देखील कधीं कधीं कांहीं चांगला भाग दृष्टीस पडतो; व अशाचें संरक्षण करून त्याची वाढ होऊं देणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे. पाश्चिमात्य शिक्षणाचा संसर्ग ज्या वर्गांना—अगदीं वरकरणी कां होईना—झाला होता, त्यांच्या ठिकाणीं अलीकडे ह्या शिक्षणाच्या सर्व फलांविरुद्ध उलट खाऊन बंडावा करण्याची प्रवृत्ति जरी पुष्कळच दिसून येते, तरी अद्यापि ह्या प्रवृत्तीचा पूर्ण ताबा त्यांच्या मनावर खात्रीनें बसलेला नाहीं.

पाश्चात्यांच्या विद्याचारसंपन्नतेचें क्षेत्र मोठें असल्याकारणानेंच, हिंदुस्थानामध्यें धार्मिक व बुद्धिविषयक चळवळी मोठ्या जोरानें सुरू झाल्या आहेत. हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन व राजकीय असंतोष ह्यांना **हिंदुराष्ट्रीयत्व** असें मोठें गौरवयुक्त नांव देण्यांत येत असून, त्यांचा समावेश वरील चळवळीमध्यें होतो. आतां, सर्वांच्याच कमनशीबानें, जरी ह्या चळवळी फार महत्त्वाच्या असून अगदीं अलीकडच्या आहेत, तरी केवळ इतक्याच चळवळी होऊन राहिल्या आहेत, असें मात्र नाहीं. दुसरा एक पुष्कळच अधिक हितकर परिणाम झाला आहे तो असा कीं, समाजाचा घटकभाग ह्या नात्यानें आपलें कांहीं कर्तव्य असून आपल्या हातून समाजाची सेवा घडली पाहिजे, अशा प्रकारची जागृति सर्व धर्मांच्या व जातींच्या सुशिक्षित हिंदी लोकांपैकीं पुष्कळांच्या हृदयांत दिवसें दिवस अधिकाधिक होत चालली आहे; आणि विशेषेंकरून अशी जागृति हिंदुलोकांमध्यें जितकी लक्ष्यांत येण्यासारखी झाली आहे, तितकी इतर लोकांत नाहीं. एकमेकांस मदत करणें हा गुण सर्वच पौर्वात्य देशांप्रमाणें हिंदुस्थानांतहि फार दिवसांच्या संवयी-मुळें लोकांच्या अगदीं हाडींमांसीं खिळलेला आहे. हिंदुलोकांचे जाति-निर्बंध, त्यांची एकत्र-कुटुंबांची पद्धत, खेड्यांतील जुनी व्यवस्था, इत्यादि गोष्टींत परस्परांस साह्य करण्याचें जें तत्त्व दिसून येतें, तो त्यांच्यामधील फार मोठा गुण आहे; आणि त्यामुळेंच, आम्हांस (इंग्रजांस) विलायतेंत "गरीब लोकांचे कायदे" करून, त्यांच्यायोगानें अगदीं कंगाल लोकांच्या दीन स्थितीचें निवारण करण्याचा मोठा दुःखदायक प्रसंग येत असतो, तशा प्रकारची स्थिती हिंदुस्थानांत इतकें दारिद्य असतांहि कां येत नाहीं, ह्या प्रश्नाचा उलगडा होतो. परंतु, पाश्चिमात्य

कल्पना हिंदुस्थानांत येऊन, त्यांच्यायोगानें इकडील लोकांच्या मनांत खळबळ उडून जाण्यापूर्वीं, ह्या परस्पर-साह्याच्या तत्वाची अमलबजावणी प्रायः समाजाच्या भिन्न भिन्न घटकभागांतल्या भागांतच (जातींत व पोटजातींतच) होत असे; ह्मणजे, त्याची व्याप्ति फारच लहान होती. पण, आतां ही स्थिति हळूहळू पालटूं लागली असून, एकंदर समाजांतील निरनिराळे वर्ग, जाती वगैरे परस्परांवर सामाजिक बाबतींत अवलंबून आहेत, ह्या कल्पनेचा उजेड लोकांच्या हृदयांत पडूं लागला आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जाती, पंथ वगैरे म्हटले ह्मणजे मोहरबंद केलेल्या पेट्याच होत. ३०-४० वर्षांपूर्वींच्या जुन्या पिढींतल्या लोकांत, सामाजिक सुधारणा करण्याच्या बाबतींत जो उत्साह उत्पन्न झाला होता, त्यामुळेंच हिंदी लोकांची नजर सामाजिक बाबतींत ह्याप्रमाणें दूरवर फांकूं लागली. आतां, अलीकडच्या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनांमधूनच ह्या गोष्टीचा उगम आहे, असें जें कित्येकांचें ह्मणणें आहे, तें मात्र साफ खोटें आहे; कारण, त्या काळीं राष्ट्रीयत्वाचें मुळीं नांव देखील ऐकूं येत नसे. ह्या नवीन राष्ट्रीयत्वाच्या कल्पनांमुळें लोकांत धार्मिक व सामाजिक प्रश्नांसंबंधानें जी उलट खाण्याची प्रवृत्ति उत्पन्न झाली आहे, त्यामुळेंच मीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, सामाजिक सुधारणेला धक्का बसला आहे इतकेंच नाहीं, तर जेथें विशेषशी फलप्राप्ति नाहीं, अशा राजकीय चळवळींत देशांतील कांहीं चांगले चांगले कर्तृत्ववान लोक पडून, त्यांचे श्रम वायां जात असल्यामुळेंहि, सामाजिक सुधारणेचें पाऊल मागें पडत आहे.

आतां, जरी सामाजिक सुधारणेच्या गतीस अडथळा आला आहे, तरी तिचा मार्ग सर्वस्वी खुंटला आहे असें

नाहीं. आणि, जोंपर्यंत हिंदुस्थानांत ब्रिटिश लोकांची सत्ता कायम राहणार, तोंपर्यंत सामाजिक सुधारणा अजीबात बंद पडणें मुळीं शक्यच नाहीं. कारण, ब्रिटिश सत्तेमुळें पाश्चिमात्य कल्पनांचें व ध्येयांचें वर्चस्व कायम राहणारच. परकी लोकांच्या सत्तेचें जूं झुगारून देऊन मोकळें होण्यापेक्षां, हिंदी समाजानें आपल्याच हातानें स्वतःच्या पायांत जी शृंखला अडकवून घेतली आहे, तींतून मुक्त होण्याची आवश्यकता अधिक आहे, असें समजणारे अद्यापि पुष्कळ सुशिक्षित हिंदी गृहस्थ आहेत, ही मोठी सुदैवाची गोष्ट आहे. हल्लींच्या काळास अयोग्य अशा, मानभंग करणाऱ्या कित्येक गोष्टी हिंदी समाजव्यवस्थेंत असल्यामुळें, सर्वांस लाजेनें खालीं पहावें लागतें. म्हणून, अशा लाजिरवाण्या गोष्टी काढून टाकिल्या पाहिजेत, असें निदान तोंडानें कबूल करणारे लोक बहुतेक सर्व तऱ्हेच्या मतांच्या राजकारणी पुरुषांमध्यें देखील आहेत. मुख्यतः, राजकीय चळवळी करण्याकरितां, ज्या राजकीय स्वरूपाच्या संस्था प्रसिद्ध आहेत, त्यांच्याबरोबरच सर्व हिंदुस्थानभर इतर संस्था शांतपणानें अस्तित्वांत येत असून, वृद्धिहि पावत आहेत. ह्या संस्थांचा मुख्य उद्देश, राजकारणाशीं ज्यांचा संबंध नाहीं किंवा असण्याची आवश्यकताहि नाहीं, असें सामाजिक, धार्मिक व सांपत्तिक प्रश्न हातीं घेण्याचा असतो. केवळ नुसत्याच राजकारणांत गढून गेलेल्या लोकांच्या, राक्षसी हावभावाच्या, "अल्लच्या" ओरडण्यामध्यें वरील प्रकारचें काम करणाऱ्या लोकांचा आवाज उठून बाहेर येत नाहीं, असें पुष्कळ वेळां घडतें; व हिंदुस्थानाबाहेरील देशांतील लोकांचें लक्ष त्यांच्याकडे जात नाहीं म्हटलें तरी चालेल. परंतु, राज-

कीय स्वरूपाच्या मुळींच नाहींत अशा ज्या सभा, परिषदा, कानफरन्सा दरसाल सर्व देशभर भरत असतात, त्यांत जें पुष्कळ दिशेनें काम होत असतें, तें, हिंदुस्थानांत कांहीं दिवस घालविलेल्या माणसांच्या नजरेस आल्याशिवाय राहणार नाहीं. गेल्या १२ महिन्यांत, 'सर्व हिंदुस्थानची मद्यपाननिषेध-सभा' 'ख्रिस्तीलोकांच्या प्रयत्नाची सभा', 'थिआसाफीची सभा', 'हिंदी राष्ट्रीय सामाजिक परिषद,' 'मुसलमानांची शिक्षणपरिषद,' 'शीखलोकांची शिक्षणपरिषद' वगैरेसारख्या, परोपकारार्थ व धर्माचा प्रसार करण्याकरितां सभा झाल्या. त्याचप्रमाणें, पंजाब-मधील उद्योगधंद्याच्या व शेतकीच्या प्रदर्शनाबरोबरच लाहोरास भरलेल्या 'उद्योगधंद्याच्या परिषदे'-सारख्या सांपत्तिक स्थितीचा विचार करण्याकरितांहि सभा झाल्या. शिवाय, 'रजपूतांची परिषद', 'पंजाबच्या हिंदूंची परिषद', 'कायस्थांची परिषद,' 'पारशी परिषद,' वगैरे-सारख्या कितीतरी सभा आपापल्या जातीच्या व समाजाच्या हिताच्याच प्रश्नांसंबंधानें विचार करण्याकरितां भरल्या होत्या हें खरें; तथापि, ह्या कारणांमुळें, हिंदुस्थानच्या सर्व भागांतून— निदान सबंद प्रांतांतून—त्या त्या जातीचे किंवा समाजाचे प्रतिनिधी एकत्र जमले होते. ह्या सभांपैकीं कित्येकांचा राजकीय हेतु साधण्याकडेहि उपयोग करून घेतां येईल. 'पारशी परिषदेसारख्या कित्येक सभांतून, कोणास कल्पना नव्हती अशा बाबतींत, प्रगतीच्या मार्गापासून पराङ्मुख होण्याची प्रवृत्ति दिसून येते. कारण, पाश्चिमात्य तऱ्हेच्या शिक्षणामुळें, ज्यांची इतरांपेक्षां अधिक भरभराट झाली असून, हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या लोकांपेक्षां आपण प्रगतिप्रिय, सुधारलेले व समंजस आहों, असा

जे मोठा गर्व वाहतात, त्याच पारशी लोकांत कांहीं थोडा वेळ टिकणारा कां होईना--पण एक प्रकारच्या, चमत्कारिक, अज्ञानमूलक पुराणप्रियतेचा जय झालेला दिसेल, असें पूर्वी कोणाच्या स्वप्नींहि आलें नसतें. परंतु, पाश्चात्यांनीं स्वानुभवावरून ज्या गोष्टी चांगल्या ह्मणून ठरविल्या आहेत, त्यांचा उपयोग हिंदुस्थानांतील प्रश्न सोडविण्याकडे करण्याकरितां, आणि तसेंच हिंदी लोकांच्या चालीरीती व समजुती ह्यांचें अर्वाचीन काळीं अस्तित्वांत आलेल्या टीकात्मक पद्धतीनें निरीक्षण करून, त्यांचा बरावाईटपणा ठरविण्याकरितां, प्रामाणिकपणाचे व अगदीं मनापासून प्रयत्न करण्याच्या हेतूनें, वर सांगितल्यापैकीं बऱ्याच परिषदा भरत असतात. शिवाय, हिंदुस्थानदेशांतील सरकाराप्रमाणें परक्या सरकारास ज्या कित्येक गोष्टींचा उपक्रम करणें शक्य नसतें, --कारण असें केल्यास, तद्देशीय लोकांच्या मनाची जितकी तयारी असते, त्याच्या फारच पुढें सरकारची मजल जाण्याची व लोकांच्या मनांत त्यांच्याविषयीं भयंकर वैषम्य उत्पन्न होण्याची मोठीच भीति असते—अशा कित्येक गोष्टी ह्या परिषदा मुख्यतः हातांत घेत असतात. उदाहरणार्थ, गेल्या (१९०९) वर्षाच्या लाहोर येथील **सामाजिक परिषदेचे** अध्यक्ष मि. लाला देवराज यांनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें :—

जसजसे आपले डोळे उघडत जातील, तसतसे आपणांस कळून येईल कीं, आज ज्या सुधारणा येथें सुचविण्यांत येत आहेत, त्यांच्यायोगानें आपल्यांतील कित्येक घातुक व अनिष्ट चालींच्या मुळावरच घाव पडणार आहे. अशा चाली केवळ आपण स्वतः होऊन प्रचारांत आणिल्या असून, त्यांना आतां कायमचा रामराम ठोकला पाहिजे.

ह्या सर्व प्रकारच्या कामाचीं फळें अजून चांगलींशीं दिसूं लागलीं नाहींत; तरीपण, परंपरागत आलेल्या ज्या रूढींच्या

प्राबल्याविरुद्ध पूर्वी ब्र काढण्याची कोणाची छाती नव्हती, त्यांच्या बरेंवाईटपणाविषयीं आतां जी वाटाघाट होऊं लागली आहे, ह्याच केवळ गोष्टीचा परिणाम, ज्यांच्या राजकीय कल्पना हिंदुधर्माच्या अंगभूत असलेल्या श्रेष्ठतेच्या पायावर उभारलेल्या आहेत, अशांच्या सुद्धां मनावर झालाच पाहिजे. पाश्चिमात्य शिक्षणाचा परिणाम हिंदुलोकांच्या मनावर होण्यापूर्वी, मनुष्याच्या जीविताविषयीं त्यांची जी कल्पना असे, तिच्यामुळें ज्या समाजांत मनुष्य जन्मास येऊन संसार करितो, त्यासंबंधानें त्याचें कांहीं कर्तव्य आहे, असें समजलें जात नसे. परंतु, आतां ती कल्पना पालटून गेल्यामुळेंच— ह्मणजे आपणास सामाजिक कर्तव्यहि बजावलें पाहिजे, असें वाटूं लागल्यामुळेंच— भगवद्गीतेचा देखील नवीन अर्थ करण्यांत येऊं लागला आहें. कधीं कधीं असुरी हेतु साधण्याकरितांहि, ह्या ग्रंथाचा विपर्यास केला जातो, हें वेगळें. राजा राममोहनराय, बाबू केशव चंद्रसेन व माधवराव रानडे यांच्या उद्योगामुळें सामाजिक सुधारणेच्या चळवळी झाल्या होत्या. तशाच चळवळी त्यांच्यापेक्षां पुष्कळच कमी योग्यतेच्या माणसांकडूनहि होत गेल्या, तर हल्लीं सुधारणेविरुद्ध जें बंड माजविण्यांत आलें आहे, त्याची लाट शेंवटीं फुटून बिनजोर झाल्याशिवाय राहणार नाहीं. कारण पाश्चिमात्य लोकांच्या आचाराविचारांशीं हिंदुस्थानच्या लोकांचे आचारविचार जुळते येतील, अशा तऱ्हेची सुधारणा घडवून आणण्याकरितां त्यांनीं स्वतः अत्यंत परिश्रम केले होते; व त्या सुधारणेच्या हेतूशीं विसंगत असणाऱ्या प्रतिक्रियात्मक हेतूंत सर्व कृत्रिमपणा सामाजिक सुधारणेचा प्रसार करण्याकरितां ज्या मोठमोठ्या संस्था स्थापन झाल्या आहेत,

त्यांच्याबरोबरच पुष्कळ लहान लहान मंडळ्या स्थापन होत आहेत, ह्यांत फार अर्थ आहे, असें वाटतें. ह्या वरील मोठमोठ्या संस्थांच्या सभासदांस फक्त कांहीं प्रसंगींच संस्थेच्या हेतुप्रीत्यर्थ काम करावें लागतें. परंतु, ह्या ज्या लहान लहान मंडळ्या अस्तित्वांत येत आहेत, त्यांचे सभासद परस्परांशीं चांगल्याप्रकारें बद्ध झाले असून, अशा संस्थांचे नियमहि अधिक कडक असतात, व त्याप्रमाणें सभासदांस वागावेंच लागतें. आणि, कित्येक संस्था तर अशा आहेत कीं, सर्वसंगपरित्याग करून मी आपलें सारें आयुष्य लोकसेवेंतच घालवीन, अशी शपथ त्यांच्या सभासदांस घ्यावी लागते. अशा संस्थांपैकीं पुष्कळांच्या कामाची दिशा विशेष चित्ताकर्षक असून, त्यांची माहिती असणें योग्य आहे. परंतु, मी येथें फक्त एकाच संस्थेविषयीं सांगणार आहे; व तिचें उत्पादकत्व एका विशेष व्यक्तीकडे असल्यामुळें, त्या संस्थेला विलक्षण महत्त्व आलेलें आहे. ही संस्था ह्मणजे पुण्यास मि. गोखले यानीं काढलेली "सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी" (हिंदुस्थानच्या सेवकांची मंडळी) होय. हिंदुस्थानच्या अस्वस्थतेंतील, मनाचा बहुधा गोंधळ करून टाकणारा भाग ह्मणजे, जे आडवे तिडवे ओघ (परस्पर- विरोधी स्वरूपाच्या, नानाप्रकारच्या चळवळी) त्यांचा उत्कृष्ट मासला ह्मणजे, मि. गोखल्यांचा आयुष्यक्रमच होय. जे लोक पुढाकार घेतात व ज्यांच्याकडे खरोखर सर्वांचें फार लक्ष लागून राहतें, अशांपैकीं ते एक आहेत, असा विलायतेंतील लोकांचा मुख्यतः समज आहे. ते जातीनें चित्पावन ब्राह्मण आहेत. ह्मणजे, महाराष्ट्रांत फार दिवसांपासून ज्या जातीचें प्राबल्य आहे, तिचें रक्त त्यांच्या अंगांत

खेळत आहे. व्हाइसरायसाहेबांच्या व मुंबई-इलाख्याच्या अशा दोन्ही कौन्सिलांत, परकी सरकाराविरुद्ध कडक आणि अगदीं निकराची देखील टीका पुष्कळ वेळां त्यांनीं केली आहे. तथापि, अशा परकी लोकांच्या सत्तेपासून हिंदुस्थानचा फायदा झाला आहे—किंबहुना तिची येथें आवश्यकताहि आहे—असें ते कबूल करितात. उलट पक्षीं, आपण राष्ट्रीय पक्षाचे आहों, असें ते प्रसिद्धपणें सांगतात; व कायदेशीर रीतीनें सरकारशीं विरोध करण्याकरितां ज्या चळवळी वाजवी होतील, त्यांच्याशीं बंगाली लोकांच्या बहिष्काराच्या चळवळीची संगत लावणें जरी कठीण आहे, तरी १९०६ सालच्या डिसेंबरांत, कलकत्त्यास जी (? बनारसेस) राष्ट्रीय सभेची बैठक होऊन तिच्यांत मोठीं रणें पडलीं होतीं, त्यावेळीं तरी निदान अध्यक्षनात्यानें गोखले यानीं बहिष्काराच्या धोरणास आपलें वजन खर्च करून पाठबळ दिलें होतें. तथापि, हिंदीलोकांस कुमार्गाकडे प्रवृत्त करणारा **देशाभिमान** जागृत करण्याकरितां, टिळकासारखे लोक समाजाचे धर्मसंबंधी पूर्वग्रह व जातीजातींतील व परक्या लोकांविषयींचा द्वेष ह्यांचा फायदा घेऊन, सामाजिक व धार्मिक उन्नतीला विघातक अशा प्रकारचें सुधारणेला विरोध करण्याचें जें नीचपणाचें व्रत स्वीकारितात, त्याचा मि. गोखल्यांसारख्या विवेकी व नीतिमान् मनुष्याला अगदीं मनापासून तिटकारा येतो. पाश्चिमात्य व पौर्वात्य अशा दोन्ही प्रकारच्या विद्यांनीं ते अलंकृत असून, आपणांस ज्या गोष्टी उत्तम वाटतात, त्या व्यवहारांत शक्य आहेत किंवा नाहींत, ह्याचा बिलकूल विचार न करितां, ठरलेल्या तत्वांप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या, फ्रेंचपियन तत्व-

वाद्यांमध्यें मि. गोखल्यांचा जसा समावेश करितां येईल, तसा त्यांच्या देशबांधवांपैकीं इतर कोणाचाहि बहुतकरून करितां येणार नाहीं. अशा तत्ववाद्यांप्रमाणेंच मि. गोखले हे राजकीय गोष्टींत अत्यंत प्रगतिप्रिय व सुधारणेच्छु असून, धर्माच्या बाबतींत **अज्ञेयवादी** आहेत. तथापि, यूरोपियन तत्ववाद्यांच्या ठिकाणीं दिसून न येणारा उत्साह व मनाची तळमळ ह्या गोष्टी त्यांच्यामध्यें दिसून येतात. हिंदुधर्मातील सामाजिक सुधारकांविरुद्ध लोकांस चिडवून, महाराष्ट्रांत अस्वस्थता उत्पन्न करण्याची मोहीम टिळकानें प्रथम जेव्हां सुरू केली, तेव्हां मि. रानड्यांच्या अगदीं पट्टशिष्यांमध्यें व साह्यकर्त्यांमध्यें मि. गोखल्यांसारखा, टिळकाशीं दोन हात करणारा दुसरा कोणीच नव्हता, असें ह्मटलें तरी चालेल. आणि, ह्या अपराधाबद्दल टिळकानें त्यांना कधींहि क्षमा केली नाहीं. टिळकी वर्तमान-पत्रांनीं अगदीं निर्दयपणानें व क्रूरतेनें (हरिश्चंद्राचा विश्वा-मित्रानें छळ केला त्याप्रमाणें) त्यांचा पिच्छा पुरविण्याचें कधींहि सोडलें नाहीं; आणि **क्रांतिकारक** पक्षाच्या वर्तमानपत्रांतून त्यांची अब्रू घेण्याच्या उद्देशानें जीं नीचपणाचीं, हलकट विधानें करण्यांत आलीं होतीं, त्यांचा बंदोबस्त करण्या-करितां त्यांना गुदस्तांच (१९०९) कोर्टाची पायरी चढण्याचा प्रसंग आला.

आपणास पूर्वीपेक्षां पुष्कळ सार्वजनिक काम करितां यावें, ह्मणून मि. गोखल्यांनीं पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांतील प्रोफेसरीच्या जागेचा राजीनामा दिला; व त्यानंतरच्या त्यांच्या आयुष्यक्रमांत त्यांना जो अनुभव आला आहे, त्यावरून त्यांच्या मनाची अशी खात्री झाली असावी कीं, आपल्या

देशबांधवांस जे सामाजिक व राजकीय हक्क मिळाले पाहिजेत असें आपण ह्मणतों, ते हक्क चांगल्या रीतीनें बजावतां येण्यासाठीं जी पात्रता अवश्य अंगीं असावी लागते, तिचा बराच भाग अद्यापि आपल्या देशबांधवांच्या ठिकाणीं बहुधा दिसून येत नाहीं. लोकांचा समज असा आहे कीं, हल्लींची दोन वर्षें संपलीं, ह्मणजे वरिष्ठ कायदेकौन्सिलांत फिरून निवडून येण्याची त्यांची इच्छा नाहीं. कारण, कोणत्याना कोणत्यातरी प्रकारच्या शिक्षणाचा लोकांत प्रसार करण्यानें आपल्या जन्माचें साफल्य करावें, असा बहुधा त्यांचा पहिल्यापासून हेतु असावासा वाटतो; व ह्मणूनच आतां ह्यापुढें मुख्यतः शिक्षणविषयक कामाला आपणा— स्वतःला पूर्णपणें वाहून घेण्याचा त्यांचा मानस दिसतो. फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर असतांना, शिकविण्याचें काम चरितार्थाचा धंदा ह्मणून ते करित नसत; तर कांहींतरी आपल्या आवडीचें काम करावें ह्मणून करित असत. आणि, ज्यांच्या अंगीं पूर्ण स्वार्थत्याग असून बहुतेक तपस्व्याप्रमाणें ज्यांची साधी वृत्ति असेल, व जे आपल्या अशा प्रकारच्या वर्तनानें इतरांस उदाहरण घालून देण्यास समर्थ असतील, त्यांनाच, हिंदुस्थानाची नैतिक, सामाजिक व तशीच राजकीय बाबतींत सुधारणा होऊन त्याचा उदय—काळ यावा, अशी आशा करितां येईल, असें मि. गोखल्यांचें मन त्यांना सांगत असावें, असें त्यांच्या स्वतःच्या वर्तनाकडे पाहिलें, तर कोणासहि दिसून येईल. ह्याच तत्वांवर त्यांनीं पांच वर्षांमागें "सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी" (हिंदुस्थानच्या सेवकांची मंडळी) काढली. ह्या संस्थेचे अगदीं आरंभाचे सभासद त्यांच्या स्वतःच्या थोड्या अनुयायांपैकींच असून, संस्थेचा खर्च

त्यांच्या स्नेह्यासोबत्यांनीं, व त्यांच्या कामाविषयीं आदर व प्रेम वाटणाऱ्या लोकांनीं आपखुषीनें वर्गण्या देऊन आजपर्यंत चालविला आहे. ह्या सोसायटीच्या मूळ उत्पादकांचे हेतू— ह्मणजे आतां सोसायटीचेच हेतू—"हिंदुस्थानदेशाची सेवा करण्याकरितां उपदेशक शिकवून तयार करणें, व सर्व प्रकारच्या कायदेशीर साधनांचा उपयोग करून हिंदी लोकांच्या खऱ्या कल्याणाची अभिवृद्धि करणें" असे आहेत. "त्या जगन्नियंत्या परमेश्वराच्या अगम्य लीलेमुळें हिंदुस्थानचा ब्रिटनशीं जो संबंध आला आहे, तो त्याच्या कल्याणासाठींच आहे, असें ह्या सोसायटीचे सभासद प्रांजलपणें" कबूल करितात. तसेंच, "साम्राज्यांत राहून स्वराज्याचे हक्क उपभोगणें व आपल्या देशबांधवांची संसारयात्रा साधारणपणें वरिष्ठ प्रतीची होईल, अशी स्थिति घडवून आणणें, हें महत्कार्य साधण्याकरितां मोठ्या कळकळीनें व धिम्मेपणानें कैक वर्षें प्रयत्न करित राहिलें पाहिजे, नाहींतर इष्ट हेतु सिद्धीस जाणार नाहीं," अशी भावना त्यांच्या ठिकाणीं आहे. ह्या सोसायटीनें ठरविल्याप्रमाणें, तावडतोब हातीं घेण्याचें काम ह्मटलें ह्मणजे, "हल्लींच्या पिढींतील लोकांत सच्छीलता व आक्रमणशक्ति फार कमी असल्याकारणानें, ती ज्या उपायांनीं वाढेल असे उपाय योजण्याकडे सोसायटीनें आपलें बरेंच लक्ष घातलें पाहिजे. आणि ह्मणून, हा हेतु साधण्याकरितां, "देशहित साधणें ह्मणजे खरोखर धर्मसाधन आहे, असें समजून, जे लोक ह्या कामांत आपलें सर्व आयुष्य खर्च करण्यास तयार असतील, अशांना ही सोसायटी शिकवून तयार करील" ह्या सोसायटीच्या घटनेकडे पाहिलें ह्मणजे, ख्रिस्ती लोकांच्या—जेसुइट लोकसुद्धां धरून—ज्या मोठमोठ्या मंडळ्या आहेत, त्यांच्या घटनेची खरोखर आठवण होते.

मात्र, एक मोठा फरक आहे तो असा कीं, ही संस्था कोणत्याहि विशिष्ट जातीची, धर्माची अथवा पंथाची नसून, "ईश्वराची सेवा" ह्याच्याऐवजीं "देशाची सेवा" असा तिचा हेतु आहे. ह्मणजे, जपानी लोकांनीं आपल्यांतील अनेक धर्मपंथांना **राष्ट्रहिताच्या** मुशींत घालून, जशी **देशाभिमानाची** मूर्ती तयार केली आहे, त्याच नमुन्यावर बहुतेक ही **सोसायटी** बनविण्यांत आली आहे.

सोसायटीमध्यें दाखल होतांना, प्रत्येक **सेवकास** (हिंदुस्थानच्या) खालीं दिल्याप्रमाणें सात व्रतें घ्यावीं लागतात:—

(१) मी आपल्या हृदयामध्यें माझ्या देशाला पहिली जागा देईन, आणि माझ्या अंगीं जें कांहीं सर्वोत्कृष्ट असेल, तें सर्व देशसेवेला वाहीन.

(२) देशसेवा करित असतांना, मी स्वतःचा फायदा मुळींच पाहणार नाहीं.

(३) मी सर्व हिंदी लोकांना आपले **बंधू** मानून, धर्माचा अथवा जातीचा विचार न करितां, सर्वांच्या उन्नतीसाठीं झटेन.

(४) स्वतःच्या आणि कुंटुंब असल्यास त्याच्या चरितार्थाकरितां जी कांहीं व्यवस्था सोसायटी करील, त्यांत मी संतुष्ट राहीन; व स्वतःच्या हितासाठीं द्रव्य मिळविण्याचा मुळींच उद्योग करणार नाहीं.

(५) मी स्वतः अगदीं सदाचरणानें वागेन.

(६) मी कोणाशींहि खासगी प्रकारचा भांडणतंटा करणार नाहीं.

(७) सोसायटीचे उद्देश मी निरंतर डोळ्यापुढें ठेवीन,

व तिच्या हितसंबंधांवर अत्यंत आस्थापूर्वक लक्ष ठेवीन. सोसायटीच्या कामाचा प्रसार करण्याकरितां शक्य तितक्या गोष्टी करीन, व तिच्या हेतूंशीं विरुद्ध असणारी कोणतीहि गोष्ट करणार नाहीं.

ह्या सोसायटीच्या प्रमुखास **पहिला सभासद** असें नांव असून, हल्लीं मि. गोखले **पहिले सभासद** आहेत. हा अधिकार त्यांच्याकडे जन्मभर राहतो. आणि, पहिल्या सभासदानें केलेल्या पोटनियमांअन्वयें संस्थेचें सर्व काम चालतें. ह्या कामांत त्यांना मदत करण्याकरितां तीन सभासदांचें एक **कौन्सिल** असतें. ह्या तिघांपैकीं एकाची नेमणूक **पहिल्या सभासदानें** करावयाची असून, बाकीचे दोघे सर्वसाधारण सभासदांकडून निवडले जातात. **पहिल्या सभासदाचे** अधिकार फार मोठे असतात. आणि, आपल्यामागून कोणीं **पहिला सभासद** व्हावें, हें वेळ आली ह्मणजे ठरवितां यावें ह्मणून, साधारण सभासदांपैकीं तीन नांवें सुचविण्याचा अधिकार त्यांच्याच हातीं असतो. ह्मणजे, वस्तुतः लायकी पाहण्याकरितां पांच वर्षांच्या मुदतीनें सोसायटींत घेतलेले उमेदवार, अथवा सर्व हक्क मिळून पक्के झालेले साधारण सभासद, अथवा कायमचे मदतनीस, कांहीं प्रसंगीं काम करण्याकरितां तयार असलेले लोक व दूरदूरच्या ठिकाणीं सोसायटीच्या धोरणानें काम करूं इच्छिणारे लोक ह्या सर्वांवरच **पहिल्या सभासदाचा** पूर्ण अधिकार चालतो. ह्मणजे, सर्वांना त्यांच्याच तंत्रानें चालावें लागतें. लायकी-गैरलायकीप्रमाणें कायम होणाऱ्या उमेदवारांस एकंदर पांच वर्षें शिकून तयार होण्यास लागत असतात. ह्यांपैकीं तीन वर्षें सोसायटीच्या, पुण्यांतील मुख्य ठिकाणीं राहून त्यांना घालबाव-

याचीं असतात. शेवटीं सांगितलेल्या ह्मणजे कायमच्या मदतगार वगैरे लोकांचा सोसायटींत खरोखर प्रवेश झालेला नसतो, तरी तिच्याशीं त्यांचा अति-निकट संबंध असतो. ही संस्था सध्यां बाल्यावस्थेंत असणार, हें स्वाभाविक आहे. कारण, आज मितीला तिच्यांत सुमारें २५ सभासद असून, त्यांपैकीं बहुतेकजणांची उमेदवारीची मुदत अझून संपलेली नाहीं. तथापि, कायमपणें राहणारे ५० उमेदवार सभासद लवकरच जमतील, अशी मि. गोखल्यांना आशा आहे. पुण्यास फर्ग्युसन कॉलेजच्या अगदीं जवळ, सोसायटीच्या कांहीं चांगल्या प्रशस्त इमारती उठल्या असून, त्यांत राहून सोसायटीचें काम करणारे कांहीं तरुण गृहस्थ त्यांनीं पूर्वींच जमविले आहेत; व त्यांच्या ठिकाणीं त्यांचाच उत्साह मला बराच दिसून आला. मि. गोखल्यांनीं मेहरबानी करून, ह्या मंडळीपैकीं कित्येकांची माझ्याशीं ओळख करून दिली. ह्या संस्थेला अगदीं अलीकडे येऊन मिळालेला गृहस्थ मुसलमान असून, त्याच्याविषयीं गोखल्यांना विशेष अभिमान दिसला. कारण, सोसायटींत सर्व धर्मांचे, पंथांचे व जातींचे लोक येऊन, केवळ मनःकल्पित नव्हे तर प्रत्यक्ष व्यवहारांत, तिला खरें खरें हिंदी स्वरूप प्राप्त व्हावें, अशी त्यांची अगदीं मनापासून इच्छा आहे.

आतां, हा जो विशेष लक्ष्यांत घेण्यासारखा प्रयोग चालू आहे, त्यावरून पहिला प्रश्न असा निघतो कीं, मि. गोखल्यानीं "हिंदुस्थानच्या सेवकापुढें" जीं ध्येयें ठेविलीं आहेत, तीं अशा प्रकारच्या कामास लागणारी शक्ति उत्पन्न करण्यास समर्थ होतील किंवा नाहीं? सर्वसंगपरित्याग करून व सर्व प्रकारच्या ऐहिक सुखास [illegible], लोककल्याणासाठींच किंवा लोक-

कल्याण करून त्यायोगें ईश्वरप्राप्ति करण्यासाठीं, देह झिजविण्यास तयार होणाऱ्याच्या अंगीं जो विलक्षण स्वार्थत्याग असतो, तशी प्रवृत्ति माणसांमध्यें आजपर्यंत उत्पन्न होत आली आहे, ती केवळ तशा प्रकारच्या धर्मसमजुतीमुळें व मरणानंतर परलोकीं कांहींतरी लाभ होण्याच्या आशेमुळें होत असे. परंतु, आपण धर्मबुद्धीनें प्रेरित होऊन काम करित आहों, असें मि. गोखल्यांच्या सोसायटीचें मुळींच ह्मणणें नाहीं. ख्रिस्तीलोकांच्या कोणत्याहि, तापसी मार्गाचा उपदेश करणाऱ्या मठानें कधीं सांगितलें नाहीं—फार कशाला, मि. गोखल्यांनीं आपल्या अनुयायांस विहित ह्मणून सांगितलें आहे—अशा प्रकारच्या सर्वसंगपरित्यागाच्या व्रताहून पुष्कळ पटीनें अधिक खडतर अशा व्रताची दीक्षा जन्मभर घेऊन, त्याप्रमाणें आचरण करण्यांत आपलें आयुष्य घालविण्यास तयार असलेले योगी, अतिप्राचीन काळापासून, हिंदुधर्मामध्यें उत्पन्न होत आले आहेत. परंतु, अशा प्रकारच्या जीवनक्रमाची प्रेरणा नेहमीं कसल्यातरी धर्मबुद्धीमुळें होत असते. आतां, प्रश्न असा आहे कीं, इहलोकीं किंवा परलोकीं लाभ होण्याची बिलकूल आशा नसतां, देशमातेला अगदीं देवता जरी मानली तरीदेखील, तिच्याच सेवेंत सारा जन्म निरिच्छतेनें घालविल्यानें आपल्या जीविताचें सार्थक होईल, अशी बुद्धि ह्या **देशसेवकांच्या** मनांत निरंतर वास करील काय? अशा संस्थेपासून राजकीय दृष्ट्या व अन्य रीतीनें जे फायदे पुढें कालांतरानें होतील, असें मि. गोखल्यांस वाटत आहे, त्याविषयीं विचार करण्याची गरज नाहीं. कारण, एकाच मनुष्याच्या हाताखालीं शिक्षण घेऊन आणि एकाच्याच आज्ञेंत वागण्याची

संचय करून, ही सेवक मंडळी सर्व हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांत हिंडून, यच्चयावत् मनुष्यांस-अस्पृश्य लोकांपासून तों तहत अत्युच्च वर्गांतील लोकांपर्यंत-हिंदी राष्ट्राचा जन्म झाला आहे तेव्हां आतां त्याप्रमाणें वागा, असें सांगत फिरणार आहेत.



भाग १७ वा.

पाश्चात्य शिक्षणाची वाढ.

हल्लींची तरुण पिढी ह्मणजेच भावी भारतवर्ष होय; आणि, आह्मींच होऊन येथें सुरू केलेल्या पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाच्या कक्षेंत येणारी तरुण मंडळी, हिंदुस्थानांतील एकंदर तरुण लोकांच्या संख्येच्या मानानें, जरी अद्यापि अगदींच थोडी आहे, तरी त्यांची संख्या व समाजांतील त्यांचें वजन एकसारखें वाढतच चाललें असून, पुढेंहि असाच क्रम राहणार, ह्यांत मुळींच संशय नाहीं. त्यांच्या मनावरील आमचें वजन कमी होत चाललें असलें, तरी त्यांच्या वडील माणसांवर तें अझून कायम आहे असें कोणीं सांगितल्यास, त्यापासून ह्मणजे आमचें समाधान होईल, अशांतला प्रकार नाहीं. ह्मणून, तरुण हिंदी लोकांचीं—आणि, विशेषतः आमच्या शाळांतून व कॉलेजांतून शिकून गेलेल्या किंवा जात असलेल्या तरुण हिंदूंचीं—मनें आमच्याविषयीं विटत चाललीं आहेत, ही गोष्ट आजच्या परिस्थितींत सर्वांत भीतिदायक आहे, असें मी समजतों, आणि, इंग्रज मुत्सद्यांपुढें हिंदुस्थानासंबंधीं जे प्रश्न येऊन पडले आहेत, त्यांमध्यें शिक्षणविषयक प्रश्नाएवढा कठीण व जरुरीचा दुसरा कोणताहि प्रश्न नाहीं, अशी माझी पुरी खात्री होऊन चुकली आहे. हिंदुस्थानांतील लोकांच्या शिक्षणासंबंधाच्या, आमच्या धोरणाचीं जीं सामान्य तत्वें आहेत, तीं पाळण्याला आतां आह्मी

इतके बांधले गेलों आहों कीं, तें धोरण अगदीं चुकीचें आहे असें ज्यांना वाटतें, त्यांनादेखील तें सोडून देण्याचा नुसता विचारहि मनांत आणतां येणार नाहीं. परंतु, ह्याच कारणामुळें प्रचलित पद्धतींतील—किंवा कित्येकांच्या मतें पद्धतीच्या अभावांतील—भयंकर दोषांकडे आह्मीं लक्ष देणें फार महत्त्वाचें आहे. कांकीं, तेणेंकरूनच शक्य तितके दोष काढून टाकतां येतील, अथवा त्यांपासून कमी नुकसान होईल, अशी व्यवस्था करितां येईल. आह्मांस आतां माघार घेतां येणार नाहीं; आणि, हिंदी लोकांच्या शिक्षणाची उपेक्षा करण्यांत तरणोपाय नाहीं, तर ह्या प्रश्नाकडे अधिक लक्ष देऊन, सुधारणा करण्यामध्येंच सर्वांचें खरें हित आहे.

सध्यांच्या शिक्षणव्यवस्थेंतील जे चार, फार महत्त्वाचे मुद्दे लक्ष्यांत घेण्यासारखे आहेत ते असेः—(१) खुद्द सरकारनेंच ज्या शिक्षणसंस्था चालविल्या आहेत, त्यांव्यतिरिक्त इतर संस्थांवर, इंग्लंडांतील वहिवाटीचें अनुकरण करून, येथेंहि सरकारनें आपला प्रत्यक्ष ताबा ठेविलेला नाहीं. मात्र, ज्या खासगी संस्था सरकारी आश्रयाचा अव्हेर करण्यास तयार नाहींत, त्यांच्यावर अनेक दिशेनें सरकारच्या इच्छेचा अप्रत्यक्षपणें परिणाम होतो; (२) आपल्या प्रयत्नाचा विशेष भर सरकारनें उच्च-प्रतीच्या शिक्षणावरच ठेविला आहे; आणि, अशानें वरच्या वर्गांतून खालच्या वर्गांत शेवटीं शिक्षणाचा प्रवेश हळू हळू होत जाईल, अशी सरकारास वाजवीपेक्षां अधिक आशा होती; (३) हें शिक्षण मुख्यतः साहित्यविषयक असून, त्यांतील निरनिराळ्या विषयांचें ज्ञान इंग्रजी [illegible] जातें; आणि, [illegible] अशी संज्ञा आहे. पण इंग्रजी [illegible]

अझून बहुतेक लोकांस अगदीं परकी आहे; आणि, (४) हें शिक्षण बहुतेक बुद्धिविषयक आहे; व धर्मशिक्षणापासून त्याची अगदीं फारकत झालेली आहे इतकेंच नाहीं, तर नैतिक शिक्षण, विनयशीलपणा इत्यादि गोष्टींचाहि त्यांत पुष्कळांशीं अंतर्भाव झालेला नाहीं. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, सर्व शिक्षणाचा केवळ आत्मा असें जें शील, तेंच बनविण्याच्या कामीं सर्वथैव दुर्लक्ष झालें आहे, असें ह्मटलें तरी चालेल.

सध्यांच्या परिस्थितीचें यथार्थ ज्ञान होण्यासाठीं, हिंदुस्थानांतील आमच्या शिक्षणपद्धतीचीं कसकशीं स्थित्यंतरें झालीं आहेत, ह्याचें अगदीं थोडक्यांत कां होईना, पण येथें वर्णन करण्याची जरुरी आहे, असें मला वाटतें. कंपनी—सरकाराकडून अगदीं आरंभीं जें थोडेसें उत्तेजन शिक्षणास देण्यांत येत असे, तें पौर्वात्य भाषांचा लोकांनीं अधिक अभ्यास करूं लागावें ह्मणून असे. कारण, न्यायाच्या कोर्टांतून वगैरे त्यावेळीं ह्याच भाषा चालत असल्याकारणानें, सरकारी नोकरीस, आणि विशेषेंकरून न्यायखात्यांतील खालच्या प्रतीच्या जागांकरितां, तरुण हिंदी लोकांस लायक करण्याचा कंपनीचा हेतु होता. शिक्षणाचा प्रसार ज्यारीनें होण्याकरितां, इंग्रजी कां देशी भाषेतून शिक्षण द्यावें, ह्याबद्दल मोठा कडाक्याचा वाद पुष्कळ दिवस माजून राहिला होता. पण, अखेरीस, ता० ७ मार्च १८३५ रोजीं, मेकॉलेसाहेबानें आपलें सुप्रसिद्ध मिनिट लिहून, शिक्षणविषयक धोरण ठरवून टाकिलें. ह्याचा अखेर परिणाम काय होईल, ह्याची अगदीं पुसट कल्पना देखील त्यावेळीं फारच थोड्या लोकांच्या लक्षांत आली असेल. लॉर्ड विल्यम बेंटिंक

गव्हरनरजनरल असतांना, सरकारनें असें ठरविलें कीं, "इंग्रजी साहित्य आणि शास्त्रें यांच्या ज्ञानाचा प्रसार करणें, असा सरकारचा मुख्य उद्देश असला पाहिजे; आणि, शिक्षणा-करितां खर्च होणाऱ्या सर्व पैशाचा उपयोग इंग्रजी शिक्षणा-प्रीत्यर्थच करणें फार चांगलें होणार आहे." ही प्रचंड क्रांति घडवून आणण्यांत लॉर्ड मेकॉले ह्यांचा जितका हात होता, तितकाच आणखी एका गृहस्थाचा होता; पण, ही गोष्ट बहुतकरून लोकांच्या स्मरणांतून साफ जात असते. हे गृहस्थ ह्मटले ह्मणजे, डा० आलेकझांडर डफ नांवाचे प्रख्यात मिशनरी होत. सती वगैरे सारख्या धर्माच्या नांवाखालीं मोडणाऱ्या कित्येक चाली, आरंभीं, कंपनीसरकारानें होत्या तशाच राहूं दिल्या होत्या; परंतु, कित्येक खऱ्या अंतःकरणाच्या ख्रिस्त्यांना असें वाटत असे कीं, ख्रिस्ती लोकांच्या अमला-खालीं असणाऱ्या देशांत अशा प्रकारच्या चाली राहूं देणें, हें अगदीं विसंगत आहे. ह्मणून, ह्या चाली बंद करून टाकण्याची खटपट डा० डफ ह्यांनींच केली, व तिला चांगलेंच यश आलें. अमोदरच्या केरी वगैरे मिशनरींच्या मताच्या अगदीं उलट, डफ साहेबाचें असें ठाम मत होतें कीं, हिंदुस्थानांत सर्वत्र ख्रिस्तीधर्माचा प्रसार होण्याकरितां, प्रथमतः येथील देशी भाषांवर इंग्रजी भाषेचें वर्चस्व स्थापन झालें पाहिजे; ह्मणजे, देशी भाषा मागें पडून, इंग्रजी भाषेचा अभ्यास वाढला पाहिजे व तिला महत्त्व आलें पाहिजे. १८३० सालीं, त्यांनीं स्वतःच कलकत्त्यास [illegible] इंग्रजी शाळा सुरू केली; व ह्या कामीं त्यांना तत्काळ [illegible] यश मिळालें कीं, त्यांच्या उलट असलेल्या सर्व मंड-[illegible] व हिंदुस्थान [illegible] दोन्ही

देशांत त्यांचें मत मोठें प्रमाणभूत मानित असत. जातीचा किंवा धर्माचा भेदभाव न ठेवितां, इंग्रजी जाणणाऱ्या हिंदी लोकांना बऱ्याच सरकारी नोकऱ्या देण्याचा जो ठराव लॉर्ड हार्डिंग साहेबांनीं १८४४ सालांत केला, त्यांत डफसाहेबाच्या मतांची बरीच छाया दिसून आली. त्याचप्रमाणें, १८५४ सालीं, सर **चार्लस वुड** यानीं जो शिक्षणासंबंधीं खलिता पाठविला होता, त्यांत देखील डफसाहेबाच्या मतांना बराच मान दिल्याचें दिसून आलें होतें. ह्या खलित्याचें धोरण सरकारास पसंत पडून, त्याप्रमाणें सार्वजनिक शिक्षणाचें एक निराळेंच खातें काढण्यांत येऊन, कलकत्ता, मद्रास व मुंबई अशा तीन ठिकाणीं विश्वविद्यालयें स्थापन करण्यांत आलीं, व परीक्षा घेण्याकरितां शाळा व कॉलेज त्यांना जोडण्यांत आलीं. शिवाय, प्रापंचिक (ह्मणजे धार्मिक नव्हे असें) शिक्षणाच्या बाबतींत कांहीं ठरीव कसास उतरणाऱ्या सर्व शाळांस ठरलेल्या नियमाप्रमाणें पैशाची मदत करून, एतद्देशीय लोकांनीं काढलेल्या शाळांस उत्तेजन देण्याची पद्धतहि तेव्हांच अमलांत आली. अशा रीतीनें प्रापंचिक शिक्षणाच्या बाबतींत इंग्रजी भाषेचें वर्चस्व डफसाहेबाच्या वजनामुळेंच बसलें. परंतु, ह्याहिपुढें जाऊन धर्माच्या बाबतींतील आपला तटस्थपणा सोडून देण्याच्या कामीं त्यांना सरकारचें मन मुळींच वळवितां आलें नाहीं. मध्यंतरीं, केवळ शिक्षक ह्मणूनच नव्हे, तर मिशनरी ह्या दृष्टीनेंहि, कलकत्त्यांतील वरच्या वर्गांतल्या लोकांमध्यें त्यांची विलक्षण कीर्ति झाली होती; आणि ह्मणून, इंग्रजी भाषेच्या ज्ञानाबरोबरच ख्रिस्तीलोकांचें नीतिशास्त्र व त्यांचा धर्म ह्यांचा प्रसार होऊन, सरकारच्या प्रत्यक्ष मदतीशिवाय देखील, आपलें कार्य सिद्धीस

जाईल, असा त्यांना मोठा भरंवसा वाटत होता. तरीपण, प्रापंचिक शिक्षणाची धार्मिक आणि नैतिक शिक्षणाशीं सांगड घालून देण्याची आवश्यकता आहे, आणि असें न केल्यास, पुढें भयंकर परिणाम आहे, असें प्रतिपादन करण्याचा क्रम त्यांनीं कधींहि सोडला नाहीं.

१८३५ सालच्या शिक्षणसंबंधाच्या मिनिटानें जी पद्धत सुरू झाली व १८५४ सालच्या सरकारी ठरावानें जिची वृद्धि झाली, तिचा आरंभ चांगला झाला. ह्या शिक्षणपद्धतीचा फायदा घेणाऱ्या तरुण हिंदी लोकांची संख्या एकंदरींत लहानच असे. हे लोक बहुधा वरच्या प्रतीच्या वर्गांतून आलेले असत; त्यांचा इंग्रज गुरूंशीं प्रत्यक्ष संबंध येत असे, आणि त्यांपैकीं पुष्कळांचें शिक्षण मिशनरी लोकांच्या शाळांतून होत असे. ह्या इंग्रज शिक्षकांपैकीं पुष्कळ विशेष नावाजण्यासारखे असून, त्यांच्या हाताखालीं शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बुद्धीचाच विकास साहजिकपणें व बहुधा न समजून येण्यासारख्या रीतीनें होत असे असें नाहीं, तर त्यांचें शीलहि त्याचप्रमाणें बनत जाई. कारण, ह्या काळीं, हिंदुस्थानांत शिक्षणाच्या बाबतींत जें काम होत होतें, त्यांत ख्रिस्ती मिशनऱ्यांचा भाग फार मोठा होता. १८५४ सालीं, एकंदर सरकारी शाळांमध्यें १२,००० विद्यार्थी होते; पण मिशनरी शाळांत त्याच्या चौपट मुलें शिकत होतीं. आणि, त्या सालच्या सरकारी ठरावाअन्वयें मदत मिळण्याचा जो हक्क त्यांना प्राप्त झाला, त्यामुळें ह्या बाबतींतील त्यांचा पुढारीपणा त्यांच्याकडे बऱ्याच अंशीं राहण्यास साधन झालें. सध्या हा पुढारीपणा संख्येच्या दृष्टीनें नसला, तरी इतर बाबतींत अद्यापि त्यांच्याकडेच आहे. १८३५ च्या मिनिटानंतर

अर्ध्या शतकापेक्षां अधिक काळपर्यंत, आणि विशेषतः १८५४ च्या ठरावानंतरच्या २५।३० वर्षांत, ह्या शिक्षणपद्धतीनें तयार झालेले लोक तिच्या मूळ उत्पादकांच्या अपेक्षेप्रमाणेंच निपजत गेले. हे लोक सरकारी कारकुनांचें व खालच्या दर्जाच्या नोकरांचें काम करतां येण्याइतकेंच इंग्रजी भाषेचें ज्ञान संपादन करून स्वस्थ होते असें नाहीं, तर त्यांच्यामध्यें मोठे विद्वान व सुशील असे लोक उत्पन्न होऊन, हिंदी लोकांना मिळण्यासारख्या सर्व सरकारी जागांवर काम करून, त्यांनीं मोठी वाहवा मिळविली. त्यांच्यांत उत्तम न्यायाधीश व वकील निर्माण झाले. तात्पर्य, पाश्चात्यांचा सहवास घडल्यामुळें, त्यांच्या बुद्धीचा अनेक दिशेनें विकास होऊन, तितक्या धंद्यांत त्यांनीं चांगला नांवलौकिक मिळविला. ह्या नवीन पद्धतीनें विद्या संपादन करणाऱ्या एकंदर विद्यार्थ्यांमध्यें, अशा नामांकित लोकांचें काय प्रमाण बसत होतें, हें ठरविण्याचीं साधनें उपलब्ध नाहींत, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. हें प्रमाण लहान होतें, यांत शंका नाहीं. तथापि, ह्या शिक्षणपद्धतीच्या अंगचे दोष झांकून टाकून, एकंदरींत तिला भूषण आणण्याइतकें निदान मोठें तें प्रमाण होतें, ह्यांत संशय नाहीं. भौतिक प्रगतीच्या प्रत्येक बाबीविषयींच्या माहितीचे आंकडे हवे तितके मिळत असून, हायस्कुलें व कॉलेजें ह्यांत शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांच्या आयुष्यक्रमांत, त्यांना प्राप्त झालेल्या पाश्चात्य शिक्षणाचा परिणाम त्यांच्या ठिकाणीं कसा दिसून आला, हें ठरविण्याकरितां लागणाऱ्या आंकड्याची जमवाजमव करण्याची खटपट मुळींच झाली नाहीं, ह्यावरून शिक्षणाच्या विषयांत अधिकारी वर्गाची किती संकुचित दृष्टि असते, हें चांगलें कळून

येतें. सार्वजनिक कामांत किती लोक प्रसिद्धीस आले हें आह्मांस कळतें; परंतु, प्रसिद्धीस न येतां, गरिबींतच राहून, किती लोक आपल्या शिक्षणाचा फायदेशीर रीतीनें उपयोग करित आहेत, अथवा किती लोकांनीं त्याचा मुळींच उपयोग केला नाहीं, हें नक्की समजून येण्यास कांहींच साधन नाहीं.

शिक्षण मिळण्याचीं जीं साधनें आह्मीं हिंदी लोकांना दिलीं, त्यांचाच फायदा त्यांनीं अत्यंत उत्सुकतेनें घेतल्यामुळेंच, शिक्षणाचे कित्येक चांगले हेतु सिद्धीस गेले नाहींत, असें ह्मणणें परस्परविरोधी दिसलें, तरी तें अगदीं खरें आहे. आरंभीं आरंभीं, ज्यांनीं ह्या शिक्षणाचा फायदा घेतला, ते लोक बुद्धीनें पुढें असलेल्या वर्गांपैकींच होते; आणि, पाश्चात्य तऱ्हेचें शिक्षण हिंदुस्थानांत सुरू होण्यापूर्वीं, पाश्चात्य विद्या जरी त्यांना प्राप्त होत नव्हती, तरी त्या काळीं उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा ठेवा सर्वस्वी त्यांच्याच ताब्यांत होता. नवीन शिक्षणपद्धतीस जसजशीं चांगलीं फळें येऊं लागलीं, तसतशी त्या शिक्षणाची मागणी झपाट्यानें वाढत गेली; आणि, ज्या मानानें अधिक लोक शिकून बाहेर पडूं लागले, त्यामानानेंच त्यांचें शिक्षण कच्चें राहूं लागलें. शिक्षण हेंच एक साध्य आहे, ही कल्पना हळू हळू जाऊन, चांगल्या किफायतशीर धंद्यांचें, किंवा बेताच्या पगाराची, पण खात्रीनें मिळणारी व लौकिक वाढविणारी सरकारी नोकरी मिळण्याचें तें केवळ एक साधन आहे—ह्मणजे, दोहोंपैकीं कोणतीहि एक गोष्ट साधली, तरी त्यामुळें चारचौघांत मानमान्यता वाढून, अखेरीस त्याच्या वेळी सुशिक्षित मुलास, त्याच्या शिक्षणाच्या मानानें, हुंडा मिळावयास—अशी लोकांची एका बाजूनें समजूत होऊन बसली. मद्रासच्या

पद्धतीमुळें, एतद्देशीय लोकांनींच खासगी रीतीनें चालविलेल्या अशा पुष्कळ शाळा व कॉलेजें अस्तित्वांत येऊन, त्यांमध्यें हळू हळू सर्वच एतद्देशीय लोक झाले, अथवा निदान त्यांचा विशेष भरणा झाला. आणि त्यामुळें, त्यांना आपले फीचे दर इतके कमी करितां आले कीं, आपण लिहिणें– वाचणें शिकावें, ही गोष्ट ज्यांच्या कधीं स्वप्नींहि आली नाहीं, अशा पुष्कळ लोकांना मोठा हुरूप आला कीं, प्रत्येक सांसारिक सुखाची प्राप्ति करून देणारा हा **चिंतामणि,** निदान आपल्या कांहीं मुलांना तरी हस्तगत करून द्यावा. दुय्यम प्रतीच्या शाळांतून खेंचून भरलेल्या मुलांपैकीं बहुतेक मुलें अगदीं निरुपयोगी असत, आणि, साधारण चांचणी करून मग मुलांना शाळेंत घेण्याची व्यवस्था कांहींच नव्हती ह्मटलें तरी चालेल. त्यामुळें, पुष्कळ विद्यार्थी मध्येंच थकून पडत; व त्यांच्या मनोराज्याचा सर्वच डोलारा एकदम ढांसळून त्यांची निराशा होई; व कांहीं नवीन नवीन कल्पना त्यांच्या डोक्यांत कोंबल्या गेल्यामुळें, मूळच्या स्थितींत असतांना, जो काहीं कामधंदा करून त्यांनीं आपलें पोट भरलें असतें, तोहि करण्याची योग्यता त्यांच्या अंगीं राहत नसे. दुसऱ्या बाजूनें असें झालें कीं, शिकलेल्या लोकांस अधिकाधिक मागणी येऊं लागतांच, ती पुरी पाडण्याकरितां, शाळा व कॉलेजें—मुख्यतः एतद्देशीय लोकांच्या देखरेखीखालील—यांची संख्याहि त्या मानानें वाढत गेली. आणि, त्यांतील शिक्षणक्रम इयत्तांच्या रूपानें दगडासारखा घट्ट होऊन गेला; व ह्या शिक्षणाची योग्यता—सर्वस्वी नसली तरी मुख्यत्वेंकरून—परीक्षांच्या निकालावरच ठरूं लागली. तात्पर्य, मगजरूपी कोठार मोठें अगर लहान असेल, त्यामानानें अपक्क ज्ञान त्याच्यांत

ठेंचून भरणें ह्मणजेच शिक्षण, असें समजण्यांत येऊं लागून, उच्च प्रतीच्या शिक्षणाचा खरा अर्थ कोणासच समजेनासा झाला.



भाग १८ वा.

हिंदी विद्यार्थी.

आह्मीं हिंदुस्थानांत सुरू केलेल्या शिक्षणपद्धतींतील मुख्य दोष ह्मटला ह्मणजे, साधारण प्रतीच्या हिंदी विद्यार्थ्यास त्याला मिळणाऱ्या शिक्षणाचा, शाळा किंवा कॉलेज सोडून बाहेर जगांत आल्यावर, ज्या परिस्थितींत त्याला राहावयाचें असतें, तिच्याशीं प्रत्यक्ष मेळ बसवितां येत नाहीं. कारण, त्याच्या पूर्वजांनीं ज्या तऱ्हेनें संसार केला, त्याच तऱ्हेनें त्याला आतांहि करावयाची पाळी येते; आणि, पाश्चिमात्य पद्धतीचें शिक्षण मनुष्यास मिळाल्यावर, ज्या परिस्थितींत राहून प्रपंच करण्यास तो योग्य होतो, त्या परिस्थितींत आणि ह्या हिंदी विद्यार्थ्याच्या परिस्थितींत जमीन–आसमानाचें अंतर असतें. आमच्या शाळा व कॉलेजें यांतून जें शिक्षण हिंदी विद्यार्थ्यांस मिळतें, त्यांतील उणीव भरून काढण्याकरितां, घरीं स्वतंत्र शिक्षण देण्याचें काम, पाश्चात्य कल्पनांशीं अगोदर बराच परिचय झाला असल्यामुळें, ज्या आईबापांना व पालकांना करितां येऊं लागलें आहे, अशा अगदींच थोड्या लोकांविषयीं मी हें लिहित आहें, असें नाहीं. त्याचप्रमाणें, थोर मनाच्या इंग्रजांच्या देखरेखीखालीं—आणि विशेषतः कलकत्त्याचें ऑक्सफर्ड मिशन किंवा मद्रासचें ख्रिश्चन कॉलेज अशा संस्थानच्या देखरेखीखालीं—विद्यार्थिवसतिगृहांत राहून विद्यार्जन करणाऱ्या लोकांसंबंधानेंहि हें माझें

लिहिणें नाहीं. अशा विद्यार्थिवसतिगृहांच्या चालकांना जागेच्या अडचणीस्तव पुष्कळांचे अर्ज नांमजूर करावे लागतात. परंतु, वरीलप्रमाणें विद्यार्जन करणारांची देखील संख्या फारच अल्प आहे. उदाहरणार्थ, खुद्द कलकत्त्यांतील ४५०० विद्यार्थ्यांपैकीं केवळ १००० विद्यार्थी वसतिगृहांत राहतात; आणि, हीं सर्वच वसतिगृहें समाधानकारक स्थितींत आहेत, असें मुळींच ह्मणतां येणार नाहीं. इंग्लंडांतल्या विश्वविद्यालयांत राहून शिकणाऱ्या विद्यार्थ्यास तेथें जे फायदे मिळतात, तसें हिंदी विश्वविद्यालयांतील मुलांना मिळत नाहींत. शिवाय, हिंदुस्थानांतील बहुतेक हायस्कुलांत आणि कॉलेजांत विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय नसते. त्यामुळें, स्वतःच्या घरीं राहून शाळेस जाण्याची ज्यांची सोय नसते, अशा पुष्कळच विद्यार्थ्यांना आपल्या इष्टमित्रांच्या घरीं जेवणाची सोय करावी लागते, अथवा वाटेल त्याला जेवावयास येण्यास हरकत नाहीं, अशा खाणावळींत जेवून अभ्यास करावा लागतो. पुष्कळच वेळां तर अत्यंत वाईट ठिकाणीं—कधीं कधीं तर नीतिभ्रष्ट स्त्रिया जेथें राहतात अशा ठिकाणीं—जागा घेऊन, विद्याभ्यासाकरितां मुलांना राहण्याची पाळी येते. तात्पर्य, बौद्धिक, नैतिक व शारीरिक बाबतींत विद्यार्थ्यांचें सर्वस्वी नुकसान जेथें होणार, अशा परिस्थितींत त्याला बहुधा नेहमीं राहावें लागतें. न जाणे, मी अतिशयोक्ति करित आहें, किंवा माझा कांहीं भलता ग्रह पूर्वींच झाला असल्याकारणानें, मी असें लिहित आहें, असा दोषारोप मजवर होऊं नये ह्मणून, मी डाक्टर गारफिल्ड वुइलियम्स यांच्याकडें बोट दाखवितों. डॉ० वुइलियम्स हे एक अत्यंत सुप्रसिद्ध व अनुभवी मिशनरी

गृहस्थ असून, हिंदीलोकांबद्दल त्यांच्या ठिकाणीं पूर्ण सहानुभूति वसत आहे. गेल्या हिंवाळ्यांत, मिशनरी लोकांची कलकत्त्यास जी परिषद् भरली होती, त्यांत ते असें बोलले:—

कलकत्त्यास राहणाऱ्या विद्यार्थ्यांची परीस्थिति इतकी वाईट असते कीं, तींत **शील** तयार होणें बहुतेक अशक्य आहे. ... ... **विद्यार्थी** ह्या शब्दाचा जो खरा (उत्तम) अर्थ आहे, त्या दृष्टीनें त्यांना **विद्यार्थी** असें मुळींच ह्मणतां येणार नाहीं; कारण, विद्या संपादन करण्याकरितां जे गुण स्वभावतःच अंगीं असावे लागतात, ते त्यांच्या ठिकाणीं दिसून येत नाहींत. आतां, येथें हें सांगितलें पाहिजे कीं, अपवादादाखल असणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल मी बोलत नाहीं, तर साधारण विद्यार्थ्यांसंबंधानें बोलत आहे. एखादी दुसरी परीक्षा पास होण्याकरितां, आईबापें आपल्या मुलांना कॉलेजांत पाठवितात. आणि, ह्या परीक्षा देण्याचा हेतु अधिक पगाराच्या जागा मिळाव्या असा असतो. ... ... असे विद्यार्थी नुसती **घोकंपटी** करितात. व्याख्यानांच्या वेळीं उत्तम नोटा मिळविणें, हें त्यांना आपलें आद्य कर्तव्य वाटतें; आणि जो प्रोफेसर चांगल्या नोटा देऊन, परीक्षेकरितां नेमलेलीं पुस्तकें वाचण्याची गरज मुळींच राहूं देणार नाहीं, तो त्यांना मोठा प्रिय होतो. आणि, ह्याचीं दोन कारणें आहेत, तीं अशीं:—एकतर पुस्तकें विकत घेण्याचा खर्च वाचतो; व दुसरें असें कीं, परीक्षा पास होण्यास ह्या नोटा चांगल्या उपयोगी पडतात. ह्याच कारणामुळें, एकाच गांवचे दोन विद्यार्थी निरनिराळ्या कॉलेजांत जातात. हेतु असा कीं, दोन ठिकाणच्या नोटा एकत्र करून वाचावयास मिळाव्या. परीक्षेच्या विषयांवरील सुचविलेल्या पुस्तकांपैकीं एखादें पुस्तक विकत घेण्याकरितां लागणाऱ्या पैशापेक्षां अधिक रक्कम विद्यार्थ्यांजवळ क्वचितच असते. एखादें पुस्तक आणि कलकत्त्यांतील दोन तीन आवडत्या प्रोफेसरांच्या नोटा इतकें घोकून, परीक्षेकरितां **पोपट** तयार होतात. परीक्षेला नेमलेल्या पुस्तकांपैकीं कोणतेंहि पुस्तक जवळ नसतां, नुसत्या भाराभर नोटा पाठ करून, त्यांच्या जोरावर परीक्षा उतरून जाणारे पुष्कळ विद्यार्थी असतात. ... ... बंगाली विद्यार्थ्यांहून नेटानें मेहनत करणारे विद्यार्थी माझ्या कोठेंच पाहण्यांत नाहींत. आतां, विद्यार्थ्यांच्या शक्तीचा हा जो निंद्य अपव्यय होत आहे, तो कसा थांबवावा? केवळ नांवाचे विद्यार्थी असलेल्या व विफलजीवित झालेल्या लोकांचा वर्ग अस्तित्वांत येऊ

नये ह्मणून काय उपाय योजिले पाहिजेत? असें प्रश्न पुढें येऊन पडले आहेत. सृष्टिनियमाप्रमाणें विद्यार्थी होण्याची त्यांची कधींच इच्छा नव्हती; व अशी इच्छा उत्पन्न होण्यासारखें शिक्षणहि त्यांना मिळालें नव्हतें. ... ... आणि खरोखर, उत्तम विद्यार्थ्यांचे गुण एखाद्याच्या अंगीं असले, पण जर कां तो परीक्षेंत नापास झाला, तर त्याची स्थिति ज्यास्तच वाईट होते. कारण, त्याच्या अंगच्या खऱ्या विद्वत्तेची किंमत त्याच्या आईबापांस मुळींच वाटत नाहीं. त्यांना जें कांहीं पाहिजे असतें तें हें कीं, त्याच्या शिक्षणासाठीं आपण जो पैसा खर्च केला, त्याची फेड तात्काळ झाली पाहिजे. असा विद्यार्थी नापास झाला, तर त्याला ५० रुपयांऐवजीं ३० रुपये पगारांतून आईबापांच्या पैशाची फेड करावी लागते.

डा० वुइलियमस यानीं विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष जीवनक्रमाचें जें चित्र काढिलें आहे, त्याहून हृदयद्रावक व भीतिजनक असें दुसरें कांहीं असेल काय?—

तो सकाळीं ६ च्या सुमारास उठतो, आणि कपडे घालून (ह्या गोष्टीला फारसा वेळ लागत नाहीं) अभ्यासास लागतो. त्याच्या खोलींत जाऊन कोणीं पाहिलें, तर बहुधा अंथरुणावर पडून किंवा त्याला टेंकून (खाट असल्यास तिच्या बाजूवर बसून), दाहा वाजेपर्यंत, पुस्तकाचे पीठ पाडण्यांत तो दंग झाला आहे, असें दिसून येईल. अभ्यासास बसण्याच्या ह्या तऱ्हा मोठ्या आश्चर्यकारक आहेत, ह्यांत संशय नाहीं. खोलींत हटकून सोबती असावयाचेच. कधीं कधीं तर दोन–दोन तीन–तीन सुद्धां असतात. आणि हे जर विद्यार्थी असले, तर त्यांच्याहि अभ्यासाचा धडाका चाललेला असावयाचा. दाहा वाजतां त्या मुलाला कांहीं खावयास मिळतें, आणि नंतर तो आपल्या कॉलेजांत जातो. तेथें त्याला चार पांच तास व्याख्यानें ऐकावीं लागतात. तिसऱ्या प्रहरीं तीन वाजून गेल्यावर, तो आपल्या बिऱ्हाडी येतो, आणि ३ पासून ५ पर्यंत खोलींत इकडे तिकडे फिरण्यांत वेळ काढितो. त्यावेळीं तो अगदीं थकून गेलेला असतो, तरी [illegible]या सोबत्यांबरोबर वादविवाद करण्यामध्यें किंवा मोठ्या अधाशीपणानें वर्तमानपत्रें वगैरे वाचण्यामध्यें तो गढलेला असावयाचाच. हीच कायती त्याची [illegible] व हेंच कायतें त्याला किंचितसा आवेश चढण्याचें कारण. पांच वाजतां पाय [illegible] मोकळे करण्याकरितां, कॉलेजच्या [illegible]मधून किंवा कॉलेज [illegible] सोबती [illegible]

असाल, तर ह्या एकाच प्रकारचा इतका व्यायाम तो घेत असतो. सूर्यास्त झाला ह्मणजे घरीं येऊन, अंधुक दिव्याजवळ त्या कांदट खोलींत बसून आपल्या कामास लागतो; आणि मध्यंतरी जेवणाकरितां जो कांहीं थोडा वेळ खर्च होईल तो खेरीज करून, बाकी निजेपर्यंत सारा वेळ आपल्या अभ्यासांत घालवितो. ही निजण्याची वेळ परीक्षेच्या जवळपणावर किंवा दूरपणावर अवलंबून असते. परीक्षेस बसण्याच्या वेळीं पुष्कळ विद्यार्थ्यांची प्रकृति अगदींच ढांसळून गेलेली असते.

डा० **मलिक** नांवाच्या एका प्रख्यात हिंदुजातीच्या डाक्टरानीं तरुण विद्यार्थ्यांस मदत करण्याच्या कामीं आपणा स्वतःस वाहून घेतलें आहे. ह्यांच्या भाषणांतील एक उतारा डा० **वुइलियमस्** यानीं घेतला होता तो असाः—

ज्या जागांतून विद्यार्थी अगदीं गर्दी करून राहतात, त्यांच्यामुळें त्यांच्या प्रकृतीस फारच अपाय होतो. त्यांचीं घरें गलिच्छ, अंधेराचीं, आंत मोकळी हवा न खेळणारीं व माणसांनीं गच्च भरून गेलेलीं असतात. सांसर्गिक रोगानें कोणांस पछाडलें असलें, तरी देखील सर्व जण एकाच ठिकाणीं निजतात, व त्यामुळें कित्येक निरोगी माणसांसहि त्या रोगाची खरोखर बाधा होते. गर्दी झालेल्या बिऱ्हाडांतील हवेंत, क्षयी माणसांच्या थुंकींतले रोगजंतु धुळीबरोबर तरंगत राहूं दिल्यामुळें, विद्यार्थ्यांमध्यें क्षयाची वाढ इतकी झपाट्यानें होत आहे कीं, त्यामुळें सर्वांस मोठी भीति पडली आहे. ... ... बहुतेकजण खासगी भिशा करून राहतात. आणि, स्वयंपाक, बाजारहाट वगैरे सर्व कामाची व्यवस्था एक पगारी आचारी व एकच गडी ह्यांच्या हातीं दिलेली असते. त्यामुळें, हे लोक सामान वगैरे चोरतात, त्यांत भेसळ करितात, स्वयंपाक बिघडवतात व अर्धकच्चें अन्न कसेंतरी विद्यार्थ्यांच्या पानांत घालितात.

डा० **वुइलियमस** यांचें असें जोराचें ह्मणणें आहे कीं, " पुष्कळ वेळां विद्यार्थी अर्धपोटी असतात, ह्यांत मुळींच अतिशयोक्तीचा भाग नाहीं. " त्यानंतर, अशा विद्यार्थ्यांच्या मनावर अनीतीचा परिणाम कसा होतो, ह्याचें सुरेख वर्णन डॉकटरसाहेबानें केलें आहे. ह्या विद्यार्थ्यांच्या वागणुकीवर कोणाची

चांगली देखरेख नसते. ज्या विश्वविद्यालयांमध्यें विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय असल्याकारणानें त्यांना खऱ्या विद्यालयीन आचरणाचा लाभ होतो, तेथें ज्याला "चांगलें वळण" ह्मणून ह्मणतात, त्याचें फार महत्त्व असतें. परंतु, अशा "चांगल्या वळणा"—मध्यें विद्यार्थ्यांच्या वर्तनावर दाब ठेवणाऱ्या ज्या गोष्टींचा अंतर्भाव होतो, त्या गोष्टीहि कलकत्त्यास नसतात. त्यामुळें, येथील विद्यार्थ्यांच्या वर्तनावर कांहींच दाब राहत नाहीं.

कलकत्ता-शहरांत, रात्रीच्या वेळीं, फार भयंकर गोष्टी चालत असतात. अशा शहराच्या अगदीं मध्यभागीं, शारीरिक व नैतिक उन्नतीस सर्वस्वी विघातक अशा परिस्थितींत; हजारों तरुण लोकांस तुम्ही एकीकडे राहूं देता ... ... त्यावरून त्याचा परिणाम काय होणार, हें अगोदरच समजून चुकतें. त्यामुळें शरीराचा नाश होतो इतकेंच नाहीं, तर नीतिमत्तेची राखरांगोळी होते, आणि राजकीय रोगानें सहज पछाडलें जावें, अशा तऱ्हेची मनाची स्थिति होतें. ह्याबद्दल शंका घेण्याला तिळभरहि जागा नाहीं.

बुद्धीच्या कामामध्यें हिंदुस्थानांत आपला कोणी हात धरणार, नाहीं असें जरी बंगाली लोकांस वाटतें, तरी त्यांच्या इलाख्यांत— विशेषतः कलकत्ताशहरांत— सांपत्तिक दृष्ट्या जितकी वाईट स्थिति आहे, तितकी हिंदुस्थानच्या बऱ्याच प्रांतांत नाहीं, व अशा स्थितीमुळें उत्पन्न होणाऱ्या शारीरिक व नैतिक दुष्परिणामांवरच मुख्यतः डा० गारफिल्ड वुइलियमस यांचा रोख आहे, हें खरें आहे. परंतु, कांहीं थोडे विद्यार्थी खेरिजकरून, बाकीच्यांच्या बुद्धीवर होणारे दुष्परिणामहि आपल्या परीनें इतकेच भयंकर आहेत; आणि, असे दोष हल्लींच्या शिक्षणपद्धतीच्या अगदीं अंगीं खिळलेले आहेत. हिंदुस्थानच्या कोणत्याहि भागांतील खेड्यापाड्यांत राहणाऱ्या ज्या लोकांस पाश्चात्य कल्पना व पाश्चात्य ज्ञान यांची कधींच

थोडीसुद्धां ओळख झालेली नसते, असे लोक आपलीं मुलें जवळच्या गांवच्या शाळेंत जाण्याजोगीं होईपर्यंत त्यांना कसें वाढवितात, हें अशा एखाद्या मुलाचें उदाहरण घेऊन पाहूं या. आपल्या मुलास सरकारी नोकरी मिळावी, ह्मणून अशा मुलाचीं आईबापें आपल्या पोटाला चिमटा घेऊन, त्याचा शाळाखर्च चालविण्यास तयार असतात. ह्मणून, त्याला निव्वळ हिंदी लोकांच्या जुन्या स्थितींतून काढून, जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं ह्मणा किंवा विश्वविद्यालय असणाऱ्या राजधानीच्या ठिकाणीं ह्मणा, पण मध्यम प्रतीचें (हायस्कूलचें) शिक्षण मिळविण्यासाठीं ते त्याला पाठवून देतात. तेथें त्याचे कोणी इष्टमित्र असले, तर त्यांच्या घरीं तो राहतो; किंवा चांगल्यावाईट ठिकाणीं भाड्यानें जागा घेऊन, तो ज्या स्थितींतून इकडे आला त्याचप्रकारच्या—ह्मणजे हिंदीलोकांच्या निव्वळ जुन्या चालीरीतीप्रमाणें राहण्याच्या—स्थितींतच राहूं लागतो. पाश्चात्य लोकांच्या आचारविचारांची त्याला जी कांहीं माहिती होते, ती परक्या भाषेंत लिहिलेल्या, शाळेंत चालणाऱ्या पुस्तकांवरूनच कायती होते. ह्या पुस्तकांचा नुसता शब्दार्थ कळण्याची त्याला मारामार पडते; मग त्यांतलें मर्म कळण्याची गोष्टतर दूरच राहिली. हें त्याच्या एतद्देशीय गुरूलाच स्वतःला बहुधा अर्धवट कळलेलें असतें, आणि त्यामुळें, तें त्यांना दुसऱ्यास नीट समजावून सांगतां येत नाहीं. दुय्यम प्रतीचें (हायस्कुलांतलें) शिक्षण संपविण्यापर्यंत त्यानें पल्ला गांठला असला, तर तो कॉलेजांत जातो, व येथेंही त्याची स्थिती अगदीं पहिल्याप्रमाणेंच असतें. वास्तविक ह्मटलें, तर हें कॉलेज ह्मणजे एक वरिष्ठप्रतीची शाळाच असते. कॉलेजांत असतांनाहि, त्याची राहणी अगदीं जुन्या, देशी पद्धतीची असते;

आणि, पाश्चात्य लोकांच्या जीवनक्रमाचें जें कांहीं ज्ञान त्याला मिळतें, तें सारें परीक्षेकरितां नेमलेल्या पुस्तकांतूनच मिळतें. पाश्चात्य लोकांच्या आचारविचाराचें रहस्य काय, हें एखाद्या शिकून तयार झालेल्या यूरोपियन शिक्षकास जसें बरोबर रीतीनें सांगतां येईल, तसें अति- उत्तम प्रतीच्या एतद्देशीय शिक्षकास सांगतां येणार नाहीं. ज्या विद्यार्थ्यांस वैद्यकी किंवा इंजिनियरचें काम शिकावयाचें असेल, त्यांना मात्र हे विषय शिकविण्याच्या शाळांत जाऊन, तेथील यूरोपियन शिक्षकांच्या हाताखालीं विद्या संपादन करावी लागते. पण, इतर विद्यार्थ्यांस शाळेंतील व कॉलेजांतील सर्व अभ्यास संपेपर्यंत, एकाहि इंग्रजाशीं बिलकूल संबंध न येता राहतां येतें, व ते तसें राहतातहि. अशा स्थितींतील विद्यार्थ्यांवर पाश्चात्य ज्ञानाचा सुपरिणाम होईल, असें कसें ह्मणतां येईल? तसेंच, पाश्चात्य लोकांच्या विद्याधनामुळें त्यांचीं जीं ध्येयें आहेत, तीं जरी बाजूस ठेविलीं, तरी निदान त्या लोकांच्या चालीरीती व पूर्वपरंपरा यांचें यत्किंचित् तरी ज्ञान त्याला कसें होईल?

आतां, कितीहि वेडगळपणाची कां वाटेना, पण क्षणभर अशी कल्पना करा कीं, गेलीं शंभर वर्षें आमचा देश (इंग्लंड) चिनी लोकांच्या ताब्यांत असून, आमच्या सामाजिक चालीरीतींत अथवा धर्मसमजुतींत मुळींच ढवळाढवळ न करितां, आमच्या लोकांचें उच्च शिक्षण तेवढें त्यांनीं (चिनी लोकांनीं) आपल्या हातीं घेतलें आहे; आणि, हें शिक्षण निव्वळ चिनी पद्धतीचें असून, तें चिनी भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांच्या द्वारें, मुख्यतः इंग्रज शिक्षकांकडून देण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला आहे; आणि, चिनी लोकांच्या आचारविचारांचें खरें मर्म ज्या

इंग्रज शिक्षकांना आपल्या शिष्यवर्गाहून फार झालें तर, एक गहूंभर अधिक कळलेलें आहे. तर, अशा स्थितींत, आमच्या तरुण मंडळीच्या मनावर (बुद्धीवर) काय परिणाम झाला असतां? हल्लीं, जे हिंदी विद्यार्थी शाळांतून व कॉलेजांतून बाहेर पडतात, त्यांच्यापैकीं पुष्कळांच्या मनावर (मेंदूवर) जो परिणाम होतो ह्मणून मी सांगितलें आहे, त्यापेक्षां हा वरील परिणाम मनाला अधिक घाबरवून टाकणारा झाला नसता.

आतां, कोणी असें ह्मणेल कीं, हीं जीं उदाहरणें दिलीं आहेत, तीं अगदीं निदानीचीं आहेत. परंतु, तीं जरी निदानीचीं असलीं, तरी अपवादादाखलचीं आहेत, असें मात्र नाहीं. वर सांगितलेल्या अडचणींस न जुमानतां, संपादन केलेली विद्या आपल्या अंगीं पुरी बाणविण्याची आश्चर्यकारक देणगी ज्यांना असते—किंवा ह्याहिपेक्षां बरोबर बोलावयाचें, ह्मणजे साहजिकज्ञानाची देणगी ज्यांना असते, असे लोक फारच थोडे असून, नवीन विचारांचें रहस्य तात्काळ जाणण्याची शक्ति त्यांच्या ठिकाणीं असते— त्यांना निदान मळकट भिंगांतून पाहिल्याप्रमाणें, त्याची पुसट कल्पना येते. ह्या अशा प्रकारच्या अगदीं थोड्या लोकांतच वर सांगितल्या प्रकारचे अपवाद शोधून काढिले पाहिजेत. परंतु, अशी देणगी जवळ असणारांची संख्या बहुतकरून नेहमींच लहान असते. शिवाय, यूरोपियन शिक्षकांची संख्या जसजशी कमी होत चालली आहे, तसतसें अशा लोकांचें प्रमाणहि कमी होऊं लागलें आहे. आणि, अशी देणगी कोणाजवळ जरी स्वभावतःच असली, तरी तिचा विकास करण्याचीं साधनें ह्यापुढें, यूरोपियन शिक्षकांच्या अभावीं, कमीच होत जाणार आहेत. १९०१ च्या खानेसुमारीच्या रिपोर्टीतील

आंकडे व १९०१।०२ सालचे शिक्षणखात्यानें दिलेले आंकडे यांची तुलना करून पाहिली, तर असें दिसून येतें कीं, शाळाखात्यांत कामावर असलेल्या यूरोपियन लोकांची संख्या केवळ ५०० असून, त्यांपैकीं निम्मेपेक्षां कमीच लोक सरकारी नोकरींत होते; परंतु, मध्यम व उच्च प्रतीचें शिक्षण देण्यासाठीं सुमारें २७५०० हिंदी शिक्षकांची योजना झालेली होती. मध्यम व उच्च प्रतीचें शिक्षण मिळविणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची संख्या ज्याअर्थी ७॥ लक्ष आहे, त्याअर्थी इतक्या प्रचंड विद्यार्थिचमूवर इतक्या थोड्या यूरोपियन शिक्षकांपासून, ते कितीहि उत्तम असले तरी, ह्मणण्यासारखा परिणाम घडून येणार नाहीं, हें उघड आहे. बाकी, इकडचे यूरोपियन शिक्षक बहुधा असावेत तितके चांगले नसतात, ही गोष्ट निराळी.

मनुष्याच्या बुद्धीचा विकास झाला पाहिजे, ह्या दृष्टीनें विचार केला, तर असें दिसून येतें कीं, पाश्चात्य देशांमध्यें, प्राचीन भाषांतील ग्रंथांच्या अध्ययनाविरुद्ध, जे आक्षेप त्याच्या कट्टया शत्रूंकडून घेण्यांत येतात, त्यांपैकीं पुष्कळ आक्षेप हिंदुस्थानांतील आमच्या सध्यांच्या शिक्षणपद्धतीवर, खरोखर विशेषच उग्र स्वरूपांत, येऊं शकतात. शिवाय, पाश्चात्य देशांमध्यें, अशा प्राचीन विद्येचें कितीहि महत्त्व असलें, तरी एकंदर शिक्षणक्रमांत तिला फक्त कांहीं जागा मिळते; आणि दुसरी गोष्ट अशी आहे कीं, प्रत्येक विषय फक्त लाटिन व ग्रीक भाषेंतूनच शिकविला जात नाहीं. पाश्चात्यांच्या कल्पनेप्रमाणें मनुष्याचें शील बनलें पाहिजे, ह्या दृष्टीनें विचार केला, तसेंच शरीर- सुधारणेच्या बाजूनें सुद्धां पाहिलें, तर येथें (हिंदुस्थानांत) अधिकच वाईट स्थिति दृष्टीस पडते. पाश्चि-

मात्र देशांतील शाळांत—अगदीं स्कूलबोर्डाच्या शाळांपासून तों तहत युनिव्हर्सिटीपर्यंत—जें शिक्षण देण्यांत येतें, तें, त्या शाळांत येणारीं मुलें समाजाच्या ज्या वर्गांतील असतील, त्या-वर्गास साजेल, अशाच साधारण नमुन्याचें नेहमीं असतें. आमच्या मुलांना जन्मल्यापासून जें शिक्षण घरीं मिळत असतें, तोच केवळ क्रम शाळांतून ठेवण्यांत येऊन, ज्या विषयांचें शिक्षण घरीं मिळत नाहीं, तें तेथें मिळतें. आणि ह्मणून, आमची मुलें ज्या स्थितींत जन्मास येतात, वाढतात व एकंदर व्यवहार करितात, त्याच स्थितीला अनुरूप अशा पद्धतीनें त्यांना शिक्षण मिळत असतें. आतां, क्वचित् आढळून येणाऱ्या अपवादादाखलच्या गोष्टी सोडून दिल्या, तर हिंदुस्थानांत अशी स्थिति नसते; पण, त्याच्या अगदीं उलट मात्र असते.

नैतिक दृष्ट्या विचार केला तर, गेल्या थोड्या वर्षांत, ह्या पद्धतींतले दोष एका नवीनच आणि अतिभयंकर मार्गानें जगाच्या निदर्शनास आले आहेत. हिंदुस्थानांतील हल्लींच्या राजकीय चळवळींत शाळेंत जाणाऱ्या मुलांनीं व कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं अंग घातलें, ह्यापेक्षां शोचनीय प्रकार दुसरा कोणता असेल, असें वाटत नाहीं. हा प्रकार सर्वच ठिकाणीं अगदीं ढळढळीतपणें दिसून आला आहे. पण, त्यांतल्यात्यांत तो बंगाल्यांत जितका दिसून येतो, तितका इतर कोठें दिसत नाहीं. १९०५ सालच्या बहिष्काराच्या चळवळींत, अगदीं आरंभापासून, तरुण हिंदुलोकांचे थवेच्याथवे जागजागीं जमून, आणि मुद्दाम कुरापत उकरून काढून, लोकांच्या इच्छेविरुद्ध, त्यांच्या व्यवहारास हरकत करण्याचें काम (पिकेटिंग) बंगाल्यांत मोठ्या जोरानें करित होते. वास्तविक पाहूं जातां, ह्या तरुण मुलांचें

खरें कर्तव्य ह्मणजे शाळेंत जाऊन, आपले धडे तयार करणें, असें होतें. असो. मुलांनीं हें जें पिकेटिंग सुरू केलें होतें, तो केवळ आरंभ होता. आणि, शेवटीं, ह्या तरुण मंडळीमध्यें जी अगदीं नीतिभ्रष्टता दिसूं लागली, तिची कल्पना पुढील उताऱ्यावरून करितां येईल. हा उतारा १९०८।०९ सालच्या पूर्व-बंगालच्या शाळाखात्याच्या रिपोर्टांतून घेतला आहेः—

बहिष्काराच्या वाढदिवसानिमित्तानें, आगष्टच्या ७ व्या तारखेस (१९०८), कोमिल्ला येथील बहुतेक हिंदु विद्यार्थी शाळेंत अथवा कॉलेजांत गेले नाहींत. ह्यानंतर लौकरच, मुझफरपूर येथील खून करणाऱ्या इसमास फांशीं दिलें, त्या दिवशीं, ह्या प्रांतांतील पुष्कळ शाळांतले विद्यार्थी अनवाणी व अंगांत सदराहि न घालतां शाळेंत गेले. कित्येकांनीं तर त्या दिवशीं उपासदेखील केला. ... ... जमालपुरास असा प्रकार अठवडाभर चालू होता. ... ... त्याच वर्षी, आणखी पुढें कांहीं दिवसांनीं, अलीपुरचे खून करणाऱ्या इसमांपैकीं एकास फांशीं दिलें, त्या दिवशीं, संदिपकार्गिलच्या शाळेंतील मुलांनीं असाच प्रकार केला.

ह्याच रिपोर्टमध्यें मोठे आशाजनक उद्गार काढले आहेत कीं, विद्यार्थ्यांस शिस्त लागण्याकरितां, जे कित्येक उपाय योजण्यांत आले आहेत, त्यामुळें अलीकडे बरीच सुधारणा झाली आहे. परंतु, अगदीं अलीकडे—ह्मणजे डाक्का येथील मोठ्या कटाचा खटला चालू असतां—ज्या गोष्टीं दृष्टोत्पत्तीस आल्या आहेत, त्यांवरून असें वाटतें कीं, अशा गोष्टींची प्रवृत्ति ज्या कारणामुळें होते, तीच मुळांत नाहींशीं करून टाकण्याकरितां, नुसत्या शिस्त राखण्याच्या उपायापेक्षां कांहींतरी अधिक करावयास पाहिजे आहे.

आपल्या बुद्धिमत्तेमुळें देशाचें पुढारीपण आपल्याकडे आहे, असें ह्मणणाऱ्या लोकांच्या अंगावर ह्या बाबतींत अत्यंत मोठी जबाबदारी आहे. आपल्यांतील तरुण मंडळीनें राजकीय

चळवळींत पडावें, ह्मणून त्यांना ह्या लोकांनीं नुसतें चिथावून दिलें इतकेंच नाहीं, तर भांडणामध्यें खरोखर अगदीं आघाडीवर त्यांची योजना करण्यांत आली होती. राजद्रोही चळवळींच्या अंगभूत असणाऱ्या इतर गोष्टी, आह्मां ब्रिटिश लोकांच्या दृष्टीनें, कितीहि दूषणीय असल्या, तरी मुलांचा असा दुरुपयोग करणाऱ्या हिंदु पुढाऱ्यांवर नैतिक दृष्ट्या जसा दोष येतो, तसा दुसऱ्या कोणावरहि येत नाहीं. कोंवळ्या वयांत मुलांच्या मनावर कोणत्याहि गोष्टीचा परिणाम फार जलद होतो. अशा अनुभवशून्य मुलांचे प्रबळ मनोविकार जागृत करून, अथवा त्यांच्या धर्मसमजुतींचा फायदा घेऊन, समाजांत शिस्त व कदर राखण्याकरितां जीं तत्वें सांभाळावीं लागतात, त्यांसच हिंदु पुढाऱ्यांनीं हरताळ लाविला. राजकीय खून करणारे सर्वच लोक निखालस कुमार्गास लाविलेल्या, शाळेंतील विद्यार्थ्यांपैकींच होते. तथापि, सबंद शाळांच्या शाळा व कॉलेजें अशा खुनी माणसांविषयीं जो आदरभाव दाखवीत तो पाहिला ह्मणजे, भावी स्थितीविषयीं मनाला अधिकच भीति वाटूं लागते, ह्यांत संशय नाहीं. शाळामास्तर व कॉलेजचे प्रोफेसर लोक अशा गोष्टी सहन करितात, आणि कधीं कधीं तर त्यांना उत्तेजन देतात, हें सर्वांत मोठें दुश्चिन्ह आहे. शिक्षक व विद्यार्थी ह्या उभयतांचीहि नीति अगदीं बिघडून गेल्याचीं हीं लक्षणें असून, त्यापासून मोठा धोका आहे. ह्या भयंकर नैतिक रोगाची उपेक्षा केली असतां, आह्मांवर मोठें अरिष्ट येण्याचा खात्रीनें संभव असून, हिंदी लोकांच्याविषयीं जें आमचें कर्तव्य आहे, त्यापासून आह्मी पराङ्मुख झालों, असें होईल. गेल्या दोन पदवीदान–समारंभांच्या वेळच्या

आपल्या भाषणांत, शिक्षक व राजकारण ह्यांच्या संबंधाच्या प्रश्नावर, डॉ० अशुतोष मुकर्जी यांना विशेष जोर देण्याची पाळी आली. १९०९ सालच्या आपल्या भाषणांत डॉक्टरसाहेब ह्मणाले कीं, "गेल्या १२ महिन्यांत घडलेल्या गोष्टींवरून मी असें बिनदिक्कत ह्मणतों कीं, आपल्या भावी पिढीचें खरोखर पुढें कल्याण व्हावें, अशी इच्छा करणाऱ्या सर्व लोकांनीं, आपली तरुण मंडळी बेजबाबदार लोकांच्या हातीं पडूं नये ह्मणून, अगदीं न डगमगतां, मोठ्या नेटानें प्रयत्न केला पाहिजे. कारण, हे लोक मोठा अविचार करून, व परिणामाकडे बिलकूल लक्ष न देतां, विद्यार्थ्यांचें वाजवी कर्तव्य जें विद्यासंपादन करणें, तें त्यांस सोडावयास लावून, भलत्याच मार्गास नेण्याचा आणि कायद्यानें स्थापन झालेल्या सरकाराविषयीं त्यांच्या अपक्व मनांत द्वेषाचें बीं पेरण्याचा उद्योग करितात." ह्या वर्षीचें (१९१०) त्यांचें भाषण तर ह्याहिपेक्षां स्पष्ट होतें. त्यांनीं असें सांगितलें कीं, "जो शिक्षक दिक्कत बाळगून वर्गामध्यें राजकीय विषयांची चर्चा करित नाहीं, परंतु आपला बहुतेक किंवा सर्वच फुरसतीचा वेळ राजकीय कामें व चळवळी करण्यांत घालवितो, आणि राजकीय संस्था व त्यांचीं कामें ह्यांच्या निमित्तानें ज्याचें नांव व भाषणें अगदीं प्रसिद्धपणें जगापुढें येतात," त्या शिक्षकाकडून आपलें, विद्यार्थ्यांसंबंधाचेंच कर्तव्य बजावलें जात नाहीं; कारण, "विद्यार्थ्यांवर अधिकार चालविण्याच्या स्थितींत जो मनुष्य असणार, त्याच्या मुख्य दिनचर्येंत जर राजकारणाचा व राजकीय चळवळीचा अंतर्भाव होत असेल, तर त्याच्या मनाचा ओढा खास तिकडेच असणार." ह्मणून, "विद्यार्थ्यांच्या मनाची राजकारणाकडे अवेळीं प्रवृत्ति

उत्पन्न करणाऱ्या गोष्टी" शिक्षकानें टाकल्या पाहिजेत.

हा उपदेश फारच प्रशंसनीय आहे, ह्यांत मुळींच शंका नाहीं. परंतु, कांहीं थोड्या बंगाली विद्यार्थ्यांची भेट साध्या रीतीनें घेऊन, त्यांच्याशीं संभाषण करण्याकरितां, मि. सुरेंद्रनाथ बानर्जींनीं मला एकदां आमंत्रण दिलें व तें मीं स्वीकारिलें, त्यावेळीं वरील उपदेशाला बंगाल्यांतील कांहीं राजकीय पुढारी किती महत्त्व देतात, हें अजमावून पाहण्याची मला संधी मिळाली. हे विद्यार्थी मोठे पाणीदार, आनंदी होते; आणि, त्यांचें त्यांनाच जर बोलूं दिलें असतें, तर त्यांचे अभ्यास कसे काय चालले आहेत व त्यांच्या पुढच्या आशा काय आहेत, ह्यासंबंधानें त्यांच्याशीं माझा मोठा मनोरंजक संवाद झाला असता. परंतु, मि. बानर्जी व तेथें हजर असलेले इतर कांहीं राजकारणी लोक यांनीं आमच्या संभाषणास अगदीं आग्रहानें राजकीय स्वरूप दिलें, व ज्यापासून मनाला त्रास होईल, अशा वादग्रस्त विषयावर बोलण्यास सुरवात केली. मला तर हा सर्व प्रकार अगदींच अप्रासंगिक वाटला.

परंतु, शिक्षक व विद्यार्थी ह्या दोघांच्याहि मनांत राजकीय द्वेषाचें बीं रुजून, तें जोरानें वाढीस लागण्यास योग्य अशी जी परिस्थिति उत्पन्न झाली आहे, तिचीं कारणें सांपत्तिक असून, त्यांबद्दल कांहीं अंशानें तरी आम्हीच जबाबदार आहों. आतां, अशीं कारणें जर नसतीं, तर राजकीय चळवळयांच्या खोडसाळ प्रयत्नांस इतकें चांगलें यश येण्याजोगी जमीनच मुळीं तयार झाली नसती. अलीकडे, प्रपंचाचा खर्च झपाट्यानें वाढल्यामुळें, कारकुनी पेशाचे लोक ज्या जातींतून येतात, त्यांच्यावर जसा वाईट परिणाम झाला आहे, तसा इतर कोण-

त्याच जातीवर नाहीं; आणि, ह्याच जातींतून शिक्षक व शाळें-तले आणि कॉलेजांतले विद्यार्थी यांचा भरणा मुख्यतः होत असतो. ह्या लोकांची सांपत्तिक स्थिति कारागीर लोकांच्या किंवा रोजमजुरीचे कामकरी लोकांच्याहि स्थितीपेक्षां खालावली आहे, असें बहुधा आढळून येतें. कारण, अन्नवस्त्राच्या किंमती वाढूं लागल्या आहेत, त्याबरोबरच साधारणपणें त्यांची प्राप्तिहि वाढली आहे. पुष्कळ दिवस अभ्यासानें हाडांचीं काडें केल्यावर, शेवटीं ज्या लोकांना त्यांच्या श्रमांचा मोबदला ह्मणून लहानशा पगाराची जागा मिळते, त्यांच्या मनामध्येंसुद्धां ह्याच कारणामुळें मोठा विषाद उत्पन्न होतो. पण, ज्यांच्या नशिबीं एवढेंहि मिळण्याचें नसतें—ह्मणजे ज्यांना कोठेंच कांहीं थारा मिळत नाहीं—त्यांच्या दुःखाला तर पारावार नसतो. हल्लीं प्रचारांत असलेली शिक्षणपद्धति सुरू करण्याचा जो तात्कालिक मूळहेतु होता, तो साधण्याकरितां तिची जशी वाढ व्हावयास पाहिजे होती, त्यापेक्षां फारच झपाट्यानें झाली आहे. त्यामुळें, ह्या पद्धतीनें शिक्षण मिळवावयाचें, तें केवळ सरकारी नोकरी मिळण्यास एक मार्ग व्हावा ह्मणून, अशी ज्या असंख्य हिंदी लोकांची समजूत होती, त्यांची पुढें अत्यंत निराशा होणारच होती. कारण, पुरवठ्यापेक्षां मालाला मागणी ज्यास्त येऊं लागली; आणि, ह्या अशा जबरदस्त वाढीमुळें हलक्या प्रतीचें शिक्षण मिळूं लागल्याकारणानें, ह्या मालाला जी मागणी आली असती, ती त्याचवेळीं कमी होऊं लागली. हल्लींतर, एफ्. ए. पास झालेले आणि बी. ए. लोकसुद्धां केवळ दुकानांतला पडीत माल होऊन बहुधा बसले आहेत. विश्वविद्यालयाच्या परीक्षा पास होऊन आपला इष्ट हेतु (पदवी) [illegible] ,

हिंदी विद्यार्थी व त्याचीं आईबापें जे हाल सोसतात, ते पाहिले ह्मणजे अंतःकरणाला दयेचा जसा पाझर फुटतो, तसा दुसऱ्या कशानेंहि फुटत नसेल. परंतु, अशा पदव्या निव्वळ शुष्क घोकंपट्टी करून मिळविल्या असल्याकारणानें, असल्या पोपटपंचीचा पदवीधरांना व्यवहारांत कांहींच उपयोग करून घेतां येत नाहीं; व त्यामुळें, दुर्दैवानें, ह्या लोकांनीं केलेले श्रम व सोसलेला त्रास व्यर्थ होतो. कळाकुसरीचें काम करणाऱ्या कारागिरास, आणि हेलपाटी करणाऱ्या मजुरासमुद्धां, दररोज १२ आण्यांपासून १ रुपयापर्यंत प्राप्ति होते. पण, आपलें उच्च शिक्षण चालू असे-तोंपर्यंत, खुद्द स्वतःला व कंटुंबाच्या माणसांना पिळून काढणाऱ्या तरुण मनुष्याला दरमाहा ३० किंवा २० सुद्धां रुपयांची नोकरी मिळत नाहीं, असें नेहमीं घडतें. कलकत्त्यास कांहीं परोपकारी हिंदुलोकांनीं अशा कित्येक शिकलेल्या तरुणांस, तागाच्या गिर-ण्यांतून (जेथें पोतीं वगैरे करितात) दरमाहा १५ रुपये पगारावर, मजुरांप्रमाणें हातकाम करण्याकरितां (लिहिण्याचें वगैरे नव्हे) ठेविलें आहे. हेतु इतकाच कीं, त्यांची उपासमर होऊं नये. वस्तुतः, गोष्टी इतक्या विकोपास गेल्या आहेत कीं, आमच्या सध्यांच्या शिक्षणव्यवस्थेमुळें, अर्धवट शिकलेल्या लोकांचे थवेच्या थवे दरसाल एकसारखे बाहेर पडत आहेत. आणि, ह्या लोकांना उद्योगधंदा मिळत नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक कोणत्याहि कामाला बहुतेक लाय-कच नसतात. शिक्षणविषयांत ज्यांचा शब्द मोठा प्रमाणभूत मानण्यांत येतो, अशा एका हिंदु गृहस्थानीं मला सांगितलें कीं, अशा बेरोजगारी शिकलेल्या लोकांची संख्या बंगाल्यांत ४० हजारांवर असावी, असा अजमास आहे. बंगाल्यांत बा-

संकटाची अगदीं परमावधि झाली आहे. सरकारी व खासगी नोकरींत असणाऱ्या यूरोपियन व एतद्देशीय लोकांच्या संख्येच्या प्रमाणांत कितीहि फरक केला, तरी हें अरिष्ट फारसें टळणार नाहीं. हिंदुस्थानांतले एकूनएक इंग्रज लोक निघून गेले, तरी येथील राज्यकर्त्यांस हा प्रश्न हल्लींइतकाच भयंकर वाटेल. त्यांत फरक एवढाच होईल कीं, ह्या बाबतींतील आपल्या दुःखाचें खापर हल्लीं बहुधा लोकांना परकी राज्यकर्त्यांच्या डोक्यावर फोडावयास सांपडतें, तसें तें मग सांपडणार नाहीं. सध्यां अशी स्थिति आहे कीं, परकी राज्यकर्त्यांनीं येथें जी नवीन शिक्षण-पद्धति सुरू केली, तिच्यामुळेंच आमची अशी मोठी फसगत झाली असूनहि, त्याबद्दल त्यांना आमची मुळींच दयामाया येत नाहीं, असें अपेशी लोकांपैकीं पुष्कळजणांस वाटत आहे.

अशाच कारणांमुळें, शिक्षकमंडळींतहि असंतोष उत्पन्न झाला असून, ह्या रोगाची लस ते आपल्याकडून विद्यार्थ्यांना टोंचण्याचा उद्योग करित आहेत. शिक्षकाच्या कामाकरितां लायक माणसें तयार करण्यापेक्षां, शाळा आणि कॉलेजांची संख्या वाढविणें फार सोपें होतें. मनाला न आवडणाऱ्या वाईट गोष्टींचा विचार सरकारी रिपोर्टांत करण्याची बहुधा कोणी परवा करीत नाहीं. हिंदुस्थानसरकारच्या व प्रांतिक सरकारांच्या विद्याखात्याच्या रिपोर्टांतून, शाळा व विद्यार्थी यांच्या संख्येची वाढ झाली आहे, ह्या गोष्टीवर जसा मोठा जोर देण्यांत येत असतो, तसा प्रचलित शिक्षणपद्धतींतल्या दोषांवर मात्र मुळींच देण्यांत येत नाहीं. (ह्मणजे, इकडे बहुतकरून डोळेझांकच केलेली असते). तथापि, "होत आहे तें सर्व चांगलेंच आहे" असें [illegible], केवढा मोठाहि आशावादी मनुष्य असला तरी, एक

गोष्ट फारच असमाधान उत्पन्न करणारी आहे, असें कबूल करणें त्याला प्राप्त आहे; तिजकडे त्याला बिलकूल दुर्लक्ष करितां येणार नाहीं. एतद्देशीय शिक्षकांच्या गैरलायकीबद्दल व त्यांच्यांतील उणीवांबद्दल कांहीं उल्लेख, नाहीं असा एकहि रिपोर्ट नाहीं, असें ह्मटलेंतरी चालेल. हिंदुस्थानच्या शिक्षणखात्याचे हुशार मुख्याधिकारी मि. **ऑरेंज** यांच्या गेल्या पंचवार्षिकी रिपोर्टांत, एक थोडक्या पण अतिशय अर्थपूर्ण शब्दांनीं लिहिलेला भाग आहे. ते ह्मणतात कीं, "साधारणपणें ह्मटलें ह्मणजे, दुय्यम प्रतीच्या शाळांतील मास्तरांचे पगार व लायकी असावी त्यापेक्षां कमी आहे, असें कोणाहि समंजस माणसास कबूल करावें लागेल; आणि, ह्या बाबतींत जी चौकशी सध्यां होत आहे, त्यावरून असें दिसून येतें कीं, ह्या संबंधाची दोन्ही बंगालप्रांतांची (बंगाल व पूर्वबंगाल) स्थिति लज्जास्पद असून, इतर प्रांतांचीहि असमाधानकारक आहे." मास्तरलोकांचे खरोखर पगार काय आहेत, व त्यांची खरोखर लायकी किती आहे, ह्याबद्दल फारच थोडी—बहुतेक नकारार्थींच—माहिती पुढें येत आहे. तथापि, कलकत्त्याच्या युनिव्हर्सिटीमार्फत हायस्कुलांची जी तपासणी झाली आहे, त्यावरून असें दिसून येतें कीं, त्यांनीं पाहिलेल्या शाळांतील ३०५४ मास्तरांपैकीं २१०० पेक्षां अधिक लोकांना ३० रुपयापेक्षां कमी दरमाहा मिळत होता. ह्मणून, "बंगालमध्यें अगदीं कमी योग्यतेचे लोक शिक्षणखात्यांत राहतात; व जे थोडे लोक चांगल्या लायकीचे असतात, ते दुसरा जास्त किफायतशीर धंदा सांपडेपर्यंतच फक्त शाळेतलें काम पतकरतात." हा नवा धंदा बहुधा वर्तमानपत्राचा असतो; आणि, तो स्वीकारल्यावर, हे वैतागलेले, शाळा सोडून आलेले मास्तर हालाहल-

विष ओकण्याचा सपाटा सुरू करून, राजद्रोहात्मक वाङ्मयांत भर घालण्याचें काम चालवितात. परंतु, जर कां असे लोक शाळामास्तरींतच राहिले, तर त्यापासून जास्तच धोका असतो. कारण, मग ते तोंडानें उपदेश करून अथवा प्रत्यक्ष धडा घालून देऊन, आपल्या हाताखालच्या विद्यार्थ्यांस राजद्रोह शिकविण्याच्या कामीं, आपल्या गुरुजीपणाचा उपयोग करून घेतात.

१८८६।८७ सालच्या **पब्लिक सर्विस कमिशनच्या** शिफारशींचा शिक्षण खात्यांतील हिंदी नोकराच्या बाबतींत कसा वाईट परिणाम झाला आहे, हें मीं मागेंच सांगितलें आहें. आतां, त्यामुळें योग्य प्रकारचे हिंदी लोक ह्या खात्याला मिळण्याची जशी पंचाईत पडूं लागली आहे, त्याचप्रमाणें योग्य प्रकारचे युरोपियन लोक बहुतेक मिळेनासे झाले असावेत, अथवा त्यांचें वजन पूर्वीसारखें आतां विद्यार्थ्यांवर बसेनासें तरी झालें असावें. पहिली गोष्ट अशी कीं, त्यांची संख्या फारच अपुरी आहे. हिंदुस्थानांत शिक्षकाचें काम खरोखरीं करित असलेल्या ५०० युरोपियनांपैकीं, निम्मेपेक्षां कमी लोक सरकारी नोकरींत आहेत. त्यांच्यामध्यें पुष्कळ लोक मोठ्या कर्तबगारीचे आहेत, ही गोष्ट सर्वमान्य आहे; आणि विश्वविद्यालयांत असतांना, मोठ्या नांवारूपास आलेले व मान मिळविलेले लोकहि त्यांच्यांत कांहीं कमी नाहींत. परंतु, हिंदुस्थानचें **शिक्षणखातें** ही सरकारी नोकरीची एक कनिष्ठ प्रतीची शाखा आहे, असें जोंपर्यंत मानण्यांत येऊन, त्याप्रमाणें त्याची संभावनाहि होत आहे तोंपर्यंत, ह्या खात्याकडून होणाऱ्या अतिशय महत्वाच्या कामगिरीच्या दृष्टीनें पाहूं गेल्यास, त्याची साधारणपणें जशी स्थिति असली पाहिजे, तशी होण्याचें चिन्ह दिसत

नाहीं. बहुधा असें सांगण्यांत येतें कीं, विलायतेस शिक्षण खात्यांतील लोकांची जशी स्थिति असते, तशीच निदान हिंदुस्थानांतहि असते. आतां, असें जरी असलें, तरी त्यामुळें माझ्या ह्मणण्यास मुळींच बाध येत नाहीं. कारण, माझा मुद्दा असा आहे कीं, सर्वस्वी परक्या देशांतील लोकांच्या तरुण मुलांस पाश्चात्य कल्पनांप्रमाणें शिक्षण देऊन तयार करण्याचें काम अनंतपटीनें कठीण आहे. ही गोष्ट विचारांत घेतली, तसेंच हिंदुस्थानांतील ब्रिटिश लोकांच्या राज्यास ह्या कामाची पुढें किती मातब्बरी आहे, हेंहि ध्यानांत ठेविलें, तर विद्याखात्यांतील नोकरी अशा तऱ्हेची असली पाहिजे, कीं त्यामुळें साधारण योग्यतेच्या नव्हे, तर आह्मांमधील अति–उत्तम माणसांच्या मनांत ह्या नोकरींत शिरण्याची इच्छा उत्पन्न व्हावी. पण, सांप्रतच्या स्थितींत, उत्कृष्ट प्रतीचे लोक शिक्षणखात्यांत शिरतात, असें ह्मणतां येणार नाहीं. कारण, असे लोक सनदी नोकरींत (सिविल सर्विस) जातात. हिंदुस्थानांत जाऊन, तेथें आपल्या नशिबाची परीक्षा पाहावयाची, असा ज्यांचा पहिल्यापासून बेत असतो, त्यांचा सनदी नोकरींत प्रवेश झाला नाहीं, तरच ते लोक साधारणपणें इकडल्या शिक्षणखात्यांत शिरतात. अथवा, विलायतेंतील विद्याखात्यांत शिकविण्याचा धंदा करण्याचा मूळ हेतु असलेल्या लोकांची तेथें निराशा झाली, किंवा पैशाच्या दृष्टीनें इकडे चांगला फायदा होईल अशी बहुधा त्यांची भ्रामक कल्पना असली, ह्मणजे पुढें इकडे येऊन शिक्षणखात्यांत नोकरी धरण्याविषयीं त्यांच्या मनाची प्रवृत्ति होते. हे लोक हिंदुस्थानांत येऊन पोहोंचले, ह्मणजे इकडल्या लोकांच्या स्वभावाचें व त्यांच्या चालीरीतीचें कांहीं

ज्ञान त्यांना नसतांनाच, ते आपल्या कामास लागतात. कित्येकांकडे इन्स्पेकटरीचें (शाळांच्या तपासणीचें) व कित्येकांकडे प्रोफेसरीचें (शिकविण्याचें) काम येतें. आणि, विशेषतः ह्या दुसऱ्या वर्गांतील लोकांची लवकरच निराशा होण्याचा संभव असतो. कारण, आपल्या कामाबद्दल कोणाला कृतज्ञता नाहीं, व सामाजिक दृष्टीनें आपणास अगदीं एकलकोंड्यासारखें राहावें लागतें, ह्या गोष्टींचा त्यांना चांगलाच अनुभव येतो. ह्या लोकांपैकीं कांहींजणांची उदासीनतेपलीकडे मजल जात नाहीं. परंतु, मला असें सांगण्यांत आलें आहे कीं, कांहीं लोक—सुदैवानें फारच थोडे—सभोंवतीं फिरत असलेल्या असंतोषाच्या भोंवऱ्यांत स्वतःच सांपडतात, आणि त्यांच्या हाताखालील भावी पिढीच्या लोकांच्या मनांत जो कांहीं दुजाभाव उत्पन्न झाला असेल, तो घालविण्याच्याऐवजीं, त्यांच्या वजनामुळें तो उलटा वाढतच जातो. कांहीं लोक मात्र अशा प्रतिकूळ परिस्थितीस बळी न पडतां, निखालस सत्त्व राखितात. हल्लींच्या व पूर्वींच्या लोकांची तुलना करितांना, हिंदुस्थानांतील शिक्षणाच्या इतिहासांत ज्या थोड्या लोकांचीं नांवें अद्यापि गाजत आहेत, त्यांची तेवढी आठवण राहून, जे पुष्कळ लोक कांहींच नांवलौकिक न मिळवितां निघून गेले, त्यांचा विसर पडण्याचा संभव आहे. तथापि, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे कीं, हल्लींच्या काळांत, ज्या यूरोपियन लोकांचें आपल्या हिंदी विद्यार्थ्यांवर अतिशय वजन असतें, ते मुख्यतः मिशनरी लोकांपैकीं असतात. अशा लोकांचा शिक्षण हा चरितार्थाचा धंदा नसतो, तर तो त्यांच्या आवडीचा एक व्यवसाय असतो.

भाग १९ वा.

शिक्षणपद्धति सुधारण्याचे कांहीं उपाय.

सन १८८९ सालीं, लॉर्ड लॅन्सडाऊन हे व्हाइसराय असतांना, आमची (हिंदुस्थानांतील) शिक्षणपद्धति सुधारण्यासंबंधाचा एक महत्त्वाचा ठराव अगोदरच पास झाला होता. ह्या ठरावाचा मसुदा सर **अँन्थनी** (आतां लॉर्ड) **मॅकडोनाल्ड** यांनीं, हिंदुस्थानसरकारचे सेक्रेटरी असतांना, तयार केला होता. विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा विकास करणें व त्यांना शिस्त लावणें, ह्या दृष्टीनें आमच्या प्रचलित शिक्षणपद्धतींत जे ठळक ठळक दोष दिसत होते, ते ह्या ठरावांत नमूद करण्यांत आले होते. तसेंच, हे दोष काढून टाकण्याकरितां कांहीं चांगले उपायहि त्यांत सुचविले होते. परंतु, इतकें करूनहि, त्या ठरावाचा व्यावहारिक दृष्ट्या तादृश उपयोग झाला, असें दिसत नाहीं. लॉर्ड कर्झन व्हाइसराय असतांना, हाच प्रश्न सोडविण्याचा जो प्रयत्न झाला, तो कांहींसा सफळ झाला. त्यांनीं शिक्षणसंबंधी प्रश्नांची चर्चा करण्याकरितां एक सभा भरविली, व तिचें अध्यक्षस्थान आपणच मंडित केलें. ह्या सभेनें जें कांहीं काम केलें, तें सर्व १९०४ च्या मार्च महिन्याच्या ११ व्या तारखेच्या सरकारी ठरावांत, तसेंच त्याच वर्षी पास केलेल्या विश्वविद्यालयांसंबंधाच्या कायद्यांत (युनिव्हर्सिटीज अॅक्टांत) दाखल करण्यांत आलें आहे. त्यामुळें, हिंदी राजकारणी पुरुषांच्या तळव्याची आग अगदीं मस्तकास गेली

व त्यांनीं सरकारावर त्याबद्दल यथेच्छ तोंडसुख घेतलें. ह्या लोकांचें असें ह्मणणें असतें कीं, देशांतील सर्व सुशिक्षित व बुद्धिवान् लोकांच्या तर्फेनें बोलण्याचा आह्मांस हक्क आहे. हिंदुस्थानांतील उच्च प्रतीच्या शिक्षणाची जाणून-बुजून गळचेपी करण्याचा प्रयत्न लॉर्ड कर्झन हे करित आहेत, असा किमान-पक्षीं त्यांच्यावर आरोप लादण्यांत आला होता. आतां, ज्यांची समजूत कशानेंहि व्हावयाची नाहीं असे लोक वगळले, ह्मणजे ही वरील खोटी ओरड आतां सर्वांमधून नाहींशी झाली आहे. गेल्या पदवीदानसमारंभाच्या वेळीं (कलकत्त्यास), डा० **अशुतोष मुकर्जी** यानीं आपल्या भाषणांत असें ह्मटलें कीं, ज्या नवीन नियमांच्या (शिक्षणासंबंधाच्या) अमलबजावणीला आतां नुकतीच सुरवात झाली आहे, ते आमचा दगा करणार, असें जें कित्येकांनीं भविष्यकथन करून ठेविलें होतें, तें अगदीं खोटें ठरलें आहे इतकेंच नाहीं, तर उच्च प्रतीच्या व सामर्थ्यवान् विद्यार्थ्यांस त्यांपासून खात्रीनें फायदाच होत आहे.

वर सांगितलेल्या सभेनें जें काम केलें, त्याची हकीकत अगदीं थोडक्यांत द्यावयाची ह्मणजे, खालच्या प्रतीचें शिक्षण देणें तें मातृभाषेच्याच द्वारें देणें अगदीं वाजवी आहे, असें प्रथमत: मान्य करून, नंतर त्या सभेनें असें ठरविलें कीं, उच्च प्रतीचें शिक्षण देण्याकरितां इंग्रजी भाषेलाच हल्लींप्रमाणें प्राधान्य दिलें पाहिजे. शिक्षणक्रमांतील मुख्यत: वाङ्मयात्मक विषयांशीं "आधुनिक शिक्षणास" (ज्यांत शास्त्रीय शिक्षण, धंदेशिक्षण इत्यादिकांचा अंतर्भाव होतो) [illegible] आमचीं दडपून टाकिलें होतें त्याला वर काढून, विश्वविद्यालयांतील शिक्षणास अधिक व्यावहारिक स्वरूप देण्याचें [illegible]

तसेंच, शाळेंतील शिक्षणक्रम ह्मणजे कॉलेजांत (विश्वविद्यालयांत) जाण्याची केवळ तयारी, ही व्यवस्था मोडून टाकून, त्यांत अशा तऱ्हेचे व इतके विषय घातले कीं, तेणेंकरून शाळेंत मिळणाऱ्या शिक्षणास एक प्रकारें पूर्णताच यावी. आणि ह्याच हेतूनें, मध्यम प्रतीच्या शाळांतील अभ्यासक्रम ह्मणजे विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेचीच केवळ तयारी होण्यासाठीं ठरविलेला असतो, असें न समजतां, लायकीची साधारण कसोटी ह्मणून स्कूलफायनल परीक्षेलाच अधिक महत्व देत जावें, अशाबद्दल त्या शाळांना उत्तेजन देण्यांत आलें. शिक्षक लोक तयार करणाऱ्या कॉलेजांची सुधारणा करणें, त्याचप्रमाणें, उद्योगधंदे, व्यापार व शेतकी ह्यांचेंच शिक्षण देणाऱ्या शाळांची वाढ करणें, ह्या गोष्टींवर विशेष जोर देण्यांत आला होता. शिक्षणाच्या नीतिशास्त्राचा विद्यार्थ्यांना चांगलें वळण लावण्याच्या कामाशीं जो संबंध आहे, त्याचाहि विसर पडला नव्हता. मोठमोठ्या शहरांत जीं मुलें विद्याभ्यासाकरितां राहतात, तीं नीतिभ्रष्ट होऊन जाऊं नयेत ह्मणून, कॉलेजें व शाळा यांनाच जोडून, योग्य माणसांच्या देखरेखीखालीं, आणखी पुष्कळ विद्यार्थिवसति-गृहें स्थापन होणें हें फारच महत्त्वाचें आहे, असें आपलें ठाम मत असल्याबद्दल, सरकारानें वरील ठरावांत उल्लेख केला आहे. आणि, सरकारी मदत मागणाऱ्या व विश्वविद्यालयाशीं जोडून घेऊं इच्छिणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या शाळांची तशी लायकी आहे किंवा नाहीं; हें ठरविण्याकरितां, पूर्वीपेक्षां कडक रीतीनें त्यांची तपासणी करण्याची व्यवस्था केली; त्याचबरोबर, खुद्द विश्वविद्यालयांच्या रचनेंत व अंतर्व्यवस्थेंत देखील कांहीं सुधारणा करण्यांत आल्या.

ह्या सर्व गोष्टींचा जो परिणाम होऊन चुकला आहे, तो कांहीं लहान–सान नाहीं. विद्यार्थिवसतिगृहांच्या बाबतींत लॉर्ड कर्झनसाहेबांचें फारच लक्ष असे; व ह्या बाबतींत बरेंच पुढें पाऊल पडलें आहे. डा० गारफिल्ड वुइलियमस् यांनीं कलकत्त्याच्या विद्यार्थ्यांच्या दिनचर्येचें केलेलें वर्णन मागें देण्यांत आलें आहे, तें ज्या स्थितीचें द्योतक आहे, ती स्थिति नाहींशी होण्याच्या पंथास ह्यापूर्वींच लागली आहे, अशी उमेद आहे. बाकी, हल्लींच्या गतीनें ह्मटलें ह्मणजे, तसें होण्यास फारच कालावधि लागणार आहे. मद्रासेस **प्रेसिडेन्सी** कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरितां, तसेंच **मद्रास ख्रिश्चन** कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरितांहि मोठ्या सुंदर इमारती बांधण्यांत आल्या आहेत. मुंबई-इलाख्यांतील तीन मुख्य कॉलेजांचीं विद्यार्थिवसतिगृहें वाढविण्याकरितां सरकार पैसा खर्च करित आहे. आलहाबाद, आग्रा, लखनौ, मिरत, बरेली, लाहोर आणि दुसरीं ठिकाणें येथें जीं जुनीं वसतिगृहें आहेत, तीं वाढविण्यांत येत आहेत, किंवा नवीन बांधण्यांत येत आहेत. बंगालच्या फाळणीमुळें, ज्या मोठ-मोठ्या व लक्ष्यांत ठेवण्यासारख्या गोष्टी घडून आल्या आहेत, त्यांपैकीं पूर्वबंगालची राजधानी जें डाका–शहर तेथील नवीन कॉलेज ही एक गोष्ट आहे. खुद्द कलकत्ता–शहरांत, मिशनरी लोकांच्या संस्था खेरिजकरून, बाकी कोठें कांहींच झालेलें नाहीं, असें ह्मणतां येईल. बंगालचें मुख्य कॉलेज ह्मणजे **प्रेसिडेन्सी कॉलेज** हें सध्यां अत्यंत भरवस्तीच्या गलिच्छ ठिकाणीं बांधलेलें असल्यामुळें, त्याचा सर्वच बाजूंनीं अगदीं कोंडमारा झालेला आहे, व त्यामुळें त्यांतील सर्वांच्या प्रकृतीस मोठा अपाय होण्याचा संभव आहे. ह्मणून, हें कॉलेज हल्लींच्या जागेवरच्या

ठिकाणाहून उठवून, शहराबाहेर स्वच्छ, निरोगी जागेंत नेण्याचा बेत चालला होता. परंतु, कांहीं अंशीं खर्चाच्या भीतीमुळें व कांहीं अंशीं एतद्देशीय लोकांच्या गुळमुळीतपणामुळें, ही अत्युत्कृष्ट व निकडीची योजना बंगालसरकारनें दप्तरांत गुंडाळून बाजूस ठेवून दिली, ही गोष्ट खरोखर मनाचा मोठा निरुत्साह करणारी आहे. कलकत्त्याच्या विश्वविद्यालयांस जितक्या ह्मणून पाठशाळा (कॉलेजें) आजामितीला जोडलेल्या आहेत, त्या सर्व हल्लींच्या ठिकाणांहून साफ हालवून दुसरीकडे नेण्याची वास्तविक आवश्यकता आहे, ह्यांत संशय नाहीं. परंतु, प्रेसिडेन्सी कॉलेजपासून अशा तऱ्हेचा प्रारंभ करण्यास नाकबूल होणें ह्मणजे (फ्रेंच लोकांतील एका ह्मणीप्रमाणें,) "सर्वोत्तम ह्मणजे उत्तमाचा शत्रु होय," हें पुनः एकवार सिद्ध करून दाखविणें आहे.

विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेविषयीं ह्मटलें ह्मणजे, फक्त मद्रासचेच अलीकडील रिपोर्ट पाहिले असतां कळून येतें कीं, परीक्षा जास्त अवघड केल्यामुळें, म्याट्रिक्युलेशन होणारांची संख्या बरीच कमी झाली आहे, हें एक चांगलें लक्षण आहे. तसेंच, पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचा दर्जाहि बराच वाढला आहे. नवीन नियम अमलांत आल्यापासून काय परिणाम झाले आहेत, हें चांगल्या रीतीनें दिसून येण्यास हेच रिपोर्ट अगदीं पुरे आहेत. शाळा व कॉलेजें यांची विश्वविद्यालयाकडून होणारी तपासणी व अशा प्रकारच्या संस्था जोडून घ्यावयाच्या किंवा नाहींत, हें ठरविण्याच्या बाबतींत विश्वविद्यालयास असणारी पूर्ण स्वतंत्रता, यांचे पूर्वीपेक्षां पुष्कळच चांगले परिणाम होऊं लागले आहेत. उलटपक्षीं, विश्वविद्यालयाच्या मुख्य सभेचे (सिनेटचे) अधिकार गैरवाजवीपणानें कमी करण्यांत आले नाहींत, ह्या गोष्टीचा

अगदीं उत्तम पुरावा ह्मटला ह्मणजे, मुंबईस सर **जार्ज क्लार्क** साहेबांनीं ज्या सुधारणा सुचविल्या आहेत, त्यांना तेथल्या विश्वविद्यालयाकडून (सिनेटकडून) इतका जबरदस्त अडथळा होत आहे कीं, त्या सूचना अझूनहि अमलांत न येतां, त्यांच्या-वर मोठा कडाक्याचा वाद माजून राहिला आहे. ह्या सुधारणांच्या योजनेंतील अतिशय महत्त्वाच्या बाबी ह्मटल्या ह्मणजे, कॉलेजांतील पहिल्या वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना शास्त्रीय शिक्षण देऊन, त्यांतील प्रयोग त्यांच्या हातून करवून घेणें, शिक्षण-क्रमाच्या दोन निरनिराळ्या शाखा व्यवस्थितपणानें करणें, विद्यार्थ्यांत पूर्वींपेक्षां कांहीं अधिक पक्केपणा यावा ह्मणून एकंदर विषयांची संख्या कमी करणें आणि हिंदुस्थानच्या इतिहासाचें व राज्यव्यवस्थेचें शिक्षण सक्तीनें देणें, अशा होत्या. आणि, ह्या बाबींना ह्मणजे कोणाला मोठीशी हरकत घेतां आली असती, असें नाहीं. परंतु, सिनेटमधल्या राजकारणी मंडळीनें वादविवादाचें तोंड अगदींच बंद पाडलें.

सन १९०४ च्या सरकारी ठरावांत जी दिशा दाखविली आहे, त्या दिशेनें अद्यापि पुष्कळ गोष्टी व्हावयाच्या आहेत, व करितां येण्यासारख्याहि आहेत. राहिलेल्या सुधारणा किती त्वरेनें करितां येतील, हें कित्येक ठिकाणीं पैशावर अवलंबून राहणार, ह्यांत शंका नाहीं. उदाहरणार्थ, विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या वाढीचा प्रश्न घ्या. नैतिक व शारीरिक दृष्ट्या, शिक्षणावर ज्या कांहीं गोष्टींचा अत्यंत अनिष्ट परिणाम घडून येतो, त्या नाहींशा करण्याकरितां ही सुधारणा फारच आवश्यक आहे. परंतु, ती सर्वस्वी पैशावर अवलंबून आहे. त्याचप्रमाणें, विद्यालयांत यूरोपियन व

एतद्देशीय लोकांची आणखी भरती होणें फार जरूर आहे; पण हीहि गोष्ट पैशाशिवाय होणें नाहीं. अशा मोठ्या महत्त्वाच्या धंद्याला कांहीं अंशीं शोभण्यासारखा पगार दिल्याशिवाय, उत्तम हिंदीलोक मिळणें फार कठीण आहे. आणि, पोट बांधून नोकरी करावयास लागणाऱ्या शिक्षकांच्या वाजवी गाऱ्हाण्यांची दाद लागेपर्यंत, आमच्या शाळा व कॉलेजें ह्या राजद्रोहाचे रोपे तयार करण्याच्या सध्यां जशा जागा आहेत, तशाच राहणार. आणि, नोकरीची एकंदर स्थिति सुधारल्यामुळें, जरी पुढें चांगले लोक मिळूं लागले, तरी अर्धेकच्चे शिकून तयार झालेले व शाळाखात्यांत घाईघाईनें लावलेले जे हजारों नालायक मास्तर सध्यां शाळांतून शिकवित आहेत, ते जाऊन त्यांच्या जागेवर चांगले लोक येण्यास खरोखर फार काळ लागणार आहे. हिंदी शिक्षक तयार करण्याकरितां, हल्लींपेक्षां अधिक व चांगल्या ट्रेनिंग कॉलेजांची आवश्यकता आहे, तरी एवढ्यानेंच सर्व संपलें, असें मात्र नाहीं. अलीगड येथें मुसलमान लोकांचें जें मोठें कॉलेज आहे, त्याची गणना हिंदुस्थानांतील अति—उत्तम शिक्षणसंस्थांमध्यें होते, ह्याचें कारण, कांहीं अंशीं, तेथें सर्व विद्यार्थ्यांच्या राहण्याची चांगली सोय केलेली आहे, हें होय. ह्या कॉलेजापासून जो अतिशय फायदा झाला आहे, त्याचें कारण असें आहे कीं, येथील ज्या विद्यार्थ्यांस पुढें परत आल्यावर शिक्षकाचा धंदा करावयाचा असेल त्यांस, त्यांचा हिंदुस्थानांतील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर, यूरोपमधील पाश्चात्य शिक्षणपद्धतीचा अभ्यास करण्याकरितां पाठविण्यांत येत असतें. हीच पद्धत दुसरीकडे सुरू करितां येण्यासारखी आहे.

विद्याखात्यांतील यूरोपियन लोकांचा दर्जा वाढविण्याकरितां,

केवळ पगाराच्या वगैरे बाबतींतल्या सुधारणेशिवाय आणखी कांहीं गोष्टींची जरूर आहे. शिक्षकांची व तपासणी करणाऱ्या अमलदारांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पण, सर्वांत मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे, ह्या खात्यांत केवळ उदरंभरणार्थ शिक्षकाचा धंदा करणाऱ्या लोकांची भरती न करितां, ज्यांचा तो आवडीचा उद्योग आहे, असे लोक मिळविले पाहिजेत. आणि, ज्या लोकांच्या मुलांचें शिक्षण त्यांच्या हातून व्हावयाचें असेल त्यांच्याविषयीं, तसेंच ज्या सरकारची त्यांना नोकरी करावयाची असेल तें कोणत्या प्रकारचें आहे व त्याचे मार्ग काय आहेत, ह्याविषयीं चांगली माहिती त्यांना करून दिली पाहिजे. आतां, ह्या विद्याखात्याचा हल्लीं उंच दर्जाच्या मानलेल्या इतर सरकारी खात्यांशीं चांगला निकट संबंध आणल्याविना, ही गोष्ट सिद्धीस जाणें दुरापास्त आहे. हिंदी लोकांच्या खऱ्या राहणीशीं हिंदुस्थानांतील सनदी (सिव्हि-लियन) नोकरांचा (इंग्रज) जितका प्रत्यक्ष संबंध येतो, तित-का इतर इंग्रज लोकांचा येत नाहीं. आणि म्हणून, हिंदुस्थानची सनदी नोकरी (सिव्हिल सर्व्हिस) व विद्याखातें ह्यांना अगदीं अलग ठेवणारा जो मध्यें आडपडदा आहे, तो साफ काढून टाक-ण्याची कांहींतरी तजवीज झाली पाहिजे. हिंदुस्थानांतील शिक्षण-खात्यांत प्रथम नोकरी धरणाऱ्या तरुण इंग्रज गृहस्थांस, राजधा-नीच्या ठिकाणाहून दूर, जिल्ह्यांतून काम करित असणाऱ्या सिवि-लियनांच्या (कलेक्टर, जज्ज वगैरे अधिकाऱ्यांच्या) दिमतीस कांहीं दिवस द्यावें, ह्मणजे ज्या लोकांत त्यांना आपल्या नोकरीचीं वर्षें घालवावयाचीं असतात, त्यांचा स्वभाव, चालीरीती व भाषा यांचें यथार्थ ज्ञान होऊन, शिवाय हिंदी राज्यकारभार कसा चाल-तो, ह्याचीहि चांगली माहिती मिळण्याची त्यांना संधी मिळेल, व

तेणेंकरून फार फायदा होईल. हिंदुस्थानांतील शिक्षणखात्यास मुंगीचाहि रिघाव आंत होणार नाहीं अशा गच्च पेटींत घालून आजपर्यंत ठेविलें होतें. परंतु, मि. हारकोर्ट बटलरसारख्या फार हुशार व कर्तबगारीच्या सिविलियनाची शिक्षणखात्याच्या मुख्य प्रधानाच्या जागेवर जी नेमणूक झाली आहे, त्यावरून वरप्रमाणें कोंडून ठेविलेल्या ह्या खात्याची सुटका आतां केली पाहिजे, ह्या गोष्टीची जाणीव लार्ड मोर्लेसाहेबांस झाली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. येथील शिक्षणावर इंग्रज लोकांचें जसें वजन आरंभीं होतें, तसें तें पुनः बसविण्याची आह्मांस आशा वाटत नाहीं. आजमितीला हिंदुस्थानांत मुलांच्या दुय्यम प्रतीच्या शिक्षणाच्या (हायस्कुलें) १२०० शाळा आहेत. त्यांपैकीं फक्त २२० सार्वजनिक व्यवस्थेखालीं आहेत. आणि, ह्यांना प्रत्येकाला देखील एकेक इंग्लिश हेडमास्तर मिळवून देण्याची अडचण पडेल. आह्मांला जें कांहीं करितां येईल, तें हें कीं, सरकारच्या प्रत्यक्ष अमलाखालीं असणाऱ्या हायस्कुलांची संख्या वाढविण्याचें जें जुनें धोरण पुनः अलीकडे स्वीकारण्यांत आलें आहे, तेंच पुढें चालू ठेवावयाचें. आणि, अशा रीतीनें प्रत्येक जिल्ह्यांत निदान एक हायस्कुल होऊन, प्रत्येक मोठ्या शहरांत इंग्लिश हेडमास्तराच्या देखरेखीखालीं अशी एक शाळा असावी कीं, त्या भागांतील (अनेक जिल्हे मिळून झालेल्या प्रांतांतील) एकंदर हायस्कुलांस तिचा कित्ता घेतां यावा.

हल्लीं, आमच्या शाळांत व कॉलेजांत नालायक व अर्धकच्चे लोक भरत असतात, त्यांच्या येण्यास प्रतिबंध करण्याच्या उद्देशानें, उच्चप्रतीच्या शिक्षणाची फी वाढवितां येईल किंवा नाहीं, हा एक बऱ्याच त्रासाचा प्रश्न आहे. विश्वविद्यालयांतील

शिक्षणाबद्दल हल्लीं जी फी घेण्यांत येत असते, ती हिंदी लोकांच्या स्थितीच्या मानानेंहि फार थोडी आहे, असें सर्व लोक कबूल करितात. हिंदी विद्यार्थ्यांच्या, चार वर्षांच्या कॉलेजांतील शिक्षणाला कमींत कमी ६०० रुपये व जास्तींत जास्ती १६५० रुपये—ह्मणजे, दरसाल १५० रुपयांपासून ४१२॥ रुपयांपर्यंत खर्च येतो. निरनिराळ्या कॉलेजांत फक्त शिकण्याची फी दरमाहा ३ रुपयांपासून १२ रुपयांपर्यंत असते. अर्थात् कॉलेजांतील शिक्षणाप्रीत्यर्थ, फीच्या एकंदर उत्पन्नाच्या जवळ जवळ दुप्पट पैसा सरकारी तिजोरींतून खर्च करावा लागतो. तेव्हां, कांहीं थोड्या लोकांच्या फायद्याकरितां, इतक्या मोठ्या खर्चाचा बोजा करभार देणाऱ्या सर्वच हिंदी रयतेवर लादणें न्यायाचें आहे काय? शिवाय, ह्या वरील थोड्या लोकांपैकीं पुष्कळ लोकांस आपल्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च—सर्वच नसला तरी निदान त्याचा बराच हिस्सा—सोसण्याची ऐपत असलीच पाहिजे. उच्चप्रतीचें शिक्षण इतकें सवंग झाल्यानें, आपल्या बहुधा मंदबुद्धीच्या किंवा साधारण प्रतीच्या मुलांस त्यांच्या आहाराबाहेरील शिक्षण देण्याचा मोह आईबापांस पडूं देणें, हें शहाणपणाचें आहे काय? तें कसेंहि असो; पण, निदान सर्वच ठिकाणची फी साधारणपणें वाढवून जें अधिक उत्पन्न येईल, त्यांतून गरीब स्थितींतल्या, परंतु अत्यंत हुशार अशा थोड्या मुलांना नेमणुका व शिष्यवृत्त्या करून देणें अधिक चांगलें होणार नाहीं काय?

ह्यावर असा एक आक्षेप घेण्यांत येतो कीं, ज्या मानानें संपत्ति असेल त्या मानानें विद्या प्राप्त करून घ्यावी, असें ह्मणणें हिंदी लोकांच्या परंपरागत कल्पनेच्या अगदीच विरुद्ध आहे. आणि,

मला असें कळतें कीं, जेथें शिक्षणाचा एकंदर खर्च फीच्या उत्पन्नांतून बराच भागला जातो, तेथें वास्तविक शिक्षणाची स्थिति सर्वांत वाईट असल्याचें आढळून येतें. आतां, हाच युक्तिवाद दुय्यम प्रतीच्या शाळांतून फी वाढविण्यासंबंधानेंहि लढविण्यांत येत असतो. परंतु, अशा शाळांत सर्वचठिकाणीं साधारणपणें फी वाढविण्याविरुद्ध जे लोक आहेत, त्यांची एक सूचना आहे, व ती विचारांत घेण्यासारखी आहे. पुष्कळ शाळांत खालच्या वर्गांतील फीचा प्रारंभ फारच कमी—ह्मणजे दरमाहा आठ आणे—ह्याप्रमाणें होऊन, वरच्या वर्गांत तीन, चार व कित्येक ठिकाणींतर पांच रुपयांपर्यंत ती वाढविली जाते. शिक्षणाचा आरंभ अशा रीतीनें थोडक्या खर्चांत होत असल्यामुळें, दुय्यमप्रतीच्या शाळेंतील आपल्या मुलांचें शिक्षण आपल्या हातून पुरें होईल किंवा नाहीं, ह्या गोष्टीचा विचार न करितां, पुष्कळ अविचारी आईबापें आपल्या मुलांना अशा शाळांत शिकण्याकरितां पाठवित असतात. दुसरी गोष्ट अशी कीं, ह्या सवंगपणामुळें लोकांची अशीं समजूत होऊन बसते कीं, खालच्या वर्गांवर कमी पगाराचे व थोडे शिकलेलें मास्तर असले तरी चालतात. पण वास्तविक ह्मटलें, तरं मुलांचें खालच्या वर्गांत जें शिक्षण होतें, तेंच बहुधा सर्वांत महत्त्वाचें असतें. ह्या अडचणी दूर होण्यासाठीं असा एक मार्ग सुचविला जातो कीं, सर्व वर्गांची फी सारखी करावी.

शास्त्रीय शिक्षणाला, तसेंच धंदेशिक्षणाला अधिक उत्तेजन देणें अत्यंत महत्वाचें आहे, हें सांगण्याचा मला पुढें प्रसंग येणार आहे. सरकारी नोकरी व उदार धंदे (वकिलीसारखे) यांत अगोदरच मोठी गर्दी झाली आहे. आणि ह्मणूनच, निव्वळ वाङ्मयात्मक (शास्त्रीय नव्हे) असें शिक्षण मिळविण्याची जी प्रवृत्ति


तरुण हिंदी लोकांमध्यें दिसून येते, तिला आळा घालण्याची फारच आवश्यकता आहे. कारण, हें शिक्षण हल्लीं जसें मिळतें त्यापेक्षां चांगलें मिळण्याची सोय असली—ह्मणजे, हल्लीं लोक अर्धकच्चे राहतात तसें राहीनातसे झाले—तरी त्याचें चीज होण्यास पुरेशी जागा राहिलेली नाहीं. हिंदुस्थानचें पाऊल व्यापारांत व उद्योगधंद्यांत एकसारखें पुढें पडत जावें, अशी सर्व लोकांस इच्छा झाली आहे. त्यामुळें, लोकशिक्षणाचा ओघ ह्या अधिक उपयुक्त व व्यावहारिक दिशेनें वळविण्याची अति–उत्तम संधी आलेली आहे.

शिक्षणखात्यांतील लोकांचा व मुलांच्या आईबापांचा परिचय व्हावा ह्मणून, हल्लींच्यापेक्षां दुसऱ्या कांहींतरी चांगल्या योजनेची सुद्धां गरज आहे. शिक्षण ह्मणजे केवळ **पंतोजीपणा**, असें कोठेंहि असूं शकणार नाहीं; व हिंदुस्थानांत तर असें मुळींच असतां कामा नये. तथापि, असें मानण्याची मोठी बलवत्तर प्रवृत्ति लोकांत स्पष्टपणें दिसून येते. आपण एकच उदाहरण घेऊं, तें हें कीं, ठरविलेल्या अभ्यासक्रमामुळें लहान मुलांवर व प्रौढ विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा बोजा बहुधा फारच पडतो; आणि, कित्येकदां तर असें झालें आहे कीं, शिक्षणखात्यांतील अमलदारांनीं आईबापांच्या वाजवी तक्रारीं ऐकून घ्याव्या ह्मणून, इतर खात्याच्या अधिकाऱ्यांस मध्यस्थी करण्याची पाळी आली होती. आतां, ह्या व अशाच दुसऱ्या गोष्टींमध्यें मुलांच्या आईबापांची सल्लामसलत मोकळ्या मनानें घेतली असती, तर आपल्या जनकत्वाच्या नात्यानें शिक्षणखात्याच्या अमलदारांस पाठिंबा देण्यास ते लोक तयार झाले असते, असें वाटतें. खरोखर कोणत्या प्रश्नांचा विचार करावयाचा आहे, हें लोकांस

नीटरीतीनें समजून सांगण्याचा त्रास घेतला असता, तर कधींहि ताळ्यावर न येणाऱ्या राजकारणी लोकांना पुष्कळ गोष्टींत इतक्या सहजरीतीनें त्यांना फसवितां आलें नसतें.

हें अगदीं उघड आहे कीं, आज जी फार मोठी गरज आहे, ती लवचीकपणाची (प्रसंगाप्रमाणें वांकण्याच्या गुणाची) आहे. खरोखर हिंदुस्थान हा कांहीं एक देश नाहीं, तर पुष्कळ, अगदीं निरनिराळे असे देश मिळून झालेलें एक खंडच आहे. अशा खंडांतील लोकांच्या गरजा व त्यांच्या आकांक्षा फारच भिन्न भिन्न असल्या पाहिजेत. आणि ह्मणून, ओतीव लोखंडाप्रमाणें टणक, परंतु मुळींच न लवणारे, असे नियम तात्विक दृष्ट्या कितीहि उत्तम असले, तरी त्यांच्यापासून वरील सर्व लोकांचें कधींहि समाधान होणार नाहीं. हिंदुस्थानसरकारनें शिक्षणखातें निराळें करून, तें एका स्वतंत्र प्रधानाच्या ताब्यांत दिलें आहे. परंतु, ह्या व्यवस्थेमुळें अधिकारांचें केंद्रीकरण (एकाजागीं आणणें) करण्याची जी प्रवृत्ति असते, तिला जोर येणार नाहीं, अशी अगदीं मनापासून सर्वांची इच्छा असली पाहिजे. ही प्रवृत्ति ह्मणजे हिंदुस्थानांतील शिक्षणाला लागलेली मोठी कीड असून, तिचें काम अगदीं मेकॉलेसाहेबाच्या वेळेपासून चालू आहे. हे साहेबबाहादूर ह्मणजे आजपर्यंत होऊन गेलेल्या अगदींच व्यवहारशून्य व एखाद्या गोष्टीचा निव्वळ तात्विक दृष्ट्या विचार करणाऱ्या लोकांच्या वर्गापैकीं होते. हल्लीं, शिक्षणावर आमचा जो कांहीं थोडासा अमल आहे, तो सोडून देऊन आमचें मुळींच चालावयाचें नाहीं. परंतु, शिक्षण हा एक असा विषय आहे कीं, त्या-संबंधानें लोकांच्या गरजा काय आहेत, हें निरनिराळ्या ठिकाणच्या परिस्थितीप्रमाणें ठर-

वून, त्या भागविण्याचें काम प्रांतिक सरकारावरच सोंपवून द्यावें. तथापि, दुसऱ्या एका दृष्टीनें शिक्षणखात्याच्या प्रधानकीची जागा सर्वस्वी फायदेशीरच झाली पाहिजे. जर कांहीं खऱ्या व व्यापक सुधारणा करावयाच्या असतील, तर त्यांना पैसाहि बराच लागणार; आणि, साधारण अर्थानें ह्मटलें ह्मणजे हा सर्व पैसा उत्पन्न वाढविणारा खर्च नाहीं. तथापि, हा पैसा शहाणपणानें खर्च केला, तर त्यापासून जशी उत्तम फलप्राप्ति होईल, तशी दुसऱ्या कशानेंहि होणार नाहीं. मिस्टर बटलर हे कौन्सलदार—ह्मणजे खुद्द हिंदुस्थानसरकारचा एक अवयव—असल्याकारणानें, अमुक खर्च अवश्यक आहे ह्मणून तो करावा, अशी सूचना त्यांनीं केली, तर तिला हिंदुस्थानच्या सर्व शिक्षण-खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यानें (डायरेक्टर–जनरल ऑफ पब्लिक एज्युकेशन यानीं) अथवा प्रांताच्या गव्हरनरानें केलेल्या अशा प्रकारच्या सूचनेपेक्षां फारच महत्त्व दिलें पाहिजे. ह्याचें विशेष कारण असें कीं, असा हा खर्च बहुतेक हिंदुस्थानच्या मुख्य तिजोरींतून भागवावा लागण्याचा संभव आहे; केवळ प्रांताच्या तिजोरींतून नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व प्रश्नांमध्यें शिक्षणाचा प्रश्न जर आजच्या मितीला अत्यंत महत्त्वाचा व जरूरीचा असेल, तर त्याचा उलगडा करण्याकरितां जें नवीन खातें काढलें आहे, त्याची उपासमार केली असतां, जी भयंकर चूक होईल, त्याच्या तोडीची चूक होणें अशक्य आहे, असें प्रत्येकास कबूल करावें लागेल.



भाग २० वा.

धार्मिकशिक्षणाचा प्रश्न.

१९०४ च्या शिक्षणविषयक ठरावांतून अजीबात सुटलेली, परंतु फारच महत्त्वाची, अशी एक शिक्षणाची बाजू आहे. पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि आढळून न येणारी, आमची हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धति अनुभवून पाहण्यासाठीं, पाऊणशें वर्षांपूर्वीं ती जेव्हां सुरू केली, तेव्हांपासून हा प्रश्न असाच पडून राहिला आहे. असा अनुभव पाहण्याचें काम ह्मटलें ह्मणजे, मूठभर इंग्रजांच्या मदतीनें, हिंदुस्थानांतील ३० कोटी लोकांवर राज्य चालविणें, ह्याच्यापेक्षांहि दुर्घट आहे. आजपर्यंत, पुष्कळ राष्ट्रांनीं दूरदूरच्या देशांतील परक्या लोकांना जिंकून, त्यांच्यावर आपले कायदेकानू लादले असतील व शांतपणानें तेथला राज्यकारभार केला असेल. तथापि, हिंदुस्थानांत इंग्रज लोक जशा अवाढव्य प्रमाणावर ही गोष्ट करित आहेत, तशी मात्र यावत्काल कोणीं केलेली नाहीं. परक्या लोकांना आह्मींच काय ती आपली भाषा व तिच्यांतील नानाप्रकारच्या विषयांवरील ज्ञान—शास्त्रीय व वाङ्मयात्मक—देण्याचा प्रयत्न केला असून, ज्या विद्याचारसंपन्नतेमुळें ह्या लोकांना आमच्या ताब्यांत यावें लागलें, तिच्यामध्येंच त्यांना पारंगत करून, बौद्धिक दृष्ट्या आमच्या बरोबरीला आणण्याचा उद्योग चालू आहे. लोकांवर राज्य करणें व त्यांना सुशिक्षित करणें, ह्या दोन गोष्टींपैकीं दुसरी पहिलीपेक्षां

सोपी आहे, असें खास ह्मणतां येणार नाहीं. कारण, चांगल्या रीतीनें राज्य करण्यासाठीं (सुराज्य), लोकांच्या धर्मसमजुती, चालीरीती व परंपरेनें चालत आलेल्या रूढी, यांत होतां होईल-तों हात घालण्याची गरज पडत नाहीं. परंतु, चांगल्या प्रकारचें शिक्षण (सुशिक्षण) द्यावयाचें ह्मणजे, ह्या वरील सर्व गोष्टी काढून टाकून, आह्मी स्वतः जिला श्रेष्ठतर संस्कृति मानतों (आह्मी सर्वबाबतींत अधिक सुधारलेले आहों असें समजतों), तिला अनुरूप अशा बौद्धिक व नैतिक कल्पना (विचाचार) त्यांच्याबदला घालाव्या लागतात; ह्मणजे, लोकांचे जुने आचार-विचार बदलून, त्यांना अगदीं नवे ध्यावयास लावावे लागतात. ह्मणून, चांगलें राज्य ह्मणजे पूर्वीचें जें काहीं असेल, तें तसेंच राहूं देणें होय; चांगलें शिक्षण ह्मणजे, कांहीं अंशीं, पूर्वीचें जें असेल त्याचा नाश करणें—बहुतेक त्याविरुद्ध बंड करणें—असें आहे. असें असूनहि, मला वाटतें कीं, शिक्षणसंबंधाच्या ह्या अशा कठीण व नाजूक प्रश्नांकडे, हिंदुस्थानांतील राज्यकारभाराच्या प्रश्नांपेक्षां, आह्मी आजपर्यंत कमी लक्ष देत आलों आहों, व त्यांचा करावा तितका विचारहि केलेला नाहीं. कलकत्त्याच्या गेल्या वर्षाच्या पदवीदानसमारंभाच्या वेळीं, डा० अशुतोष मुकर्जी यांनीं, शिक्षणाचा उद्देश काय, ह्याबद्दल आपल्या भाषणांत फारच नामी खुलासा केला आहे. डॉक्टरसाहेब ह्मणाले कीं, "देशाच्या कल्याणाकरितां, राजनिष्ठ व सन्माननीय नागरिक तयार केले पाहिजेत." आणि, आमचाहि उद्देश खात्रीनें असाच होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु, हिंदुस्थानांतील आमच्या शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी ज्यांच्या शिरावर आहे, त्यांनीं हाच उद्देश एकसारखा आपल्या नजरेसमोर ठेविला आहे

काय? शिक्षणाच्या नैतिक व धार्मिक अंगासंबंधानें, "काय होईल तें होईल" असें जें धोरण आम्हीं ठेविलें आहे, त्याच्या योगानें वरील हेतु कधींतरीं साध्य होईल काय? आणि, "होईल" असें ह्मणावें, तर हा हेतु न साधल्याबद्दल, अंगाचा अगदीं थरकांप करून सोडणारा पुरावा पुष्कळ वेळां पुढें आला आहे, तें कसें?

धर्माची शिक्षणापासून फारकत केली असतां काय परिणाम होईल, ह्या बद्दलचा अनुभव पाहण्याचें काम अझून पाश्चिमात्य देशांत चालू आहे. ह्या देशांतील लोकांचे नैतिक विचार फारच उन्नतावस्थेला पोहोंचलेले असून, सामाजिक व नागरिक बाबतींत आपणांस जीं कर्तव्यें बजावावयाचीं असतात, तीं आपण बजावलींच पाहिजेत, अशी जाणीवहि त्यांच्यामध्यें परंपरेनें आलेली असते. आणि ह्मणून, तेथें धर्माची जागा भरून काढण्याकरितां, ह्या वरील गोष्टींवरच सारी भिस्त ठेवण्यांत येते. पूर्वेकडील बहुतेक सर्व देशांप्रमाणेंच हिंदुस्थानांतहि असा प्रकार आहे कीं, प्रत्येक व्यक्तीच्या व ती व्यक्ति ज्या समाजाची असेल त्या समाजाच्या हातून जें आचरण घडत असतें, त्याचीं प्रेरणा धर्मापासून मिळत असते. मग तो धर्म कोळ्या—कातकऱ्यांच्या झाडाझुडपांच्या व दगडधोंडयांच्या पूजेच्या रूपानें असो, मोठ्या विद्वान् ब्राह्मणाचा "अखिल जग ईश्वररूप आहे" असा वेदांत असो, अथवा पुराणप्रिय मुसलमानांचा कडक एकेश्वरी पंथ असो. तात्पर्य, हिंदी लोकांच्या एकंदर जीवनक्रमाचा धर्म हा केवळ पाया आहे. आणि, पाश्चिमात्य तऱ्हेचें शिक्षण मिळालेले अगदीं थोडे लोक वगळले, ह्मणजे धर्माशिवाय नीतीचें अस्तित्व असूं शकेल, अशी को-

णाच्या स्वप्नींहि गोष्ट येत नाहीं. आणि ह्मणूनच, हिंदी लोकांच्या मनांत धर्माव्यतिरिक्त नीतीच्या कल्पना भरविण्याचा प्रयत्न कोणीं केला असला, अथवा पुढें कोणी करील, तर त्याला निःसंशय अपेश आल्याशिवाय राहणार नाहीं. इतर कोणत्याहि धर्मांतील लोकांपेक्षां बहुधा हिंदूंमध्यें, मनुष्याचे जन्मल्यापासून तों अगदीं मरणापर्यंतचे सर्व संस्कार धर्मप्रणीत पद्धतीनेंच व्हावे लागतात. वस्तुतः, त्याचा जन्म आणि मृत्यु ह्या दोन्ही गोष्टी एका मोठया सांखळीचे दुवे असून, धर्माच्या योगानें त्या परस्परांस अशा जखडून टाकलेल्या असतात कीं; त्यांचा सांधा प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला देखील उकलतां येणार नाहीं. त्यांचा धर्म ह्मटला ह्मणजे बहुतकरून मंत्रतंत्र, नेमधर्म, व्रतेंवैकल्यें, धर्मसंस्कार इत्यादिकांनींच भरलेला असून, त्यामुळें उच्च तऱ्हेच्या आध्यात्मिक उन्नतीस मात्र बाध येतो, असें आपणांस (इंग्रजांस) वाटण्याचा संभव आहे. परंतु, असा ग्रह होणें हा मुख्यत्वेंकरून आमच्या कोत्या समजुतीचा परिणाम जरी नसला, तरी त्यांच्या आयुष्यक्रमांतील प्रत्येक साधी गोष्ट हें एक धार्मिककृत्य असतें—ह्मणजे त्यांच्या सर्व नित्य-नैमित्तिक कृत्यांस धर्माचा आधार असतो—ह्या एकाच गोष्टीवरून त्यांचें सर्व जीवित धर्मांत कसें अगदीं गुरफटून गेलें असतें, हें दिसून येतें. त्यांचा जन्म देखील ज्या जातींत होतो, त्या जाती पूर्वजन्मीं त्यांच्या हातून ज्याप्रमाणें धर्माचरण घडलें असेल, त्यावरूनच ठरल्या जातात, अशीहि त्यांची समजूत असते. ते ज्या जगामध्यें जन्मास येतात, ल्हानाचे थोर होतात व आपली संसारयात्रा संपवितात, त्यापैकीं जो भाग केवळ इंद्रियांना भ्रम नसेल, तो सर्व त्या सर्व व्यापी परमेश्वराचें स्वरूप

आहे, अशी त्यांची भावना असते; व अशा परमेश्वराची हजारों प्रकारांनीं ते उपासना करितात. खंडोबा, बहिरोबा, मरीआईच्या पूजेअर्चेपासून तों उपनिषत्-प्रणीत ईश्वरविषयक उदात्त कल्पनापर्यंत त्यांची मजल जाते.

आणि, ज्या देशांत धर्माचें एवढें माहात्म्य आहे, त्या देशांतील लोकांच्या शिक्षणामधून धर्माला आह्मीं अगदीं आरंभापासून अर्धचंद्र दाखविला आहे. आतां, हें खरें आहे कीं, हिंदुस्थानसारख्या नानाविध धर्मांच्या व पंथांच्या देशांत, हिंदी आईबापांना मान्य होईल अशा तऱ्हेचें धर्मशिक्षण देण्याची गोष्ट सरकाराला निःसंशय हातीं घेतां येत नाहीं. आणि, पुष्कळ वेळां तर असें असतें कीं, ह्या भिन्न भिन्न धर्मांची व पंथाची मतें केवळ आमच्या (इंग्रजांच्या) धर्मालाच नव्हे, तर नीतीलाहि अगदीं सोडून असतात. तथापि, अशा शिक्षणास आमच्या शाळांतून व कॉलेजांतून अगदींच हुसकवून लावणें जरूर होतें कीं काय? त्यामुळें, आह्मीं धर्माच्या बाबतींत अगदीं तटस्थ वृत्ति स्वीकारिली आहे, असा जो टेंभा आह्मी मिरवित असतों, तें निव्वळ ढोंग आहे; तसेंच, ख्रिस्ती धर्माच्या मतांचा प्रसार हिंदी लोकांमध्यें करण्याकडे, शिक्षणाचा उपयोग न होऊं देण्याबद्दल सरकारनें कितीजरी खबरदारी घेतली, तरी नवीन तरुण पिढीची आपल्या वाडवडीलांपासून चालत आलेल्या धर्मावरील श्रद्धा उडविण्याकडे त्याचा (शिक्षणाचा) सरकार उपयोग करित आहे, असा पुष्कळ हिंदी लोकांचा ग्रह होण्यास वरील बहिष्कार कारणीभूत झाला नाहीं काय? आतां, आह्मी असें मुद्दाम बुद्धिपुरःसर करितों, असें जरी त्यांचें ह्मणणें नसलें, तरी आमच्या शिक्षणाचा तसा परिणाम बहुधा घडून येतो, असें निदान

ह्मणण्यास त्यांना अधिकार पोहोंचत नाहीं काय? पाश्चिमात्य शिक्षणास इकडे सुरवात झाल्यानंतर, हिंदुधर्मांतील सर्व परंपरागत चालीरीती व धर्मसमजुतीविरुद्ध एक प्रारंभीं बंड उठलें होतें; व त्यामुळेंच, आतां जेवढें ह्मणून **पाश्चिमात्य** असेल, त्याविरुद्ध उलटून पडण्याची प्रवृत्ति सर्व लोकांमध्यें दिसून येत आहे, ती उत्पन्न होण्यास साह्य झालें नाहीं वरील गोष्टीमुळें आणि, काय? हीच प्रतिक्रियात्मक लोकमताची लाट हल्लींच्या अस्वस्थतेच्या मुळाशीं आहे.

हिंदुस्थानसारख्या देशावर राज्य करण्यांत किती भयंकर बिकट अडचणी असतात, ह्याचा उत्कृष्ट प्रत्यय जसा वरील गोष्टीनें येतो, तसा दुसऱ्या कशानेंहि येत नाहीं. एका पक्षीं, हिंदुलोकांच्या धर्मसमजुती, इंग्रजलोकांच्या राज्यामुळें ज्या कांहीं गोष्टी सुचविल्या जातात त्यांच्याशीं **पांढऱ्या—काळया** प्रमाणें उलट असल्यामुळें, त्या समजुतींना मुद्दाम पाठिंबा देऊन त्यांचें संरक्षण करितां येत नाहीं, अथवा त्यांचा प्रसारहि करितां येत नाहीं. उलट पक्षीं, ह्या वरील धर्मसमजुतींपासून सर्व हिंदीसमाज एकत्र बांधून ठेवण्यास लागणारीं बंधनें प्राप्त होतात; आणि, जर कां तीं घाईघाईनें ढिलीं करून टाकिलीं, तर राज्यशकटास मोठा अपाय होईल इतकेंच नाहीं, तर त्यापासून त्याला मोठा धोकाहि येणार आहे. आणि, गेल्या थोड्याशा वर्षांत ज्या गोष्टी घडून आल्या आहेत, त्यांवरून वरील गोष्टीची खात्री अगदीं वरवर पाहणाऱ्याच्याहि मनाला पटली आहे. आणि, अकस्मात् वीज चमकून अंधक प्रकाश पडला असतां, समोंवतालच्या वस्तूंचें जसें ज्ञान होतें, तसेंच वरील गोष्टींमुळें, आमच्या शाळा व कॉलेजें नैतिक दृष्ट्या कशी निकृष्टावस्थेला पोहोंचली आहेत;

ह्याचें ज्ञान झालें. ह्या गोष्टींच्या कार्यकारणभावाविषयीं जर एखाद्या इंग्रज गृहस्थाला शंका असेल, तर राजकारणांत न पडणाऱ्या कोणत्याहि संभावित हिंदी पालकाला त्यानें विचारून पाहावें. ह्या शिक्षणपद्धतीमुळें, मुलांच्या ठिकाणची आपल्या आईबापांविषयींची आदरबुद्धि व पूज्यभाव नष्ट होत चालला आहे, अशा प्रकारच्या त्यांच्या तक्रारी आज पुष्कळ वर्षे ऐकूं येत आहेत. ह्या शिक्षणपद्धतीमुळें, मुलांच्या बुद्धीचा विकास होऊन, त्यांना उपयुक्त असें ऐहिक ज्ञान प्राप्तहि होत असेल. परंतु, ह्याच शिक्षणपद्धतीमुळें, तरुण मुलांना आपल्या आईबापांच्या अथवा गुरूच्या प्रत्यक्ष देखरेखीखालून दूर व्हावें लागतें, व त्याचमुळें आपल्या स्वतःच्या हिंदुधर्माला व त्यांतील आचाराविचारांना तीं अगदीं परकीं होऊन जातात. हिंदुलोकांच्या जुन्या शिक्षणपद्धतीप्रमाणें ह्मटलें ह्मणजे, धार्मिक बाबतींत गुरु हाच पित्याच्या ठिकाणीं विद्यार्थ्यांना असे, व त्याच्याच देखरेखीखालीं त्यांचें सर्व शिक्षण होत असे. पुष्कळ लोक आपल्या मुलांना सरकारी शाळांत न घालितां, मिशनरी लोकांच्या शाळांत घालितात; आणि, अशा शाळांत जरी मुलांकडून धर्मांतर करविण्याचा प्रयत्न होत नसला, तरी तेथें धर्मशिक्षण—ख्रिस्ती धर्माचें कां होईना—देऊन, कांहीं अंशीं मुलांना धार्मिक वातावरणांत ठेविलें जातें. ह्यावरूनच असें सिद्ध होतें कीं, आमच्या शाळांतून व कॉलेजांतून धर्मशिक्षणांस अजीबात गचांडी दिली आहे, ह्या गोष्टीबद्दल आईबापांना खरोखरच राग येत असतो. आणि, "राष्ट्रीय शाळा" काढण्याची जी नवीन चळवळ सुरू झाली आहे, तिचे पुरस्कर्ते सरकारी मदतीपासून व विश्वविद्यालयास आपल्या शाळा जोडण्यापासून

होणाऱ्या फायद्याची अपेक्षा न ठेवितां, सरकारचा ताबा मुळींच नसलेल्या शाळा उघडण्याचें धोरण स्वीकारण्याविषयीं लोकांस आग्रह करितात, त्याचें तरी कारण हेंच. मुख्यतः, अशा शाळा **जहाल** पक्षाच्या राजकारणी लोकांच्या आश्रयानें चालल्या आहेत. आणि, पुष्कळ वेळां, त्या शाळा ह्मणजे राजद्रोहाचें केवळ आगरच असें आढळून आलें आहे. परंतु, हिंदु आई-बापांना हिंदु मुलें हिंदुपद्धतीनें वाढविण्याचा हक्क आहे, असा त्या शाळांचा मुख्य उद्देश असल्याबद्दल सांगण्यांत येतें.

आतां, हिंदी राजकारणरूपी समुद्राच्या अगदीं पैलतिरीं असणारे लोक ह्मणजे राजेरजवाडे. हिंदुस्थानांत राजद्रोहाचा फैलाव होत आहे, त्यासंबंधानें आपलें मत काय आहे, तें कळविण्याविषयीं ह्या मंडळीला लॉर्डमिंटोसाहेबांनीं विनंती केली होती. तेव्हां, पुष्कळ संस्थानिकांनीं आपल्या उत्तरांत शिक्षणाच्या ह्या अंगाविषयीं जोरानें उल्लेख केला होता. त्यांतल्या त्यांत, विशेषेंकरून, हिंदू राजांनीं धार्मिक व नैतिक शिक्षणाच्या हेळसांडीवर फार जोर दिला होता. अत्यंत सच्छील व मोठे अनुभविक ह्या दृष्टीनें सर्वांनाच पूज्य असलेले हिंदु-राजे, जयपूरचे महाराज, यांचेंच फक्त मत मी खालीं देतों:—

धार्मिक शिक्षणाच्या कामीं जी हयगय दिसून येते, त्यासंबंधानें माझा दुसरा मुद्दा आहे. व ता० २९ आक्टोबर सन १९०९ सालीं, जयपुरांत जो सरकारी खाना झाला, त्यावेळीं मीं हाच मुद्दा लाटसाहेबांच्या ध्यानीं आणून दिला होता. मी असें ह्मणणार कीं, ज्या शिक्षणपद्धतींत प्रापंचिक व धार्मिक अशा दोन्ही तऱ्हेच्या शिक्षणाची उत्तम रीतीनें सांगड घालून दिलेली असते, त्यावरच माझा सर्वथैव विश्वास आहे. कां कीं, धर्माचा खालीं पाया असला म्हणजेच तोवर मनुष्याच्या शीलाची इमारत सर्वथैव उठते. आणि, माझी अगदीं अंतःकरणापासून अशी आशा आहे कीं, आमच्या धर्मग्रंथांतील सत्य

व उत्कृष्ट कल्पना तरुण पिढींतील लोकांच्यापुढें मांडल्या, म्हणजे त्यायोगानें ते साम्राज्याचे एकनिष्ठ व कर्तव्यदक्ष असे नागरिक बनतील. तरुण लोकांच्या मनावर कोणत्याहि गोष्टीचा लवकर ठसा उमटतो. म्हणून, ह्या लोकांवर अशा कल्पनांचा परिणाम खात्रीनें झालाच पाहिजे. आणि, एकंदरींत राजद्रोहाचें व अराजकतेचें बीं देशी संस्थानांत फारसें रुजलेलें दिसत नाहीं, ह्याचें तरी कारण अशा प्रकारच्या उदात्त कल्पना पुढें असणें असें कदाचित् असावें. १९०८ सालीं, मेयो कॉलेजांत राजकुमारांच्या कॉलेजांचें सम्मेलन झालें होतें. त्यावेळीं, रजपुतान्यांतील सरदारांच्या व राजेलोकांच्या मुलांना धार्मिक शिक्षण देण्याची किती आवश्यकता आहे, हें माझ्या मित्रांच्या मनांत मीं चांगल्या रीतीनें भरवून दिलें होतें. आणि, आपल्या स्वतःच्या समाजासंबंधीं आपलीं कर्तव्यें काय, व आपण आपल्या बादशाहाशीं कोणत्या रीतीनें वागलें पाहिजे, ह्याविषयींच्या अगदीं बरोबर कल्पना आपल्या हाताखालील शिष्यमंडळीच्या मनांत भरवून देणें, हाच सर्व शाळांतील पंडितांचा व मौलवींचा मुख्य उद्देश असला पाहिजे

ब्रिटिश हिंदुस्थानांतील व तसेंच देशी संस्थानांतील उच्च वर्गाच्या हिंदी लोकांचीं ह्या बाबतींत जशीं मतें आहेत, तशींच ह्या राजेरजवाड्यांचीं आहेत, ह्याबद्दल प्रश्न नाहीं. आणि, हिंदुस्थानसरकारला त्यांचा अनादर करून चालावयाचेंहि नाहीं. सन १९०४ च्या सरकारी ठरावांत, "सरकारी शाळांतून केवळ प्रापंचिक शिक्षण दिलें जातें व तें तसेंच पुढें देत गेलें पाहिजे," असें पुनः एकवार निक्षून सांगण्यांत आलें आहे, हें खरें आहे. परंतु, आमच्या शिक्षण--पद्धतीमुळें जीं अरिष्टें उत्पन्न झालीं आहेत, तीं निदर्शनास आणून देणाऱ्या पुष्कळ गोष्टी १९०४ पासून आतांपर्यंत घडल्या आहेत. आणि, त्यांच्या प्रतिकारार्थ जे उपाय करण्याचें आमच्या हातांत आहे, त्यांपैकीं एकाचा उपयोग करण्याबद्दल, शांत व विचारशील अशा जबाबदार हिंदी पुढाऱ्यांनीं वरचेवर सरकारास अर्जद्वारा विनंति केली आहे, त्यालाहि वरील गोष्टीमुळें पुष्टि मिळते. खरोखर

ह्मटलें तर, धर्माच्या बाबतींत आह्मीं जें फार काळापासून तटस्थ-वृत्तीचें धोरण स्वीकारिलें आहे, त्यालाहि हरताळ लावण्याची आह्मांस गरज नाहीं. आह्मांला जें कांहीं करावें लागेल, तें एवढेंच कीं, आमच्या शाळांतील व कॉलेजांतील शिक्षणक्रमांत धार्मिक शिक्षणासाठीं ह्मणून कांहीं तास आह्मीं निराळे काढून ठेवावेत ; आणि, कांहीं विशेष अटींवर, मुलांच्या आईबापांच्या इच्छेप्रमाणें, त्या त्या धर्माचें शिक्षण ह्या ठरीव वेळांत मुलांना घेण्याची मोकळीक असावी. ह्या बाबतींत सक्ती करण्याचें मुळींच कारण नाहीं. स्थानिक सरकारला ज्या बाबतींत अतिशय स्वातंत्र्य देतां येण्यासारखें असतें, त्यांच-पैकीं ही एक खरोखर बाब आहे. कारण, भिन्न भिन्न जातींच्या व लोकसमूहांच्या इच्छा व विचार कसे असतात, हें हिंदुस्थानसरकारपेक्षां प्रांतिक सरकारांस चांगल्या तऱ्हेनें माहीत असतें. मुलांच्या आई-बापांना धार्मिक शिक्षणाची इतकी प्रबळ इच्छा आहे किंवा नाहीं, व तशी असल्यास तें कोणत्या धोरणानें देतां येईल, हें ठरविण्या-करितां स्थानिक कमेट्या स्थापन करण्यांत अडचण येणार नाहीं, असें मला खात्रीपूर्वक सांगण्यांत आलें आहे. आतां, सरकारला त्यांच्यावर कांहीं तरी देखरेख ठेवावी लागेल, हें खरें आहे. परंतु, अवश्य तेवढी देखरेख करण्याच्या कामास लागतील, इतके निरनिराळ्या धर्मांचे, सुशिक्षित व कर्तबगार लोक आमच्या शिक्षण-खात्यांत सांपडतील, व आपल्या लोकांचें पारमार्थिक हित साधण्यासाठीं लागणारी सहानुभूति बाळगून, ज्या सरकारचे ते नोकर असतील, त्याच्याशीं राजनिष्ठेनें वागून वरील काम करतील, अशी आशा करण्यास हरकत नाहीं. यावर, कोणी असा आक्षेप घेतील कीं, हिंदुस्थानामध्यें इतके, परस्परविरोधी

धर्मपंथ आहेत, व इतक्या जाती व पोटजाती आहेत, कीं धर्माचें शिक्षण अमुक एका पद्धतीनें द्यावें, अशाबद्दल सर्वांचें एकमत होणें, ही गोष्ट कालत्रयींहि घडावयाची नाहीं. आतां, ही अडचण आह्मी कबूल करितों; परंतु, तिला भलतेंच महत्त्व देतां उपयोगी नाहीं. हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रमुख धर्माच्या बुडाशीं अशीं कांहीं ठोकळ तत्त्वें सांपडतील कीं, तीं त्या त्या धर्मांतील सर्व पोटपंथांच्या लोकांस पूर्ण मान्य असतील. उदाहरणार्थ, सर्व पंथांच्या मुसलमानांकरितां कुराणांतून व उच्च जातींतील बहुतेक हिंदूंकरितां त्यांच्या शास्त्रांतून वचनें घेऊन, धर्मशिक्षण देण्याची व्यवस्था करितां येईल. निदान इतकी गोष्ट खरी कीं, ह्या दिशेनें प्रयत्न करूनहि, आमचा कांहीं दोष नसतांना, केवळ हिंदी लोकांना आपल्या मुलांच्या धर्मशिक्षणाची सोय आपापसांतील धर्मसंबंधी मतभेदामुळें करितां न आल्याकारणानें, जर तो प्रयत्न फसला, तर धर्मशिक्षणाच्या बाबतींत त्यांना ह्यापुढें आह्मांला जबाबदार धरितां येणार नाहीं.

दुसरी एक हरकत कदाचित श्रद्धाळु ख्रिस्ती लोकांकडून येण्याचा संभव आहे. हे लोक असें ह्मणतील कीं, जीं धर्ममतें ख्रिस्ती सरकाराला मुळींच मान्य नाहींत, त्यासंबंधानें शिक्षण देण्याच्या सोयी सरकार करून देऊं लागलें, तर त्याविरुद्ध ओरड करणें आह्मांस भाग आहे, अशी आमची मनोदेवता आह्मांस सांगते. त्यांच्यांतील कांहीं कट्टे धर्माभिमानी लोक असेंहि ह्मणण्यास चुकणार नाहींत कीं, "असा खोटानाटा धर्म" शिकविण्याची गोष्ट सहन करण्यापेक्षां, हिंदी मुलांना मुळींच धर्मशिक्षण न दिलेलें पुरवलें. तथापि, अशा प्रकारच्या टीकेला हिंदुस्थानसरकार आजदेखील पात्र आहे. कांहीं विशिष्ट

धर्मपंथांच्या लोकांनीं, आपल्या मुलांच्या धर्मशिक्षणाची सोय करण्याकरितां, मुद्दाम शिक्षणसंस्था काढून, त्या चालविल्या आहेत. आणि, त्यांतील कांहीं संस्था तर—अलीगडच्या महॉमेडन कॉलेजसारख्या—फारच उत्तम आहेत. असें असूनहि, **चांगले** मुसलमान अथवा **चांगले** हिंदू निपजावेत, अशा धोरणानें ह्या संस्थांतून शिक्षण दिलें जातें, इतक्याच मुद्यावर सरकारनें त्या मान्य केल्या नाहींत, अथवा त्यांना मदत दिली नाहीं, असें मुळींच नाहीं. तरमग, ज्या दुसऱ्या शाळा, सर्वांशीं अथवा मुख्यतः, खासगी लोकांच्या प्रयत्नानें चालल्या नाहींत, त्यांतून वाटल्यास धर्मशिक्षण देण्याची सोय करण्यास परवानगी दिली असतां, काय बिघडणार आहे? जयपुरचे महाराज ह्मणतात त्याप्रमाणें, प्रापंचिक व धार्मिक शिक्षणांची ‘ उत्तम ’ सांगड घालून देण्यापासून, हल्लींच्या आमच्या “ होईल तसें होईल ” ह्या धोरणापेक्षां, हिंदी लोकांच्या धर्मसंबंधाच्या कल्पनांची सुधारणा होऊन, त्यांना चांगलें, शुद्ध स्वरूप प्राप्त होण्याचा अधिक संभव नाहीं काय? त्याचप्रमाणें, पाश्चिमात्य आचारविचारांचा तरुण लोकांच्या मनावर पगडा बसूं लागल्यामुळें, त्यांच्याविरुद्ध आज जें बंड उठलें आहे तें उठण्यापूर्वीं, पौर्वात्य व पाश्चिमात्य लोकांचीं ध्येयें जवळ जवळ आणण्याची प्रवृत्ति उत्तमोत्तम विचारांच्या हिंदी लोकांत दिसून येत होती, तीच गोष्ट साध्य करून घेतां येणार नाहीं काय?

खरोखर, हिंदी लोकांचा मुख्य जीवनहेतु ह्या प्रश्नामध्येंच असून, “ हिंदी लोकांच्या कल्पनांप्रमाणें राज्य करा,” असें वाजवी रीतीनें आह्मा राज्यकर्त्यांस कोणासहि सांगतां येईल. “ मनुष्याचें शील बनण्यास मुख्य आधारस्तंभ ” ह्मणून

गोष्ट हिंदी आईबापांस आवश्यक वाटते, तिचा तरुण हिंदी लोकांना आह्मीं फायदा मिळूं दिला नाहीं, तरी ते उत्तम राजनिष्ठ नागरिक निपजतील, अशी अपेक्षा आपणांस धरितां येईल काय? आमच्या शाळांत व कॉलेजांत नीतिभ्रष्टतेचा पाय शिरण्याच्या मुख्य कारणांपैकीं हें एक आहे, असें इतके जबाबदार हिंदी लोक समजतात, तिकडे आपणास डोळेझांक करितां येईल काय? आपल्या शिष्यवर्गाला असंतोषरूपी विषाची बाधा होऊं नये, अशी खबरदारी घेण्याच्या कामीं, सरकारास हिंदी शिक्षकांकडून निष्ठापूर्वक मदत पुष्कळ प्रकारांनीं सत्तेनें करून घेतां येईल, ह्यांत संशय नाहीं. उदाहरणार्थ, सरकाराला असें ह्मणतां येईल कीं, ज्या शाळांतून राजद्रोह भरला आहे असें दिसून येईल, त्यांतून ह्यापुढें कोणासहि सरकारी नोकरींत घेतलें जाणार नाहीं. तसेंच, तरुण मुलांनीं गुन्हे केले असतां, त्यांचीं मनें बिघडविण्यास ज्यांची मदत झाली असेल, त्या सर्वांसच सरकारला अशा गुन्ह्यांबद्दल जबाबदार धरितां येईल; व हा उपाय कित्येक हिंदी लोकांनीं सुचविलेलाहि आहे. परंतु, हे सर्व जालीम उपाय आहेत; आणि, ज्या तत्वांच्या पायावर हिंदीलोकांच्या नीतिविषयक कल्पनांची उभारणी झालेली आहे, त्या तत्वांचें शिक्षण देण्याची हयगय केल्याचा अथवा तीच मुळापासून ढांसळून पाडण्याचा दोषारोप—मग हा अपराध आमच्या हातून कितीहि नकळत झालेला असला तरी—जोंपर्यंत आमच्या शिक्षणपद्धतीवर करितां येईल, तोंपर्यंत असे जालीम उपाय अमलांत आणण्यास आमची मनोदेवता आह्मांस खास सांगणार नाहीं. आणि, अलीकडेच घडलेल्या गोष्टींचा पुरावा लक्ष्यांत घेतला असतां, हा आरोप सर्वस्वी निराधार आहे, असें कधींहि

ह्मणतां यावयाचें नाहीं. ह्मणून, जोंपर्यंत ह्या दोषारोपाचें निराकरण करण्याच्या तजविजी आह्मी करीत नाहीं, तोंपर्यंत शिक्षणाचा खरा हेतु सफळ होण्याची आशा आह्मांस करितां येईल काय? शिक्षणाचा खरा हेतु ह्मटला ह्मणजे, डा० मुकरजी वाजवी रीतीनें ह्मणतात त्याप्रमाणें, "देशाच्या हिताकरितां राजनिष्ठ व सन्माननीय असे नागरिक तयार करणें," असा आहे.



भाग २१ वा.

प्राथमिक शिक्षण.



हिंदुस्थानांतील आमच्या शिक्षणपद्धतीच्या बाबतींत, "आधीं कळस आणि मग पाया" अशा प्रकारचें धोरण स्वीकारून व प्राथमिक शिक्षणाची उपासमार करून, दुय्यम प्रतीच्या शिक्षणासाठीं आह्मीं आपलें इतकें सामर्थ्य व पैसा खर्च केला, ही गोष्ट शहाणपणाची झाली किंवा कसें, ह्याचा आतां खल करित बसण्याची वेळ केव्हांच निघून गेली आहे. ह्या पद्धतीपासून खरोखर असा मात्र परिणाम झाला आहे कीं, हिंदी समाजांतील भिन्न भिन्न जातींत व वर्गांत जो भेदभाव अगोदरच होता, तो आतां पुष्कळ वाढला आहे. शिवाय, ज्या लोकांच्या बुद्धीवर पाश्चिमात्य शिक्षणाचें लुकण—मग तें कितीहि कां पातळ असेना—चढलें आहे, अशा लोकांनाच फक्त वाचा फुटून, हिंदीलोकांचें हित कशांत आहे व त्यांच्या आकांक्षा काय आहेत, हें सांगण्याची पात्रता ह्याच लोकांना आहे, असें समजलें जातें. पण, वास्तविक पाहतां, हिंदी लोकांचें खरें पुढारीपण यांच्याकडे येण्यास, त्यांचें समाजांत जितकें वजन असावयास पाहिजे तितकें बहुधा नसतें. ज्यांनीं इंग्रजी भाषेचें थोडेंसें ज्ञान संपादन करून, तें कायम राखलें आहे, असे लोक सर्व हिंदुस्थानांत, फार झालेतर, दाहा लाख निघतील. गेल्या खानेसुमारीच्या (१९०१) आंकड्यावरून असें दिसतें कीं, एकंदर २९ कोटी ४० लक्ष लोकसंख्येमध्यें,

कोणत्याहि भाषेंत लिहितां–वाचतां येणारांची संख्या १ कोट ६० लक्षांपेक्षां कमीच आहे; व ह्या लोकांत दीड कोटीपेक्षां कमी पुरुष असून, स्त्रियांची संख्या १० लाखापेक्षांहि कमीच आहे. शिवाय, ही अल्पशी साक्षरता (लिहितांवाचतां येणें) मुख्यत्वेंकरून कांहीं थोड्या विशिष्ट जातींमध्येंच आढळून येते.

हिंदुस्थानांतील इंग्रजी राजसत्ता उलथून पाडण्याच्या हेतूनें प्रेरित झालेल्या हिंदी राजकारणी लोकांची संख्या इकडे वाढत चालली आहे. आणि, तिकडे तर, बहुधा कल्पना होत नाहीं अशा रीतीनें, हिंदी जनता अज्ञानसागरांत अद्यापिहि अगदीं मग्न होऊन राहिलेली आहे. आणि त्यामुळें, सध्याला खरोखरच मोठा धोका आहे. कारण, राजकीय चळवळ्यांनीं सरकारविषयीं उठविलेल्या खोट्यानाट्या कंड्यांचें व त्यांच्यावर घेतलेल्या तोहमतींचें बीं पडल्याबरोबर तें धारण करण्यास उत्कृष्ट अशी मनोभूमि तयार असते, असा चांगलाच अनुभव येऊन चुकला आहे. हे चळवळे दुसऱ्या लोकांस सरकाराविषयीं ज्या गप्पा सांगतात, त्यांवर स्वतः विश्वास ठेवण्याइतके मूर्ख ते नसतात. परंतु, सरकारवर कोणत्या तऱ्हेचे आळे घेतले असतां व कशा प्रकारच्या खोट्या कंड्या पिकविल्या असतां, त्या आपल्या अडाणी व भोळ्या देशबांधवांस बहुतकरून पटतील, हें त्यांना अगदीं बरोबर माहीत असतें. विहिरींत विष टाकून सरकार प्लेगच्या सांथीचा फैलाव करितें; तसेंच, प्लेगचा प्रतिबंध करण्याकरितां जी लस टोंचतात, त्यांत पुरुषत्व नाहींशीं करणारीं औषधें घालून, जन्मसंख्या कमी करितात. ह्या व अशासारख्याच गप्पांचा जो चोहोंकडे अगदीं सुकाळ झाला आहे व ज्यांवर लोकांचा विश्वासहि फार बसतो, त्यांस विशेषतः

उद्देशून मी लिहित आहें. ह्या संबंधानें लॉर्ड कर्झनसाहेबांनीं ज़ितक्या जोराचे उद्गार काढले आहेत, तसे कोणींहि काढलेले नाहींत:—

हिंदुस्थानांत सर्वांत मोठा धोका कशापासून आहे? संशय, भोळे-पणा, दंगेधोपे, गुन्हे—होय असेंच, शेतकरी लोकांमधील बराचसा असंतोष व एकंदर लोकांचें पुष्कळसें दुःख, ह्यांचें मूळ कशांत आहे? तर **अज्ञानांत.** आणि अज्ञानाला फक्त मारक काय? तर **ज्ञान.**

आणि, आश्चर्याची गोष्ट अशी कीं, लॉर्ड कर्झन साहेबांचा अतिशय राग करणाऱ्या त्यांच्या एका प्रतिपक्षीयानें, अलीकडेच्याच एका वादविवादाच्या प्रसंगीं, त्यांच्या ह्या वरील मताला पुष्टि दिली. त्या गृहस्थांनीं अशी गोष्ट सांगितली कीं, कांहीं वर्षांपूर्वीं, हुगळीनदीवर **चिनसुरा** पूल बांधण्याचें काम चाललें होतें, त्यावेळीं "लोकांची अशी पक्की समजूत झाली होती कीं, जलदेवतेनें संतुष्ट होऊन, पुलाचें काम कायम राहूं द्यावें ह्मणून, शेंकडों, हजारों लोकांस बळी देण्यांत येत असे; व त्यांचीं शिरें कांपून, तीं पुलाच्या कमानीखालच्या भिंतींच्या पायांत चिणण्याकरितां नदीवर पाठविलीं जात. पुढें आणखी त्यांनीं असें सांगितलें:— "मला माहीत आहे कीं, अडाणी लोक रात्रीं घराबाहेर पडण्यास भीत असत. कारण कीं, न जाणो, कोणी आपणास पकडून, आपलें डोकें तोडील व हुगळी नदीवरील पुलाच्या कमानीखालीं तें गाडून टाकील."

तथापि, प्राथमिक शिक्षण मोफत व जबरीचें करण्याच्या उद्देशानें, व तसेंच ह्या संबंधानें कांहीं निखालस सूचना करण्याकरितां, लवकरच एक कमेटी नेमण्याच्या हेतूनें, गेल्या हिंवाळ्यांत वरिष्ठ कौन्सिलाच्या पहिल्या बैठकीच्या वेळीं, कलकत्त्यास ना-

गोखले यांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून, जो ठराव पुढें आणला, त्याचीं कारणें ह्याहिपेक्षां सामान्य स्वरूपाचीं होतीं.

[त्यांचें ह्मणणें असें कीं,] जनसमूहाच्या शिक्षणाला (प्राथमिक) सरकारच्या कर्तव्यामध्यें जें स्थान आज मिळालें आहे, त्याचें श्रेय तीन प्रकारच्या चळवळींना दिलें पाहिजे. पहिली चळवळ **भूतदयात्मक** होय; व तिच्यामुळेंच तुरंगांची स्थिति सुधारली आणि गुलामांचें दास्यविमोचन झालें. दुसरी चळवळ ह्मटली ह्मणजे **लोकसत्तात्मक** होय. हिच्यामुळेंच पुष्कळ लोकांना राज्यकारभारांत वांटा मिळाला. आणि, तिसरी चळवळ **औद्योगिक** होय. हिच्यायोगानें एका गोष्टीची राष्ट्रांना ओंळख पटली ती अशी कीं, सर्व देशभर शिक्षणाचा प्रसार झाला ह्मणजे— मग त्याची मजल लिहिण्यावाचण्यापलीकडें गेली नसली तरी— कामकऱ्याच्या अंगची कर्तबगारी वाढली, असा त्याचा अर्थ होतो.

ह्यांपैकीं शेवटच्या गोष्टीसच हिंदुस्थानांतील नेमस्त मतांचे लोक बहुधा आतां अत्यंत महत्त्व देत असतील. कारण, हिंदुस्थानांत उद्योगधंद्यांची व व्यापाराची वृद्धि झाली पाहिजे, अशी सर्व लोकांची एकसारखी ओरड मोठ्या जोरानें चालू आहे. आणि ह्मणूनच, मि. गोखल्यांच्या ठरावास, कौन्सिलांतील त्यांचे मुसलमानबंधु व त्याचप्रमाणें हिंदु सभासद, ह्या सर्वांकडूनच पाठिंबा मिळाला. परंतु, आपण असें पक्कें जाणून असलें पाहिजे कीं, असंतोषरूपी राहूनें ग्रासलेल्या राजकारणी लोकांच्या मनांत दुसराच एक हेतु असून, तो ते उघडपणें बोलून दाखवित नाहींत. ह्या लोकांना अशी आशा आहे कीं, दुय्यम प्रतीच्या शाळांच्या अस्तित्वामुळें राजद्रोहाचा फैलाव करण्यास जसें सोपें गेलें, तसेंच प्राथमिक शिक्षणाच्या शाळा वाढल्या ह्मणजेहि करितां येईल. आणि, विशेषतः, हा हेतु "निराश्रित वर्गांतील" लोकांमध्येंहि साध्य करून घेतां येईल.

आजपर्यंत ह्या लोकांमध्यें राजकीय चळवळ्यांची डाळ मुळींच शिजली नाहीं ह्मटलें तरी चालेल.

आतां, त्या दिशेनें कांहीं जरी धोका येण्याचा संभव असला, तरी त्याचा परिणाम सरकारच्या धोरणावर होऊं देतां कामा नये. कारण, मि. गोखल्यांच्या ठरावाला सरकारनें इतकी सहानुभूति दाखविली आहे कीं, त्यामुळें ते आपला ठराव तूर्त मागें घेण्यास तयार झाले. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याचें तत्व हिंदुस्थानसरकारनें पूर्वींच मान्य केलें आहे, व त्या दिशेनें आणखी प्रयत्न करण्याची शिफारस, १८५४ च्या शिक्षणविषयक खलित्यांत व तशीच १८८३ च्या शिक्षणाच्या कमिशनच्या रिपोर्टांत, अशा दोन्ही ठिकाणीं केलेली आढळून येईल. लॉर्ड कर्झन साहेबांच्या कारकिर्दींतील १९०४ सालच्या सरकारी ठरावांत, ह्या गोष्टीवर तसाच जोर देण्यांत आला होता, व त्यानीं अगोदरच, १९०२ मध्यें, ह्याच कामासाठीं प्रांतिक सरकारांना अधिक मदत देण्याकरितां, जवळजवळ ४० लाख रुपयांची जादा मंजुरी दिली होती. लॉर्ड मिंटोसाहेबांच्या कारकिर्दींत तर एका वेळीं सरकारची मजल ह्याच्याहि पुढें जाऊन, निदान पक्षीं फुकट शिक्षण देण्याचें तत्व त्यानीं कबूल केलें होतें, असें दिसतें. कारण, १९०७ सालीं, सरकारच्या फडणविसानीं भर कौन्सिलांत स्टेटसेक्रेटरींकडून आलेला खात्रीचा संदेश सांगितला कीं, "एखादी योग्य मसलत तयार होऊन, ती कौन्सिलांत पास करून घेण्यांत आल्यास, अंदाजपत्रकांत त्याबद्दल व्यवस्था केलेली नसली, तरी चालू वर्षांत तिची अमलबजावणी करूं देण्यास आपण तयार आहों. मात्र पैशाची तजवीज करितां येण्यासारखी असली पाहिजे." आतां, योग्य वेळ येण्या-

पूर्वीच, अशा प्रकारची आशा लोकांना लावण्यांत आली, हें कांहीं अंशीं अनिष्ट होतें. आणि, अशा प्रकारें, निश्चयात्मक सांगून टाकल्यावर, स्थानिक सरकारांचा सल्ला विचारण्यांत आला, तो अगोदरच विचारण्यांत आला असता, तर तें खरोखर शहाणपणाचें झालें असतें. कां, कीं, त्यांचा सल्ला मागण्यांत आला, तेव्हां त्यांचें मत---विशेषतः फी अगदींच माफ करून टाकण्यासंबंधानें---बहुतेक प्रतिकूलच होतें. आणि, यंदासुद्धां, ह्या बाबतींत सरकारनें आपली सदिच्छा प्रगट केली आहे. परंतु, ह्या प्रश्नाचा चांगल्या रीतीनें खल होईपर्यंत व पैशासंबंधानें सरकारच्या खजिन्याची स्थिति सुधारेपर्यंत, वरील प्रश्न लांबणीवर टाकणें वाजवी आहे, असें सरकारास वाटलें.

सध्यांची स्थिति खात्रीनें असमाधानकारक आहे. सन १८८२ मध्यें, विद्याखात्यानें मान्य केलेल्या अशा ८५००० प्राथमिक शिक्षणाच्या शाळा सर्व हिंदुस्थानांत असून, त्यांत सुमारें २०,००,००० मुलांना लिहिण्यावाचण्याचें शिक्षण देण्यांत येत असे. गेल्या पंचवार्षिक रिपोर्टाप्रमाणें, १९०७ सालीं, शिकणाऱ्या मुलांची एकंदर संख्या ३६,३१,००० पर्यंत वाढली होती; परंतु, ही वाढ जरी बरीच मोठी आहे, असें दिसतें, तरी विद्याखात्याच्या अगदीं वरिष्ठ अधिकाऱ्यास (डायरेक्टर-जनरलांस) ही गोष्ट कबूल करावी लागली कीं, सध्यांप्रमाणेंच पुढेंहि प्रगति होत जाईल असें जरी मानलें, तरी "शाळेंत जाण्याइतकीं मोठीं झालेलीं सर्व मुलें शाळेंत जाऊं लागतील, अशी स्थिति येण्यास अझून कैक पिढ्या गेल्या पाहिजेत." आणि, मि. गोखल्यांचा ठराव, आज नाहीं तरी शेवटीं, मुलांप्रमाणेंच मुलींनाहि लागू व्हावयाचा आहे. आतां, देशी संस्थानें सोडून

फक्त ब्रिटिश हिंदुस्थानचीच गोष्ट घेतली तरी, हिंदुस्थानांतील मुलांसाठीं चार वर्षांचा अभ्यासक्रम ठरविलेल्या व्यवस्थेप्रमाणें, शाळेंत जाण्यास योग्य झालेले मुलगे सुमारें एक कोटी वीस लक्ष निघतील; व मुलींचीहि संख्या अजमासें तितकीच असली पाहिजे. आतां, स्थानिक सरकारांच्या अंदाजाप्रमाणें पाहूं गेल्यास, इतक्या मुलांना शिक्षण देण्यास २२।२३ कोटी रुपयांपेक्षां सरकारास कमी खर्च येणार नाहीं. शिवाय, पुनः पुनः उपस्थित न होणाऱ्या खर्चांच्या रकमांचा एकंदर आंकडा २७ कोट रुपयांचा होईल. आतां, आईबापांकडून फीच्या रूपानें येणाऱ्या प्राथमिक शिक्षणाचें वार्षिक उत्पन्न सध्यां केवळ ३१।३२ लाख रुपयेच कायतें होतें. हिंदुस्थानच्या कांहीं भागांत, व कांहीं विशेष परिस्थितींत, आजमितीलाहि प्राथमिक शिक्षण अगदीं मोफत देण्यांत येत असतें. म्हणून, ह्या भयंकर दिसणाऱ्या सर्व तुटीचा बोजा कर देणाऱ्या सर्वच हिंदी-लोकांच्या डोक्यावर बसणार आहे. सध्यां, त्यांना प्राथमिक शिक्षणाकरितां दरसाल ९८ लाख रुपयांहून कमीच रकमेची तजवीज करावी लागते. मि. गोखल्यांचेंदेखील म्हणणें असें नाहीं कीं, शिक्षणाच्या व सार्वजनिक पैशाच्या बाबतींतील अशी क्रांति लेखणीच्या एका फरगट्यासरशीं घडवून आणावी. आणि, त्यांच्याच बरोबरीच्या दुसऱ्या एका हिंदु नामदाराचेंहि मत असें होतें कीं, आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं वाजवी फी देण्याचें सामर्थ्य असतांना, आईबापांनीं नादारीचा फायदा घेणें, ही गोष्ट हिंदुलोकांच्या पूर्वापार चालत आलेल्या वहिवाटीस विरुद्ध होईल.

परंतु, एवढा अवाढव्य खर्च अंगावर घेण्यासारखी हिंदु-

स्थानच्या खजिन्याची स्थिति कांहीं एक काळानें होईल, असा जरी संभव असला, अथवा एका बाजूनें आयात मालावरील जकात शेंकडा पांच आहे ती साडेसात करून व नवीन कर बसवून, आणि दुसऱ्या बाजूनें सर्वच खात्यांतील खर्चाचें मान होईल तितकें कमी करून, हा खर्च भागविण्याची मि. गोखले यांची सूचना जरी सरकारला मान्य करितां आली असती, तरी पैशाच्या बाबतींतली अडचण एवढेंच ह्या मार्गांतलें विघ्न आहे, असें नाहीं. भरपूर पैसा हातीं आला असतां, हल्लींच्या भिकार शाळागृहांच्या ठिकाणीं नमुनेदार शाळागृहें निःसंशय बांधतां येतील. नुसत्या मुंबईइलाख्याचेंच उदाहरण घेतलें, तरी तेथल्या शाळागृहांची सोय इतकी कमी आहे कीं, आपल्या मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याची आईबापांची तयारी असतांहि, त्यांना तें मिळत नाहीं, असे मुलगे एक लक्ष आहेत, असें ह्मणतात. परंतु, शिक्षकांची काय व्यवस्था करणार? सरकार कोट्यावधी रुपये खर्च करावयास जरी तयार झालें, तरी यक्षिणीची कांडी फिरविल्याप्रमाणें, पाहिजेत तितके शिक्षक उत्पन्न करितां येणार नाहींत. चांगल्या शाळागृहांपेक्षां चांगल्या मास्तरांचीच उणीव मोठी आहे; आणि, कांहीं अंशीं, प्राथमिक शिक्षणाची किंमत दुय्यम प्रतीच्या शिक्षणापेक्षांहि चांगल्या शिक्षकांवर अवलंबून आहे. चांगले शिक्षक ह्मटले ह्मणजे, ते जो विषय शिकवित असतात, त्याची फोड करून त्यांना दुसऱ्यांस सांगतां येतें. स्वतःलाच जें अर्धवट कळलें असतें, तेंच केवळ अर्धवट रीतीनें आपल्या विद्यार्थ्यांस, तोंडानें पुनः पुनः तीच ती बडबड करित, ते सांगत बसत नाहींत. प्राथमिक शिक्षणाचें काम करित असलेल्या

एकंदर शिक्षकांची संख्या एक लाखावर आहे; परंतु, त्यांना दरमाहा सरासरी आठ रुपयेहि पगार मिळत नाहीं. इतका भिकार पगार पाहिला ह्मणजे, मास्तर लोकांच्या नालायकीचा चांगलाच उलगडा होतो. पण, अशी स्थिति आहे; आणि, शाळेस जाण्याचें वय असणाऱ्या लक्षावधि हिंदी मुलांना फायदेशीर रीतीनें प्राथमिक शिक्षण लाभण्यापूर्वी, जवळ जवळ पांच लक्ष शिक्षकांची नवीन फौज तयार केली पाहिजे. मग तें शिक्षण, ना. गोखले ह्मणतात तसें, **मोफत व सक्तीचें** असो, अथवा इतर कित्येक लोक सुचवितात त्याप्रमाणें, **मर्जीप्रमाणें व फी देऊन** असो.

इतर सर्व बाबतींतल्याप्रमाणें ह्याहि बाबतींत, हिंदुस्थान-सरकारला हातपाय जोडून आतां स्वस्थ बसतां येणार नाहीं; आणि, हिंदी लोकांच्या मताचा दिवसेंदिवस अधिकाधिक विचार करावा लागेल. परंतु, सरकारनें प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत आणखी कांहींतरी केलें पाहिजे, असें जरी सर्वसाधारण मत आहे तरी तें शिक्षण मोफत व सक्तीचें करावें, अशाविषयीं लोकांचें एकमत नाहीं. निरनिराळ्या हिंदी कौन्सलदारांनीं निरनिराळ्या मुद्यांवर त्याच्याविरुद्ध मत दिलें आहे. कांहींचें ह्मणणें असें पडतें कीं, कुटुंबासाठीं अन्नवस्त्र मिळविण्याच्या कामांत पुष्कळ आईबापांना आपल्या मुलांची मदत पाहिजे असल्यामुळें, त्यांना शाळेंत पाठवून त्यांचें चालावयाचें नाहीं. कित्येक असें ह्मणतात कीं, शाळेंत जाणारीं मुलें पुढें शेतकामाला निरुपयोगी होतात, व शेतांत राबणें आपल्यासारख्यांना शोभत नाहीं, असें समजूं लागतात, अशी आईबापांची अगोदरपासूनच मोठी तक्रार आहे. आणि, कांहीं लोकतर असा प्रश्न करितात कीं, ज्या

मुलांना शाळेंत जाण्याकरितां आपलें घर सोडावें लागेल व आपल्या आईबापांच्या देखरेखीखालून दूर व्हावें लागेल, त्यांची अशा लहान वयांत कोण काळजी घेणार? व असें विचारणें कांहीं अंशीं रास्तहि दिसतें. ह्या सर्व हरकतींमध्यें कांहीं तथ्य आहे, ह्यांत संशय नाहीं. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याच्या कामीं, सरकारनें आजपर्यंत जें कांहीं केलें आहे, त्यापेक्षां अधिक त्यांस करितां येईल, असें जर गृहीत धरलें, तर शिकलेल्या लोकांची नुसती संख्या वाढविण्यापेक्षां, शिक्षणच जरा अधिक चांगलें करणें, व सर्वांत अगोदर शिक्षकांची लायकी वाढविणें, हा शहाणपणाचा मार्ग होईल. येथें पुनः ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, सर्वत्र एकसारखाच प्रकार सुरू करण्यापेक्षां, तो टाळणें बरें. शहरांतील व खेड्यांतील अशा दोन्ही ठिकाणच्या मुलांना सारखाच उपयोगी पडेल, असा प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम मुळींच आंखतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें, हवा, स्वभाव वगैरे बाबतींत हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतील लोकांची स्थिति भिन्न भिन्न असल्याकारणानेंहि वरील गोष्ट साध्य होणें नाहीं. दुय्यम प्रतीच्या शिक्षणापेक्षां प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींतच आईबापांच्या गरजा काय आहेत, तें त्यांना विचारून घेतलें पाहिजे. आणि त्याचप्रमाणें, ठिकठिकाणच्या गरजांचा विचार करून, व्यावहारिक दृष्ट्या शिक्षणपद्धतींत फेरफार करण्याची मोकळीक देववेल तितकी प्रांतिक सरकारास दिली पाहिजे. त्याचप्रमाणें, अशा लहान मुलांच्या शिक्षणक्रमांतून धार्मिक शिक्षणास अजीबात फांटा देणें सुरक्षितपणाचें होणार नाहीं, असें जें कित्येक आईबापांचें अगदीं ठाम मत आहे, तिकडेहि दुर्लक्ष करितां

यावयाचें नाहीं. हिंदुस्थानच्या एकंदर विद्याखात्याचे मुख्याधिकारी ऑरेंज साहेब यानीं कांहीं विशेष लक्ष्यांत घेण्यासारखे मुद्दे फार चांगल्या रीतीनें सांगितले आहेतः—

आमची अशी इच्छा आहे कीं, प्रत्येक खेड्यांत जरी नसली, तरी प्रत्येक खेड्यांतील लोकांना आपलीं मुलें सहज पाठवितां येतील, अशा तऱ्हेच्या शाळा जागजागीं स्थापन झाल्याचें आमच्या दृष्टीस पडावें. शिवाय, ह्या शाळा **विदेशी** असूं नयेत; तर खरोखरच त्या **खेड्याच्या शाळा**––अगदीं आपल्याच शाळा––आहेत, असें लोकांस वाटलें पाहिजे, व त्यांविषयीं त्यांच्या ठिकाणीं अभिमानहि उत्पन्न झाला पाहिजे. आणि, पुरुष व स्त्रिया ह्या उभयतांनाहि शिक्षण देऊन, त्यांना सुशील व सुविचारी करून, चांगले नागरिक तयार करावयाचे, असा ह्या शाळांचा मुख्य उद्देश असला पाहिजे; व दुसरा उद्देश म्हटला म्हणजे, त्यांना उपयुक्त ज्ञानाची जोड करून द्यावयाची. पण त्याचवेळीं, त्यांच्या हातांना व डोळ्यांनाहि शिक्षण मिळालें पाहिजे, ह्या गोष्टीची आपणास विस्मृति होतां कामा नये. ह्यांत हेतु इतकाच कीं, मुलांनीं शाळा सोडल्यानंतर, त्यांना शेतकाम करावयाचें असो, किंवा कळाकुसरीचें असो, त्यांत अगदीं बिनचूकपणानें निरीक्षण करण्याची किंमत त्यांना कळूं लागावी, व सुबुद्धपणानें व अगदीं बरोबर रीतीनें हातकाम केल्यापासून त्यांच्या मनाला मोठा आल्हाद वाटूं लागावा.

प्राथमिक शिक्षणाचा असा अंतिम हेतु असल्याकारणानें, त्याची त्या धोरणानें व्यवस्था केली पाहिजे, ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. परंतु, कैक वर्षे स्थिरपणानें व सतत श्रम केले, तरच हा हेतु साध्य होणार आहे. नाहींतर, दुय्यम प्रतीच्या शिक्षणाच्या बाबतींत जसें "वरातीमागून घोडें" आलें, तसाच प्रकार ह्या कामांतहि होऊन, अतिघाई करणें म्हणजे अतिमंद गतीनें चालणें, असा पुनः, फार उशीरा, आपणांस अनुभव येईल.

स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाचा विचार करण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं; मग तें प्राथमिक असो वा दुय्यम प्रतीचें असो.

कारण, त्याचा हिंदी लोकांच्या—विशेषतः हिंदुलोकांच्या विशिष्ट चालीरीतींशीं इतका निकट संबंध आहे कीं, एतद्देशीय लोकांच्या मनांत भीति उत्पन्न न होऊं देतां व त्यांना विमुख न करितां, ह्या बाबतींत सरकारनें जोरानें पुढाकार घेणें, ही गोष्ट दूरापास्त आहे, व त्यांत मोठा धोकाहि आहे. हिंदी लोकांच्या सामाजिक चालीरीती व त्यांच्यांतील बालविवाहाची पद्धत, अथवा निदान फार लवकर पडदानशीन होणें, ह्या गोष्टींमुळें मुलींच्या शिक्षणाच्या बाबतींत मोठ्या अडचणी व्यवहारांत उत्पन्न होतात, तशा मुलांच्या बाबतींत नसतात. आणि ह्मणूनच, स्त्रीशिक्षणाचें पाऊल फार मंदगतीनें पडत आहे. गेल्या (१९०१) खानेसुमारीवरून असें दिसून येतें कीं, दर हजारीं फक्त आठ स्त्रियांनाच कायतें लिहितांवाचतां येत होतें; आणि, एकंदर हिंदुस्थानांत सुमारें पांच लक्ष मुलींनाच केवळ कांहीं थोडें शिक्षण मिळत होतें. आतां, चारच वर्षांचा जरी शिक्षणक्रम घेतला, तरी देखील हें प्रमाण ह्मणजे, शाळेंत जाण्यास योग्य असलेल्या मुलींपैकीं शेंकडा चार असेंच पडतें. शाळेंत जाणाऱ्या दहा मुलींत नऊ फक्त प्राथमिक शाळांत जातात. मुलांप्रमाणेंच मुलींचें शिक्षण सक्तीचें करण्याची कल्पना खुद्द मि. गोखल्यानीं देखील सोडून दिली आहे. स्त्रीशिक्षणाचा प्रश्नच असा आहे कीं, त्यासंबंधानें हिंदी लोकांचे विचार आपोआप परिपक्व होऊं दिले पाहिजेत; व सरकारचें काम ह्मटलें ह्मणजे, त्यांचे विचार ह्या बाबतींत जसजसे प्रगल्भ होत जातील, तसतशी ज्या मदतीची त्यांना वाजवीरीतीनें अपेक्षा असेल, ती सरकारनें त्यांना देत जावी. सुज्ञ हिंदीलोकांचें लक्ष ह्या गोष्टीकडे फार दिवसांपासून लागून राहिलें

आहे; आणि, कित्येक समाजांत, विशेषतः पंजाबांतील आर्य-लोकांत, ह्या बाबतींत कांहीं प्रगतिहि झाली आहे. शिक्षणाच्या व लोकहिताच्या सर्वच कामांत पारशीलोकांनीं अर्थात् सर्वांच्या अगोदर आघाडी मारली आहे. पाश्चिमात्य शिक्षणाची एकसारखी वाढ होत असल्यामुळें, उच्च वर्गांतील हिंदी स्त्रियांना आतां बेसुमार मागें रेंगाळत राहून चालणार नाहीं. आणि, आपल्या मुली केवळ लग्नाकरितांच पूर्वींपेक्षां चांगल्या तयार करावयाच्या ह्मटल्या तरी, अगदीं जुन्यास चिकटून राहूं पाहणाऱ्या आई-बापांना देखील त्यांना शिक्षण देणें भाग होईल; व कांहींनीं ह्याप्रमाणें पूर्वींच आरंभहि केला आहे. कारण कीं, ज्यांच्या-शीं त्यांची जन्माची गांठ पडावयाची असून, संसाराचा गाडा चालविण्याच्या कामीं ज्यांचा वांटेकरी व्हावयाचें असतें, त्यांच्या व ह्यांच्या विद्वत्तेंत जमीनआसमानाचें अंतर पडून आतां भागा-वयाचें नाहीं. कलकत्ता, मुंबई, मद्रास व हिंदुस्थानांतील इतर मुख्य मुख्य शहरांतूनसुद्धां, विद्येनें अलंकृत झालेल्या व सुधा-रलेल्या अशा हिंदु व मुसलमान स्त्रिया हल्लींदेखील दृष्टीस पडतात. आतां, ह्यांची संख्या जरी अगदीं थोडी असली, तरी जुन्यापुराण्या चालीरीतींची जड बिडी तुटून, हिंदी स्त्रियां-ची एकदां कां सुटका झाली, ह्मणजे त्यांना कोणत्या पदाला जाऊन पोहोंचतां येतें, ह्याचीं तीं देदीप्यमान उदाहरणें होत.



भाग २२ वा.

स्वदेशी चळवळ आणि सांपत्तिक प्रगति.

आपल्या विचारांस कपटरूप देतां यावें, ह्मणून मनुष्यास वाणी दिली आहे, असें टॅलीरँड यानेंच ह्मटलें आहे नाहीं काय? हिंदी राजकारणी लोक टॅलीरँड नाहींत हें खरें; परंतु, राजकीय बाबतींतले आपले विचार व आपल्या कल्पना प्रसिद्धपणें मांडण्याची त्यांच्यापैकीं पुष्कळांना आज छाती होत नाहीं, ते विचार व त्या कल्पना बोलून दाखवितांना, त्यांचें वास्तविक स्वरूप झांकलें जाईल, अशा प्रकारची शब्दयोजना त्यांनीं मुद्दाम तयार करून ठेविली आहे, असें दिसतें. **स्वराज्य** ह्या शब्दाचा अर्थ "स्वतःचा राज्यकारभार करणें", अथवा "स्वतःची सत्ता स्थापन करणें," असा दोन्ही तऱ्हेनें कसा करण्यांत येतो,—ह्मणजे त्यामध्यें लवचीकपणा कसा ठेविला आहे— हें आह्मीं पूर्वींच दाखवून दिलें आहे. साम्राज्यांतील वसाहतींस (यूरोपियन लोकांच्या) स्वतःचा अंतस्थ कारभार करण्याचा पूर्ण हक्क असल्यामुळें, साम्राज्यांत त्यांना जें स्थान मिळतें, तेंच सद्धेतुपूर्वक प्राप्त करून घेण्याची आमची आकांक्षाच फक्त आह्मी **स्वराज्य** ह्या शब्दानें दर्शवित असतों, असें हिंदी राष्ट्रीय सभेच्या **नेमस्त** पक्षांतील लोकांचें आह्मांस खात्रीपूर्वक सांगणें आहे. पण, **जहाल** पक्षांतील राजकारणी

लोकांच्या मतें, **स्वराज्य** शब्दाचा अर्थ **मधली स्थिति** असा असून, आजमितीस हिंदुस्थान ज्या बंधनांनीं साम्राज्यास जोडलें गेलें आहे, तीं अशा **स्थितीमुळेंच** शेवटीं खात्रीनें तुटून जाऊन, हिंदुस्थान साम्राज्यापासून अगदीं अलग होईल, अशी त्यांना आशा आहे व ह्याप्रमाणें गोष्टी घडूनहि येतील, असा त्यांचा पुरा समज आहे. आणि, **क्रांतिकारक** लोकांच्या मतें, **स्वराज्य** शब्दाचा अर्थ, ब्रिटिश अमलापासून हिंदुस्थानची ताबडतोब, दंगाधोपा करून मुक्तता करणें व त्याला पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देणें, असाच आहे. **स्वदेशी** ह्या शब्दाचाहि असाच प्रकार आहे. हिंदुस्थानांतील व्यापारधंद्यांस अगदीं कायदेशीरपणानें व स्तुत्य मार्गानें उत्तेजन देण्यापासून तों तहत हरएक परदेशी वस्तूस—आणि विशेषतः ब्रिटिश मालास—निखालस मज्जाव करून व त्यावर **राष्ट्रीय** व बहुधा सक्तीचा **बहिष्कार** घालून, अशा चळवळीस राजकीय स्वरूप आणून, तिचा उपयोग इंग्रजी अमलाविरुद्ध करण्यापर्यंतच्या सर्व गोष्टी **स्वदेशी** शब्दाच्या बकासुरी पोटांत येत असतात.

हिंदुस्थानास आमचे (इंग्रजांचे) पाय लागण्यापूर्वीं, येथें चोहोंकडे **रामराज्य** असून ऋद्धिसिद्धी पाणी भरीत होत्या, व इंग्रजी राज्यानें येथील संपत्ति बुद्धिपूर्वक पार धुवून नेण्याचा सपाटा लाविला आहे, या **राष्ट्रीय** पक्षाच्या स्वकपोलकल्पित कथानकावर राजकीय **स्वदेशीच्या** नाटकाची रचना झालेली आहे. आतां, कंपनी सरकारच्या जुन्या व्यापारी धोरणामुळें व ब्रिटिश लोकांच्या उद्योगधंद्यांचे कारखाने व्यवस्थित रीतीनें व शास्त्रीय पद्धतीनें चालत असल्याकारणानें, त्यांच्यांशीं भयंकर चढाओढ करावी लागल्यामुळें, हिंदुस्थानांतील मूळच्या उद्योग-

धंद्यांची फारच हानि झाली, ही गोष्ट जरी आह्मांस कबूल करावी लागली, तरी वरील कल्पित कादंबरीचा गंभीरपणानें विचार करण्यासारखा सत्याचा भाग त्यांत कांहीं नाहीं.

हिंदुस्थानकरितां जें कर्ज इंग्लंडांत काढावें लागलें, "त्याच्या व्याजाची रक्कम हिंदुस्थानास भरावी लागते, व ती सर्व इंग्रज सावकारांच्या खिशांत उतरत असते, त्यामुळें ती रक्कम ज्यांच्याकडून वसूल होते, त्यांचा तिच्यापासून कांहींएक फायदा होत नाहीं, तर ती एक हिंदुस्थानच्या संपत्तीस कायमची, जबरदस्त ओहटी लागली आहे," असा आरोप ब्रिटिश राज्यावर मि. केर हार्डी यानीं आणिल्यामुळें, वरील कल्पित कथानकाच्या खुळसटपणाची खरोखर आतां शिकस्त झाली ह्मणावयाची. ह्या ह्मणण्यांत जो अलोट शहाणपणा भरला आहे, तिकडे स्वराज्यसुखाचा अनुभव घेणाऱ्या आमच्या वसाहतींनीं लक्ष पुरवावें, अशी फक्त माझी शिफारस आहे. कारण, आपल्या देशांतील संपत्ति प्राप्त करून घेण्याकरितां जे उद्योगधंदे करावयास पाहिजे होते, ते सुरू करण्याकरितां लागणारें भांडवल त्यांना इंग्रज सावकारांकडूनच कर्जाऊ घेण्याची पाळी येऊन, त्या भांडवलाचें व्याजहि त्यांना इंग्लंडास द्यावें लागलें. परंतु, अशा रीतीनें दिलेल्या पैशामुळें, आपल्या संपत्तीस "जबरदस्त ओहटी" लागली आहे, ह्या गोष्टीची खबर त्यांच्या गांवींनांवींहि नव्हती, असें दिसतें. ह्या काल्पनिक "**द्रव्यशोषा**"चा हिशेब निरनिराळ्या प्रकारांनीं करण्यांत येत असतो. परंतु, सामान्यपणें ठरवलेला मार्ग ह्मटला ह्मणजे, आयात मालापेक्षां निर्गत मालाची किंमत अधिक असते, ह्याच गोष्टीवर सर्व जोर द्यावयाचा. अर्थशास्त्रदृष्ट्या, ही कसोटी

अगदीं चुकीची आहे, असें लॉर्ड कर्झनसाहेबांनीं अगदीं बरोबर रीतीनें दाखवून दिलें आहे. जगांतील अत्यंत श्रीमंत अशा अमेरिका देशांत, आयात मालाच्या किंमतीपेक्षां निर्गत मालाची किंमत दरसाल दीड अब्ज रुपयांहून अधिक असते. वर सांगितलेल्या "द्रव्यशोषा"पैकीं $\frac{3}{4}$ भाग विलायतसरकारच्या खर्चास (होम च्यार्जेस) जातो. ही रक्कम दरसाल सुमारें २७ कोट रुपये असते. ह्यांतील जवळ जवळ १० कोट रुपये हिंदुस्थानांतील रेलवेंत गुंतलेल्या इंग्रजी भांडवलावरचें व्याज असतें. परंतु, रेलवे ह्मणजे एक मोठ्या किफायतीचें कलम असून, सदरील व्याजाची रक्कमहि रेलवेंतून प्रवास करणाऱ्या लोकांपासून उत्पन्न होते. खेरीज, हे प्रचंड किंमतीचे लोखंडी रस्ते कालांतरानें सरकारच्याच मालकीचे व्हावयाचे आहेत, व कांहीं आतां तसे होऊंहि लागले आहेत. दुसरी दरसाल भरावी लागणारी ४$\frac{1}{2}$ कोट रुपयांची बाब ह्मटली ह्मणजे, हिंदुस्थानसरकारास काढाव्या लागलेल्या सार्वजनिक कर्जावरील व्याजाची होय. परंतु, ह्या कर्ज काढलेल्या पैशांतून केलेल्या खर्चामुळें उत्पन्नाच्या बाबी वाढून, हिंदुस्थानचा केवढा मोठा फायदा झाला आहे, हीहि गोष्ट त्याचबरोबर लक्ष्यांत ठेविली पाहिजे. फक्त कालवे व पाटबंधारे यांपासूनच झालेल्या, रयतेच्या उत्पन्नाच्या वाढीचा अगदीं कमींत कमी अंदाज केला, तरी तो दरसाल ४५ कोटी रुपयांचा होईल, असें सर बामफिल्ड फुल्लरसाहेबांनीं दाखवून दिलें आहे. गेल्या ५० वर्षांत, हिंदुस्थानचा एकंदर आयात व निर्गत व्यापार ६० कोटींवरून ३ अब्ज रुपयांवर गेला आहे. बाकी राहिलेल्या खर्चाच्या बाबी स्थूलमानानें ह्मटल्या ह्मणजे, साम्राज्याच्या सै-

न्याचा खर्च ३ कोट रुपये; खुद्द विलायतसरकारचा (इंडिया आफीसचा) वगैरे खर्च ३७½ लाख रुपये; विलायतेंत रजेवर असलेल्या कामगारांचा पगार रु० १ कोटी १२½ लक्ष; व पेनशनाबद्दल रु० ६ कोट. ह्या पेनशनच्या रकमेंतीलहि बराच भाग केवळ झालेल्या नोकरीबद्दल देणें असलेल्या पगाराचाच असतो. शिवाय, दुसरी गोष्ट अशी आहे कीं, इतर कित्येक देशांत, बहुतेक निष्कारणच, ह्मणजे कोणत्याहि तऱ्हेचा हक्क नसतांहि, पेनशनें द्यावीं लागतात, तशी कांहीं हिंदुस्थानची स्थिति नाहीं. उदाहरणार्थ, अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत, अशा विनाकारण दिलेल्या पेनशनची रक्कम ४८ कोट रुपये असते. पण, हिंदुस्थाननें वरप्रमाणें दिलेल्या पेनशनाबद्दल, अगदीं भरपूर व केव्हांकेव्हांतर अधिकच किंमतीची नोकरी त्याच्या पदरांत पडत असते. ह्या वर नमूद केलेल्या बाबींखेरीज, नोकरी, व्यापार वगैरे निमित्तानें, हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांकडून खासगी रीतीनें विलायतेंत पैसा पाठविला जातो, त्याचाहि समावेश एकंदर रकमेंतच होत असतो. आतां, ह्या शेवटल्या रीतीनें परदेशीं जाणारा पैसा ह्मणजे **सांपत्तिक हानि,** असें इतर कोणत्याहि देशांत समजत नाहींत. आयर्लंड, इटाली व इतर यूरोपांतील देश येथून अमेरिकेंत राहण्यास गेलेल्या लोकांकडून दरसाल पैशाचे ढीगच्याढीग त्यांच्या मातृदेशांत रवाना होत असतात, अथवा, यूरोपमध्यें मौजेखातर प्रवास करणारे अमेरिकन लोक दरसाल तिकडे अवाढव्य पैशाचा चूर उडवितात, ह्मणून ही अमेरिकेची हानि होत आहे, असें कोणताहि अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ समजत नाहीं. फक्त स्ट्रेट्स सेटलमेंट व मलाया संस्थानें येथून तेथल्या हिंदी रहिवाशांकडून दरसाल ६० लक्ष

रुपये हिंदुस्थानांत येत असतात. तसेंच, पूर्व व दक्षिण आफ्रिकेंतून व सिंहलद्वीपांतूनहि मोठमोठ्या रकमा हिंदुस्थानांत येत असल्या पाहिजेत; व मारिशस आणि वेस्ट इंदीज येथूनहि कांहीं लहान रकमा येत असल्या पाहिजेत. तथापि, हिंदुस्थानाकडे वळलेल्या ह्या संपत्तीच्या **ओघाबद्दल**, सदरहु वसाहतींची तक्रार कोणाच्या कानीं आल्याचें दिसत नाहीं.

ह्या संबंधांत प्रश्न विचारण्याचा हिंदुस्थानास इतकाच हक्क आहे कीं, हिंदुस्थानच्या नांवानें काढलेल्या कर्जाचा हिंदुस्थानच्याच हितार्थ विनियोग केला आहे कीं कसें? व ह्या प्रश्नाचें उत्तर निर्विवाद समर्पक असेंच मिळेल. रेलवे, कालवे, पाटबंधारे व असलींच सार्वजनिक कामें, ह्यांच्या रूपानें जी मालमिळकत आज हिंदुस्थानला मिळाली आहे, तिचीच बाजारांत किंमत करूं गेल्यास, हिंदुस्थानच्या एकंदर कर्जाच्या रकमेपेक्षां ती अधिक होईल. तरी, ह्या कर्जामुळें हिंदी लोकांच्या फायद्याच्या ज्या गोष्टी करितां आल्या आहेत, त्यांपासून "पुढें प्राप्त होणारी" प्रचंड संपत्ति ह्या हिशेबांत धरलेली नाहीं ती नाहींच. ह्मणून, हिंदुस्थानसरकार हें एक **व्यवस्थापकमंडळ** (बोर्ड ऑफ डायरेक्टरस्) असून, दिवसेंदिवस अधिकाधिक संपत्ति उत्पन्न करणारा एक मोठा धंदा तें हिंदीलोकांच्या तर्फेनें चालवित आहे, अशी जरी क्षणभर कल्पना केली, तरी ह्या धंद्याला मोठी **तेजी** असून, त्यांत फार फायदा पडत आहे, असें त्यांना खास दाखवून देतां येईल. आह्मी कबूल करितों कीं, "होम च्यार्जेस" ह्मणून जो पैसा विलायतसरकार हिंदुस्थानापासून घेतें, त्यांतील कांहीं बाबींसंबंधानें मतभेद होण्याचा संभव आहे; आणि, ह्या संबंधानें मला पुढें

थोडेंबहुत सांगावयाचेंच आहे. परंतु, उद्यां आह्मीं येथलें सर्व दुकान आटोपून, ह्या धंद्यांतून मोकळें होण्याचें मनांत आणिलें व त्याप्रमाणें देण्याघेण्याचा हिशेब करून व्यवस्था लाविली, तर हिंदुस्थानच्या नांवानें काढलेलें सर्व कर्ज भागवून, हिंदुस्थानच्या तिजोरींत चांगलीच शिल्लक पडली आहे, असें आह्मांस दाखवितां येईल. ह्मणून, आह्मी ह्मणतों कीं, ह्या संस्थेचा कारभार पाहण्यास जो एकंदर खर्च लागला, तो वावगा नव्हता, असें चांगल्या रीतीनें ह्मणतां येईल. अत्यंत **जहाल** मंडळीखेरीज-करून इतर सर्व हिंदी लोक, कै० रावसाहेब रानड्यांच्या मतांबद्दल आह्मांस अझूनहि आदर वाटत असून, त्यांचीं वचनें ह्मणजे केवळ **गुरुवचनां**प्रमाणें आह्मी समजतों, असें ह्मणत असतात. बरोबर २० वर्षांपूर्वी, पुणें मुक्कामीं भरलेल्या पहिल्या हिंदी औद्योगिक परिषदेच्या वेळीं, जें प्रास्ताविक भाषण त्यांनीं केलें होतें, त्यांत वरील गोष्ट फार चांगल्या रीतीनें मांडून दाखविली होती:—

आमच्या निर्गत व्यापारांपैकीं सुमारें २० कोट रुपयांचा माल जोंपर्यंत इंग्लंडास भक्कम खंडणीदाखल आह्मांस द्यावा लागेल, तोंपर्यंत आह्मांस आपलें डोकें वर करण्याची बिलकुल आशा नसून स्वतःची उन्नति करून घेण्यासाठीं आह्मांस कांहींएक करितां यावयाचें नाहीं, असें आह्मांपैकीं कित्येकांस वाटत आहे. वास्तविक पाहतां, हा त्यांचा समज बरोबरहि नाहीं, किंवा मर्दपणाचाहि नाहीं. ह्या वरील बोज्यापैकीं बराचसा भाग आह्मांस कर्जाऊ दिलेल्या रकमेवरील अगर ह्या देशांत गुंतलेल्या भांडवलावरील व्याजाबद्दल आहे. आणि हें व्याज भरावें लागल्याबद्दल कुरकुर करण्यास आह्मांस बिलकूल जागा नसून उलटें इतक्या हलक्या व्याजानें पैसे देऊन आमच्या गरजा भागविणारा सावकार आह्मांस मिळाला, त्याबद्दलच आह्मी वाजवी ह्मटलें ह्मणजे आभार मानले पाहिजेत. तसेंच, ज्या प्रकारचा माल इकडे तयार होत नसल्यामुळें आह्मांस परदेशांतून आणावा लागतो, तशा मालाची किंम-

तहि वरील खंडणींतच धरली जाते. आणि बाकीची रक्कम ह्मटली ह्मणजे ह्या देशाचा राज्यकारभार चालविणें, त्याचें परचक्रापासून संरक्षण करण्याचें काम करणें व पेनशनें वगैरे देणें इत्यादि बाबतींतल्या खर्चासाठीं आवश्यक आहे, असें सांगण्यांत येतें. आतां ह्या सर्वच रकमांची वरील कामासाठीं जरूरी नाहीं, अशी तक्रार करण्यास पुष्कळ जागा आहे, तरी ब्रिटिश लोकांशीं आमचा हल्लींप्रमाणें संबंध आल्यामुळेंच, अफूचा मक्ता आमच्याच हातांत ठेवून, चीन देशावर तितकीच खंडणी आह्मांस बसवितां आली आहे, ही गोष्ट आपण विसरतां कामा नये.

इंग्लंडच्या लोकांची सदसद्विवेकबुद्धि जागृत होऊन, अफूचा व्यापार चालू ठेवणें मोठें अन्यायाचें आहे, असें त्यांना वाटून, त्यांनीं हा व्यापार बंद करण्याचा जो उद्योग सुरू केला आहे, त्याचा परिणाम केवळ हिंदुस्थानासच भोगावा लागून, ह्या व्यापाराच्या रूपानें चीन–मधून येणाऱ्या खंडणीची तूट हिंदुस्थानच्या तिजोरींत पडणार आहे. परंतु, निदान एवढी गोष्ट खचित् आहे कीं, त्याबद्दल हिंदुस्थानसरकारास मुळींच दोष देतां येणार नाहीं.

आह्मीं हिंदुस्थानचा कारभार बऱ्या रीतीनें केला आहे किंवा कसें, असा प्रश्न नसून, ह्याहिपेक्षां चांगल्या रीतीनें तो आह्मांस करितां आला असता किंवा नाहीं, व जगांतील इतर देशांप्रमाणेंच, उद्योगधंदे, व्यापार व शेतकी इत्यादि बाबतींत, हिंदुस्थानची प्रगति झाली आहे कीं कसें, असा प्रश्न आहे. ह्या प्रश्नाचें उत्तर कांहींसें संशयात्मक असलें, तर हिंदी लोकांच्या—विशेषतः सुशिक्षित लोकांच्या—स्वभावांतील कांहीं लऱ्हेवाईकपणा हेंच त्याचें कारण होय, ही गोष्ट आपण लक्ष्यांत ठेविली पाहिजे. व्यापार, उद्योगधंदे अथवा शास्त्रीय पद्धतीची शेतकी ह्या कामीं आपलें मांडवल

गुंतविण्यास साधारणपणें हिंदी लोक तयार नसतात. हिंदुस्थानची सांठवून ठेवलेली संपत्ति (ह्मणजे कोणत्याच कामाला उपयोगी न येतां, केवळ विनाकारण अडकून पडलेली संपत्ति) ४½ अब्ज रुपयांची आहे, असा जुन्या लोकांचाच अंदाज आहे; आणि, हा पैसा बहुधा दागदागिन्यांत गुंतलेल्या किंवा इतर रीतीनें सांठवून ठेवलेल्या अशा निव्वळ सोन्याची किंमत आहे. हिंदुस्थानामध्यें दरसाल सोन्याचा फार खप होतो. तिकडे गेलेल्या, गुळगुळित सोन्याच्या लगडींपैकीं एकसुद्धां कधीं परत येत नाहीं, अशी लॉर्ड रॉथ्सचाइल्ड यांनीं करन्सि (चलनी नाण्यासंबंधाच्या चौकशीच्या) कमिशनपुढें साक्ष दिली होती. शिवाय, नाणें आणि दागदागिने यांत गुंतून पडलेली चांदीहि रगड असून, तिचाहि उपयोग कोणत्याच द्रव्योत्पादक कामाकडे होत नाहीं. अंगांत एखादें फाटकेंतुटकें घाणेरडें रकटें असलें, तरी रुप्याच्या जडजड दागिन्यांनीं लादलेलीं पोरें उत्तरहिंदुस्थानांतील गांवांतून नेहमीं दृष्टीस पडत असतात. पैसेवाल्या हिंदी लोकांस आपला पैसा निव्वळ सांठवून ठेवावयाचा नसल्यास, आपल्या देशबांधवांपैकीं गरजू व उधळपट्टीचा खर्च करणाऱ्या लोकांस तो ते कर्जाऊ देऊन, त्यांच्यापासून बहुधा जबरदस्त व्याज चोपून घेतात. उदार धंद्यांखेरिज (वकिली, डाक्टरी वगैरे) इतर धंद्यांत सुशिक्षित लोक बहुधा मुळींच पडत नसत; परंतु, अलीकडे अलीकडेच तो मनु थोडासा पालटला आहे. विश्वविद्यालयाच्या परीक्षा देणारांत कोणत्याहि तऱ्हेचा शास्त्रीय विषय घेणारे लोक फारच थोडे असतात; आणि, परीक्षांचे निकाल पाहिल्यास, बहुतकरून १०० बी. ए. ना एकच बी. एस्. सी. पडतो, असें दिसून

येईल. खुद्द हिंदी राष्ट्रसभेमध्यें, बहुतेक असलयाच (बी. ए. वाल्या) लोकांचा विशेष भरणा असल्यामुळें, तिच्यामध्यें स्वाभाविकपणें हीच प्रवृत्ति दिसून आली; आणि नित्याच्या व्यवहारांतील संपत्तिविषयक प्रश्न हातीं न घेतां, फक्त राजकीय विषयांचा काथ्याकूट करण्यामध्यें, आपला सर्व उत्साह व सामर्थ्य ही राष्ट्रसभा कित्येक वर्षें खर्च करित आली आहे. आणि ह्याच कारणामुळें, पाश्चात्य शिक्षण संपादलेल्या हिंदी मनुष्यास व्यापारांत व उद्योगधंद्यांत कांहीं नांव घेण्यासारखें यश बहुतेक मुळींच मिळवितां आलेलें नाहीं; आणि ह्या बाबतींत बंगाल्यांतील सुशिक्षित लोकांची जशी फजिती झाली आहे, तशी इतरत्र कोठेंहि आढळून येत नाहीं. ह्या नियमाला खरोखर हरताळ लावणारा जर तिकडे कोणी सांपडला, तर असा हरीचा लाल एखादाच असणार; दुसरा दाखवून देण्यास फारच मुष्किल पडेल. व ह्याच कारणामुळें, ह्या लोकांत राजकीय चळवळींची विशेष तीव्रता दिसून येते, ह्यांत बहुधा संशय नाहीं. गेल्या थोड्या वर्षांत मात्र, ह्या राजकारणी लोकांस असें कळून चुकलें आहे कीं, व्यापार व उद्योगधंदे यांचें पाऊल एकसारखें, संथपणानें पुढें पुढें पडत असून, चोहोंकडून ह्या गोष्टीला अधिकाधिक मागणी होत असल्यामुळें—ह्मणजे लोकांमध्यें त्यांची आवड वाढत जात असल्यामुळें—त्यांना (राजकारणी लोकांना) मात्र आतां ओसाड माळावर पाटिलकी करण्याचा प्रसंग आला आहे. स्वदेशी चळवळीचा राजकीय बाबतींत एखाद्या अस्त्राप्रमाणें उपयोग–दुरुपयोग ह्मटल्यास अधिक शोभेल–करण्याची त्यांनीं आपल्याकडून शिकस्त केली, व त्यांच्या ह्या नेटाच्या प्रयत्नांस कांहीं काळपर्यंत थोडेसें यशहि पण आलें.

तथापि, आपली अशी पक्की खात्री असूं द्या कीं, ही सोंगाडी स्वदेशी चळवळ निजधामास गेल्यानंतरहि, खरी कायदेशीर स्वदेशी पुष्कळ काळ जिवंत राहील. ही स्वदेशी ह्मटली ह्मणजे, परकी मालावर, तो इंग्लंडांतून येतो ह्याच निव्वळ सबबीवर, बहिष्कार घालणारी स्वदेशी नव्हे; तर तसलाच, किंबहुना त्याहूनहि चांगल्या तऱ्हेचा माल, परदेशी मालापेक्षां स्वस्त विकतां येईल असा, खुद्द हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतच पैदा करून, त्या योगें परदेशी मालास बाजारांतून पिटाळून लावण्याकरितां, अगदीं मनापासून खटपट करणारी स्वदेशी होय.

ह्याप्रकारच्या स्वदेशीस उत्तेजन देणें हें हिंदुस्थानसरकारचें निःसंशय कर्तव्य असून, त्यांत त्यांचें हितहि आहे. हिंदुस्थानच्या लोकांचें हितानहित पाहण्याचें काम आमच्यावर सोंपविलें असल्याकारणानें, हिंदी व्यापारधंद्यांचा आह्मांस जितका उत्कर्ष करितां येईल, तितका करण्याचें आमचें कर्तव्य आहे. तसेंच, आमच्या शिक्षणपद्धतीच्या मोहजालांत सांपडून तरुण हिंदीलोकांनीं आपले वडिलार्जित धंदे सोडून दिले, व अशा शिकलेल्या लोकांची संख्या दिवसेंदिवस भराभर वाढत चालली असल्यामुळें, सरकारी नोकरींत अथवा उदार प्रतीच्या धंद्यांत (वकिली, डाक्टरी, शिक्षकी वगैरे) पहिल्यासारखा आतां वावहि राहिला नाहीं. अशा लोकांना रोजगार लावून देण्याकरितां, नवीन नवीन उद्योगधंदे सुरू करण्याची जबाबदारीहि आमच्याच शिरावर आहे. शिक्षणपद्धतींत कितीहि सुधारणा केल्या, तरी त्यापासून ह्या सुशिक्षित भिकाऱ्यांच्या वाढीस कायमचा, चांगला आळा बसणार नाहीं. हल्लीं हिंदुस्थानांत जी अस्वस्थता दिसत आहे, तिचें बहुतेक कारण ही वरील वाढच

होय. ह्मणून, तरुण हिंदी लोकांच्या उत्साहास आतां निराळें वळण लावून, त्याचा उपयोग ते लोक नवीन नवीन धंद्यांत करूं लागतील व तेणेंकरून त्यांचीं मनें पूर्वींसारखीं बिघडून जाणार नाहींत, असे उपाय आपणांस योजिले पाहिजेत. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, देशांत व्यापारधंद्यांचा उत्कर्ष होऊन त्यांची भरभराट होऊं लागली, व त्यामुळें जिकडे तिकडे शांतता नांदून लोकांनीं कायद्यास भिऊन वागलें पाहिजे, अशी आवश्यकता पाश्चात्य शिक्षण मिळालेल्या लोकांपैकीं अधिकाधिक लोकांस, त्यांच्याच स्वतःच्या हिताकरितां, वाटत जाऊं लागली, ह्मणजे फैलावत जाणाऱ्या असंतोषरूपी रोगावर मोठा रामबाण उपाय योजल्यासारखेंच होईल. ह्या सुशिक्षित वर्गांतील पुष्कळ लोकांच्या स्वतःच्या पदरचें कांहींएक खर्च होत नसल्यामुळें, राजद्रोहाच्या गढूळ व खळबळणाऱ्या पाण्यांत जाळें टाकून, कांहीं लाभ होतो कीं काय, हें पाहण्याची त्यांना स्वाभाविकच इच्छा होते.

हिंदी लोकांपैकीं शेंकडा ७०—कदाचित् ८० सुद्धां—लोकांचा निर्वाह शेतकीवरच होत असतो. त्यामुळें, हिंदीलोकांचा हा जसा मुख्य धंदा आहे, तसाच तो पुढेंहि राहणार आहे. ह्या बाबतींत हिंदुस्थानसरकारनें जें कांहीं केलें आहे, त्याबद्दल त्यांना मान खालीं घालण्याचें कारण नाहीं. ज्या देशांतील मोठमोठाल्या प्रदेशांस पाण्यासाठीं, अत्यंत अनिश्चितपणानें पडणाऱ्या पर्जन्यावरच, सर्वथैव अवलंबून राहावें लागतें, व तसेंच जेथील लोकांस निर्वाहाकरितां केवळ जमिनीच्या उत्पन्नावरच सर्वस्वी आधार ठेवावा लागतो, अशा देशांतील दुष्काळ कायमचा नाहींसा करितां येणार नाहीं. परंतु, दुष्काळग्रस्तांना मदत करण्याकरितां, अगदीं शास्त्रीयरीतीनें करून ठेविलेल्या

व्यवस्थेशिवाय, सार्वजनिक हितांचीं कामें (रेल्वे, कालवे, सडका वगैरे) करणाऱ्या खात्यासंबंधानें सरकारनें जें धोरण स्वीकारिलें आहे, त्यामुळें मुख्यतः दुष्काळ पडणाऱ्या प्रांतांचें क्षेत्रफळ हळूहळू कमीच होत चाललें आहे. सर्व देशभर लोखंडी रस्त्यांचें जाळें पसरलें असल्यामुळें, दूरदूरच्या दुष्काळ-पीडित प्रदेशांस धान्याचा पुरवठा करणें हल्लीं सोईचें झालें आहे इतकेंच नव्हे, तर सरकारनें केलेल्या पाटबंधाऱ्यांच्या कामांमुळें वगैरे पुष्कळच नवीन जमीन लागवडीस येऊं लागली असून, जेथें अपुरा पाऊस पडेल, तेथल्या लागवडीचीहि हरकत दूर झाली आहे. अशीं कालव्याचीं वगैरे कामें हिंदुस्थानांत एवढ्या अवाढव्य प्रमाणावर व इतक्या कौशल्यानें बांधण्यांत आलीं आहेत कीं, त्यामुळें, ह्या कामाची माहिती करून घेण्याकरितां, हिंदुस्थान ही जगांतील इतर देशांस एक मोठी, अगदीं पहिल्या नंबरची शाळाच होऊन बसली आहे. सिंधुनदाचें खोरें पूर्वीं अगदीं कोरडें ठणठणीत असे. परंतु, आतां ती स्थिति पालटून, हा प्रदेश म्हणजे धान्याचें एक कायमचें पेंवच होऊन बसला आहे. एकट्या पंजाबचेंच उदाहरण घेतलें, तरी तेथें कालवे होण्यापूर्वीं, जी जमीन लागवडीखालीं होती, तिच्यांत आतां तेथल्या कालव्यांमुळें, उत्कृष्ट पिकाऊ अशा ८० लाख एकर जमिनीची नवीन भर पडली आहे. शिवाय, ५० लाख एकर जमिनीस, अवर्षणाच्या वेळीं, पाणी मिळण्याची जशी आतां सोय झाली आहे, तशी पूर्वीं नव्हती. गेल्या २५ वर्षांत, नवीन झालेल्या चहा, काफी, सिंकोना इत्यादिकांच्या मळ्यामुळें व तागाच्या लागवडीमुळें, हिंदुस्थानच्या निर्गत व्यापारांत, दरसाल सुमारें ४३ कोट रुपयांची वाढ झाली आहे. हिंदुस्थानच्या ज्या-

द्रव्यशोषाबद्दल लोकांचा इतका, निष्कारण **कंठशोष** चालू आहे, तो सर्व केवळ एका तागाच्याच उत्पन्नानें भरून निघत आहे.

तथापि, हिंदी लोकांमध्यें अत्यंत मोठी संख्या शेतकऱ्यांचीच असून, हे लोक अगदीं निकृष्टावस्थेंत राहिले आहेत, ही गोष्ट कबूल करणें कितीहि दुःखकारक असलें, तरी वास्तविकपणें ती गोष्ट नाकारितां यावयाची नाहीं. शेतकरी लोकांपासून सरकार जो शेतसारा घेतें, तो इतका जड असतो कीं, त्यामुळें शेतकरी अगदीं चिरडून जाऊन, असे धुळीस मिळाले आहेत, अशी हिंदी राजकारणी लोकांची हाकाटी आहे. आतां, हें शेतकऱ्यांबरील जड ओझें ह्मटलें ह्मणजे, पिकणाऱ्या जमिनीवर दर एकरीं सरासरीनें सवा रुपाया बसत असून, देशाच्या एकंदर उत्पन्नाच्या मानानें पाहूं जातां, तेंहि हलकें हलकें कमी होत चाललें आहे. परंतु, एतद्देशीय जमिनीचे मालक शेत कसणाऱ्यांपासून किती खंड चोपून घेत असतात, ह्याबद्दल सदरहु राजकारस्थानी मंडळी एक अवाक्षरहि काढित नाहींत. उदाहरणार्थ, बंगालच्या कायम धाऱ्याच्या पद्धतीमुळें, तिकडील जमीनदारांस शेताचें बहुतेक सर्वच उत्पन्न घशांत टाकतां येत असल्याकारणानें, शेतकरी वर्गाचा अगदीं चुराडा उडून गेला आहे. मद्रास सरकारच्या कायदे कौन्सिलांतील चालू सालच्या वादविवादाच्या वेळीं, **रयतवारी** पद्धतीच्या जमीनदार लोकांबद्दल, चांगल्या लक्ष्यांत ठेवण्यासारख्या बऱ्याच गोष्टी बाहेर आल्या. कांहीं खेड्यांतील फाळ्यासंबंधानें सरकारावर घसरून पडून, खुब ताशेरा उडविणाऱ्या एका हिंदुसभासदास उत्तर देतांना, मि. **अॅटकिन्सन** ह्यांनीं भरपूर माहितीचे पुष्कळच आंकडे पुढें मांडून, असें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें कीं,

प्रत्यक्ष ह्याच खेड्यांतील शेत कसणारांकडून जमिनीचे मालक जो खंड घेत असतात, तो सरकारी साऱ्याच्या ८ पासून ११ पटीपर्यंत असतो. सरकार देणें वसूल करणाऱ्यांपेक्षा, शेतकऱ्यांच्या दारिद्र्यास देशी सावकारच अतिशय कारण होतात. परंतु, ह्याविषयीं मात्र हिंदी राजकारणी लोकांच्या मुखांतून फारसें बाहेर पडत नाहीं. त्याचप्रमाणें, कांहीं अंशीं धार्मिक व कांहीं अंशीं सामाजिक अशा जबरदस्त खर्चाच्या बाबी हिंदी समाजांत रूढ असल्यामुळें, शेतकरी लोक सावकाराच्या तावडींत कसें सहज सांपडतात, ह्याबद्दल हे राजकारणी लोक एक चकार शब्दहि तोंडावाटें काढित नाहींत. घरांत मुलाचें लग्न उभें राहिलें, किंवा आईचें अथवा बापाचें उत्तरकार्य करण्याचा प्रसंग आला, अथवा ब्राह्मणभोजन उठवून द्यावयाचें झालें, ह्मणजे त्यांना बहुधां सावकाराचें घर बघण्याची पाळी येते. कर्जबाजारीपणा हा हिंदी शेतकऱ्याच्या मानगुटीस बसलेला एक दांडगा संमधच आहे; व त्याच्या तडाक्यांतून सुटण्याचा मुख्य मार्ग ह्मटला ह्मणजे, कर्जरूपी चिखलांत शेतकऱ्याचा पाय अधिकाधिक रुतत जाणार नाहीं, अशा रीतीच्या हलक्या व्याजानें त्यास पैसे देणाऱ्या संस्थांची स्थापना झाली पाहिजे. हिंदी शेतकऱ्यांची अशा ह्या संकटांतून मुक्तता करण्याचा उपाय हिंदी राजकारणी लोकांनीं शोधून काढला नाहीं, तर हिंदुस्थानावर राज्य करणाऱ्या ब्रिटिश लोकांनींच काढला आहे; व त्याचें महत्व व त्यापासून पुढें फायदा होण्याची आशा इतकी मोठी आहे कीं, त्याचा फक्त जातां जातां उल्लेख करण्यापेक्षां, त्यासंबंधानें अधिक सांगण्याची आवश्यकता आहे.

हा उपाय ह्मणजे, हिंदुस्थानच्या प्रजा [illegible]विण्याकरितां

सुप्रसिद्ध **राफीसन** पद्धत येथें सुरू करणें असा आहे. माझा असा समज आहे कीं, प्रथमतः ही योजना खरोखर सर **विलियम वेडरबर्न**साहेबांनीं सुचविली होती. परंतु, सर **फ्रेडरिक निकलसन** यांनीं तत्संबंधानें पूर्ण चौकशी केल्यानंतर, पहिले प्रत्यक्ष प्रयोग मद्रासेस करून पाहण्यांत आले. त्याच-प्रमाणें, संयुक्त प्रांतामध्यें सर अंटनी (आतां लॉर्ड) मॅकडोनेल ले० गव्हरनर असतांना, त्यांनींहि असलेच प्रयोग तिकडे करून पाहिले होते. हिंदुस्थानांतील दरिद्री लोकांच्या कल्याणार्थ, लॉर्ड कर्झनसाहेबांनीं ज्या पुष्कळ गोष्टी अमलांत आणिल्या, त्यांमध्येंच सरकारी पतपेढ्या व पतसंस्था यांच्या कामास काय-देशीर स्वरूप देण्याचा कायदा येतो. हा कायदा पास करून घेण्याचें घाटत असतां, त्याला राजकारणी लोकांपासून किंचित् सुद्धां पाठिंबा मिळाला नाहीं इतकेंच नाहीं, तर उलट त्याला त्यांनीं मोठ्या जोरानें विरोध केला होता. आणि, **राष्ट्रीय** पक्षाच्या पत्रकारांनींतर हा कायदा ह्मणजे, "श्रीमंत हिंदी लोकांच्या खिशांतून पैसे काढून घेऊन, दुसऱ्याच्या पदराला खार लावून आपल्या औदार्याची बढाई मारण्याची—रामाजी-पंताला लुटून, दामाजीपंताला धर्म करण्याची—ही खाशी युक्ति सरकारनें लढविली आहे, असें ह्मटलें होतें. हिंदुस्थानांतील ग्रामसंस्थांची निर्दोष पद्धत आयतीच तयार असल्यामुळें, या नवीन योजनेच्या सुरवातीस त्या फार उपयोगी पडल्या. आणि, इकडील "उन्हानें वाळून गेलेल्या अधिकारी वर्गांत," ह्या कामाची सुरवात कशी करावी, कोणीं करावी, वगैरे गोष्टींसंबंधानें लोकांस ज्ञान करून देण्यासाठीं लागणारा उत्साह व प्रामाणिकपणा नसतां, व तसेंच सरकारनें या वरील योजनेला उत्तेजन दिलें

नसतें, तर ती कधींच यशस्वी झाली नसती, हें जरी खरें आहे, तरी कर्तबगारीच्या, पुष्कळ देशी लोकांचें तिला मोठेंच साह्य मिळालें आहे, ह्या कामाची सुरवात होऊन, आज केवळ आठच वर्षें झालीं आहेत. तरी त्याचा प्रसार आश्चर्य वाटण्यासारख्या झपाट्यानें होत आहे. गेल्या हिंवाळ्यांत (१९०९), ह्या **मंडळ्यांच्या** रजिष्टरांची परिषद् कलकत्त्यास भरली होती. तिच्या रिपोर्टावरून असें दिसतें कीं, असल्या प्रकारच्या एकंदर **मंडळयांची** संख्या तिगस्तां १३५७ होती, ती गुदस्तां २००८ पर्यंत वाढली असून, त्यांचें एकंदर भांडवल तिगस्तां ४४ लाख रुपये होतें, तें गुदस्तां सुमार ८१ लाख झालें. आतां, ही नवीन योजना अद्यापि बाल्यावस्थेंतच आहे हें खरें; तथापि, तिच्यापासून पुढें फारच फायदा होईल, अशी पूर्ण आशा आहे. सावकारलोक प्रथमतः ह्या योजनेला फारच प्रतिकूळ होते. परंतु, सहकारी पेढ्यांत भांडवल गुंतविल्यापासून, पूर्वीपेक्षां आतां पैसे बुडण्याची भीति फारच कमी झाली असूनहि, योग्य मोबदला आपणास मिळतो, असें त्यांसहि वाटूं लागलें आहे. कारण, पूर्वीं व्याजाचा फायदा फार होता, त्याचबरोबर तोटाहि फार होता. गेल्या बारा महिन्यांत, ह्या कामाचा प्रसार फार झाला असतांहि, त्याकरितां लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा बहुतेक खासगी लोकांनीं केला असून, सरकारास फारच थोडी मदत करावी लागली आहे, हें एक मोठें, चांगुलपणाचें लक्षण आहे. कर्जाची फेड होईपर्यंत, हल्लींच्या हलक्या व्याजामुळें, शेतकरी लोकांचा जो पैसा वांचतो, तो आतां त्यांस अलीकडलीं, सुधारलेलीं आउतें विकत घेण्यासाठीं किंवा सुधारलेल्या पद्धतीनें शेतकी

करण्यासाठीं उपयोगी पडत आहे, ह्यामुळेंहि आणखी आशा वाढूं लागली आहे. दारिद्र्यानें गांजलेल्या व कर्जाखालीं चिरडून गेलेल्या खेड्यांतील लोकांस ही योजना फारच पसंत पडूं लागली आहे. पंजाबांत— विशेषतः तेथील मागासलेल्या कित्येक मुसलमानी जिल्ह्यांत— ह्या योजनेपासून खरोखर मोठा विलक्षण परिणाम घडून आला आहे. तेथील शेतकऱ्यांस एकंदर ३५ पासून ४५ कोट रुपयांपर्यंत सध्यां कर्ज आहे, असा अंदाज आहे. तथापि, थोड्याच वर्षांत, सुमार निम्या कर्जाचा फडशा उडून जाईल, अशी उमेद आहे.

आतां, कोणत्याहि हिंदी उद्योगधंद्यास ज्याप्रमाणें व्यावहारिक शिक्षणाची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणें ती शेतकीसहि आहे. जमीन व बीं पसंत करणें, योग्य प्रकारचीं खतें घालणें, पिकें कोणत्या अनुक्रमानें काढून घ्यावयाचीं ती माहिती करून घेणें, तसेंच शेतकीच्या उत्तम ठरलेल्या पद्धती सुरू करून, सुधारलेल्या प्रकारचीं, नवीन आउतें वापरूं लागणें, इत्यादि गोष्टींचा केवळ प्रत्यक्ष अनुभव मिळाल्यानेंच त्या पटावयाच्या असतात. हिंदुस्थानांतील शेतकरी वर्गाचें हित पाहण्यासाठीं, त्यांच्या वतीनें नवीन कौन्सिलांतून पुष्कळ सभासद यावयास पाहिजेच होते; व त्याप्रमाणें, हल्लींच्या व्यवस्थेंत, जमीनदारलोकांना आपले प्रतिनिधी पाठविण्याचे, विशेष हक्क सरकारनें समंजसपणानें दिलेच आहेत. ह्मणून, वरील प्रकारचें,— ह्मणजे नवीन गोष्टी प्रत्यक्ष करून दाखवून— शिक्षण देण्याची सोय सरकारनें करून द्यावी, अशी मागणी सदरहु कौन्सिलांकडून दिवसानुदिवस अधिकाधिक जोरानें व आग्रहानें होऊं लागेल, असा रंग दिसत आहे.

हिंदी राजकारणी लोकांनीं **स्वदेशी** हा शब्द प्रचारांत आणण्यापूर्वींच, हिंदी शेतीप्रमाणेंच हिंदी उद्योगधंद्यांच्या बाबतींत, निर्दोष **स्वदेशीचा** लोकांस उपदेश करण्याचें व तदनुसार प्रत्यक्ष कृति करून दाखविण्याचें श्रेयहि ह्या "उन्हानें वाळलेल्या अधिकारीवर्गानेंच" प्रथम संपादन केलेलें आहे. वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध सर जॉर्ज बर्डवुड साहेब, सर जॉर्ज वॉट, सर एडवर्ड बक व दुसरे अनेक इंग्रज गृहस्थ हे हिंदी कलाकौशल्य व हिंदी उद्योगधंदे यांचे मोठे वाली असून, त्यांची आज कित्येक वर्षें ते तरफदारी करित आले आहेत. मागें १८८३ सालीं, सरकारनें एक ठराव पास करून, "हल्लीं यूरोपमधून मागविण्यांत येणाऱ्या पदार्थांच्या बदला, खरोखरच हिंदुस्थानांत तयार करण्यांत येणारे अगर उत्पन्न होणारे पदार्थ विकत घेण्याच्या हरएक प्रयत्नास देतां येईल तेवढें उत्तेजन द्यावें," अशी त्यांनीं आपली इच्छा त्यांत दर्शविली होती. सन १८८६ सालीं, सर जॉर्ज वॉट यांनीं सरकारच्या देखरेखीखालीं हिंदुस्थानच्या सांपत्तिक द्रव्यांच्या पाहणीचें जें मोठें काम नुकतेंच संपविलें होतें, तें तसेंच पुढें चालू ठेवण्याकरितां, एक स्वतंत्र खातें सरकारांतून मुद्दाम काढण्यांत आलें. परंतु, राज्यकारभाराच्या कामांतील एक अतिशय महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे, लार्डकर्झन साहेबांच्या कारकिर्दींत, हिंदुस्थानसरकारनें व्यापार व उद्योगधंदे यांच्यासाठीं एक निराळेंच खातें काढून, तें एका स्वतंत्र प्रधानाच्या (कौन्सलदाराच्या) स्वाधीन करून दिलें. ह्या जागेवर पहिली नेमणूक सर जॉन ह्युएट या सिविलियन कामगाराची झाली, व या कामांत त्यांना यशहि फार चांगलें आलें. तसेंच, लॉर्ड कर्झन यांच्याच कारकिर्दींत, धंदेशिक्षणास अतिशय उत्ते-

जन मिळालें. त्याच्यापूर्वींच, धंदेशिक्षणाची आवश्यकता फार आहे, असें सर अँटनी (आतां लॉर्ड) मॅकडोनेल, सर ऑकलंड काल्विन अशासारख्या पुष्कळच सुप्रसिद्ध इंग्रज अधिकाऱ्यांचें मत असून, तें त्यांनीं मोठ्या जोरानें बोलूनहि दाखविलें होतें. सर्व हिंदुस्थानभर फिरून, ह्या प्रश्नाची सर्व बाजूंनें अगदीं पुरी-पुरी चौकशी करण्याकरितां, एक कमेटी नेमण्यांत येऊन, तिच्या-मध्यें मोठ्या काळजीनें निवडून काढलेले कामगार घातले होते. आणि, ह्या कमेटीनें जे अभिप्राय दिले होते, तेच १९०४ सालच्या शिक्षणविषयक सरकारी ठरावांत दाखल करण्यांत आले. धंदेशिक्षण मिळविण्यास पात्र होण्याची तयारी करण्यासाठीं, औद्योगिक, व्यापारी, कलाकौशल्याच्या व कारागिरीच्या शाळा स्थापन करण्याचें महत्व फार आहे, ह्या गोष्टींवर सदर कमे-टीच्या रिपोर्टांत विशेष जोर देण्यांत आला होता. शिवपुर, रुरकी, जबलपुर व मद्रास येथलीं इंजिनिअरिंग कॉलेजें, पुण्याचें सायन्स कॉलेज व मुंबईचें टेक्निकल इन्स्टिट्यूट अशा ठिकाणीं वरिष्ठ प्रतीच्या धंदे शिक्षणाची सोय पूर्वींच झालेली आहे. लखनौच्या उद्योगशाळेची हकीकत ह्मणजे "मूळच्या उद्देशांत धरसोडपणा व मधून मधून पुरी अनास्था यांचा इतिहास " आहे, असें शिक्षणखात्याचें नवीन प्रधान मि. बटलर यानीं जें तिचें थोड-क्यांत व खुबीदार वर्णन केलें आहे, तेंच तावत्कालपर्यंत एकंदर धंदेशिक्षणाच्या शाळांस बहुधा लागू पडत असे. धंदे-शिक्षणाचा प्रश्न पद्धतशीर रीतीनें सोडविण्याकडे हिंदुस्थानस-रकारचें लक्ष पूर्वींपेक्षां अधिक गेलें इतकेंच नाहीं, तर ह्या शिक्षणाची सुधारणा करून आणखी प्रसार करण्याकरितां, प्रांतिक सरकारांतून ह्या कामीं जो पैसा खर्च होत होता, त्यांस म-

दतीदाखल २,४४,००० रुपयांची विशेष भर घालण्याचें हिंदुस्थानसरकारनें १९०५ मध्यें ठरविलें. मुंबईच्या सुप्रसिद्ध पारशी मंडळीपैकीं प० लो० मि. **जे. एन्. टाटा** व त्यांचे मुलगे यांनीं वरील गोष्टीकरितां बरीच मोठी रक्कम सरकारच्या स्वाधीन करण्याचें औदार्य नुकतेंच दाखविलें आहे. परंतु, तोंपर्यंत, "शास्त्रीय विषयांच्या अभ्यासासाठीं हिंदी विद्यापीठ" ह्या नांवास शोभण्यासारखी संस्था स्थापन करण्याची कांहींच तजवीज झाली नव्हती. ह्या विद्यालयास म्हैसूरच्या दरबारानें बंगलोर येथें जागा दिली असून, शिवाय हें दरबार व हिंदुस्थानसरकार या दोघांनीं पैशाचीहि चांगली मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे.

अगदीं अलीकडे अलीकडेपर्यंत, हिंदी धंदेशिक्षणास जें उत्तेजन मिळत होतें, तें कोणत्याहि देशी संस्थेपेक्षां हिंदुस्थानच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांकडूनच फार मिळत होतें. त्याचप्रमाणें, अगदीं अलीकडे अलीकडेपावेतों, ब्रिटिश लोकांचें धाडस व त्यांचेंच भांडवल ह्यांच्यामुळेंच हिंदी कारागिरी व व्यापार ह्यांची वाढ बहुतकरून झाली आहे. हिंदुस्थानच्या व्यापारधंद्यांच्या वृद्धीकरितां, ब्रिटिश लोकांनीं ५¼ अब्ज रुपयांचें भांडवल हिंदुस्थानांत घातलें आहे, असा अजमास आहे; आणि, ह्याच भांडवलाच्या प्रसंगामुळें, पुष्कळ हिंदी लोकांस रोजगार धंदा मिळाला आहे. एकट्या रेलवेंतच पांच लाख लोक कामावर असून, इतकेच आणखी चहाच्या मळ्यांवर आहेत. हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांच्या वाढीच्या कामीं, हिंदी लोकांचें धाडस व भांडवल उपयोगी पडून, त्यांत चांगलें यश आल्याचीं फक्त दोनच, महत्वाचीं उदाहरणें हल्लीं दृष्टीस

पडतात, तीं मुंबई व आमदाबाद येथील कापसाच्या गिरण्यांचीं होत. हिंदुस्थानांत कारखाने चालल्याचीं जीं कांहीं मुख्य ठिकाणें आहेत, त्यांत कानपुर मोडत असून, येथें लोंकर, कापूस व चमड्याचे कारखाने आहेत. हे कारखाने व तसेंच बंगालप्रांतांतील तागाचा मोठा कारखाना, हें सर्व केवळ ब्रिटिश लोकांच्याच परिश्रमाचें बहुतेक फळ आहे; ह्या कामीं हिंदीलोकांनीं कांहींएक केलेलें नाहीं. ब्रिटिश लोकांचें उदाहरण व त्यांचा अचाट उद्योग, ह्यामुळें खऱ्या **स्वदेशीला** उत्तेजन मिळून, ती अगोदरच मोठ्या जोरांत होती, इतक्यांत हिंदी राजकारणी लोकांनीं मध्यें घुसून, **स्वदेशी**चा एळकोट सुरू केला, व पुष्कळ वेळां तिचा वाईट कामाकडे दुरुपयोगहि केला. आतां, हिंदी राजकारणी लोकांच्या ह्या अशा खटपटीमुळें, पिकल्या उंबराखालीं उपाशी मरणारे, अजगरवृत्तीचे त्यांचे देशबांधव खडबडून जागे झाल्यानें, वाईटाप्रमाणें कांहीं चांगल्याहि गोष्टी त्यांच्या हातून घडल्या असतील, तरी राजकारणी लोकांच्या कृतीमुळें, बहुधा अगदीं उघड उघड रीतीनें चालविलेल्या, तामसीपणाच्या राजद्रोही चळवळींचा अनर्थकारक परिणाम नवीन भांडवल मिळण्यावर झाल्यानें, त्यांच्या (राजकारणी लोकांच्या) हातून जें कांहीं देशहित झालें असेल, त्यावर अशा रीतीनें पाणी पडलें आहे, असें वाटतें. स्वतः मि. गोखल्यांना ह्या अनर्थाची ओळख पटल्याचें दिसतें. कारण, १९०७ मध्यें, त्यांनीं लखनौ मुक्कामीं **स्वदेशीच्या** समर्थनार्थ जें मोठें वक्तृत्वप्रचुर असें भाषण केलें, त्यांत स्वदेशीच्या कांहीं भक्तांनीं तिला जें संकुचित, एकदेशीय व अक्षम असें स्वरूप देऊन, तिचा उत्कर्ष करण्याची मोठी हांव धरली होती, तिचा— थोड्या उशीरानेंच

ह्मणावयाचा— निषेध केला, व ही चळवळ यशस्वी होण्यास, लोकांच्या अंगीं साहस व चातुर्य जसें असलें पाहिजे तसेंच भांडवलहि पाहिजे, ह्या महत्त्वाच्या मुद्यावर त्यांनीं फारच जोर दिला. हिंदुस्थानांत गुंतलेलें ब्रिटिश भांडवल जरी बरेंच आहे, तरी तें जितकें मोठें झालें असतें व व्हावयास पाहिजे तितकें नाहीं. आणि, राजकीय बाबतींतल्या अस्वस्थतेमुळें (ब्रिटिश लोकांच्या मनाला) जी भीति वाटूं लागली आहे, तिच्याबरोबरच हिंदुस्थानांत आणखी भांडवल गुंतविण्याविषयींची त्यांची नाखुषी वाढत चालली आहे.

हिंदुस्थानांत उद्योगधंद्यांची वाढ होण्यास अद्यापि पुष्कळच जागा मोकळी आहे, ह्याबद्दल मुळींच वाद नाहीं. हिंदुस्थानच्या सनदी नोकरीपैकीं मि. ए. सी. चतरजी नांवाच्या एका हिंदी गृहस्थानीं, **एशियाटिक कार्टरली रिव्ह्यू** नामक त्रैमासिकाच्या गेल्या ज्यानेवारींतील अंकांत, ह्या विषयासंबंधानें एक फार चांगला, माहितीनें भरलेला असा लेख लिहिला आहे. त्यांत ह्या प्रश्नाचा जो सांगोपांग विचार केला आहे, त्यावरून त्यांची विद्वत्ता व हुशारी चांगलीच दिसून येते. शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून ज्या धंद्यांची सुधारणा करण्याची फारच आवश्यकता आहे, असे पुष्कळ धंदे त्यानीं सांगितले आहेत. परंतु, त्यापैकीं गळिताच्या धान्यांपासून तेलें काढणें, लांकडांतील गर व त्याचें पीठ ह्यांपासून कागद करणें, चामडीं कमावणें व कमावलेल्या कातड्याच्या जिनसा तयार करणें, वनस्पतींपासून (हिरडे, तरवड वगैरे) व रासायनिक पदार्थांपासून (कोलटार वगैरे) रंग बनविणें, साखर करणें, व धातूंच्या कारागिरीच्या [illegible] करणें, इतकींच फक्त उदाहरणें मी घेतों. आतां

ह्या सर्व धंद्यांचें योग्य शिक्षण लोकांस मिळून, त्यांना कोणीं योग्य मार्ग दाखविला, तर स्वतःच्या गरजा भागविण्याकरितां अथवा परदेशांत पाठविण्याकरितां, येथल्या कच्च्या मालापासून पक्का माल त्यांस तयार करितां येऊं लागून, त्यापासून त्यांचा पुष्कळ फायदाहि होईल. निदान आपले मूळचे धंदे— आणि विशेषतः हातमागाचा धंदा— बुडूं न देणें, ही गोष्ट हिंदी लोकांस तितकीच महत्त्वाची आहे. कारण, शेतकीच्या धंद्यांत इकडे अगोदरच पुष्कळ लोक गुंतले असल्यानें, तेथें फारच गर्दी झालेली आहे. आणि, लँकेशायरमधील वाफेच्या शक्तीवर चालणाऱ्या मागांमुळें, हिंदुस्थानांतील हातमागांचा धंदा अगदीं रसातळास गेला आहे, व त्यायोगानें अशा बेकार झालेल्या दरिद्री लोकांची (साळी, कोष्टी वगैरे) भर शेतकरी लोकांत पडत आहे. ह्या बाबतींत लोकांची एकजूट होऊन, व्यवस्थित रीतीनें त्यांना काम करितां येऊं लागण्याची फारच जरूरी आहे, असें जें मि. चतरजींनीं ह्मटलें आहे, तें खरोखर शहाणपणाचें आहे. कारण, "हस्तकौशल्याच्या धंद्यांत प्रत्यक्ष यंत्रांचा उपयोग न करितां, यांत्रिक शक्तीनें चालणाऱ्या धंद्यांत ज्या पद्धतीनें काम चालतें, ती पद्धत वरील धंद्यांत सुरू केली, तर त्यांचा टिकाव लागण्याचा फारच संभव आहे." मद्राससरकारच्या **उद्योगवृद्धि** खात्याचे मुख्याधिकारी मि. आल्फ्रेड चाटरटन यांनीं, **सायन्स प्रोग्रेस** (शास्त्रांची प्रगति) ह्या मासिकाच्या एप्रिल व जुलै महिन्यांच्या अंकांत, "हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांविषयींचा प्रश्न" ह्या विषयावर लिहिलेले निबंध देखील काळजीपूर्वक मनन करण्यासारखे आहेत. थोडक्या मजुरींत पाहिजेत तितके लोक कामावर येण्याची सोय हिंदुस्थानांत आहे, "हेंच हिंदी व्यापा-

राचें अत्यंत मोठें भांडवल," असें जें त्यांनीं ह्मटलें आहे, तें अगदीं खरें आहे. तथापि, पाश्चिमात्य देशांतील पद्धतीच्या कारखान्यांचा प्रसार इकडे केला पाहिजे, परंतु ह्या कामांत मोठा काळजीपूर्वक विचार करून, फारच सावधगिरी ठेविली पाहिजे, असें जें त्यांचें मत आहे, तेंहि फार समंजसपणाचें आहे. लहान मुलें व तरणीं माणसें ह्यांच्यापासून आहाराबाहेर काम घेण्याची जी गैरशिस्त रीत पडली आहे, ती मोडून टाकण्याकरितां कोणते उपाय योजावेत, ह्यासंबंधाचा महत्वाचा कायदा करण्याचा हल्लीं हिंदुस्थानसरकारचा विचार चालला आहे. परंतु, "देशी उद्योगधंद्यांची बाल्यावस्थेंतच गळचेपी करावी" ह्याच केवळ हेतूनें, "इंग्लंडांतील कापसाच्या गिरण्यांच्या, राजासारख्या व्यापाऱ्यांनीं" हे "हातपाय जखडून टाकण्याचे" कायदे सरकारास सुचविले आहेत, असा त्यांच्याविरुद्ध पहिल्यापासूनच हिंदी वर्तमानपत्रकारांनीं गिल्ला करून सोडला आहे.

नवीन उद्योगधंदे सुरू करण्याच्या कामीं सरकारास काय काय करितां येईल, हें उत्तर-हिंदुस्थानांतील सरकारी थट्ट्यांस (गौळवाडे), व मद्रास येथें मि. चाटरटन यांनीं अल्युमिनियम धातूच्या कारखान्यासंबंधी करून पाहिलेल्या प्रयोगांस जें यश आलें आहे, त्यावरून दिसून येतें. उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठीं, नवीन नवीन शोध लावले पाहिजेत, व ते लावण्याकरितां सर्व हिंदुस्थानभर जागजागीं प्रयोगशाळा स्थापन होऊन, त्यांतून प्रयोग करून पाहण्याचें काम चाललें पाहिजे; व ह्या गोष्टीची सध्यां फारच जरुरी आहे. परंतु, सर्वांच्या अगोदर प्रथमतः हल्लींच्या शिक्षणपद्धतींत सुधारणा होऊन, पूर्वींपेक्षां अधिक व्यवहारोपयोगी असें शिक्षण मिळण्याची आव-

श्यकता आहे. ह्या कामाला लॉर्ड कर्झनसाहेबांच्या कारकिर्दींत बरेंच प्रोत्साहन मिळालें होतें; परंतु, लॉर्ड मिंटोसाहेबांच्या अमदानींत त्याला कांहींशी मंदाई आलेली आहे. ह्याचें कारण, हल्लींची राजकीय स्थिति व राज्यकारभारांत घडून येणाऱ्या सुधारणा इकडेच सरकारचें सर्व लक्ष निःसंशय वेधून राहिलें आहे.

सर्व प्रकारच्या कारागिरीच्या उच्च शिक्षणाकरितां, एक महाविद्यालय स्थापन करण्यासंबंधाच्या ठरावावर, कलकत्त्यास कौन्सिलची बैठक झाली, त्यावेळीं, अंतर्गत कारभाराच्या प्रधानानीं (होम मेंबर) भाषण केलें. त्या प्रसंगीं, हिंदुस्थानच्या सर्व भागांत धंदेशिक्षणाचा प्रसार करण्याकरितां, सरकारनें थोडा पैसा खर्च केलेला नाहीं, असें सांगून, ह्या कामीं काय काय तजविजी करण्यांत आल्या आहेत, त्यांची एक बरीच मोठी यादी सभासदांस वाचून दाखविली. आणि, प्राथमिक धंदेशिक्षण मिळण्याच्या ज्या सोई पूर्वींच करण्यांत आल्या आहेत, त्यांचा फायदा घेऊन, हल्लींपेक्षां पुष्कळ विद्यार्थी उच्चप्रतीचें धंदेशिक्षण घेण्यास लायक झाल्याखेरिज, कोणत्याहि प्रकारचें, धंदेशिक्षणाचें **महाविद्यालय** स्थापन करण्यापासून कांहींएक फायदा होणार नाहीं, असें जें त्यांनीं मोठ्या जोरानें प्रतिपादन केलें, तें अगदीं वाजवी होतें. परंतु, सध्यां चालू असलेल्या शाळांतून शिक्षणाच्या सोई सर्वदां भरपुर केलेल्या असतात, व चांगला विचार करून ठरविलेल्या योजनांस सुज्ञ अधिकाऱ्यांची पूर्ण पसंती असल्यावर, अशा योजनांचा अंमल करण्यांत सरकारच्या मुख्य ठिकाणांहून हरकती घेण्यांत येऊन विनाकारण दिरंगाई होत नाहीं, असें जर ह्या प्रधानांना दाखवितां आलें असतें, तर त्यांच्या उत्तरानें लोकांच्या मनाची खात्री पटली असती.

नैनितालास जी **औद्योगिक परिषद्** झाली, त्यांत जसे लोकांचे खरेखरे प्रतिनिधी आले होते, तसे आजपर्यंत हिंदुस्थानांतील कोणत्याहि परिषदेंत नव्हते---ह्मणजे ही सभा खरोखरच प्रातिनिधिक तत्वावर भरली होती. त्यानंतर, तीन वर्षांमागें, हिंदुस्थानच्या **व्यापार व उद्योगधंद्यांच्या** नवीन खात्याचे पहिले प्रधान व त्या जाग्यावरूनच **संयुक्त** प्रांताचे ले० गवरनर झालेले सर **जॉन ह्युएट** यानीं धंदेशिक्षणाचें महाविद्यालय कानपुर येथें स्थापन करण्यासंबंधानें एक बेत केला होता, तो सर्व लोकांच्या पसंतीस उतरला होता. परंतु, त्याप्रमाणें आजतागायत कोणतीहि गोष्ट घडून आलेली नाहीं. अनुभवशीर अशा स्थानिक अधिकाऱ्यांचें, प्रांतिक सरकारच्या मुख्याचें व हिंदुस्थानसरकारचें पाठबळ असतांहि, ही योजना ६००० मैलांवर बसून गोष्टी सांगणाऱ्या लोकांस अगदींच निर्दोषी वाटली नाहीं, इतक्याच सबबीवर ती बाजूला सारून ठेवण्यापासून सरकारविषयीं हिंदी लोकांचा काय ग्रह होईल, असा मि. मुधोळकर ह्यानीं, कांहींशा संतापानें, कौन्सिलांत सवाल केला, तेव्हां त्यांच्या बोलण्यास सर्व हिंदी सभासदांचीच केवळ नव्हे, तर सरकारी व बिनसरकारी अशा पुष्कळ यूरोपियन सभासदांचीहि अनुमति मिळाली.

ज्या खात्यामार्फत पुष्कळ सरकारी पैसा खर्च होतो, त्यांस लागणाऱ्या मालाबद्दल दरसाल मोठमोठ्या मागण्या त्यांच्याकडून होत असतात. ह्या बाबतींत आपल्या इच्छेप्रमाणें वागण्यास सरकारास (हिंदुस्थान) अगदीं पूर्ण स्वातंत्र्य असावें, असा निदान एका दिशेनें तरी हिंदुस्थानास वाजवी रीतीनें हक्क सांगतां येईल. हिंदुस्थानसरकारास लागणाऱ्या मालांपैकीं जो माल, सर्वतः किंवा अंशतः, खुद्द हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत

तयार होत असेल, तो तेथूनच खरेदी करण्यांत येत जावा, असें आतां स्टेटसेक्रेटरीनीं ठरवून टाकिलें आहे. परंतु, हिंदी कारखान्यांस ह्याहिपेक्षां खात्रीलायक आश्रय देण्याची सवड हिंदुस्थानसरकारास मिळेल, तर मालाचा अधिक पुरवठा करण्याचें सामर्थ्य सदरहु कारखान्यांस येईल. "बंगाल लोखंड पोलाद कंपनीचें" उदाहरण मला सांगण्यांत आलें आहे. ह्या कंपनीनें कामास सुरवात केली, त्यावेळीं, तिला आश्रय देण्याविषयीं जीं आश्वासनें सरकारांतून मिळालीं होतीं, तीं बहुतेक पोकळ ठरून, कंपनीची अगदीं निष्कारण फसगत झाली. त्यामुळें, आपले पोलादाचे कारखाने अगदींच बंद करून, लोखंड करण्याच्या चार भट्ट्यांपैकीं दोनच कायत्या चालू ठेवणें तिला भाग पडलें. सरकारच्या हातीं रेलवे व पब्लिक वर्क्स हीं खातीं असल्यामुळें, अशा मालाचें सरकारच मुख्य गिऱ्हाईक असतें—किंबहुना सरकाराशिवाय दुसऱ्या कोणाचीच त्याला मोठी मागणी नसते. यास्तव, अशा मालाच्या कारखान्यास सरकार अगदीं मनापासून मदत करील, असा भरंसा असल्याशिवाय, हे कारखाने हिंदुस्थानांत सध्यां कोणासच चालवितां येणार नाहींत.

हल्लींच्या घटकेला, बंगालप्रांतांतील साकची येथें मोठमोठाले प्रचंड कारखाने उभारून, मेसर्स टाटा हे लोखंड व पोलाद तयार करण्याच्या धंद्यास हिंदुस्थानचें हवापाणी मानवूं लागेल, अशा तऱ्हेचा खरोखरच भगीरथ प्रयत्न करित आहेत. ह्या ठिकाणीं, असल्या कारखान्यांस अवश्य लागणारा चार प्रकारचा कच्चा माल—ह्मणजे अशोधित लोखंड, शुद्ध केलेला दगडी कोळसा, धातूंचा रस लवकर व्हावा ह्मणून जरूर

असणारे जिन्नस व म्यांगानीज धातु—थोडक्या खर्चांत सहज हातीं येण्यासारखा असून, त्याचा सांठा इतका विपुल आहे कीं, त्याला कधींहि खंड पडावयाचा नाहीं, असें ह्मटलेंतरी चालेल. ह्या कच्च्या मालापासून दरसाल १२०,००० टनांपर्यंत ओंतीव लोखंड, रूळ, तुळ्या व कांबीं तयार करण्यास जेवढा मोठा कारखाना असला पाहिजे, तेवढा उभारण्याचें काम चालू असून, कारखान्यांतील लोकांस राहण्याकरितां ह्मणून २०,००० वस्तीचें शहर बांधण्याचे नकाशे वगैरे सर्व तयार झाले आहेत. ह्या अचाट कामाची सर्व व्यवस्था पूर्णपणें हिंदीलोकांच्याच हातीं असून, आरंभाच्या भांडवलाकरितां कंपनीनें २,३१, ७५००० रुपयांचे शेअर काढले आहेत. ह्या कंपनीची **व्यवस्थापक मंडळी** (बोर्ड ऑफ डायरेक्टरस्) सर्व हिंदी लोकांची असून, एकंदर कामाची जुळणी करून देण्याकरितां, त्यांनीं ह्या कामांतले निष्णात लोक अमेरिकेहून आणले आहेत. सरकारानें ह्या कंपनीस रेलवेच्या बाबतींत अनेक सवलती दिल्या असून, लोखंडी सडकांकरितां लागणारे, २,००,००० टन वजनाचे रूळ त्यांच्याचपासून मुदतीमुदतीनें घेण्याचें ठरविलें आहे. हिंदुस्थानांतील धातूंच्या व असल्याच प्रकारच्या इतर कारखान्यांस चांगली स्थिति येणें, ही गोष्ट वरील कारखान्यांच्या भवितव्यतेवरच आणखी पुष्कळ वर्षेंपावेतों अवलंबून असण्याचा संभव आहे; आणि, ह्या कारखान्यास योग्य मदत देण्याच्या मार्गांत हिंदुस्थानसरकारास इंग्लंडाकडून अडचणी येणार नाहींत, अशी उमेद आहे. केवळ हिंदी लोकांच्याच धाडसामुळें निघालेला दुसरा कारखाना ह्मटला ह्मणजे, पश्चिम घांटावर पडणाऱ्या पावसाचें पाणी सांठवून, त्याच्यापासून वीज उत्पन्न करून,

तिच्यायोगानें मुंबईतील बहुतेक गिरण्या चालवावयाची व आणखीहि कामें करून घेण्याची मोठी प्रचंड योजना होय. हाहि कारखाना काढण्याच्या कामीं **टाटा** कंपनीनेंच पुढाकार घेतला आहे.

हिंदुस्थानांतील लहानसान उद्योगधंद्यांसंबंधानें पाहूं जातां, हिंदुस्थानसरकारच्या आश्रयावर ब्रिटिश धंदेवाल्यांचा हक्क आहे, ह्या गोष्टीचा सरकारास विसर पडूं नये, अशा प्रकारच्या सूचना विलायतेंतून हिंदुस्थानसरकारास वाजवीपेक्षां पुष्कळ वेळां होत असतात, असें मला खात्रीपूर्वक सांगण्यांत आलें आहे. जो माल हिंदुस्थानांत सर्वथा किंवा अर्धवट तयार झालेला नसतो, असा सर्व माल हिंदुस्थानसरकारानें विलायत-सरकारच्या (इंडिया ऑफिस), खरेदी करणाऱ्या खात्यामार्फत विकत घेतलाच पाहिजे, अशाबद्दल जे नियम आहेत, त्यांत हल्लींसुद्धां कांहींएक फरक झालेला नाहीं. अशा रीतीनें माल हातीं येण्यांत जी दिरंगाई होते, तिच्यापासूनच मुळीं मोठें नुकसान पोहोंचतें. कारण, ह्या खात्यामार्फत माल मागविला, ह्मणजे तो मिळण्यास सरासरीं नऊ महिने लागतात; आणि, जेव्हां मूळच्या मागणींत कांहीं फेरबदल करण्याचा प्रसंग येतो, तेव्हांतर आणखीहि वेळ लागतो. अलीकडे हिंदुस्थानांतील व्यापारी, व्यापाराच्या साधारण सोईकरितां, नमुन्यांचे इतके मोठमोठाले संग्रह जवळ ठेवितात कीं, दहापैकीं नऊ वेळां, आपणांस कोणता माल पाहिजे, हें सरकारच्या अधिकाऱ्यांस तावडतोब ठरवितां येण्यासारखें असून, त्यांच्या मागण्याप्रमाणें माल हल्लींपेक्षां लवकर हातीं येऊन, शिवाय किंमतहि कमी पडणार आहे. हिंदुस्थानच्या व्यापारास अत्यंत अपायकारक

असे हे जुनाट नियम अद्याप कायम ठेविले आहेत, ते मुख्यत्वें-करून इंग्लंडांतील वजनदार व्यापाऱ्यांच्या मुरवतीखातर आहेत, अशी हिंदीलोकांची समजूत आहे.

हिंदी व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ होत असतांनाच, उधळेपणानें खर्च करून कामांत दिरंगाई करणाऱ्या पब्लिकवर्क्स् खात्याऐवजीं, खासगी लोकांस कंत्राटें देऊन, सार्वजनिक कामें फायदेशीर रीतीनें करून घेऊं लागण्याची वेळहि नजीक येऊन ठेपली आहे, असें दिसतें. ह्या खात्यामार्फत होणारीं कामेंहि महाग पडलींच पाहिजेत. कारण, मोठमोठ्या खर्चाचीं, सार्वजनिक कामें हातीं घेण्यासारखी सरकारी तिजोरीची स्थिति असो वा नसो, पण ह्या खात्याचें अवाढव्य कामगार-मंडळ (एस्टाब्लिशमेंट) सरकारास कायम ठेवावें लागतें; आणि, मोठमोठीं कामें सरकारनें हातीं घेतलीं नाहींत, म्हणजे एस्टा-ब्लिशमेंटच्या खर्चाच्या कामांच्या खरोखर खर्चाशीं बसणाऱ्या प्रमाणामुळें पैशाची मोठी नासाडी होते, असें अनुभवास येतें. कलकत्त्याचें **पोर्टट्रस्ट** व अशाच इतर संस्था दरसाल कोट्या-वधि रुपयांचीं, प्रचंड कामें कंत्राटानें करून घेत असतात. तरमग, सरकारनेंहि तसेंच कां करूं नये, असा प्रश्न विचारण्यांत येत असतो. पाटबंधारे, कालवे वगैरेसारखीं कांहीं कामें पब्लिकवर्क्स् खात्याकडेच ठेवणें वाजवी आहे. परंतु, सर-कारास एखादा बंगला बांधावयाचा असला किंवा एखादा रस्ता करावयाचा झाला, तर तेव्हांसुद्धां ह्याच खात्याकडून तसलीं कामें करून घेणें, हें खरोखर हास्यास्पद आहे.

हिंदुस्थानांतील लोकमताची ह्या वेळेस खरोखर अशी स्थिति आहे कीं, ह्या प्रकारच्या वाजवी देणग्या देण्यांत आल्या

तर त्यापासून लोकांच्या अंतःकरणावर उत्कृष्ट ठसा उमटेल; आणि, सरकारानें आपण होऊनच त्या दिल्या नाहींत, तर वाढविलेलीं, नवीन कौन्सिलें सरकारावर लवकरच वजन पाडून, त्या मिळविण्याचा उद्योग करतील.



भाग २३ वा.

हिंदुस्थान व ग्रेट ब्रिटन यांच्यामधील सर्व प्रकारचे पैशाचे संबंध.

हिंदुस्थानास नवीन राजकीय हक्क देऊन, तेथील राज्यव्यवस्थेची सुधारणा करण्याची, लॉर्ड मोर्ले यांची योजना जेव्हां पुढें आली, तेव्हां निदान त्यांच्याच पक्षांतील कांहीं मंडळीकडून त्या योजनेस जो पाठिंबा मिळाला, तो नुसत्या सामान्य कारणांमुळें मिळाला इतकेंच नाहीं, तर दुराग्रही अशा अधिकारीवर्गाशीं वागण्याच्या बाबतींत, विलायतसरकारास (साम्राज्याचा कारभार चालविणाऱ्या प्रधानमंडळीस) आतां जोर येईल, ह्याच मुख्य हेतूनें, सदरहु लोकांनीं तिला आपलें अनुमोदन दिलें. इंग्लंडांतील **राडिकल** पक्षाच्या कित्येक लोकांच्या दृष्टीनें, हिंदुस्थानसरकार म्हटलें म्हणजे, अशा दुराग्रहीपणाचा केवळ मूर्तिमंत पुतळाच आहे; परंतु, " धर्म करतां कर्म पाठीस लागेल ", ही कल्पना अगोदर कोणाच्याच लक्ष्यांत बहुधा आली नाहीं, असें वाटतें. ब्रिटिश लोकांच्याच हिताकडे लक्ष देऊन, हिंदुस्थानसरकारानें कधीं काळीं हिंदी लोकांचें नुकसान केलें असेल, तर तें फक्त ह्या दोन देशांमधील पैशाच्या संबंधाच्या बाबतींतच काय तें केलें आहे; आणि, अशा बहुतेक प्रसंगीं, हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकाऱ्यांनीं चांगला विचार करून व न्यायास स्मरून सल्ला दिला असला, तरी त्याला अगदींच धाब्यावर बसविण्यांत

आलें आहे. ह्या बाबतींत, आतां पुढें, हिंदुस्थानसरकार जेव्हां जेव्हां विलायतसरकाराच्यापुढें कांहीं गोष्टी विचाराकरितां मांडील, तेव्हां सुधारून वाढविलेल्या कौन्सिलाच्या पाठिंब्यामुळें, त्यांना पूर्वीपेक्षां फारच अधिक महत्त्व येणार आहे.

कलकत्त्यास ह्या कौन्सिलची पहिलीच बैठक चालू असतांना सुद्धां, आपलें धोरण काय आहे, ह्याची त्यांनीं चांगलीच प्रचीति आणून दिली आहे. जमाखर्चाच्या अंदाजपत्रकावरील वादविवादाच्या वेळीं, मुंबई-इलाख्यांतून निवडून आलेले एक सभासद सर विठ्ठलदास ठाकर्सी, ह्यांनीं अगदीं निक्षून सांगितलें कीं, "सांपत्तिक व वसुलासंबंधीच्या महत्त्वाच्या प्रश्नांचा निर्णय करितांना, आपल्या धोरणाच्या तराजूचा कांटा राजकारणांतील प्रसंगांप्रमाणें सरकारास झुकवावा लागतो, अशी बाहेर एकंदर लोकांची समजूत आहे." सरकारी गुप्त बातम्या हिंदुस्थानांत कोणत्याना कोणत्यातरी मार्गानें बाहेर फुटत असतात; आणि, संदरहु अंदाजपत्रकावर वादविवाद होत असतांना, त्यासंबंधानें सर विठ्ठलदास जेव्हां पुढील वाक्य बोलले, तेव्हां आपण कशाविषयीं बोलत आहों, हें त्यांना माहीत होतें:— "लोकांचा साधारण समज असा आहे कीं, हिंदुस्थानसरकारचे हातपाय बांधले गेले नसते, तर हल्लीं ज्या रीतीनें जकात वाढविण्याची सूचना आली आहे, त्यापेक्षां, बाहेरून येणाऱ्या सर्वच मालावरील किंवा साखरेवरील जकात वाढविण्याची कल्पना हिंदुस्थानसरकारास पसंत पडली असती. ह्या कौन्सिलांतील बहुतेक सर्वच बिनसरकारी सभासद व देशांतील लोक, ह्यांचें मत हल्लीं सुचविलेल्या जकातीच्या वाढीविरुद्ध असतांहि, त्याला अमर्दीच धाब्यावर बसविण्यांत येत आहे."

सुधारलेल्या कौन्सिलापुढें जमाखर्चाचें अंदाजपत्रक ठेवण्याचा हिंदुस्थानसरकारास पहिलाच प्रसंग आला, त्यावेळीं, आपल्यापुढें जो खर्डा ठेवण्यांत आला आहे, तो मूळ हिंदुस्थानसरकारच्या फडनिशीखात्यानें तयार केलेल्या अंदाजपत्रकाचा नसून, इंग्लंडांतील राजकीय पक्षांच्या अस्तित्वामुळें, तिकडील बातबेत पाहून, स्टेटसेक्रेटरी–साहेबानीं मूळच्या पत्रकांत आपणास पाहिजे तशी फिरवाफिरव करून, तें हिंदुस्थानसरकारच्या फडनिशीखात्यावर लादून दिल्यामुळेंच, असें कोणास पसंत न पडणारें अंदाजपत्रक ह्या कौन्सिलापुढें विचाराकरितां आलें आहे, असा हिंदी सभासदांचा समज व्हावा, ही खरोखर दुर्दैवाची गोष्ट आहे. तसेंच, जमाखर्चांतील तूट भरून काढण्याकरितां, ह्या अंदाजपत्रकांत जी तजवीज करावी लागली होती, तिचें कारण मुख्यत्वेंकरून अफूच्या उत्पन्नास बसलेला खो होय. आणि, ही जी उत्पन्नांत तूट पडली होती, ती हिंदुस्थानाच्या फायद्यातोट्याचा बहुतेक मुळींच विचार न करितां, इंग्लंडनें चीनदेशाशीं अफूच्या व्यापाराच्या बाबतींत केलेल्या करारमदारांमुळेंच पडली होती, हीहि दुर्दैवाचीच गोष्ट होय. तीन वर्षांमागें, सर एडवर्ड बेकर हे सरकारचे मुख्य फडनीस असतांना, त्यांनीं असें आश्वासन दिलें होतें कीं, नवीन कोणताहि कर न बसवितां, अफूच्या व्यापारासंबंधाचें सरकारचें नवीन धोरण सिद्धीस नेलें जाईल. परंतु, हिंदुस्थानांतील लोकांच्या मनाला असें पक्कें वाटत आहे कीं, ब्रिटिश लोकांच्या नीतितत्वांचें समाधान होण्यासाठीं, पैशाचें जें नुकसान झालें आहे, त्याचा सर्व बोजा हिंदुस्थानची रयत व हाँगकाँग व शिंगापुर येथील त्यांचेच जातभाई, ह्यांच्याच डोक्या-

वर बसविला नसता, तर सार्वभौम सरकारनें अफूच्या व्यापाराच्या बाबतींत, चीनदेशाशीं जे कांहीं करारमदार केले आहेत, ते करण्याच्या स्तुत्य हेतूबद्दल, इंग्लंडची मोठीच प्रशंसा झाली असती. वरिष्ठ कौन्सिलनें आपल्या टीकेचा रोख केवळ गत गोष्टीवरच ठेविला नव्हता. पुढें घडून येणाऱ्या गोष्टीबद्दल, सर विठ्ठलदास ठाकरसीनीं पुढील उद्गार जेव्हां अगदीं स्पष्टपणें काढले, त्यावेळीं सर्वच हिंदी व पुष्कळ सरकारी सभासद त्यांच्या बाजूला असावेतः— " आमचें ओझें उचलण्यास आमची तयारी आहे. मात्र, वसूल वाढविण्याचे मार्ग पसंत करण्याची देशाची देशाला अधिक स्वतंत्रता असूं द्यावी, एवढेंच आमचें मागणें आहे. कोणत्या जिनसांवर जकात घ्यावी व कोणते कर बसवावे, हें ठरविण्याच्या कामीं ह्या कौन्सिलाचा खराखुरा हात असला, तर त्यापासून सरकारच्या कामास कसा अपाय होईल, हें मला समजत नाहीं. "

अशा प्रश्नांच्या बाबतींतच ह्यापुढें सुधारलेल्या कौन्सिलच्या मतामुळें, हिंदुस्थानसरकारापेक्षां विलायतसरकारासच वारंवार अडचणींत पडावें लागणार आहे. आणि, इंग्लंडच्या प्रधान-मंडळाच्या हुकुमाप्रमाणें, हिंदुस्थानच्या तिजोरीवर कित्येक होम चार्जेसचा बोजा घालण्यास हिंदुस्थानसरकारास मोठ्या नाखुषीनें वारंवार संमति द्यावी लागली आहे, त्यासंबंधानें सुधारलेल्या कौन्सिलाचें मत विलायतसरकारास ऐकून घेण्याची पाळी आली नाहीं, तर मला फारच आश्चर्य वाटेल. ब्रिटिश सोजिरांच्या वाढलेल्या खर्चासाठीं ह्मणून, दरसाल ४५ लक्ष रुपयांचा जो नवीन बोजा हिंदुस्थानच्या डोक्यावर बसविला आहे, त्यासंबंधानें, " निराधार अशा हिंदुस्थानच्या तिजोरीवर डल्ला

मारण्याचा लुटारू लढाईखात्यानें हा पुनः प्रयत्न केला आहे," असें फक्त हिंदी राष्ट्रीय पक्षाचींच वर्तमानपत्रें कायतीं ह्मणत असतात, असें नाहीं. आणि, लॉर्ड किचनेरसाहेबांच्या प्रयत्नामुळें, देशी शिपायांचा जरी पगार वाढला आहे, तरी हिंदी रयतेच्या पैशानें, लार्ड किचनेर यांच्याच कारकिर्दीत, टॉमी आटाकिन्स (इंग्रज सोलजर) यांच्यासाठीं मोठ्या प्रशस्त व सुखकर अशा बराकी बांधण्यांत आल्या असून, देशी शिपायांस मात्र अझूनहि त्या मानानें अगदींच गलिच्छ अशा जागेंत रहावें लागतें, ह्या गोष्टीवरून त्यांच्या (देशी शिपायांच्या) व त्यांच्या स्नेही मंडळीच्या मनांत सरकाराविषयीं वाईट विचार आल्याशिवाय राहत नाहींत. ज्या लष्करी मोहिमांमध्यें हिंदुस्थानचा प्रत्यक्ष हितसंबंध नसून, केवळ विलायतेंतील लष्कराची गैरव्यवस्था असल्याकारणानें, त्यांच्या हातून लढाईच्या कामाची निभावणी होत नाहीं, असें दिसून आल्यामुळें, हिंदुस्थानांतलें लष्कर पाठवावें लागलें, त्या मोहिमांचा सर्व खर्च, अगदीं सढळ हातानें, हिंदुस्थानच्या बोकांडीं बसविण्यांत आल्याबद्दल, हिंदुस्थानसरकारानें नेहमी तक्रारीहि केल्या आहेत, ही गोष्ट गुप्त नाहीं. पुढील मत कोणा हिंदी राजकारणी मनुष्यानें दिलेलें नाहीं, तर खुद्द हिंदुस्थानसरकारनें दिलेलें आहेः—

हिंदुस्थानांतील आपलें राज्य राखण्यासाठीं, जितक्या मोठ्या सैन्याची आवश्यकता वाटते, तितकें सैन्य सार्वभौमसरकार हिंदुस्थानांत ठेवून, त्याचा खर्च ह्या देशाच्या तिजोरींतून घेतें; साम्राज्याच्या कामासाठीं हें सैन्य बाजूस राखून ठेविलें आहे, असें मानून, वेळ पडेल तेव्हां त्याचा उपयोग करून घेण्याची सार्वभौमसरकारास संवय झाली आहे; हिंदुस्थानच्या स्वखर्चीस ठेवलेल्या यूरोपियन लष्करापैकीं कांहीं पलटणी

साम्राज्याच्या लढाया मारण्याकरितां बाहेर नेगें जेव्हां जेव्हां जरूर पडेल, किंवा असें करण्यापासून सरकारची सोय असेल, तेव्हां तेव्हां त्या पलटणी हटकून नेण्यांत आल्या आहेत; आणि शिवाय, दुसरी गोष्ट अशी कीं, ज्या लढायांशीं हिंदुस्थानसरकारचा अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नव्हता, असें ह्मटलें तरी चालेल, अशा परदेशांतील लढायांच्या प्रसंगीं मदत करण्याकरितां, हिंदी लष्कराच्या खर्चासाठीं इंलंद एक पै देखाल देत नसतांहि, सार्वभौमसरकारानें ह्या लष्कराच्या तुकड्या पाठविण्यांत कांहीं कसुर केली आहे, अस नाहीं.

तथापि, नवीन कौन्सिलें अस्तित्वांत येऊन, त्यांचें वजन पूर्वीपेक्षां फारच वाढलें असल्यामुळें, इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामधील एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न मोठ्या जोरानें पुढें येणार आहे, व त्याच्यापुढें हे वरील सर्व प्रश्न अगदींच फिके पडणार आहेत. कारण, हिंदुस्थानांत येणाऱ्या परदेशी मालाच्या चढाओढीपासून येथल्या उद्योगधंद्यांचा बचाव करण्याकरितां, आह्मांस पाहिजेत तशा जकाती वगैरे बसविण्याचा अधिकार आमच्याच हातीं असला पाहिजे, अशी मागणी ह्या कौन्सिलांकडून होऊं लागली, ह्मणजे जकाती वगैरे बसवून, येथलें सरकारी उत्पन्न वाढविण्याच्या बाबतींत, इंग्लंडनें आजपर्यंत हिंदुस्थानाशीं जें धोरण ठेविलें आहे, त्यासंबंधानें सर्वच बाजूंनीं पुनः विचार करावा लागणार आहे. संरक्षक (व्यापाराचें वगैरे संरक्षण करणाऱ्या) जकाती बसविण्याची इच्छा हिंदुस्थानास आतां नवीनच होऊं लागलेली नाहीं, ही गोष्ट लक्ष्यांत ठेविलीच पाहिजे. आह्मांला (इंग्रज लोकांना) आवडो किंवा न आवडो; आह्मी खुल्या व्यापाराच्या पक्षाचे असूं, अथवा परदेशी मालावर जबर जकात बसवून व्यापाराची सुधारणा करूं पाहणाऱ्या पक्षाचे असूं; तथापि, बहुतकरून प्रत्येक हिंदी मनुष्य, तात्विक दृष्ट्या नसला तरी

अगदीं अंतःकरणापासून, **संरक्षण**वादीच आहे, ही गोष्ट आह्मांला विचारांत घेतलीच पाहिजे. संरक्षक जकाती बसविण्यासंबंधाच्या विषयाला जर आपण आपल्या कार्यक्रमांत प्रमुख-स्थान दिलें, तर राजकीय बाबतींत आपणांस मदत करणाऱ्या, इंग्लंडमधील आपल्या मित्रांचीं मनें दुखावतील, ह्या भीतीमुळें **हिंदी राष्ट्रीय सभेनें** हा विषय हातीं घेण्याच्या कामीं आजपर्यंत माघार घेतली आहे. विलायतेंतील **राडिकल** पक्षाच्या लोकांना जी गोष्ट पसंत पडणार नाहीं व जिच्यामुळें त्यांना आपला राग येईल, अशी गोष्ट सार्वजनिकरीत्या न बोलण्याची खबरदारी मि० सुरेंद्रनाथ बानरजीसारखे राजकारणपटु लोक घेत असतात, तरीदेखील, मागें १९०२ सालींच, ह्मणजे **कांग्रेसच्या** १८ व्या सभेचे ते अध्यक्ष होते त्यावेळीं, त्यानीं आपल्या आरंभींच्या भाषणांत असें सांगितलें कीं, " आमच्या देशाच्या राज्यकारभारांत आमच्या मतास मान मिळाला, तर आह्मीं कोणतें धोरण स्वीकारूं, ह्याबद्दल मुळींच शंका नाहीं. यत्किंचित्हि न कचरतां, आह्मी संरक्षणपद्धतीचें धोरण स्वीकारूं. " **स्वदेशीची** राजकीय चळवळ सुरू होऊन, सरकारशीं दोन हात करण्याचा उद्योग चालू झाल्यापासून, ह्या मतास अधिकच जोर आला आहे. बंगालच्या फाळणीविरुद्ध तक्रार ह्मणून **बहिष्काराचें** व्रत स्वीकारणाऱ्या लोकांस इंग्लंडांतील **राडिकल** पक्षाचे लोक सहानुभूति दाखवित असतात. परंतु, इंग्रज कारखानदारांच्या अतिशय लोभीपणाचें **अनियंत्रित व्यापार** हें एक सर्वांत मोठें स्वरूप असून, त्या लोभीपणापासून हिंदुस्थानचें सांपत्तिकदृष्ट्या संरक्षण करण्यास दुसरीं कोणतींच साधनें नसल्यामुळें, हिंदुस्थानच्या लोकांनीं बहिष्काराचें व्रत अगदीं कडकडीत रीतीनें पाळून व

आणखी अशाच प्रकारांनीं **स्वदेशी** अमलांत आणून, देशाचा बचाव केला पाहिजे, असा हिंदी लोकांच्या सभांतून नेहमीं उपदेश करण्यांत येत असतो, ही गोष्ट इंग्लंडांतील **राडिकल** पक्षाच्या लोकांनीं लक्ष्यांत ठेविली, तर बरें होईल. पुष्कळ वेळां अगदीं मन मोकळें करून बोलण्याचा गुण लाला लजपतरायांच्या अंगीं आहे. ग्रेटब्रिटन व आयर्लंडमधील मतदारांच्या रूपानें दृग्गोचर होणाऱ्या ब्रिटिश राष्ट्राच्या न्यायबुद्धीवर ज्यांचा विश्वास आहे, व इंग्रजी मालावर बहिष्कार घालून त्यांचीं (मतदारांचीं) मनें दुखविण्यास जे भितात, अशा भल्या लोकांस उद्देशून **लालाजी** एका प्रसंगीं ह्मणाले:—

ब्रिटिश राष्ट्राचे जर कोणीं स्थूलमानानें दोन वर्ग पाडले, तर ते **कारखानदार** व **कामकरी** असे पडतील. आपल्या मालाची विक्री होऊन तो खपण्यासाठीं, हिंदुस्थानचा बाजार खुला ठेवण्यामध्यें ह्या दोन्ही वर्गांचा फायदा आहे. हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारीवर्गानें अन्याय केल्यास, त्याबद्दल ज्यांच्याजवळ आपणांस दाद मागतां येईल, असे आपले केवळ मित्र ह्मणजे वरील मंडळीच होय, असें ह्मणतात. आह्मांला असें सांगण्यांत येत असतें कीं, ह्या लोकांचीं मनें तुह्मीं दुखविलींत, कीं तुमचा नाश झाला ह्मणून समजाच. ज्या फक्त मंडळीलाच तुह्मांस मदत करितां येईल व जे तुमचीं गाऱ्हाणीं ऐकण्यास तयार आहेत, त्यांची मर्जी तुह्मी घालवाल. आतां, तुह्मी बहिष्कार घाला किंवा घालू नका; पण, हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांस तेजी आणण्याच्या कोणत्याहि चळवळीमुळें, ब्रिटिश मतदारांची मर्जी खप्पा होण्याचा संभव आहे. ब्रिटिश मतदार ह्मटला ह्मणजे चांगला शिकलेला प्राणी आहे; तो धंद्यामध्यें मोठा चणचणीत असून, एखाद्या गोष्टीपासून त्याचें खरोखर नुकसान होण्यासारखें असून दुसऱ्याचा फायदा असेल, तर अशा मनुष्यानें आपली बाजू कितीहि सजविली किंवा सजवून त्याच्यापुढें मांडण्याची व्यवस्था केली, तर त्यामुळें न फसतां, आपल्या पदरास खार लागण्याचा कसा संभव आहे, ही गोष्ट चटकन् त्याच्या ध्यानांत येते. **स्वदेशीच्या** चळवळींतून **बहिष्कार** वजा केला, तर बाकी राहिलेल्या गोष्टीमुळें तो फसला जाण्याचा

संभव नाहीं. कारण, खरें म्हटलें तर, कार्य साधण्याच्या हेतूनें व व्यवस्थित रीतीनें काम केलें, तर ह्या दोन्ही गोष्टी एकच आहेत.

सर्व वर्गांच्या आणि सर्व प्रकारच्या राजकीय मतांच्या सुशिक्षित हिंदी लोकांच्या दृष्टीनें, **स्वदेशी** ह्या शब्दाचा अर्थ कोणत्याना कोणत्यातरी प्रकारचें, **संरक्षक** जकातींचें **धोरण** असाच होतो, ही गोष्ट वरिष्ठ कौन्सिलामध्यें देखील उघड झाली. हिंदुस्थानसरकारचे फडणवीस, सर **फ्लीटवुड वुइल्सन**, हे स्वतः **स्वदेशी**चे गोडवे गाण्यास तयार झाले. परंतु, जरी अशी सहानुभूति दाखविण्यांत आली, तरी ना० चिटणविसांनीं माघार न घेतां, त्यांना जें कांहीं सांगावयाचें होतें, तें त्यांनीं सांगितलेंच. मि. चिटणवीस हे एक हिंदी सभासद असून, हिंदुस्थानच्या सांपत्तिक प्रश्नांचा विचार करणाऱ्या हिंदीलोकांपैकीं शेंकडा ९९ लोकांस, व हिंदुस्थानांतील सरकारी व बिनसरकारी इंग्रजलोकांपैकीं पुष्कळांस जीं मतें मान्य आहेत, त्यांचाच ना० चिटणविसांच्या भाषणांत समावेश असल्याकारणानें, त्यांचें भाषण येथें उतरून घेणें वाजवी आहे:—

हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांबद्दल त्यांच्या (फडणविसांच्या) मनांत प्रेम आहे, म्हणून लोकांनीं (देशानें) त्यांचे उपकार मानले पाहिजेत. "**स्वदेशी** चांगली आहे, असें मला वाटतें. आणि जे फेरफार सुचवून मीं कौन्सिलपुढें ठेविले आहेत, त्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांस जर कांहीं उत्तेजन मिळालें, तर मला तरी मुळींच वाईट वाटणार नाहीं." खुल्या व्यापाराचें तत्व प्रतिपादन करून, तें निश्चयानें अमलांत आणणारा इंग्लंडसारखा देश पृथ्वीच्या पाठीवर दुसरा नाहीं. अशा देशावर सांप्रत हिंदुस्थान अवलंबून असतांना, सरकारच्या फडणविसांनीं इतकें सुद्धां बोलण्यास तयार व्हावें, ही कांहीं लहान गोष्ट नाहीं ... ... आतां, सरकार–उत्पन्नाच्या बाबतींत पाहिजे तशी व्यवस्था करून घेण्यास हिंदुस्थानला मोकळीक नसून, उद्योगधंद्यांच्या संबंधाचें आपलें धोरण ठरविण्याच्या कामीं हिंदुस्थान–सरकारला [illegible]

आंखून देण्यांत आली आहे, ह्याबद्दल आह्मांस वाईट वाटतें. ह्या देशाच्या हिताकरितां सरकारला संरक्षक जकाती तात्काळ बसवितां येत नाहींत, हीहि गोष्ट आमच्या मनाला लागून राहिली आहे. कलाकौशल्याच्या बाबतींत उन्नतावस्थेस पाहाचलेल्या देशांत अनियंत्रित व्यापारापासून कितीहि फायदा असला, तरी बाल्यावस्थेंतील उद्योगधंद्यांचा उत्कर्ष होण्यासाठीं, संरक्षक जकाती बसविण्याची आवश्यकता आहे, हें कबूल केलेंच पाहिजे. खुल्या व्यापाराचे जे मोठे वाली आहेत, त्यांना सुद्धां ह्या गोष्टीचा राग येत नाहीं. हिंदी उद्योगधंदे बाल्यावस्थेंत आहेत, ह्याबदल मुळींच वाद असूं शकणार नाहीं. तर मग, आपल्या निकृष्ठावस्थेंतील उद्योगधंद्याचें विशेष रीतीनें संरक्षण केलें जावें, अशी हिंदुस्थाननें कां मागणी करूं नये? ज्या देशांतील लोक अचाट उद्योग करून, आपल्या धंद्यांचा मोठा उत्कर्ष करित आहेत, अशी प्रसिद्धि आहे, तेथें देखील संरक्षक जकाती बसविण्यांत आलेल्या आहेत. अमेरिकेंतील **संयुक्त संस्थानें व जर्मनी** हे देश निखालस **संरक्षणवादी** आहेत. ब्रिटनच्या वसाहतींनीं संरक्षक जकाती बसविण्याचें धोरण धरलें असून, ... त्यांचा हेतु आपल्या धंद्यांचें संरक्षण करण्याचा आहे. व त्यांनीं ह्या जकाती अशा रीतीनें बसविल्या आहेत कीं, त्यापासून त्यांचा इष्ट हेतु तडीस जात आहे. हिंदुस्थानांतील आयात मालावर जशा केवळ उत्पन्नाकरितांच जकाती बसविल्या आहेत, तशा त्या नाहींत. अशा परिस्थितींत, संरक्षक जकाती बसविण्याची मागणी हिंदी लोकांनीं केल्यास, ती गैरवाजवी आहे, असें ह्मणतां येणार नाहीं. उद्योगधंद्यांची वृद्धि होणें, ह्या गोष्टींचें साम्राज्याला फारच महत्व आहे, व संरक्षक जकाती बसविण्याकडे लोकांचा जो ओढा आहे, तिकडे प्रजावात्सल्यानें प्रेरित होऊन सरकारनें लक्ष पुरविलें पाहिजे. एक वसुलाची **बाब** ह्मणून आयात मालावर जकात बसविण्याची वहिवाट असून, तें तत्वहि मान्य झालेलें आहे. ... ... आणि, असें असतांहि, ३½ टक्यासारखी, लहानशी जकात इकडे येणाऱ्या कापसाच्या कापडावर बसविल्याबरोबर, हिंदी लोकमताला धाब्यावर बसवून, तितकीच जकात इकडे देशांतल्या देशांत तयार होणाऱ्या मालावरहि बसविण्यांत आली आहे. आणि, हिंदुस्थानच्या स्टेटसेक्रेटरीसाहेबांनीं अगदीं अलीकडे जें सांगितलें आहे, त्यावरून ह्या अन्यायांचें परिमार्जन होण्याची सर्व आशा आतां नष्ट झाली आहे.

हिंदुस्थानांतील गिरण्यांत तयार झालेल्या कापसाच्या कापडावर जी ही एक्साइज ड्युटी बसविण्यांत आली आहे, त्यामुळें खुल्या व्यापाराच्या कामास जितका धक्का बसला आहे, अथवा ब्रिटिश राजसत्तेस त्यामुळें जसा कायमपणानें काळिमा आला आहे, तसा दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें आलेला नाहीं. कारण, हिंदुस्थानांतील इंग्रजी राजसत्ता न्यायाच्या तत्वांवर स्थापन झाली आहे, असें जें इंग्रज लोकांचें ह्मणणें आहे, व एकंदरीनें जें ह्मणणें अगदीं वाजवी आहे, त्यावरील हिंदी लोकांचा विश्वास डळमळण्यास ही वरील गोष्ट जितकी कारणीभूत झाली आहे, तितकी दुसरी कोणतीच नाहीं. ब्रिटिश लोकांच्या, अनियंत्रित व्यापाराच्या तत्वापुढें मान वांकवून, सन १८८० च्या नंतर लौकरच, मीठ व दारू ह्या जिनसांखेरिज, इतर आयात मालावरील जकाती हिंदुस्थानसरकारनें शेवटी उठविल्या. हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या मीठ व दारू ह्या दोन्ही पदार्थांवर आंतली (एक्साइज) जकात होतीच. तथापि, १८९४ सालीं, वसुलाच्या तुटवड्यामुळें, कापडाखेरिज इतर बहुतेक आयात मालावर, जुन्या पद्धतीप्रमाणें ५ टक्के जकात हिंदुस्थान-सरकारास पुनः बसविणें भाग पडलें. परंतु, त्या वर्षाच्या अखेरीस, कापसाच्या कापडावरहि अशी जकात बसविण्यांत आली. आणि, विलायतेहून नेट लागल्यामुळें, लॉर्ड एल्जिनसाहेबांच्या कारकिर्दींत, हिंदुस्थानच्या गिरण्यांत तयार होणाऱ्या कापसाच्या कापडावर, समतोल करणारी ५ टक्यांची जकात बसविण्याची गोष्ट हिंदुस्थानसरकारांस कबूल करावी लागली. ह्या बाबतींत बराच कडाक्याचा पत्रव्यवहार झाल्यानंतर, परदेशांतून इकडे येणाऱ्या कापडावरील जकात ३½ टक्के करून, तितकीच जकात


हिंदी कापडावरहि बसविण्याबद्दल, १८९६ च्या फेब्रुवारी महि-न्यांत, हिंदुस्थानसरकारचें मन वळविण्यांत आलें. मात्र, हिंदी गिरण्यांत तयार होणाऱ्या सुतावर मुळींच जकात बसवावयाची नाहीं, असें ठरलें. ही व्यवस्था अद्याप चालू आहे.

आतां, चुकीची असो वा बरोबर असो; परंतु, प्रत्येक हिंदी माणसाची अशी समजूत आहे कीं, हिंदुस्थानच्या मालावर ही जी एक्साइज ड्युटी लादण्यांत आली आहे, ती विलायतेंतील कापडाच्या गिरणीवाल्यांच्या आपमतलबी फायद्यासाठींच असून, तिकडील राजकीय पक्षांच्या आग्रहामुळेंच ती बसविण्यांत आली आहे. व्हाइसरायसाहेबांच्या कायदे-कौन्सिलांतील एका हिंदी सभासदानें एका प्रसंगीं टोंचून बोलल्याप्रमाणेंच, प्रत्येक हिंदी माणसास असें वाटतें कीं, जोंपर्यंत लांकेशायरमधून पार्लमेंटांत ६० सभासद निवडून येतील, तोंपर्यंत ही एक्साइज ड्युटी कायम ठेवण्यास ब्रिटिश सरकारपाशीं नेहमीं ६० कारणें तयार असतील. ३½ टक्के जकात "केवळ क्षुल्लक आहे," ह्या इंग्रज लोकांच्या ह्मणण्यास हिंदी लोकांचें असें उत्तर आहे कीं, मरहुम **जमशेटजीशेट टाटा** यांच्या आग्रहावरून, आंकडेवगैरे पाहून जी मोठ्या मेहनतीनें चौकशी करण्यांत आली, तीवरून असें सिद्ध होतें कीं, हिंदुस्थानच्या हल्लींच्या स्थितींत, कापडावरील ही ३½ टक्क्याची जकात ह्मटली ह्मणजे, कापड विणण्याच्या गिरण्यांत घातलेल्या भांडवलावर ७ टक्के जकात बसविण्यासारखें आहे. ह्या गिरण्यांत होणाऱ्या फायद्याचें मान नेहमींच हेलकावे खात असतें, व यंत्रांच्या मोडतोडीमुळें होणारें नुकसानहि बरेंच असतें. ही जकात वास्तविक इंग्रज लोकांच्याच खिशांतून येते, हेंहि ह्मणणें असेंच चुकीचें आहे. लोकांचें असें ह्मणणें आहे कीं, हिंदी कापडाच्या

गिरण्यांतील भांडवल इंग्रजलोकांनीं घातलेलें नाहीं, तर तें बहुतेक सर्वथैव हिंदी लोकांचें आहे; व त्याच्या बऱ्याच भागाचे शेयरस श्रीमंत नाहींत अशाच हिंदी लोकांनीं विकत घेतलेले आहेत. पैशाच्या व जकातीच्या बाबतींत इंग्लंडचे हिंदुस्थानाशीं जे संबंध आहेत, त्यांचा विचार करण्याच्या कामांत, इंग्लंडमधील दोन्ही राजकीय पक्षांकडून जें वर्तन होत असतें, त्यावरून ते दोघेहि एकाच माळेचे मणी आहेत, असें ह्मणावें लागतें. त्याचप्रमाणें, इंग्लंडांतील, जकातींची सुधारणा करूं इच्छिणाऱ्या पक्षानें अनियंत्रित व्यापारपक्षापेक्षां हिंदुस्थानच्या हितसंबंधाच्या प्रश्नाचा विचार करण्याची बुद्धि अधिक दाखविली आहे, असें साधारणपणें ह्मणतां येत नाहीं. ह्या जकातींच्या प्रश्नाचा हिंदुस्थानाशीं कसा संबंध पोहोंचतो, हें "हिंदुस्थान व साम्राज्य" अशा मथाळ्यानें, मुंबईच्या कायदे–कौन्सिलांतील मि० एम्. डी. पी. वेब ह्या नांवाच्या एका सभासदानीं एक लेख लिहून उत्तम रीतीनें दाखवून देण्यापूर्वी, साम्राज्यांतील देशांस जकातींच्या सवलतीचा फायदा देण्याच्या आपल्या योजनेंत, ह्या सुधारणेच्छूंपैकीं फारच थोडे लोक हिंदुस्थानास हिशेबांत धरित होते, असें दिसतें. ह्मणून, ह्या प्रश्नाकडे मीं लोकांचें लक्ष वेधलें आहे, ही गोष्ट कोणत्याहि प्रकारच्या पक्षपातिपणामुळें मीं केली आहे, अशी शंका कोणी घेणार नाहीं, अशी मला आशा आहे. माझी अशी समजूत आहे कीं, ब्रिटिश साम्राज्याशीं हिंदुस्थानचा संबंध कोणत्या प्रकारचा राहणार, हें ठरविण्याच्या कामांत ह्या वरील प्रश्नाला आतां लवकरच खात्रीनें फार महत्त्व येणार आहे— किंबहुना, त्यामुळेंच ह्या गोष्टीचा कायमचा निकाल लागणार आहे. [illegible]

ह्या वर्षी मी हिंदुस्थानांत परत आलों, तेव्हां प्रथम ज्या गोष्टींकडे माझें लक्ष गेलें—आणि तें मोठ्या जोरानें गेलें—त्यांपैकीं एक अशी होती कीं, हिंदुस्थानचा व्यापार व उद्योगधंदे यांचा विस्तार करण्याच्या उद्देशानें, सांपत्तिक बाबतींत नवीन धोरण स्वीकारून, तें मोठ्या नेटानें व व्यवस्थितपणानें अमलांत आणण्याविषयीं, सर्व हिंदी लोकांची मोठ्या निकरानें सरकाराकडे मागणी होती. ही मागणी अशी आहे कीं, हिंदुस्थानांतील पुष्कळच इंग्रजी अधिकाऱ्यांना ती अगदीं पसंत असून त्याप्रमाणें घडून यावें, अशीहि त्यांची इच्छा आहे; आणि ह्या प्रश्नासंबंधानें लोकांत जी जागृति झाली आहे, ती पुष्कळ अंशीं त्यांच्याच प्रयत्नाचें फळ आहे. मीं वर जी थोडक्यांत दिशा दाखवून दिली आहे, त्याप्रमाणें ह्या प्रश्नाचा निकाल लावण्याकडे हिंदुस्थानसरकारची तात्काळ व अंतःकरणपूर्वक प्रवृत्ति होईल, ह्यांत बिलकूल शंका नाहीं. आतां, सर्व साम्राज्याचा कारभार करणारें विलायत सरकार व सर्वसत्ताधारी ब्रिटिश-जनता यांच्याकडून हिंदुस्थानसरकारास ह्या कामीं हातभार लागेल काय? अथवा, ह्या कामीं हवें तें धोरण स्वीकारण्याची हिंदुस्थान सरकारला त्यांच्याकडून मोकळीकतरी मिळेल काय? असें जर झालें नाहीं, तर परदेशी मालाच्या चढाओढीपासून देशांतील उद्योगधंद्यांचा बचाव व्हावा ह्मणून, निव्वळ संरक्षक जकातींचा भोंवतीं तट बांधण्याची उघड उघड मागणी सर्व हिंदी लोक आतांप्रमाणेंच मोठ्या आवेशानें व एकमतानें करूं लागले असतां, तिचा विचार करण्याची पाळी आमच्यावर खास येईल. आणि, अशी मागणी नाकारल्यास, ह्या गोष्टींचा फायदा राजकीय चळवळे आमच्याविरुद्ध कसा करून घेतील, अथवा हिंदुस्थानांतील अत्यंत

पुराणप्रिय व वजनदार लोकांपैकीं कांहीं लोक राजद्रोहाची चळवळ मोठ्या जोरानें करणाऱ्या पक्षाच्या बाजूला कसे वळतील, हें सांगत बसण्याचें मला कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. कारण, प्रजेविषयीं प्रेम दाखविण्यानें राज्यकारभाराच्या उत्कृष्टपणांत जरी थोडेंसें व्यंग पडलें तरी हरकत नाहीं, असें कित्येक इंग्रज लोक नेहमीं सांगत असतात; व त्यांना असें वाटत असतें कीं, हिंदी-लोकांविषयीं सहानुभूति कायती आपल्याच मनांत वसत आहे. आणि, अशा त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें आम्ही वागण्यास तयार झालों, तर मग खुल्या व्यापाराचें धोरण स्वीकारिल्यानें, सांपत्तिक बाबतींत व्यवस्था अधिक चोख ठेवितां येते, ह्या कल्पनेच्या मागें लपून, वरील सांपत्तिक प्रश्नाची उडवाउडव कशी करितां येईल? "हिंदी लोकांच्या कल्पनांप्रमाणेंच हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविला पाहिजे," ह्या तत्वास, माझी नम्रपणें पण पूर्णपणें, संमति आहे. आणि, ह्या तत्वाप्रमाणें राज्यकारभार करण्याचा जर आम्ही प्रयत्न करूं लागलों, तर जकाती, कर वगैरे बसवून सरकारी उत्पन्नाची व्यवस्था करणें, ह्या बाबतींत हिंदुस्थानाला पूर्ण स्वातंत्र्य न देण्यास आह्मांला कोणतीं कारणें दाखवितां येतील? वास्तविक ह्मटलें तर, राजकीय बाबतींपेक्षां सांपत्तिक बाबतींतच आह्मांला पूर्ण स्वातंत्र्य पाहिजे, अशी लोकांची खरी खरी व बहुतेक सर्व ठिकाणांहून झालेली मागणी आहे.



भाग २४ वा.

हिंदीलोकांचें साम्राज्यांतील स्थान.

हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचे प्रश्नच मुळीं सोडविण्यास बिकट आहेत. परंतु, ह्यांहिपेक्षां कठिण असे कित्येक प्रश्न उद्भवतात, ते साम्राज्याच्या इतर भागांशीं हिंदुस्थान व त्यांतील लोक ह्यांचे जे संबंध आहेत, त्यामुळेंच उद्भवतात. गेल्या थोड्या वर्षांत, ह्यांपैकीं एका प्रश्नाला फारच भयंकर स्वरूप आलें असून, साम्राज्याचा कारभार चालविणाऱ्या सरकारच्या किंवा ब्रिटिशजनतेच्या लक्ष्यांत ही गोष्ट बरोबर रीतीनें खास आलेली नाहीं, असें दिसतें.

हिंदी मजुरांशीं करार करून, त्यांना नाताळांत नेण्याचा प्रघात बंद करून टाकण्यासंबंधाचा आपला ठराव पुढें मांडताना मि० गोखले ह्मणाले कीं, "दक्षिण आफ्रिकेंत हिंदी लोकांचा जो एकसारखा छळ होत आहे, त्यामुळें सर्व हिंदी लोकांच्या मनांत इतका त्वेष उत्पन्न झाला आहे कीं, तसा आमच्या हयातींततरी दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीमुळें उत्पन्न झालेला नाहीं, असें जें मी ह्मणतों, तें निव्वळ सत्य ह्मणून मी आपल्यापुढें मांडित आहें, असें मला वाटतें. आणि, लोकांच्या मनांत असा त्वेष उत्पन्न झाला असूनहि, ब्रिटिश राज्याच्या अति– उत्तम हितचिंतकांस निरुपायानें हताश होऊन बसावें लागलें आहे.

व्हाइसरायांच्या कायदेकौन्सिलांतील ज्या ज्या ह्मणून हिंदी सभासदानें ह्या प्रश्नावरील वादविवादांत भाग घेतला, त्यानें

आपल्या धर्माचा, वर्णाचा किंवा जातीचा विचार मनांत न आणितां, मि० गोखले यांच्या ह्मणण्यास दुजोरा दिला; आणि, ह्या ठरावावर जर कां मतें घेण्यांत आलीं असतीं, तर सर्व हिंदी सभासदांच्या एकमताचा जोर त्याला मिळून, शिवाय प्रत्येक सरकारी आणि बिनसरकारी इंग्रज सभासदाची पंसतीहि त्याला मिळाली असती. ह्या बैठकींत जे दुसरे ठराव पुढें आणण्यांत आले होते, त्यांपैकीं कोणत्याहि ठरावास असें पुष्टीकरण मिळालें नसतें. हा ठराव आपण होऊन मान्य करून, मतें घेण्याचा प्रसंग हिंदुस्थानसरकारनें शहाणपणानें टाळला. मि० गोखल्यांचें हें वरील विधान, किंवा आपला ठराव पुढें मांडतांना त्यांनीं व त्यांच्यामागून ह्या ठरावास पुष्टि देण्याकरितां बोललेल्या प्रत्येक हिंदी सभासदानें, दक्षिण आफ्रिकेंत हिंदी लोकांचा किती व कसा छळ होत आहे, ह्यासंबंधानें पुढें ठेविलेले पुराव्यावर पुरावे खोडून काढण्याचा प्रयत्न अध्यक्षस्थानीं असलेल्या व्हाइसरायसाहेबानीं किंवा सरकारच्या इतर प्रतिनिधींनीं मुळींच केला नाहीं. हा सर्व वादविवाद मोठ्या प्रौढपणानें चालला असून, त्यांतील वक्त्यांनीं अतिशय आत्मसंयमन दाखविलें होतें. तथापि, तो ऐकल्यावर, लज्जेनें अगदीं खालीं मान न घालणारा असा एकहि इंग्रज आढळला नसता. आमच्या हिंदी साम्राज्यांतील हरएक जातीच्या लोकांस चीड आणणाऱ्या ह्या प्रश्नासंबंधानें, साम्राज्याचा कारभार हांकणाऱ्या सरकारावर, तें स्वतः हजर नसतां, अगदीं उघडपणें दोषारोप करण्यांत येत असतांना, हिंदुस्थानसरकारास मौन धारण करून बसण्याचा प्रसंग सगळ्या इतिहासांत हा प्रथमच आला. गेल्या डिसेंबरांत, लाहोर येथील हिंदी राष्ट्रीयसभेंत, लोकांच्या भावनांची अगदीं [illegible]

सोडणारा असा हाच एक प्रश्न होता. आणि, ह्यासंबंधानें सर्व हिंदुस्थानभर चळवळ करून सोडण्याचा खर्च भागविण्याकरितां, त्या सभेंत वर्गण्यांना व देणग्यांना अगदीं पूर आला होता. आणि, त्यानंतर पुढल्याच महिन्यांत, तेथें **ऑल-इंडिया-मुस्लीम-लीगची** (हिंदुस्थानांतील सर्व मुसलमान लोकांच्या संघाची) जी वार्षिक बैठक झाली, त्यांतहि ह्या प्रश्नाला असेंच प्राधान्य देण्यांत आलें होतें. मुसलमान लोकांना तर राग येण्यास खरोखर अधिकच कारण आहे. कां, कीं, ट्रान्सवाळच्या कायद्यांत त्यांच्या धर्माच्या लोकांचें नांव घालून, त्यांच्याविषयीं भेदभाव दाखविण्यांत आला आहे. सभेस येणारी हिंदी मंडळी कोणत्याहि वर्गाची असली, तरी ह्या विषयामुळें त्यांच्या मनाला मोठा त्वेष चढून, त्या बाबतींत ते लोक लक्ष घालूं लागतात, असा अनुभव हिंदुस्थानांत सर्वत्र आलेला असून, ह्या संबंधानें सार्वजानिक सभा झाल्या नाहींत, असें साऱ्या हिंदुस्थानांत एकदेखील मोठें गांव राहिलेलें नाहीं.

ही एक मोठी चिंता उत्पन्न करणारी गोष्ट आहे. ह्या प्रश्नासंबंधाच्या बारीकसारीक गोष्टींत शिरण्याचें मला कांहीं कारण दिसत नाहीं, व त्या सर्वांना चांगल्या माहीत आहेत. आतां, त्यांत कांहीं अतिशयोक्तीचा भाग असेल; हिंदुस्थानांतून तिकडे राहण्यास जाणारे लोक नेहमींच चांगल्या वर्गांपैकीं नसतील; दक्षिण आफ्रिकेंतील कांहीं हिंदी लोकांनीं जें धोरण स्वीकारिलें आहे, तें शहाणपणाचें आहे किंवा कसें, ह्यासंबंधानेंहि मतभेद असेल; व आपल्या वसाहतींत आणखी एका परकी लोकांची वस्ती येऊं नये, अशी इंग्रज व डच वसाहतवाल्यांची जी इच्छा आहे, त्याबद्दल इंग्रज लोकांना मोठा कळवळा येत असेल; परंतु,

इंग्लंडच्या राजाचे प्रजाजन ह्मणून हिंदी लोकांशीं न्यायाचें वर्तन होणें, ही ज्याप्रमाणें त्यांच्या हक्काची बाब आहे, त्याप्रमाणें तेथें गोष्टी घडून आलेल्या नाहींत; तसेंच, ते केवळ हिंदी ह्मणूनच त्यांच्या मार्गांत अनेक अडचणी आणण्यांत येत असून, त्यांच्यावर अपमानाचा जणुं कांहीं वर्षाव होत आहे, ह्या गोष्टी ढळढळीत दिसत असून, त्यांच्याबद्दल मुळींच शंका घेतां येणार नाहीं. हिंदुस्थानसरकारच्या संमतीनें वरिष्ठ कायदेकौन्सिलांत पास झालेला ठराव मुद्दाम नाताळच्या वसाहतीसच उद्देशून करण्यांत आला आहे, त्याचें कारण एवढेंच कीं, त्या वसाहतीच्या भरभराटीस मुदतबंदीच्या मजुरांचा पुरवठा हिंदुस्थानांतून होणें अत्यंत जरुरीचें असल्यानें, असे मजूर तिकडे जाऊं देण्याची बंदी करून, 'जशास तसें' ह्या न्यायानें, त्या वसाहतीची खोड मोडण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानच्या अंगीं आहे. परंतु, हिंदीलोकांची ओरड फक्त नाताळाविरुद्धच नाहीं; ट्रान्सवालामध्यें तर त्यांना अधिकच त्रास होत असतो. मुदतबंदीचे मजूर ह्मणून जे विशेषवर्गाचे हिंदीलोक दाक्षिण आफ्रिकेंत जातात, त्यांच्याशीं ह्या गाऱ्हाण्याचा फारच थोडा संबंध आहे. परंतु, हिंदी लोकांस जी गोष्ट अतिशय चीड आणते, ती अशी कीं, हिंदी गृहस्थ कितीहि सुशिक्षित, कितीहि सन्मान्य व कितीहि सुप्रसिद्धदेखील असो, तो दक्षिण आफ्रिकेंत—आणि विशेषेंकरून ट्रान्सवालांत—गेला किंवा जाऊन राहिला कीं, तो हीनवर्णाचा आहे, असें समजून त्याच्याशीं वागणूक होऊं लागते, व तेथल्या निष्ठुर कायद्यांच्या व नियमांच्या तडाक्यांत तो सांपडतो. हे कायदेकानू त्यांना छळण्याकरितांच मुद्दाम केलेले असून, त्यांची अमलबजावणी करण्याचें काम ज्या अधिकाऱ्यांकडे सोंपविलेलें असतें, ते पुष्कळ

वेळां अधिकच कठोर–पणानें त्यांचा अर्थ करितात. दक्षिण आफ्रिकेंतील युद्धापूर्वी, क्रूगरच्या राज्यकारभारावर विलायतेंतील मुख्य सरकारानें जे आरोप आणिले होते, त्यांमध्यें ट्रान्सवालांत हिंदी लोकांवर होणाऱ्या जुलुमांचा प्रमुखत्वानें समावेश करण्यांत आला होता, व क्रूगरची कारकीर्द लवकर संपुष्टांत येण्यास ह्या गोष्टीचें बरेंच साहाय्य मिळालें, ह्याची आठवण हिंदी लोकांना झाली, ह्मणजे त्यांचें पित्त जास्तच खवळतें. दक्षिण आफ्रिकेंतील लढाई चालू असतां, प्रत्यक्ष हिंदी शिपाई लढण्यास न नेतां, बाकीची सर्व तऱ्हेची वाटेल तितकी मदत ग्रेटब्रिटननें हिंदुस्थानाकडून चोपून घेतली. हिंदुस्थानच्या राजनिष्ठेमुळेंच, नाताळचा बचाव करणाऱ्या युरोपियन लष्कराची मुंबई–बंदरांतून मोठ्या त्वरेनें रवानगी करितां आली इतकेंच नाहीं, तर सर्व प्रकारच्या सामग्रीचा सतत पुरवठा करून, सामानासुमानाची ने-आण करणाऱ्या लोकांच्या तुकड्या पुरवून, जखमी झालेल्या लोकांस दवाखान्यांत औषधपाण्याकरितां उचलून नेणारे लोक देऊन, व अशाच आणखी गोष्टी करून, विलायतेंतील लढाईखात्याचा कमीपणा बऱ्याच अंशानें हिंदुस्थाननेंच भरून काढला. लढवय्ये नसणाऱ्या हिंदी लोकांनीं ब्रिटिश साम्राज्यासाठीं प्राण खर्च करून, आपली राजनिष्ठा व्यक्त केली, ह्या गोष्टीची साक्ष दक्षिण आफ्रिकेंत त्यांच्या नांवानें उभारलेलीं स्मारकें देतच आहेत. परंतु, इंग्रज सरकारची प्रजा असणाऱ्या हिंदी लोकांसंबंधानें ह्मणाल, तर क्रूगरच्या वेळेपेक्षां, ब्रिटिशसत्तेखालीं ही वसाहत आल्यापासून, ह्या लोकांची अधिकच कठीण अवस्था झाली आहे. आणि, क्रूगरशाई उलथून पाडण्याकरितां, तिच्या मुळावर घांव घालण्यासाठीं, हिंदी लोकांच्या गाऱ्हाण्यांची कुऱ्हाड

हातीं घेण्यास ट्रान्सवालांतील ब्रिटिश वसाहतवाल्यांची पुरी तयारी होती. पण, आतां, हेच वसाहतवाले डच वसाहतवाल्यांशीं (बोअर लोकांशीं) संगनमत करून, तीं गाऱ्हाणीं नाहींशीं करण्याचें साफ नाकारित आहेत. या प्रश्नाला कसें भयंकर स्वरूप आलें आहे, ही गोष्ट साम्राज्यसरकारच्या नजरेस आणण्याचा हिंदुस्थानसरकारनें वरचेवर प्रयत्न केला आहे. आणि, विशेषतः लॉर्ड कर्झनसाहेबांची मित्रमंडळी (युनियनिस्ट पक्ष) अधिकारारूढ असतांना, सदरहु लाटसाहेबांनीं त्यांना विशेष आग्रहानें असें सुचविलें होतें कीं, जोंपर्यंत ट्रान्सवाल ही प्रत्यक्ष ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील एक वसाहत आहे, तोंपर्यंतच ह्या प्रश्नाची उभयपक्षांस मान्य होण्यासारख्या रीतीनें कांहीं तडजोड लावून घेणें अत्यंत महत्त्वाचें आहे. कारण, एकदां कां त्या वसाहतीला स्वराज्याचे संपूर्ण हक्क मिळाले, ह्मणजे मग ते लोक आतांइतके विलायतसरकारच्या (आपल्या मातृदेशाच्या) कबांत असण्याचा संभव नाहीं. परंतु, ज्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं अशा तक्रारी पुष्कळ वेळां—पण, अगदीं मनापासून मात्र नव्हे—केल्यावर, शेवटीं आतां आपलें कांहीं चालत नाहीं, असें समजून, सुमारें दाहा वर्षांमागें, जे अन्यायाचे प्रकार अगदीं असह्य आहेत, ह्मणून साम्राज्यसरकार मोठ्या गंभीरपणानें सर्व जगास सांगत होतें, तेच प्रकार आतां चालू असतांहि--किंबहुना आतां पूर्वींपेक्षांहि जास्त अन्याय होत असतांहि--हें सरकार डोळ्यांवर कातडें ओढून घेऊन स्वस्थ बसलें आहे.

आम्ही मोठे न्यायप्रिय आहों, असा सर्व इंग्रजलोक वाहवा करतात, ही गोष्ट जरी कबूल [illegible] ठेविली, तरी त्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यसत्तेची [illegible] जो भयंकर

धक्का बसला आहे, तिकडे दुर्लक्ष करणें अशक्य आहे. मि. दादाभाई नांवाच्या, कायदेकौन्सिलांतील एका हिंदी सभासदानीं या स्थितीचें वर्णन सौम्य परंतु अर्थपूर्ण शद्बांनीं केलें आहे, तें असें :—

ट्रान्सवालांत जाऊन कायमपणें राहणाऱ्या हिंदी लोकांवर होणाऱ्या जुलुम जबरीचा व त्यांच्याबरोबर होणाऱ्या कठोर वर्तनाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य ब्रिटिश राज्याला नाहीं, अशी लोकांची खात्री झाली असतां, त्यांच्या मनावर जो वाईट परिणाम होईल, त्याबद्दल सन १८९९ सालीं लॉर्ड ल्यान्सडौन यांना भीति पडली होती. त्या काळीं हिंदुस्थानांत सर्वत्र शांतता नांदत असून, राजद्रोहाचें नांवहि कोठें ऐकूं येत नव्हतें; मग अराजकतेची तर गोष्टच बोलावयास नको. आतां, त्या वेळीं जर हा प्रश्न मनाची स्वस्थता नाहींशी करून टाकणारा होता, तर मग, सध्यांच्या काळीं तो कसा असावा? कारण, आतां जो मोठा निकडीचा प्रश्न पुढें येऊन पडला आहे, तो तर देशांतील अस्वस्थता दडपून टाकून ती पुनः उद्भवूं नये, ह्मणून काय उपाय योजिले पाहिजेत, असा आहे. जन्मभूमि (मातृदेश) व वसाहती यांच्या परस्परसंबंधांतील सूक्ष्म गोष्टी सामान्य लोकांस कळत नाहींत; तुमच्या कायद्यांतल्या भानगडी त्यांच्या बुद्धीच्या अटोक्यांत येत नाहींत. ब्रिटिश राज्याच्या सामर्थ्याला विरोध करणारा कोणी जगांत नाहीं, असा आजपर्यंतचा त्यांचा अनुभव आहे. आणि, अशा अपरंपार सामर्थ्याचा बाणा असतांहि, एका लहानशा मांडलिक राज्याकडून, आपल्या देशबांधवांस समतेनें वागविण्याची गोष्ट ह्या सर्वशक्तिमान् राज्याच्या हातून घडून आली नाहीं, हें पाहून त्यांचा निरुत्साह होतो, व हा जो प्रकार होत आहे, तो सारा विलायतसरकारावर यूरोपियन वसाहतवाल्यांचें वजन असल्यामुळेंच होतो, अशी त्यांची समजूत होऊन बसते. आणि, हे त्यांचे (ट्रान्सवालांतील) देशबांधव कसे आहेत ह्मणाल, तर ते शांतताप्रिय व सभ्य लोक आहेत, असें सर्वांनीं कबूल केलें असून, लढाईच्या वेळीं त्यांनीं चांगलीच मदत केलेली आहे. असा हा जो लोकांचा एकंदर समज झाला आहे, त्यापासून अपरिमित नुकसान होण्याचा फारच संभव आहे, व तो घालविण्याचा ब्रिटिश मुत्सद्यांनीं शक्य तेवढा प्रयत्न केला पाहिजे. हिंदुस्थानांतील सध्यांच्या

राजकीय परिस्थितीमुळें ह्या प्रश्नाचा उलगडा होण्याची अधिकच जरुरी आहे.

ह्या इशाऱ्याच्या अर्थाची फोड करून दाखविण्यासारखें मला कांहीं अधिक सांगतांच येणार नाहीं.

मि० गोखले यांच्या ठरावांत जो उपाय सुचविला आहे, त्याचा कांहीं प्रत्यक्ष परिणाम नाताळावर होण्याचा संभव असून, ट्रान्सवालांतील लोकमतावर त्याचा असाच परिणाम अप्रत्यक्षपणें होईल, असें वाटतें. मुदतीनें आणलेल्या हिंदी मजुरांपासून नाताळच्या वसाहतीचा अत्यंत फायदा झाला आहे, ही गोष्ट तेथील प्रमुख मुत्सद्यांनीं पुष्कळ वेळां कबूल केली आहे. परंतु, दक्षिण आफ्रिकेंत हिंदी लोकांशीं बरी किंवा वाईट वागणूक आहे, ह्या साक्षात्संबंधाच्या प्रश्नाच्या मुळांशीं ह्याच्याहून मोठाले प्रश्न असून, ते इतक्याच खुल्या दिलानें पुढें मांडण्यांत मि० गोखल्यानीं मागेंपुढें पाहिलें नाहीं:—

मी आज ज्या दुःखदायक गोष्टींविषयीं बोललों, त्यांच्या सर्वांच्या बुडाशीं अत्यंत महत्वाचे असे तीन प्रश्न असल्याचें दृष्टीस पडतें. पहिला प्रश्न असा कीं, या साम्राज्यांत आह्मां हिंदी लोकांचा **दर्जा** काय? दुसरा प्रश्न असा कीं, या साम्राज्यांत आह्मांला न्यायानें व दयाळुपणानें आणि, इतकेंच, बरोबरीच्या नात्यानें देखील वागविलें जाईल, हें पाहण्याच्या कामीं, साम्राज्यसरकारावर किती जबाबदारी आहे? आणि, तिसरा प्रश्न असा कीं, ह्या साम्राज्याचीं जीं मुख्य तत्वें आहेत, तीं पाळण्यास स्वराज्यसुखाचा उपभोग घेणारे त्यांतील घटकभाग (वसाहती, देश वगैरे) कितपत बांधले गेले आहेत? अथवा, साम्राज्यापासून होणारा फायदा मात्र त्यांना घ्यावयास पाहिजे; पण, त्याबरोबर, त्याच्यामुळें होणारा तोटा मात्र नको, असें समजावयाचें कीं काय?

दक्षिण आफ्रिकेंत हे प्रश्न अत्यंत तीव्र स्वरूपांत उपस्थित झाले आहेत. तरी पण, आस्ट्रेलियांत आणि कानड्यांत देखील ते असून, दोन वर्षांमागें, ह्या देशांतील पासिफिक महा-

सागराच्या किनाऱ्यावरील प्रांतांत, एशियाखडांतील लोकांविरुद्ध तेथें जी मोठी चळवळ उडाली होती, त्यापासून पुष्कळच हिंदी लोकांचें जबर नुकसान झालें. स्वराज्याचा उपभोग घेणाऱ्या सर्व देशांतील व वसाहतींतील, तसेंच अप्रत्यक्षपणें साम्राज्याच्या ताब्यांत असणाऱ्या बऱ्याच वसाहतींतील, ब्रिटिश राज्यछत्राखालच्या, एशियाटिक लोकांच्या स्थितीचा प्रश्न हिंदीलोकांच्या ह्या प्रश्नांच्याच पोटांत येतो. कारण, एकंदर साम्राज्यांतील काळ्या व गोऱ्या लोकांमधील परस्परसंबंधावर ह्या प्रश्नांचाच परिणाम घडून येतो. तथापि, येथें फक्त हिंदी लोकांबद्दलच मला विचार केला पाहिजे. पुष्कळ हिंदी लोकांशीं ह्या प्रश्नांची मीं चर्चा केली आहे; आणि, ह्या बाबतींतल्या अडचणींची त्यांना पूर्ण जाणीव आहे. **काळा--गोरा**, असा भेदभाव केल्याबद्दल त्यांना संताप येतो, तरी गोऱ्या लोकांचा गोऱ्याव्यतिरिक्त लोकांशीं संकर होऊं नये, अशी वसाहतींतल्या गोऱ्या लोकांची जी बलवदिच्छा आहे, ती ते जाणतात. खरोखर ह्मटलें, तर कांहीं बाबतींत अशा प्रकारची त्यांची स्वतःची इच्छा असते; कारण, यूरोपियन लोकांच्यापेक्षां हिंदी लोकांच्याच मनांत त्या हतभागी यूरेजियन लोकांविषयीं कमी प्रेम असतें. यूरोपियन लोकांच्या वसाहतींत जाऊन राहाणाऱ्या हिंदी लोकांच्या अंगच्या उत्कृष्ट गुणामुळेंच ते वसाहवाले, बऱ्याच अंशीं, ह्यांचा इतका तिरस्कार करितात, ह्या गोष्टीमुळेंसुद्धां हिंदीलोकांच्या मनाला कांहीं समाधान वाटावें. लॉर्ड मिंटोसाहेबानीं आपलें गाऱ्हाणें ऐकावें, ह्मणून **मि० मुधोळकर** ह्मणाले कीं, "आपल्या आधींच्या व्हाइसराय साहेबानीं दाखवून दिल्याप्रमाणें, हिंदी लोकांच्या अंगच्या सद्गुणामुळें त्यांचा द्वेष केला जात आहे. गोऱ्या लोकांपेक्षां ते वि-

चारी, अल्पव्ययी, उद्योगी व आपल्या धंद्यांत लक्ष घालणारे असल्यामुळें, वसाहतवाल्यांच्या डोळ्यांत ते खड्यासारखे खुपूं लागले आहेत." ह्या बाबतींत मातृदेशाची आपल्या वसाहतींवर किती सत्ता चालते, हें सुशिक्षित हिंदीलोकांना माहीत आहे. आपली गाऱ्हाणीं विलायतेंतील व हिंदुस्थानांतील इंग्रज मुत्सद्यांस कबूल असूनहि, त्यांची दाद त्यांना लावून घेतां आली नाहीं, हेंहि ते लोक जाणतात. लॉर्ड कर्झनसाहेबानीं आपली बाजू मोठ्या जोरानें उचलून धरली ह्मणून, ते हिंदुस्थानांत असतांना, त्यांचें जे प्रतिपक्षी त्यांच्याविषयीं मनामध्यें अगदीं जळत असत, त्यांच्यापैकीं कित्येकांनीं वरिष्ठ कौन्सिलांत त्यांची अगदीं मनापासून कशी तारीफ केली, ही गोष्ट लक्ष्यांत घेण्यापासून मनाला आनंद होतो. उलटपक्षीं, त्यांना हेंहि माहीत आहे कीं, हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षांबद्दल आह्मांला मोठी सहानुभूति आहे, असें विलायतेंतील मजूर--पक्षाला तोंडानें कितीहि सांगतां येत असलें तरी, वसाहतवाल्यांनीं आपल्याशीं न्यायानें वागावें, असें जें हिंदी लोकांचें हक्काचें ह्मणणें आहे, त्यासंबंधांत तिकडल्या आपल्या स्नेहीमंडळींचीं मनें हिंदी लोकांच्या बाजूला वळविण्याचा ह्या मजूरपक्षानें बिलकूल प्रयत्न केला नाहीं; आणि, यदाकदाचित् कांहीं केला असला, तर त्यांत चांगलेंच अपेश आलें आहे, असें ह्मटलें पाहिजे. वसाहतींतला मजूरपक्षतर हिंदी लोकांस अगदीं खड्यासारखा वेंचून टाकण्याच्या, व त्यांचा छळ करण्याच्या धोरणाचा इतका भयंकर पुरस्कर्ता आहे, कीं त्यांत एक रतिभरहि माघार घेण्यास तो मुळींच तयार नाहीं. आणि, सर्व वसाहतींत मजूरपक्षाच्या हातांत किती सत्ता असते, हें त्यांस (सुशिक्षित हिंदी लोकांस) अवगत आहे.

यास्तव, वस्तुस्थिति लक्ष्यांत घेण्यास ते लोक तयार असून, "ब्रिटिश साम्राज्यांतील प्रजाजनांच्या साधारण हक्कांच्या योगानें, स्वराज्याचा पूर्ण उपभोग घेणाऱ्या वसाहतींस स्वसंरक्षणाचे जे हक्क दिलेले आहेत, त्यांस बाध आला तरी चालेल; असें कोणास ह्मणतां येणार नाहीं," असें जें लॉर्ड कर्झनसाहेबानीं ह्मटलें आहे, तें त्यांना मान्य आहे, असें मला वाटलें. खेरिज, ह्याच हक्कांच्या अमलबजावणीमुळें, मातृभूमींतून तिकडे वसाहतींत जाणाऱ्या लोकांस (यूरोपियन) देखील पुष्कळ वेळां त्रास पोहोंचतो. परंतु, ह्याच्या उलट त्यांचें असें आग्रहाचें ह्मणणें पडेल कीं, जर हिंदीलोकांना वसाहतवाले न्यायानें व सदय अंतःकरणानें वागविण्यास तयार नसतील, तर तिकडे हिंदी मजूर पाठविण्याचें बंद करावें. आणि, हिंदुस्थानांतून हजारों लोक बाह्यदेशीं जात असल्यापासून त्यांचा सर्वस्वी फायदाच होतो—तोटा मुळींच होत नाहीं—असेंहि नाहीं. ह्मणून, वसाहतींत इकडून मजूर जाण्याचें बंद पडल्यास, त्यापासून वसाहतींचा जो तोटा होईल, त्यापेक्षां हिंदुस्थानचा फारच कमी होईल, असें जें त्यांचें ह्मणणें आहे, तें अगदीं रास्त आहे; कारण, मग, वसाहतवाल्यांजवळ स्वतःच्या मजुरांचा पुरवठा नसल्यामुळें, हिंदी मजूर मिळेनासे झाल्यानें, त्यांची वाढ खुंटून जाईल. वसाहतींत जाऊन राहण्यास सर्वांना पूर्ण मोकळीक असावी, हें मागणें व्यवहाराला धरून नसल्यानें मुळींच कबूल होणार नाहीं, व सध्यांच्या स्थितींत त्यावर जोर देण्यांतहि अर्थ नाहीं, ही गोष्ट सुशिक्षित हिंदी लोकांस मान्य असल्याबद्दल, एका वजनदार हिंदी सभासदानें कौन्सिलांत सांगितलें. हेच गृहस्थ पुढें आणखी असें ह्मणाले कीं, केप कालनीमध्यें अशी

स्थिति आहे त्याप्रमाणेंच ट्रान्सवालामध्येंहि पूर्वींच स्थायीक झालेल्या हिंदी लोकांना पक्के बनलेल्या गुन्हेगारांप्रमाणें न वागवितां, शांततेनें राहूं द्यावें, व त्यांना स्वतःला व त्यांच्या लोकांना शिक्षक, धर्मोपदेशक व डाक्टर वगैरे मिळावेत, ह्मणून सुशिक्षित व चांगल्या प्रतिष्ठित लोकांस तिकडे जाण्याची मोकळीक असावी, इतकेंच त्यांचें मागणें आहे. नाताळासंबंधानें ह्मटलें तर, आज वर्षानुवर्षें, जे हक्क आपण उपभोगीत आलों आहों व ज्या वहिवाटी पडल्या आहेत, त्याच कायम राहाव्या, इतकेंच त्यांचें मागणें आहे. ह्या धोरणानें वसाहतीबरोबर कांहीं तडजोड करितां येणें, ही कांहीं अशक्य कोटींतली गोष्ट नाहीं. परंतु, हिंदी लोकांची अशीहि मागणी आहे कीं, वसाहतींत कायमपणानें जाऊन राहणाऱ्या लोकांसंबंधानें, कांहीं विशेष स्वरूपाचे, लागू केलेले कायदेकानू जरी मान्य करण्यांत आले, तरी वसाहतींत केवळ प्रवासासाठीं जाणाऱ्या लोकांस ते लागू करितां कामा नये. कांहीं वर्षांपूर्वीं, एका अतिशय उच्च दर्जाच्या हिंदी गृहस्थास आस्ट्रेलिया पाहण्याची इच्छा झाली होती. हे गृहस्थ असे होते कीं, ते इंग्लंडांत आले असतां, राजापासून सर्व लोकांनीं त्यांचा मोठ्या आनंदानें सत्कार केला असता परंतु, आस्ट्रेलियांत आपणास कांहीं अप्रिय वाटणाऱ्या, औपचारिक गोष्टी करण्याची पाळी येईल कीं काय, असें तेथें जाण्यापूर्वीं त्यानीं आपल्या एका मित्रास लिहून विचारिलें होतें. त्यानंतर, त्यांना जें उत्तर आलें, त्यामुळें त्यांची कंबर खचून गेली. अशा तऱ्हेच्या अडचणी नाहींशा कराव्या, असें हिंदी लोकांचें हक्कानें मागणें आहे. ह्या बाबतींत एक अमलांत आणण्यासारखी सूचना पुढें मांडल्याचें माझ्या ऐकिवांत आहे, ती अशी कीं,

साम्राज्यसरकार, वसाहती व हिंदुस्थान सरकार यांनीं सर्वांनीं मिळून कांहीं नियम ठरवावेत; आणि मग, त्या अनुरोधानें हिंदी लोकांस परवाने देण्याचा अधिकार हिंदुस्थानसरकारच्या हातीं असावा. असे परवाने जवळ असले, ह्मणजे सर्व साम्राज्यांत कोठेंहि जाण्यास हिंदी लोकांना हरकत नसावी, व मनाला त्रास देणाऱ्या गोष्टी करण्याचा प्रसंग त्यांच्यावर येऊं नये.

ह्या सर्वच प्रश्न असा आहे कीं, त्याचा निकाल लावल्यावांचून, तो अनियमित काळपर्यंत तसाच लोंबत ठेवल्यापासून एकंदर साम्राज्याला भयंकर धोका आहे. आतां, ह्या कामासाठीं वसाहतींनीं एकदिलानें उद्योग केल्याशिवाय, ह्या प्रश्नाचा उलगडा होणार नाहीं, हें अगदीं उघड आहे. पुढल्या वर्षीं (१९११), एकंदर साम्राज्याची मोठी **परिषद्** साम्राज्याच्या राजधानींत पुनः भरणार आहे. ह्या अवकाशांत, साम्राज्यसरकारानें हिंदुस्थान सरकाराशीं व बादशाहाच्या प्रत्यक्ष अमलाखालीं असणाऱ्या वसाहतींशीं वाटाघाट सुरू करावी. ह्यांच्या-पैकीं पुष्कळ वसाहतींचा हिंदुस्थानांतील मजुरांच्या प्रश्नाशीं अतिनिकट संबंध आहे. अशी वाटाघाट सुरू झाली, तर पुढल्या मार्च महिन्यामध्यें, लंडन येथें जमणाऱ्या वसाहतींच्या प्रतिनिधींपुढें, ज्यांच्यावर विचार झाला आहे, अशा सूचना साम्राज्यसरकारला ठेवतां येण्यासारखें आहे; आणि, वरील प्रश्नाची चर्चा करण्याकरितां प्रथम कांहीं आधार पाहिजे, तो ह्या सूचनांच्या द्वारा मिळेल, व आणखी अशीहि आशा आहे कीं, त्या प्रश्नाचा कांहींतरी अखेरचा निकाल लागेल. मुदतबंदीचे मजूर अथवा कायमचे रहिवाशी ह्मणून वसाहतींत जाणाऱ्या, ब्रिटिश राजछत्राखालील हिंदी लोकांस तिकडे येऊं देण्यासंबंधानें हवे ते नियम करण्याचा

बसाहतींना हक्क आहे, हें तत्व मान्य केलें असतां, त्याजबरोबर, तिकडे आधींच जाऊन राहिलेल्या किंवा जाऊन राहण्यास पुढें परवानगी दिलेल्या हिंदी लोकांस न्यायानें व सदयतेनें वागविण्यांत येईल, अशी हमीहि मिळाली पाहिजे. तसेंच, मौजेकरितां, शास्त्रीय विषयांच्या अभ्यासाकरितां, व्यापारधंद्याच्या निमित्तानें, अथवा दुसऱ्या कांहीं वाजवी कारणासाठीं, प्रवास करणाऱ्या प्रतिष्ठित हिंदी लोकांजवळ, हिंदुस्थानसरकारनें दिलेले, ठराविक नमुन्याबरहुकुमचे दाखले असले, म्हणजे तिकडे जाऊन योग्य काळपर्यंत प्रवास करण्याच्या कामीं, कोणत्याहि प्रकारची हरकत त्यांस येणार नाहीं, असेंहि अभिवचन बसाहतींकडून मिळालें पाहिजे. सुज्ञ हिंदी लोकांचें कमींत कमी इतक्यानें समाधान होईल, असें माझें मन मला सांगतें. आणि, बसाहतींतील आमच्या जातभाईंना जर ही एकंदर गोष्ट स्पष्टपणानें व अगदीं मन मोकळें करून नीट समजावून दिली, तर एकंदर सर्व साम्राज्याचा हिंदुस्थानाशीं जो संबंध आहे, त्याला हितावह व भूषणास्पद होणारी ही अत्यावश्यक व्यवस्था ते अमान्य करितील, अशी कल्पनाहि करितां येत नाहीं.

—∞✻∞—

भाग २५ वा.

खासगी आणि सरकारी संबंध.



एतद्देशीय लोकांशीं वागतांना इंग्रजांच्या मनाची प्रवृत्ति कोणत्या प्रकारची असते, ह्यासंबंधानें जीं विधानें करण्यांत येतात, त्यांत इतकें अज्ञान व इतका दुष्टपणा दिसून येतो कीं, तसा दुसऱ्या कोणत्याहि विषयासंबंधानें दिसून येत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. इंग्रजलोक व हिंदीलोक यांच्यामध्यें खासगी बाबतींत मोठी सलगी क्वचित्च जमून येते, ही गोष्ट अगदीं खरी आहे. परंतु, ह्या कामांत मुख्यत्वेंकरून इंग्रजलोकांकडेच चुकी आहे, असें नाहीं. मी शिळ्याच गोष्टी पुनः सांगत आहें, असा जरी माझ्यावर दोष येणार असला, तरी मला कित्येक मूलभूत गोष्टींचा विचार येथें केलाच पाहिजे.

अगदीं पहिली मोठी अडचण ह्मटली ह्मणजे, हिंदी लोकांच्या चालीरीतीमुळें, इंग्रजी व हिंदी कुटुंबांमध्यें कोणत्याहि प्रकारची सलगी होण्यास अडथळा येतो. खुद्द इंग्लंडमध्यें देखील, ज्या लोकांच्या कुटुंबांची परस्पर–ओळख होण्यास प्रतिबंध असतो, त्यांच्यामधील दळणवळण सलगीचें आहे, असें क्वचित्च ह्मणतां येईल; आणि, पाश्चिमात्य लोकांच्या चालीरीतींचें पूर्णपणें अनुकरण केलेलीं, कांहीं थोडीं हिंदी कुटुंबें सोडून दिलीं ह्मणजे हिंदी गृहस्थ हिंदु असले किंवा मुसलमान असले, तरी त्यांच्या घरीं जाण्याचा इंग्रज लोकांस अगदींच मज्जाव अ-

सल्यामुळें, त्यांच्या कुटुंबांतील माणसांशीं ह्यांचा परिचय होण्याची गोष्टच बोलावयास नको. त्याप्रमाणें, इंग्रज स्त्रिया हिंदी लोकांच्या जनानखान्यांत व पडद्यांत जाऊन, शिष्टाचार संभाळून, त्यांच्या बायकांच्या आदरोपचारी भेटी घेतात, तसेंच ज्यांना **पडदा-पार्ट्या** असें नांव आहे, असे, पडदानशीन स्त्रियांस येण्यास कोणतीहि हरकत पडूं नये ह्मणून, जे समारंभ इंग्रज लोक आपल्या घरीं करित असतात, त्याच प्रसंगीं कायतो इंग्रज व हिंदी स्त्रियांचा एकमेकांशीं समागम घडतो, पण एरव्हीं तो घडण्याचा मुळींच मार्ग नाहीं. अशा पडदानशीन स्त्रियांच्या विशेष सोयीसाठीं केलेल्या समारंभांत ह्मटलें ह्मणजे, त्यांच्या घरीं जशी व्यवस्था असते, तशीच अगदीं त्या प्रसंगीं राखण्यांत येते– ह्मणजे, त्या ठिकाणीं पुरुषांना फिरकण्यास अगदींच मज्जाव असतो. हिंदी स्त्रियांस जोंपर्यंत अगदीं एकलकोंडेपणांत आपलें सारें आयुष्य कंठावें लागणार आहे, तोंपर्यंत त्या व त्यांच्या भेटीला येणाऱ्या इंग्रज स्त्रिया अशा दोघांनाहि आवडणाऱ्या गोष्टी फारच थोड्या असणार, त्यास कांहीं उपाय नाहीं. दुसऱ्या बाजूनें पाहिलें ह्मणजे, समाजांत स्त्रियांना कोणतें स्थान आहे, ह्यासंबंधाचे, पुष्कळ हिंदी लोकांचे विचार इंग्रज लोकांना माहीत असल्याकारणानें, त्यांनीं आपल्या घरीं येऊन आपल्या कुटुंबांतील माणसांशीं सलगीनें वागावें, ह्या गोष्टीची ते बिलकूल परवा करित नाहींत, ह्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कांहींएक कारण नाहीं. कारण, अशी सलगी होऊं दिली असतां, इंग्रज लोकांच्या बायका, बहिणी व मुली यांच्याशीं त्यांचा समागम घडून येऊन, ओळखदेख, परिचय हटकून होणारच. आतां, हिंदु असो

अथवा मुसलमान असो, परंतु हिंदी लोकांच्या गृहव्यवस्थेंतील कित्येक गोष्टी—विशेषतः, मुलांचें आपल्या आईबापांशीं वर्तन —पुष्कळच वाखाणण्यासारख्या असतात; परंतु, स्त्रिया व पुरुष ह्यांच्यामधील परस्परसंबंधाच्या, हिंदी लोकांच्या कल्पना आमच्यासारख्याच आहेत, हें ह्मणणें व्यर्थ आहे. अशा स्थितींत, ह्या दोन जातींतील (वंशांतील) वरिष्ठ दर्जाच्या लोकांच्या देखील सामाजिक बाबतींत कांहीं मिलाफ होईल, ह्या गोष्टीचें सध्यां नांवसुद्धां काढावयास नको.

हिंदी व इंग्रज समाजांमधील अंतर कमी करण्याचे प्रयत्न, अगदीं निष्कपटपणानें व यशःप्रद रीतीनें, उभयपक्षांकडून सध्यां होत आहेत, हें खरें आहे. आणि, जेथें इंग्रज गृहस्थ, इंग्रज स्त्रिया व हिंदी लोक जमले होते, अशा पुष्कळ समारंभास मी गेलों असून, क्वचित् प्रसंगीं तेथें थोड्याशा हिंदी स्त्रियाहि माझ्या पाहण्यांत आल्या होत्या. परंतु, हिंदी लोकांनीं आपापल्या जातींचे किंवा वर्गांचे घोळके करूं नयेत, ही गोष्ट घडवून आणण्याच्या कामीं इंग्रज यजमान व यजमानीण ह्या उभयतांस नेहमींच मोठी पंचाईत पडे; आणि, त्याच समारंभास आलेल्या इंग्रज पाहुणेमंडळीशीं मिळूनमिसळून वागण्याच्या बाबतींत हिंदीं लोकांची जशी नाखुषी दिसून येई, त्याचप्रमाणें, ह्या अशा रीतीनें बनलेल्या एका घोळक्यांतील लोकांची दुसऱ्या घोळक्यांतील लोकांशीं सलगीनें वागण्याची मुळींच इच्छा नसे. नानाप्रकारचे वर्ण, जाती व पंथ यांचें अस्तित्व हिंदी लोकांत आज हजारों वर्षें असल्यामुळें, त्या समाजाचे असे तुकडे पडले आहेत, कीं एकाचा संबंध दुसऱ्याशीं मुळींच येत नाहीं; जणुं कांहीं ह्या गच्च लागणी-

ऱ्या पेट्या असून, आंत मुंगीलाहि शिरण्यास मार्ग नाहीं. त्यामुळें, पाश्चिमात्य लोकांत, परस्परांचा सहवास घडून येण्याचे व परस्परांचा परिचय वाढण्याचे जे मार्ग आहेत, त्यांची हिंदी लोकांना मुळींच परवा नाहीं. कारण, पाश्चिमात्य लोकांमध्यें अशा तऱ्हेचा भेदभाव मुळींच पाळला जात नाहीं. इंग्रज लोक भिन्न जातीचे आहेत, असें आह्मी स्वतः मानितों, त्यापेक्षां पुष्कळपटीनें खुद्द हिंदी लोकच असें मानतात. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, पाश्चिमात्य लोकांच्या घरगुती संभाषणांत, एकाच विषयाला चिकटून न राहतां, निरनिराळ्या साध्या विषयांवर इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्याची फार चाल आहे; परंतु, अशा तऱ्हेचें संभाषण हिंदी लोकांना मुळींच करितां येत नाहीं ह्मटलें तरी चालेल. हिंदी लोकांचा नेहमीं समज असा असतो कीं, संभाषणाचा कांहीं ठरीव हेतु असलाच पाहिजे; आणि, पुष्कळ इंग्रज लोकांपेक्षां समयसूचकतेनें व सभ्यपणानें संभाषण करण्याची देणगी त्यांना असून, बराच वेळपर्यंत इकडल्या तिकडल्या विषयावर, दुसऱ्याला संतोष होईल अशा रीतीनें, वादविवाद करण्याची हतोटी जरी त्यांना साधलेली असते, तरी ज्यांत त्यांचा स्वतःचा कमी--अधिक मानानें प्रत्यक्ष हितसंबंध असतो, असा एखादा विशेष विषय काढण्याची ही सारी बहुधा प्रस्तावना असते, असें नेहमीं घडतें. हिंदुस्थानांतील पुष्कळ इंग्रजी क्लबांत हिंदी लोकांना पुरा मज्जाव आहे, ही गोष्ट त्यांच्या मनाला बरीच लागून राहते. परंतु, हिंदी लोकांच्या मनाचा [illegible] लक्ष्यांत घेऊन, त्यांना पाहुणे ह्मणून अशा क्लबांत येऊं देण्याच्या बाबतींत, सदरहु क्लबांनीं आपल्या नियमांचा कडकपणा वाजवीरीतीनें थोडासा कमी करण्यास कांहीं हरकत

दिसत नाहीं, हें जरी खरें आहे, तरी इंग्रज मनुष्याचें घर जसा त्यांचा किल्ला असतो, त्याचप्रमाणें त्यांच्या क्लबांची गोष्ट आहे. आणि, एखाद्या क्लबानें आपल्या सभासदीचे नियम आपणांस बरे वाटतील तसे करूं नयेत, असें ह्मणण्यास फक्त हिंदुस्थानांतच एखाद्याची हिम्मत झाली तर होईल. तथापि, निदान मोठमोठ्या शहरांतून तरी, कलकत्याच्या कलकत्ता--क्लबाप्रमाणें क्लब स्थापन होण्यास वाव असावा. अशा संस्था असल्या ह्मणजे, त्या ठिकाणीं उभय पक्षांच्या पसंतीप्रमाणें, हिंदी व इंग्रजी समाजांतील वरिष्ठ दर्जाचे, सरकारी व बिनसरकारी लोक एकत्र जमविण्याच्या कामीं, त्यांचा फार उपयोग होतो. पण, तेथें सुद्धां, आहारविहार करून एकमेकांचा परिचय वृद्धिंगत करण्याचे व परस्परांच्या समागमाचा लाभ घेण्याचे जे प्रकार इंग्रज लोकांना विशेष आवडतात, त्यांना जातिनिर्बंधांमुळें—आणि हिंदुलोकांच्या बाबतींत तर विशेषच—अडथळा येतो. अशा संस्थांतील आपल्या इंग्रज मित्रमंडळीबरोबर, मध्यरात्र उलटून जाईपर्यंत, बोलत अथवा ब्रिज खेळत बसणारे हिंदी गृहस्थ थोडे नाहींत; परंतु, त्यांच्याबरोबर आपण जेवायास बसतां कामा नये, अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगत असते. आणि, कांहीं मंडळींची तर निःसंशय येथपर्यंत मजल जाते कीं, घरीं गेल्यावर ते स्नान देखील करितात. पुनः, कित्येक लोक अशाच कारणांमुळें युरोपियन लोकांच्या कोणत्याहि क्लबांत येण्यास साफ नाकारितात. यूरोपियन लोकांखेरिज आपल्या क्लबाचे कोणांसहि सभासद करावयाचे नाहींत, असा नियम करणाऱ्या इंग्रज लोकांच्याप्रमाणेंच, त्यांनाहि दोष देण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु, वास्तविक गोष्ट अशी असून, ती ध्यानांत घेतली पाहिजे.

जे इंग्रज व हिंदी लोक परस्परांचे गुणदोष ओळखून, एकमेकांविषयीं आदरबुद्धि ठेवितात, त्यांच्यामध्यें अति-उत्तम प्रकारचा व समाधानकारक रीतीचा स्नेहभाव राहतो. हिंदुस्थानच्या सनदी नोकरींतले इंग्रज गृहस्थ ह्या बाबतींत जितके चांगले वागतात, तितके इतर इंग्रज लोक वागत नाहींत. मला माहीत आहे कीं, **सनदी नोकर** हें नांव ऐकिलें कीं, हिंदी राजकारणी लोकांच्या मस्तकांत शूळ उठतो; आणि, त्यांना व ज्यांच्या अंगीं अधिक शहाणपण असावयास पाहिजे अशा इंग्रज लोकांनाहि असें वाटतेंसें दिसतें कीं, एकदां कां ह्या नोकरीमधील लोकांना **सरकारी अधिकाऱ्यांचा कंपू** अशा नांवाची चिठ्ठी डसविली, ह्मणजे ह्या रानटी नांवामुळेंच त्यांना उचलून फांसावर चढविण्यास चिंता नाहीं,—अथवा निदान, हा आरोप सामान्य लोकांस तरी खरा वाटण्यास हरकत नाहीं कीं, हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारी गर्विष्ठ असून, हिंदी लोकांशीं वागण्यामध्यें स्वतः निष्ठुरपणा दाखवितात; तसेंच, राज्यकारभाराच्या कामांत त्यांचें अज्ञान असून, त्यांच्याठिकाणीं प्रजेविषयीं प्रेम मुळींच नसतें.

बुद्धीवर व नीतीवर बराच चांगला संस्कार झाल्यानंतर, इंग्रज लोक हिंदुस्थानच्या सनदी नोकरींत शिरून इकडे येतात, ह्याबद्दल मुळींच वाद नाहीं. कारण, खुद्द विलायतेच्या तसेंच बाहेर देशच्या सनदी नोकरींत जाण्याकरितां जे तरुण लोक शिकून तयार होतात व परीक्षा देतात, त्यांच्यापैकीं अगदीं शेलकी मंडळीच इकडे हिंदुस्थानांत येते. आणि, शील, प्रामाणिकपणा व बुद्धिमत्ता ह्या दृष्टीनें पाहूं जातां, जगांतील इतर कोणत्याहि देशांतील सनदी नोकरींतल्या लोकांबरोबर त्यांची तुलना करून पाहण्यास हरकत नाहीं. तर मग, हिंदुस्थानांत

पाय ठेवल्याबरोबर, त्यांचें मूळचें रूप पालटून जाऊन, मनाचा कोतेपणा व जुलूमजबरी करण्याची क्षुद्रबुद्धि हे दुर्गुण त्यांच्या ठिकाणीं एकदम कां उत्पन्न व्हावेत! त्यांच्या नोकरीचा बराच मोठा भाग सामान्य लोकांच्या अगदीं संघट्टणांत जात असतो; कारण, कामावर असतांना, अगदीं दूरदूरच्या प्रांतांतून बहुतकरून त्यांना एकसारखीं पुष्कळ वर्षे काढावीं लागतात, व त्या ठिकाणीं वस्तुतः एतद्देशीय लोकांखेरिज त्यांना इतरांचा सहवास मुळींच घडत नाहीं. साधारणपणें, त्यांना एकापेक्षां अधिक देशी भाषा अवगत असून, त्यांत चांगलें घडघड बोलतांहि येत असतें. परंतु, हिंदुस्थानांत अशा देशी भाषा पुष्कळच असल्याकारणानें—एकट्या मुंबई—इलाख्याचेंच उदाहरण घेतलें, तर तेथें अशा पांच भाषा आहेत—त्यांची अशा जिल्ह्यांत एकदम बदली होते कीं, ज्या भाषा त्यांना येत असतात, त्यांचा तेथें त्यांना कांहींएक उपयोग होत नाहीं. वर्षांतून कांहीं दिवस त्यांना नेहमीं **स्वारींत** काढावे लागतात; ह्याचा अर्थ असा कीं, फिरतीवर निघून खेड्याखेड्यांनीं जाऊन, लोकांचे अर्ज घेणें, प्रकरणांची चौकशी करणें, लोकांच्या तक्रारी ऐकून घेणें, वगैरे कामें करण्यासाठीं, जिल्ह्याचें मुख्य ठिकाण सोडून बाहेर हिंडावें लागतें. जमिनीचा सारा (सरकारदेणें) वसूल करितांना, जसा त्यांचा रयतेशी संबंध येतो, तसा राज्यकारभाराच्या साधारण कामांपैकीं दुसऱ्या कशामुळेंहि बहुतकरून येत नाहीं. कारण, फाळा वसूल करण्याच्या कामांत आपली न्यायबुद्धि दाखविण्यास त्यांना मोठा अवकाश मिळतो, व त्यामुळें त्यांच्या अंगचा हा गुण लोकांच्या निदर्शनास येतो. म्हणून, ज्या ठिकाणीं कायम धाऱ्याची पद्धत अमलांत असते— उदाहरणार्थ,

बंगाल प्रांतांत— त्या ठिकाणीं कलेक्टराच्या, नित्याच्या कामाला मुळींच वाव राहत नाहीं; व अशा कायम धाऱ्याच्या पद्धतीचे जे दुष्परिणाम झाले आहेत, त्यांपैकीं एक ह्मटला ह्मणजे, सनदी नोकर (सिविलियन) व रयत ह्यांची इतर प्रांतांत साधारणपणें जशी एकमेकांस थोडीबहुत माहिती असते, तशी वरील प्रांतांत नसते. जेथें पैशाच्या किंवा मालमिळकतीच्या नफानुकसानाची गोष्ट असेल, अशा मुकदम्यांचा फैसला करणें, अथवा एतद्देशीय लोकांमधील भांडणतंट्यांचा तडजोडीनें निकाल लावणें, इत्यादि कामांतील इंग्रज लोकांच्या सचोटीबद्दल व निष्पक्षपातिपणाबद्दल शंका घेण्यास कोणीहि हिंदी लोक धजत नाहींत, असें ह्मटलें तरी चालेल. आणि, ह्या देशांत जातिभेद व कुलाभिमान यांचें प्रस्थ फार मोठें असल्याकारणानें, लाखों वेळां असे प्रसंग येतात कीं, लोकांवर हरएक प्रकारची जुलुमजबरी होते व खासगी रीतीनें भीड घातली जाते; व अशा गोष्टी इकडील लोकांच्या आज शेंकडों–हजारों वर्षें अंगवळणी पडत आल्या आहेत. त्यामुळें, इंग्रज लोकांच्या अंगच्या वरील गुणांची इकडे जशी किंमत आहे व त्यांच्याबद्दल लोकांना जसा आदर वाटतो, तसा इतर कोठें वाटत नाहीं. त्यांचे स्वतःचे हिंदुस्थानांत कायमचे लगेबांधे मुळींच नसल्याकारणानें, एखाद्या कज्ज्याचा त्यांना निकाल करावयाचा प्रसंग आल्यास, तो अच्या तर्फेनें झाला काय किंवा बच्या झाला काय, अथवा एखाद्या एतद्देशीय अमलदाराची त्यांना नेमणूक करावयाची असली किंवा त्याला बढती द्यावयाची झाली, तर तो ह्या जातीचा असला काय किंवा त्या जातीचा असला काय, त्यांना स्वतः त्याशीं कांहींच करावयाचें नसतें. सामान्य लोकांना ही गोष्ट

माहीत असते; आणि, इंग्रज लोकांच्या न्यायबुद्धीवर पूर्ण विश्वास ठेवण्याची त्यांना संवय झाली असल्याकारणानें, जेव्हां जेव्हां त्यांना संधि मिळेल तेव्हां तेव्हां, आपल्या स्वतःच्या लोकांपैकीं अधिकारी असलातरी त्याच्याकडे न जातां, इंग्रज अधिकाऱ्याकडे येऊन ते दाद मागतात. परंतु, विशेषेंकरून आडाअडचणीच्या प्रसंगीं, दुष्काळ अथवा प्लेगसारख्या विपत्तींत असतांना, त्यांच्याकडे लोक मदतीसाठीं धांव घेतात. "फक्त आपल्या वरिष्ठाला जबाबदार असणारे, हे उन्हानें वाळलेले अधिकारी" दुष्काळ अथवा प्लेगच्या क्यांपांत काम करित असले, ह्मणजे त्यांच्या अंगचे गुण जसे उत्तम रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतात; तसे एरव्हीं कोठेंहि येत नाहींत. अशा ठिकाणीं, एखादा अमलदार खोलींत बसून कारभाराचीं सर्व सूत्रें हलविणारा असला, तर त्याची पुरी फजिती झाल्याशिवाय राहणारच नाहीं. परंतु, इंग्रज सिविलियन मंडळी अशा प्रकारची ब्युरोक्राट नसते; व ह्मणून, केवळ आपल्या अंगच्या विशेष गुणांमुळें व नवीन गोष्टींचा उपक्रम करण्याच्या सामर्थ्यामुळें, आलेल्या अडचणींतून ते चांगल्या प्रकारें निभावून जातात. अशाच प्रकारच्या आकस्मिक प्रसंगांच्या वेळीं, एतद्देशीय अधिकाऱ्यांपेक्षां युरोपियन अधिकारी किती श्रेष्ठप्रतीचे असतात, ह्या गोष्टीचा फारच चांगला अनुभव येतो. कारण, अशीं निकडीचीं कामें करण्याविषयीं, अतिशय श्रम करून, मोठे चांगले "नियम" घालून दिले असले, तरी ते सर्वच बाबतींत पुरेसे पडत नाहींत. थंडीच्या दिवसाऐवजीं ऐन उन्हाळ्यांत, "प्यागेट एम्. पी." साहेबाची स्वारी हिंदुस्थानांत येऊन, हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांच्या वस्तीच्या मुख्य मुख्य ठिकाणीं जाऊन फक्त जंगी

जंगी मेजवान्या झोडित पाहुणचार घेत न बसतां, अथवा इंग्रज लोकांच्या कारभाराविषयींची उसनी माहिती शहरांत राहणाऱ्या हिंदी राजकारणपटु मंडळीपासून न घेतां, उत्तरहिंदुस्थानांतील एखाद्या जिल्ह्यांत तेथल्या सिविलियन अधिकाऱ्याबरोबर फिरतीवर जाऊन, हिंदुस्थानच्या खऱ्या खऱ्या लोकांत त्याला (सिविलियनास) दररोज काय काम करावें लागतें, हें पाहण्यांत सदरहु साहेबबाहादुर आपला कांहीं वेळ खर्च करतील, तर ते विलायतेस परत जातील तेव्हां, खरोखर हिंदुस्थान ह्मणजे काय, व हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारी व एतद्देशीय लोक ह्या उभयतांमध्यें कोणत्या प्रकारचे संबंध आहेत, ह्या विषयींची माहिती पूर्वींपेक्षां बरोबर रीतीनें त्यांना मिळाल्यानें, त्यांच्या विचारांत पुष्कळच बदल होऊन गेलेला दिसून येण्याचा संभव आहे.

विनाकारण वाजवीपेक्षां अधिक, अशा पगाराच्या कामदारांच्या झुंडीच्या झुंडी हिंदुस्थानांत आणून अगदीं गर्दी करून टाकिली आहे, असें जें पुष्कळ वेळां ह्मणतात, तें मुळींच खरें नसून, येथल्या राज्यकारभारांत आह्मी (इंग्रज) आपल्या स्वतःपैकीं जितके लोक घातले आहेत त्यापेक्षां कमी, अथवा येथल्या सरकारी नोकरींत जितके एतद्देशीय लोक घेतले आहेत त्यापेक्षां अधिक लोक घेऊन, जिंकलेल्या परक्या देशावर राज्य करण्याचा आमच्यासारखा प्रयत्न कोणत्याहि पाश्चात्य राष्ट्रानें कधींहि केलेला नाहीं, असें आह्मांला वाजवी रीतीनें ह्मणतां येईल. ब्रिटिश अमलाखालीं असलेल्या हिंदुस्थान देशांतील जमा-जमाबंदीखातें व न्यायखातें, ह्या दोहोंमधील अवाढव्य काम [illegible] हिंदी लोक लावण्यांत आलेले

असून, एकंदर ५००० पेक्षां केवळ थोडेसे अधिक इंग्रज लोक घेतलेले आहेत. ह्यांपैकीं सुमारें $\frac{1}{6}$ लोक हिंदुस्थानांतील अगदीं पहिल्या प्रतीची जी **सनदी नोकरी** तिच्यांत आहेत. मोठ्या विश्वासाच्या, अधिकाऱ्याच्या जागेपर्यंत चढत जाण्याच्या योग्यतेचे हिंदी, सरकारी नोकर पुष्कळ तयार करण्याचें काम ब्रिटिश लोकांच्या अमलांत येथें झालें आहे, ह्या गोष्टीचें महत्व कांहीं कमी नाहीं. उदाहरणार्थ, हायकोर्टांतील न्यायासनावर हिंदी लोक विराजमान होऊन, आपल्या यूरोपियन कार्यबंधूंशीं (जज्जांशीं) अगदीं बरोबरीच्या नात्यानें वागतात इतकेंच नाहीं, तर सर्व हिंदुस्थानभर, फौजदारी काम (म्याजिस्रेटी) मुख्यत्वेंकरून हिंदी लोकांच्याच हातून होत असतें. हीच स्थिति रेवेन्यु (जमीनमहसूल) व पोलिस खात्यांतहि आहे. आणि, ह्याच पोलिसखात्याला लोक इतकें, पण बहुधा फारच अन्यायानें, दूषण देत असतात. आणि, खरोखर पाहूं गेलें असतां, सरकारी नोकरींत हिंदी लोक येऊन, त्यांनीं निष्ठापूर्वक व समंजसपणानें मदत केल्याशिवाय, एकाहि सरकारी खात्याचें काम चालणार नाहीं; व ही गोष्ट कबूल करण्यामध्यें, हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांचा अगदीं पहिला नंबर लागतो. आतां, मीं पूर्वींच दाखवून दिल्याप्रमाणें, विद्याखात्यांतील हिंदी लोकांचीच फक्त स्थिति सुधारण्यास जागा आहे असें नाहीं, तर जिला **प्रांतिक** नोकरी ह्मणतात, तिच्या हरएक खात्यांतील हिंदी लोकांचीहि स्थिति सुधारतां येण्याचा संभव आहे. ही **प्रांतिक** नोकरी ह्मणजे, जिला पूर्वीं **बिनसनदी** (अन्कान्व्हेनन्टेड) नोकरी ह्मणत असत, तीच ही होय, असें स्थूलमानानें ह्मणतां येईल. मागें १८७९ सालीं, फक्त **सनदी नोकरां**-करितां त्या वेळपर्यंत

राखून ठेविलेल्या जागां पैकीं १/६ जागा हिंदुस्थानच्याच लोकांना देण्यासंबंधानें, लॉर्ड लिटनसाहेबांनीं नियम करून दिले; आणि, सरकारी नोकरीच्या निरनिराळ्या खात्यांत [शाखांत], फायदेशीर रीतीनें शेवटीं जितके हिंदी लोक लावतां येतील, तितक्या मर्यादेपर्यंत आह्मी अझून खास जाऊन पोंहोंचलों नाहीं. तथापि, एतद्देशीय लोकांचे गुण व तसेच दोषहि ज्यांना माहीत आहेत ते लोक, कोणत्याहि खात्यांतील यूरोपियन लोकांची संख्या घाईघाईनें कमी केली असतां, त्या खात्याचें हल्लीं जसें नेकीनें व पद्धतशीरपणानें उत्तम काम चालतें, त्यास मोठें विघ्न येणार नाहीं, असें ह्मणणार नाहींत. उदाहरणार्थ, पोलिस खात्याची स्थिति ह्या गोष्टीची अगदीं बरोबर प्रचीति आणून देते. कारण, भिकार, जुन्या, नेटिव पद्धतीनें गुन्ह्याची वगैरे चौकशी करण्याची रीत अझून जी त्या खात्यांत दिसून येते, तिचें कारण खालच्या लोकांवर [एतद्देशीय नोकरांवर] चांगला दाब ठेवण्यास पुरेसे यूरोपियन लोक या खात्यांत नाहींत, हेंच बहुतेक आहे. "साधारणपणें, देशांत ज्या शीलाचे व कर्तृत्वशक्तीचे लोक आढळून येतात, त्यांच्यापेक्षां ह्या दोन्ही बाबतींत वरिष्ठ असे लोक तयार करण्याची" आवश्यकता, हें "सर्व्हंटस ऑफ इंडिया" (हिंदुस्थानचे सेवक) ही आपली संस्था स्थापन करण्याचें एक कारण आहे, असें खुद्द ना० गोखल्यांनीं कबूल केलें आहे. ह्याचकरितां, ज्या अगदीं थोड्या जागांवर अद्यापि यूरोपियन लोकच नेमण्यांत येत असतात, त्यांवर त्यांच्याबद्दला हिंदी लोक आणण्याचें काम आपण अगदीं सावकाश रीतीनें व सावधगिरीनें केलें पाहिजे. जोंपर्यंत हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची जबाबदारी आमच्या अंगावर आहे, तोंपर्यंत राज्यकारभारांतील अगदीं वरच्या, बहुतेक

जागा इंग्रज लोकांच्याच हातीं असल्या पाहिजेत, ही गोष्ट अगदीं पक्क्या जहाल हिंदी राजकारणी लोकांशिवाय बाकी सर्वांसच मान्य आहे. आणि, अशा जागांकरितां लायक माणसें मिळावीं, ह्मणूनच हिंदुस्थानांतील सिविल सर्विस कायम ठेवण्यांत आली आहे. ह्याच सर्विसला पूर्वीं **सनदी नोकरी** असें नांव होतें. ह्या नोकरीमध्यें सर्वोत्कृष्ट असे, फार झाले तर, १२०० लोक असून, त्यांपैकीं सर्वच नाहीं तर बहुतेक मंडळी इंग्रज असते, असें ह्मणण्याचें कारण, त्यांत सुमारें १०० हिंदी लोकांचा समावेश झालेला आहे. ह्या नोकरींत शिरण्याकरितां नवीन लोक पाहिजे असतात, ते विलायतेंत परीक्षा घेऊन, त्यांत जे सर्वोत्कृष्ट ठरतील, त्यांसच पसंत करण्यांत येत असतें. पण, हिंदीलोकांच्या मुख्य गाऱ्हाण्यांपैकीं हें एक गाऱ्हाणें आहे. तथापि, सिविलसर्विसमधल्या लोकांच्या अंगीं आजपर्यंत जशी फार मोठी योग्यता दिसून आली आहे, तशी पुढें कायम राहिली पाहिजे. ह्मणून, ज्या हिंदी लोकांना ह्या नोकरींत शिरावयाचें असेल, त्यांना पाश्चिमात्य लोकांची विद्या प्राप्त झाली पाहिजे इतकेंच नाहीं, तर इंग्रज लोकांचें अगदीं पक्कें वळण त्यांना लागलें पाहिजे. हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयांतून पाश्चिमात्य तऱ्हेचें शिक्षण मिळण्याची सोय जरी असली, तरी इंग्रज लोकांचें वळण ह्मणून जी कांहीं गोष्ट आहे, ती प्राप्त होण्याची सोय अझूनतरी इकडे खास नाहीं.

असंतुष्ट अशा हिंदी राजकारणी लोकांच्या दृष्टीनें, सिविल सर्विसमधल्या लोकांचा खरोखर अक्षम्य अपराध ह्मटला ह्मणजे, ते ब्रिटिश राजसत्तेचा मुख्य आधारस्तंभ असून, हिंदुस्थानसरकार व त्यांच्या स्वाधीन केलेली कोट्यावधी रयत, यांच्यामध्यें सांगड घालून देणारी ती एक कायमची कडी आहे. आतां,

हिंदुस्थानांतील मुत्सद्दागिरीच्या मोठमोठ्या प्रश्नांचा विचार करितांना, हे इंग्रज सिविलियन आपल्या अज्ञानामुळें व मनांत प्रजेविषयीं प्रेम नसल्याकारणानें, लोकांचें खरें कल्याण कशांत आहे व त्यांचे विचार काय आहेत, इकडे लक्ष देण्याची बिलकुल परवा करित नाहींत, व त्याबद्दल त्यांच्या मनाला लाजहि वाटत नाहीं, हा आरोप किती निराधार आहे, हें ओघानें सांगण्याचा मला पूर्वीच प्रसंग आला होता. वास्तविक प्रकार पाहिला, तर ह्याच्या अगदीं उलट आहे. कारण, गेल्या ५० वर्षांत, हिंदी लोकांच्याच फायद्याकरितां, व हिंदी राजकारणी लोकांनीं मोठ्या जोरानें विरोध केला असतांहि त्यास न जुमानून, पुष्कळ वेळां जे कायदे पास करण्यांत आले, त्यांपैकीं बहुतकरून प्रत्येकाचें श्रेय ह्या सिविलियन लोकांसच दिलें पाहिजे. आणि, वस्तुस्थिति अशी असल्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कांहींएक कारण नाहीं. कांकीं, हिंदी राजकारणी लोक साधारणपणें नगरवासी असतात; व फार करून ते ज्या वर्गांतले असतात व ज्या वर्गाचें हिताहित पाहण्याचा त्यांना अधिकार पोहोंचतो, त्या वर्गांतील लोकांचा एकंदर मोठ्या जनसमूहाशीं कांहींएक संबंध नसतो ह्मटलें तरी चालेल. हा जनसमूह ह्मणजे शेतकरी लोक होत. पण, दुसऱ्या बाजूनें पाहिलें, तर इंग्रज सिविलियन लोक आपल्या आयुष्याचा अति-उत्तम भाग बहुधा खेड्यापाड्यांत—शेतकरी लोकांच्या मुलुखांत—घालवितात, व अशा खेड्यापाड्यांना राजकारणी लोकांचे पाय क्वचित्च लागतात. त्यामुळें, ज्या लोकांमध्यें सिविलियन मंडळीला आयुष्य कंठावें लागतें व ज्यांच्याशीं त्यांचा नेहमीं सहवास घडतो, त्या लोकांच्या गरजा काय आहेत व त्यांच्या मनाला काय वाटतें, हें

राजकारणपटु मंडळीपेक्षां त्यांनाच फार चांगलें कळत असतें. **लोकपक्षाग्रणी** ह्या शद्बाचा जो अत्युत्कृष्ट अर्थ आहे, त्या दृष्टीनें पाहूं गेल्यास, सिविलियन लोकांसच फक्त खरोखर तो शद्ब वास्तविक लागू पडतो. हे लोक ह्मणजे हिंदुस्थानांत "खुंटावरच्या कावळ्यांप्रमाणें" असतात, ह्याच गोष्टीमुळें, कांहीं विशेष वर्गांचेंच तेवढें हित पाहणें व कांहीं विशेष गोष्टीकडेच स्वतःच्या मनाचा ओढा असणें, वगैरे प्रकारांपासून ते अगदींच अलिप्त असतात; परंतु, इकडील राजकारणी लोकांच्या मनावर असल्या गोष्टींचा बहुधा नेहमीं पगडा असतो. आणखी असें आहे कीं, मि. बिपिनचंद्रपाल यानीं एकेवेळीं प्रांजळपणें कबूल केल्याप्रमाणें "सामान्य जन-समूहानें आपल्या राजाच्या ठिकाणीं पूर्ण भक्ति ठेवून प्रजाधर्मानें वागावें, ही जरी गोष्ट साध्य झाली नाहीं, तरी निदान त्यांनीं सहनशीलपणानें व उदार अंतःकरणानें सरकारच्या कृत्यांस सम्मति द्यावी, ... ह्मणून त्यांना आपलेसें करून, त्यांचें मन आपल्या ताब्यांत" आणण्याचा उद्योग करणें, हा हिंदु-स्थानांतील इंग्रज अधिकाऱ्यांचा मुख्य व अगदीं वाजवी हेतु असून, तो सिद्धीस नेण्याचा त्यांनीं प्रयत्न केलाच पाहिजे. आपल्या ह्मणण्याचा अर्थ अगदीं स्पष्ट करून सांगण्याच्या हेतूनें, "असंख्य जनसमूहाचें मन मोहित करून टाकण्याकरितां," लॉर्ड कर्झनसाहेबांच्या कारकिर्दीत, शेतकरी लोकांच्या हिता-करितां केलेल्या सुधारणा, शेतकीच्या पेढ्या व इतर अशाच गोष्टी, यांचें उदाहरण मि० पाल यांनीं घेतलें होतें. ह्यांनीं आणखी असेंहि सांगितलें होतें कीं, "सामान्य जनसमूहाच्या मनावर हिंदी राजकारणी लोकांचें वजन मुळींच बसूं न देतां, व

ह्यांच्या (राजकारणी लोकांच्या) जातभाईंसहि अजीबात वगळून, सरकार हिंदुस्थानांत लोकांचीं मनें आपलींशीं करून घेऊं लागलें असतां, जो राजकारणी पुरुष सरकारला तसें करूं देतो, तो मूर्ख असला पाहिजे." मि० पाल यांचा जो मुद्दा आहे, त्यावरून त्यांची विचारसरणी अगदीं तर्कशास्त्रशुद्ध आहे; व **युगांतर** पत्रांतील लेखकांचीहि अशीच स्थिति होती. ह्या मंडळीनें आपला क्रांतिकारक चळवळीचा बेत फार विचारपूर्वक जेव्हां ठरविला, तेव्हां त्यांनीं अगदीं उघडरीतीनें सर्वांस जाहिर केलें कीं, अगदीं प्रथमतः जी गोष्ट घडवून आणिली पाहिजे, ती अशी कीं, लोकांचा (हिंदी) आपल्या राज्यकर्त्यांच्या ठिकाणीं जो विश्वास आहे, त्याच्या मुळावरच घाव घालून, परकी लोकांच्या अंमलाचें जूं मानेवर असतांहि, सुखासमाधानानें वागण्याची त्यांच्यांत जी प्रवृत्ति आहे, ती नाहींशीं केली पाहिजे. परंतु, ब्रिटिश राज्याच्या वैऱ्यांकडून अशा तऱ्हेची कबुली मिळाली, ह्यावरून ब्रिटिश राज्यकर्ते हिंदी लोकांच्या हिताकडे सुज्ञपणानें व प्रेमपुरस्सर लक्ष देतात, ह्या गोष्टीविषयीं वरच्यापेक्षां स्तुतिपर उद्गार आणखी कोणते असणार?

हिंदुस्थानच्या प्रजेमध्यें नानाविध जाती, वर्ग व पंथ आहेत; आणि, ह्या अशा भिन्न भिन्न समाजांचे हितसंबंधहि वेगवेगळाले असून, ज्या वर्गांतून नवीन, सुधारलेल्या कौन्सिलांत सभासद घेतले जातात, ते ह्या अशा निरनिराळ्या हितसंबंधांच्या बाबतींत प्रतिनिधी ह्या नात्यानें बोलण्यास कांहीं अंशीं लायक असतात. म्हणून; जोंपर्यंत अशा रीतीनें व शक्यास्थलेल्या विचार पाहून, हिंदी लोकांचे प्रतिनिधी सदरहु कौन्सिलांत [illegible] करण्यांत येईल, तोंपर्यंत ह्या कौन्सि-

लांतून हिंदुस्थानसंबंधी प्रश्नांचा खल करण्यासाठीं पूर्वींपेक्षां जी पुष्कळ संधि देण्यांत आली आहे, तिच्यापासून फायदाच झाला पाहिजे, असें ह्या दृष्टीनें विचार केला असतां वाटतें. आपला पाणउतारा करणाऱ्या मंडळीशीं उघडपणें दोन हात करण्याची संधि आजपर्यंत इंग्रज सिविलियन लोकांस जितकी मिळत होती, त्यापेक्षां ती आतां जास्त मिळूं लागेल; आणि, गेल्या हिंवाळ्यांत, ह्या नवीन तऱ्हेनें बनलेल्या कौन्सिलाची जी पहिलीच बैठक झाली, त्यावेळीं घडून आलेल्या एकंदर प्रकारावरूनच जर कोणीं पाहिलें, तर प्रसंग पडेल त्याप्रमाणें शक्कल लढवून, मोठमोठालीं अलंकारयुक्त भाषणें करून, आपल्या वक्तृत्वाच्या ओघानें प्रतिपक्षास हार खाण्यास लावण्याचा गुण हिंदी राजकारणी लोकांमध्यें अधिक असल्यामुळें, वादविवादाच्या वेळीं, इंग्रज सिविलियन मंडळींची अगदीं फटफजिती होऊन जाईल, अशी पुष्कळांना प्रथम जी भीति पडली होती, ती निष्कारण होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. सरकारी सभासदांची बाजू चांगली असून, ती त्यांनीं अगदीं साध्या रीतीनें पुढें मांडल्यामुळें, आपल्या अलोट वक्तृत्वाच्या सामर्थ्यावर सर्वतोपरि भिस्त ठेवणाऱ्या त्यांच्या प्रतिपक्षीय मंडळीला "शेरास सवाशेर भेटला;" व असा प्रकार कलकत्त्याच्या वरिष्ठ कौन्सिलांतच फक्त घडून आला असें नाहीं. दुसऱ्या दृष्टीनें विचार केला, तर हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारी व वरिष्ठ दर्जाचे हिंदी राजकारणी लोक, ह्या उभयतांचा सुधारून वाढविलेल्या कौन्सिलामध्यें प्रत्यक्ष सहवास घडून आल्याकारणानें, दोन्ही बाजूंचे एकमेकांविषयीं जे कांहीं प्रतिकूल ग्रह असतील ते कमी कमी होत जाण्यास त्याचा आतां चांगला उपयोग होईल. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत

ज्या अलीकडे सुधारणा झाल्या आहेत, त्यांचा हेतु जसा काय सिविलसर्विसमधल्या इंग्रज मंडळीचीच विशेषतः खोड मोडण्याचा होता असें मानून व त्यांच्याविषयीं मनामध्यें वैरभाव व अंदेशा बाळगून, त्या सुधारणांची कित्येक मंडळीकडून तरफदारी होत होती व त्या मिळाल्याबद्दल त्यांना अत्यानंद झाला, ह्या त्यांच्या वर्तणुकीबद्दल वरील इंग्रजलोकांना राग यावा, हें अगदीं वाजवी आहे. परंतु, साधारणपणें, त्यांना त्या सुधारणांचाच मुळीं राग आला आहे, अशी कोणीं आपल्या मनाची समजूत करून घेणें, ही निव्वळ चूक आहे, असें मला खात्रीनें वाटतें. आतां, जी खरोखर अडचण येऊन पडली आहे ती अशी कीं, ज्या सिविलियन मंडळीला ह्या सभांत सरकारच्या पक्षानें येऊन, त्यांच्या बाजूचें समर्थन करण्याकरितां त्यांतून हजर राहावें लागणार, त्यांच्यावर कामाचा मोठाच बोजा पडणार आहे. गेल्या बऱ्याच वर्षांपासून, एकंदर काम, आणि विशेषतः हापिसचें काम, एकसारखें वाढतच चाललें आहे; पण, त्यामानानें नेमणुकीची मंडळीमात्र वाढलेली नाहीं. त्यामुळें, हिंदी लोक भेटीला आले असतां, त्यांची भेट घेण्यास सिविलियनांस पूर्वींसारखा आतां वेळ मिळत नाहीं. तसेंच, फिरतीवर निघून स्वारीमध्यें जितका वेळ ते घालवित असत, त्यांतहि बहुधा छाटाछाट करण्याची त्यांना आतां पाळी येते. ह्याच-कारणामुळें, बदल्या, रजेमधल्या नेमणुका अथवा हंगामी जागा ह्यांचा सुकाळ होत चालला आहे. खरोखर पाहिलें, तर फेरा घेण्यास पुरेसे इतके लोक आज मोठ्या माराकुटीनें सांपडतील; आणि, मनुष्याची वारंवार इकडून तिकडे बदली केली, म्हणजे हिंदुस्थानसारख्या देशांत, त्याला ज्या लोकांत काम करावयाचें

असतें, त्यांची सर्वप्रकारें चांगली माहिती करून घेण्यास पाहिजे तशी संधिच त्याला मिळत नाहीं, हें उघड आहे. ह्या देशांतला एखादा प्रांत जरी घेतला, तरी त्यांत निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या, व निरनिराळ्या धर्मपंथांच्या व चालीरीतींच्या, पांच सहा, अगदीं निरनिराळ्या जाती तुमच्या आढळण्यांत येतील. कदाचित्, अशाच कारणांमुळें, सरकारच्या सेक्रेटरींच्या हापिसांतून, अथवा सरकारचा मुक्काम सिमल्यास असला किंवा प्रांतांच्या राजधानीच्या ठिकाणीं असला, तरी सरकारच्या बरोबर कायमपणानें असणाऱ्या खात्यांतून (खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांच्या मार्फत), राज्यकारभाराचीं एकंदर सूत्रें हालवून, सर्व सत्ता एकाच ठिकाणीं आणून ठेवण्याची फाजील प्रवृत्ति असल्यामुळें, व ऊनतान सोसून खेड्यापाड्यांनीं कामाचा जड गाडा ओढणाऱ्या सिविलियन मंडळीच्या पदरीं इतकी पुण्याई नसल्यामुळें, ह्यांना त्यांच्यावर अधिकाधिक अवलंबून राहावें लागतें, व त्यांना स्वाभाविकपणें जसा पुष्कळ रीतीनें लाभ होतो, तसा ह्यांना होत नसल्याकारणानें, ह्यांच्या पोटांत दुखूं लागतें. टपाल, तारायंत्र व अहिमहीप्रमाणें वाढत जाणारे "सरकारी नियम" ह्यांच्यामुळें, स्वतःच्या जबाबदारीवर एखादी गोष्ट अंगावर घेऊन ती पार पाडण्याचें सामर्थ्य सर्वच बाबतींत नष्ट होत चाललें आहे. शिवाय, यूरोपांत जाऊन येण्याच्या प्रवासाच्या सुखसोयी वाढल्याकारणानें, हिंदुस्थान हें आपलें घर आहे, अशी भावना सिविलियन लोकांच्या मनांत आतां उत्पन्न होईनाशी झाली आहे, ही गोष्ट नाकबूल करितां यावयाची नाहीं. बंडाच्या काळापूर्वी, इकडेच लग्नसंबंध वगैरे करून पायांत बिडी अडकवून घेण्याचे प्रकार क्वचित् घडत असत; असे

नाहीं. परंतु, ह्या गोष्टी आतां त्रेतायुगांतल्या होऊन बसल्या आहेत; आणि, आपल्या मुलांस शिक्षणासाठीं विलायतेस पाठविणें, तसेंच हवेमुळें किंवा मुलांवर देखरेख करण्याकरितां आपल्या बायकांसहि बहुधा तिकडे पाठविणें, ह्या गोष्टी हल्लींच्या विवाहित पुरुषांस कराव्या लागत असल्यामुळें, आपल्या नोकरीचीं वर्षें मोजित राहून, तीं भरल्याबरोबर पेनशन घेऊन स्वदेशीं परत जाण्याची संधि मिळतांच, ती पहिल्यानें साधण्याची प्रवृत्ति त्यांच्या ठिकाणीं पूर्वीपेक्षां आतां स्वाभाविकपणेंच जास्त दिसून येते. हिंदुस्थानांतील राहणीचा खर्च वाढला असून, सोन्याच्या भावांतील चलबिचलपणामुळें इकडील चलनीनाणें जो रुपया त्याची किंमत कमी झाली असल्याकारणानें, केवळ पैशाच्या दृष्टीनें पाहिलें तरी, इकडल्या नोकरींत आतां पूर्वीसारखी मजा राहिली नाहीं. खेरिज, हिंदुस्थानच्या वैद्यकी खात्यांतील युरोपियन लोकांची (डाक्टरांची) संख्या कमी झाली आहे, अशा सारख्या अनेक कारणांमुळें, वरील नोकरीची मातब्बरी अप्रत्यक्षरीतीनें कमी होणारच. राजधानीच्या ठिकाणापासून दूर असलेल्या गांवीं, खासगी रीतीनें वैद्यकी करणारे यूरोपियन लोक नसतात; आणि, अशा गांवच्या सरकारी दवाखान्यांवर आतां यूरोपियन डॉक्टरांच्याऐवजीं नेटिव लोकांची नेमणूक होऊं लागली आहे. त्यामुळें, विवाहित कामदार मंडळीस विलक्षण हाल काढावे लागतात. कारण, इंग्रज स्त्रिया नेटिव डाक्टरांस हात दाखवून, त्यांचें औषध घेण्यास नाखुष असतात, ह्याचें कारण केवळ त्यांचा ह्यांच्याविषयीं प्रतिकूल ग्रह असतो इतकेंच नाहीं, तर त्यांत आणखीहि पुष्कळ गोष्टी आहेत. तसेंच, विलायतेंतील सिविल सर्व्हिसमधल्या पुष्कळ तरुण,

गृहस्थाची हिंदुस्थानांतील एका अतिशय मोठ्या जागेवर अलीकडे नेमणूक करण्यांत आली, ही गोष्ट हिंदुस्थानांतील यच्चयावत् सिविलियन लोकांच्या मनास लागून राहिली आहे, हें लपवितां येण्यासारखें नाहीं. मि० क्लार्क यांच्या हुशारीबद्दल कोणास शंका नाहीं. परंतु, त्यांच्याबरोबर, व त्यांच्या आधींहि पुष्कळ वर्षें, जे लोक त्याच द्वारानें सरकारी नोकरींत शिरले, व विलायतेंत न राहतां ज्यांनीं हिंदुस्थानांत काम करण्याचें पतकरलें, त्यांच्यापैकीं प्रत्येक गृहस्थापेक्षां मि० क्लार्क यांच्या अंगीं खरोखरच अधिक कर्तबगारी आहे काय? विलायतेंतील कोणत्याहि खात्याच्या अंडरसेक्रेटरीच्या जाग्यावर त्यांची बढती करण्याचें सध्या कोणत्याहि प्रधानाच्या मनांत आलें नसतें. आणि, ह्या नेमणुकीमुळें, हिंदुस्थानांतील एकंदर सिविलियनांची जी मोठीच बदनामी झाली आहे, ती जरी बाजूस ठेविली—आणि, हिंदी लोकांचा साधारणपणें असाच समज आहे कीं, हिंदुस्थानांतील सिविलियनांची बदनामी करण्याच्या हेतूनेंच ही अशी नेमणूक झाली आहे—तरी हिंदुस्थानांतील ह्या फारच मोठ्या दर्जाच्या जागेवर मि. क्लार्क यांची नेमणूक झाली आहे, त्यावरून हिंदुस्थानसरकार ह्मणून जें कौन्सिल येथें आहे, त्यांच्या वाजवी कामाविषयींची (विलायतसरकारची) कल्पना फारच चुकीची आहे, असें त्यांतून निघतें.

हिंदुस्थानांतील सिविलियन लोक जें वाखाणण्यासारखें इकडे काम करित आहेत, त्यांत पुष्कळ वेळां ते अगदीं कसास लागतात. ह्या अशा प्रकारच्या कामाबद्दल विलायतेंतील लोक, साम्राज्यसरकार व तसेंच हिंदुस्थानसरकार यांनीं त्यांच्या ठिकाणीं निष्ठा ठेवून त्यांचें जसें साहाय्य करणें व त्यांना उचे,

जन देणें उचित आहे, तसेंच फक्त त्यांच्याकडून होत राहिलें, तर सदरहु सिविलियन मंडळीच्या भावी स्थितीवर ह्या वर सांगितलेल्या किरकोळ गोष्टींचा मोठासा परिणाम होईल, असें नाहीं. परंतु दुर्दैवाची गोष्ट आहे कीं, गेल्या थोड्या वर्षांच्या अनुभवावरून, हिंदुस्थानांतील सिविलियन लोकांच्या मनानें असें निःसंशय घेतलें आहे कीं, व्हाइटहाल (विलायतसरकारच्या प्रधानमंडळीची काम करण्याची जागा) किंवा सिमला (हिंदुस्थानसरकारचें उन्हाळ्याचें ठिकाण) येथून आपणांस पूर्वीप्रमाणें साहाय्य व उत्तेजन मिळण्याची ह्यापुढें खात्री नाहीं; आणि इकडे तर, बेजबाबदार पक्षपाती लोकांकडून त्यांच्यावर दुप्पट जोरानें व कडकपणानें हल्ले होऊं लागले असून, विलायतेंतील सभांतून व वर्तमानपत्रांतून ह्याच गोष्टींची री अधिकाधिक उच्चस्वरानें ओढली जात आहे. हिंदुस्थानसरकार व हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारी यांच्यामधील संघट्टन नाहींसें झालें आहे, ह्या गोष्टीबद्दल मनाला जितकें दुःख वाटतें, तितकेंच पार्लमेंट सभेंतील सरकारी रीतीनें केलेल्या पुष्कळ भाषणांतील उदासीनतेमुळेंहि वाटतें. आतां, अशीं जीं भाषणें करण्यांत येतात, तीं बहुधा सरकारी नोकराचें संरक्षण करण्याच्या बुद्धीपेक्षां, वेस्टमिनिस्टर (पार्लमेंट भरण्याची जागा) येथील राजकीय पक्षभेदामुळें उत्पन्न होणाऱ्या अडचणी टाळण्याच्या इच्छेनें करण्यांत येतात, असें दिसतें. आणि, हे सरकारी नोकर कसे म्हणाल, तर त्यांच्याविरुद्ध खोट्यानाट्या कंड्या उठवून त्यांची पाहिजे तशी निंदा केली असली व त्यांच्यावर भलभलते आळ घेतले असले, आणि ह्याचा परिणाम म्हणजे राजकीय खुनी लोकांच्या पिस्तुलास व बॉम्बगोळ्यास त्यांनी

अगदीं डोळे मिटून बळी पडावें लागत असलें, तरीदेखील आपल्या स्वतःच्या अब्रूचा बचाव करण्याचें कांहींच साधन त्यांच्या हातीं नसतें. इंग्रज सिविलियनांच्या हिंदुस्थानांतील आयुष्यक्रमांत त्यांच्यावर जे अनेक प्रसंग येतात, त्यांत आणखी एका भयप्रद गोष्टीची भर पडली, ह्मणून ते लोक कांहीं घाबरून जाणारे नाहींत. हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकाऱ्यांचे खून पाडले पाहिजेत, असें जें नवीन शुभवर्तमान सर्वत्र पेरण्याचा तडाका चालला आहे, हा अपराध मोठासा नाहीं, अथवा हिंदी लोकांच्या ह्या प्रवृत्तीबद्दलची मूळ जबाबदारी वरील इंग्रज लोकांवरच पडते, असें दाखविण्यांत त्यांचेच पुष्कळ जातभाई आपली सर्व अक्कल खर्च करित असतात, त्यामुळेंसुद्धां त्यांच्या मनाला उद्विग्नता येतां कामा नये, असें कोणीतरी ह्मणण्यास तयार होईल काय? मि. म्याक्कारनेस यांनीं छापून प्रसिद्ध केलेल्या चोपड्यांत, "द्वेषबुद्धीनें, दुसऱ्याच्या सुखदुःखाकडे लक्ष न देतां व भेकडपणानें जी टीका केलेली आहे," तिचा निषेध करण्याबद्दल, मि. मांटेग्यु यांच्या मनांत कल्पना आली, ही गोष्ट फार चांगली झाली. परंतु, इंग्रज कामदारांच्या बचावाचा उपाय सरकार करीपर्यंत, देशी वर्तमानपत्रांतून दररोज त्यांच्या अंगावर गंधकाच्या अर्कांचे फवारेच्या फवारे उडत असून, त्यांस कोणीहि हरकत करित नव्हता, त्यांच्या पुढें हें चोपडें ह्मणजे, दहींहंडी फुटल्यावर गोविंदागोपाळांच्या अंगावर ताकवणी पडतें, त्यासारखेंच ह्मटलें पाहिजे.

प्रजा ही राजाचीं लेंकरें असून, तिचें त्यानें पित्याप्रमाणें पालन पोषण करावयाचें, ही जी जुनी राज्य करण्याची रीत, ती जवळजवळ आमची येथें सुटत जाईल, असतसें,

हिंदुस्थानांतील इंग्रज सिविलियनांस करावीं लागणारीं कामें अधिकाधिक घोंटाळ्याचीं होत जाऊन, त्यांच्या अंगावर कामाचा मोठा भार खात्रीनें पडणार आहे; आणि, अशीं मोठ्या श्रमाचीं कामें आपलें कर्तव्यकर्म म्हणून ते लोक करित असतांना, त्यांना धीर खचूं नये म्हणून, त्यांना शहाणपणानें व त्यांचीं दुःखें जाणून सरकारनें वागवून घेतलें पाहिजे. आतां, हल्लींचे नवीन व्हाइसरायसाहेब हे स्वतः ब्रिटिश सिविलसर्विसमधल्या एका अत्यंत महत्वाच्या शाखे पैकीं असल्यामुळें, त्यांच्या हातून वरील गोष्टी होतील, असा भरंवसा आहे. हिंदुस्थानांत जें काम आम्हीं आपल्या शिरावर घेतलें आहे, तें अधिकाधिक बिकट होत गेलेंच पाहिजे, व तें तडीस नेण्याकरितां आमच्यांतील अगदीं उत्तमोत्तम माणसें त्या कामाकडे देण्याची, कधीं पडली नाहीं अशी, जरूर पडणार आहे. हिंदुस्थानांत नोकरी करण्याकरितां येणाऱ्या लोकांस पैशाच्या वगैरे रूपानें जीं बक्षिसें मिळतील, त्यांची संख्या पूर्वींपेक्षां कमी होऊन, त्यांची किंमतहि कमी होणार आहे. पण, कामाचा चेप, घरदार सोडून परमुलखांत येऊन पडण्याची शिक्षा, आप्तबंधू व सखेसोयरे यांची वारंवार ताटातूट झाल्यामुळें मनाला होणारें दुःख, शरीरप्रकृति नेहमीं कसास लावून पाहणारें व बहुधा घातकी असें हवापाणी, इत्यादि गोष्टी बहुतकरून आहेत तशाच राहणार. तथापि, आपल्या मातृदेशाकडून आपल्याशीं न्यायानें वर्तन होईल, असा जोंपर्यंत त्याच्या मनाला भरंवसा आहे, तोंपर्यंत, हिंदुस्थानांत असलेले नानाप्रकारचे हितसंबंध, व तेथें आरंभलेल्या कामाचें विशालत्व व थोरवी यांच्यामुळें

क्रम चालू राहील. पण, जर कां ह्या बाबतींत त्यांची फसमत झाली, तर मात्र हिंदुस्थानांतील सिविलसार्विस झपाट्यानें लयास जाईल इतकेंच नाहीं, तर प्रत्यक्ष इंग्रजी राज्याचाहि तसाच शेवट होईल. कारण, तरवारीस राज्य करितां येत नाहीं; तिला फक्त राज्याचा संभाळ करितां येतो. आणि, तो कोठवर ह्मणाल, तर जोंपर्यंत हिंदुस्थानांतील कोट्यावधी लोकांच्या मनांत खुद्द सरकारविषयीं आदरबुद्धि वसत आहे व ते सरकारवर राजी आहेत तोंपर्यंतच. आतां, हिंदी लोकांचें हें असें प्रेम संपादन करण्यांत आलें आहे, तें सेनाधिपती, साम्राज्याचे अष्टप्रधान, किंबहुना बादशहाचे प्रतिनिधी, यांनीं संपादन केलेलें नाहीं; तर, हिंदुस्थानच्या सिविलसर्विसमधल्या लोकांनीं मोठ्या धिम्मेपणानें व बहुधा कोणाच्या नजरेस येणार नाहीं अशा रीतीनें काम करून, मोठ्या कष्टानें ही गोष्ट हळू हळू साध्य करून घेतली आहे. ह्मणजे, त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांचें धैर्य, त्यांची विद्वत्ता, त्यांचा पराक्रम व त्यांची अढळ न्यायप्रीति इत्यादि गुणांचें तें फळ आहे.

इंग्रज सिविलियन मंडळी तुटून वागते, अशा तक्रारी अगदीं वरच्या किंवा अगदीं खालच्या हिंदीलोकांकडून फारच क्वचित् येतात. पण ज्या येतात, त्या साधारणपणें थोडें-बहुत पाश्चात्य शिक्षण मिळालेल्या, नवीन मध्यम स्थितींतल्या लोकांकडूनच येतात; आणि, ह्या लोकांचें इंग्रज अधिकाऱ्यांशीं अशा तऱ्हेचें वर्तन असतें कीं, त्यांचें व ह्यांचें प्रेम जडून, निष्कपट स्नेह होण्याचा बहुतेक संभव नसतो, असें ह्मटलें तरी चालेल. आणि, कधीं कधीं, अशा तक्रारी पुढें येतात, त्या एका विशिष्ट लोकांकडूनच (हिंदी) येत असतात, व हे लोक नाहींसे होण्यास फार

अवकाश लागणार नाहीं, अशी आशा आहे. पण, ह्या लोकांस चार पावलें दूर ठेवण्याची सिविलियन मंडळीनें सर्वांत खबरदारी घेतली पाहिजे. सिविलियन कामगार तरुण असला, तर त्याला भूलथाप देऊन एतद्देशीय स्त्रियांच्या नादीं लावून, अथवा गोड गोड बोलून त्याला एतद्देशीय सावकाराच्या जाळ्यांत गुरफटवून, अशा रीतीनें त्याला आपल्या कह्यांत आणणारे लोक आहेत. किंवा, इतक्या निंद्य गोष्टी न करितां, कांहीं अन्य मार्गानें त्यांच्याशीं सलगी वाढविण्याचा प्रयत्न हे लोक करित असतात, त्यांचा फक्त हेतु असा कीं, अशा रीतीनें त्याच्यावर आपलें वजन बसलें, किंवा बसलें आहे असें लोकांस भासलें, म्हणजे त्याचा उपयोग इतर हिंदी लोकांचीं कामें करून देण्याकडे होऊन, आपणास पैसे खातां येतील. अशा गोष्टी फार क्वचित् घडतात, ह्यांत संशय नाहीं; आणि, पूर्वी अशा गोष्टींना अनुकूल अशी समाजाची परिस्थिति होती, ती आतां बदलत चालली असल्याकारणानें, अशा गोष्टी दिवसेंदिवस कमी कमीच होत जाणार. आतां ते इतके वाईट जरी नसले, तरी ज्यांना दुरूनच नमस्कार केला पाहिजे, अशा लोकांचा इकडे मोठा भरणा असून, **उमेदवार** ह्या नावानें ते ओळखले जातात. लोकांत आपली बडेजावी व्हावी, आणि साधल्यास, सरकाराला चार थापा मारून व घुलकावण्या दाखवून, किरकोळ पदव्या अथवा सरकारांत मानमान्यता आहे असें सुचविणाऱ्या (पदकें वगैरेसारख्या) गोष्टी प्राप्त करून घेण्यासाठीं, इंग्रज अधिकाऱ्यांच्या मार्गे **लांगूलचालन** करित हिंडण्याची त्या लोकांत नेहमीं उत्सुकता दिसून येते. कारण, ह्या वरील गोष्टींना हिंदी समाजांत फार महत्त्व असतें.

सिविलसर्विसमध्यें नवीन लोक घ्यावयाचे झाले, म्हणजे

सर्व उमेदवारांची परीक्षा घेऊन त्यांत जे वर येतील, त्यांनाच फक्त घेण्यांत येतें. परंतु, सरकारी नोकरीच्या इतर शाखांत भरती करितांना, अशी परीक्षा वगैरे न घेतां, उमेदवारांची निवड करून, त्यांपैकीं पसंत वाटतील त्यांना घेतात. पण, ही पद्धत पहिलीप्रमाणें नेहमींच यशस्वी होत नाहीं. पुष्कळच वेळां असें घडतें कीं, वकिली अथवा डाक्टरी करण्याकरितां, अथवा मीं पूर्वीं सांगितलें आहे त्याप्रमाणें विद्याखात्यांत शिरण्याकरितां, जे लोक इकडे पाठविण्यांत येतात, त्यांच्या अंगीं हे धंदे करण्याची चांगलीशी योग्यता नसते; आणि, ज्या लोकांत त्यांना काम करावयाचें असतें, त्यांची भाषा व त्यांच्या चालीरीती, यांचें मुळींच ज्ञान नसतांहि, त्यांना आपल्या कामाचा आरंभ करण्याची मोकळीक असते. आतां, अशा ज्या गोष्टी घडून येतात, त्या साधारणपणें विलायतेंतील लोकांच्या निष्काळजीपणामुळें व अज्ञानानें घडून येतात. अशा नेमणुकांपैकीं कित्येक आपल्याच (नेमणुका करणारांच्या) लोकांस दिलेल्या 'वरण्या' होत, असें ह्मटल्याशिवाय चालावयाचें नाहीं आणि हिंदुस्थानांततर अशा वरण्या देण्यास सवड नाहीं. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, जे हिंदी लोक चार देश पाहून आलेले नसतात, त्यांचा अलीकडे ज्या इंग्रज लोकांशीं संबंध घडून येतो, ते सर्वस्वी निराळ्या प्रकारचे लोक असतात. टण टण उड्या मारित, सर्व जग पायाखालीं घालणारी मंडळी बहुधा अमेरिकन असून, इकडील लोकांच्या चालीरीतींविषयीं त्यांच्या शुद्ध अज्ञानामुळें, त्याच्या हातून नेहमीं प्रमाद घडतात. आणि, हा अमेरिकन आहे व हा इंग्रज आहे, असें एतद्देशीय लोकांस ओळखतां आलें पाहिजे, असें कोणासहि ह्मणतां येणार नाहीं. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, इकडे रेल्वे व तार-

यंत्र सुरू झाल्यापासून, तसेंच व्यापारधंद्यांची वृद्धि होऊं लागल्यापासून, त्या त्या खात्यांतील खालच्या दर्जाच्या जाग्यांवर, त्या त्या धंद्याचें कांहीं विशेष ज्ञान अंगीं असणाऱ्या लोकांची नेमणूक करण्याकरितां (फिटर, इंजीन–ड्रायव्हर, तारायंत्राकडील इन्स्पेक्टर वगैरे लोक मिळण्याकरितां), एका विशेष–प्रकारचे इंग्रज लोक इकडे आणावे लागले. आतां, ह्या लोकांचे कांहीं जरी गुण असले, तरी ते बरेच अडदांड असून, आपण श्रेष्ठवर्णाचे लोक आहोंत, अशी भावना त्यांच्या मनांत बरीच असते, अथवा असल्या कल्पनेचें प्रदर्शन करण्याची त्यांना मोठी हौस असते. शिवाय, टॉमी आटकीनप्रमाणें (सोजीरलोकांप्रमाणें) त्यांना तरवारीच्या धारेवरहि धरलेलें नसतें. सोजीर लोक ह्मटले ह्मणजे, साधारणपणें खुशालचंद—कशाची फिकीर न बाळगणारे—असे असून, नेटिवांविषयीं त्यांच्या मनांत कांहींसा तिरस्कार असला, तरी त्यांच्याबरोबर सुस्वभावानें वागण्यांत त्यांना गम्मत वाटते. तथापि, ही स्वारी "आपल्या रंगांत" आली (दारू पिऊन बेहोष झाली), अथवा अंगाला (कुयली लागल्याप्रमाणें) खाज सुटली असतां चिडून गेली, ह्मणजे मात्र त्यांच्याहि हातून इमामदांडगेपणा होतो. उष्ण देशांत हा कंडु सुटण्याचा विकार जरी अगदीं साधारण आहे, तरी त्यापासून फारच त्रास होतो. ह्या दृष्टीनें पाहिल्यास, ब्रिटिश लष्करामध्यें मद्यपाननिषेधाच्या चळवळीस जो विलक्षण जोर आलेला आहे, त्यांत दोन तऱ्हेनें समाधान मानलें पाहिजे.

एकंदरींत, मोठमोठ्या शहरांतून ह्मणजे जेथें फक्त खालच्या वर्गांतील यूरोपियन व नेटिव लोकांचा एकमेकांशीं खरेखर सहवास घडतो, तेथें त्यांच्यामधील संबंधामुळें कांहीं

ह्मणण्यासारखा उपद्रव क्वचित्‌च पोहोंचतो; आणि, दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, वरच्या वर्गांतील यूरोपियन व नेटिव लोकां-मध्यें कधीं कधीं खासगी भांडणतंटा उपस्थित होतो, व त्यामुळें गोष्टी विकोपास जाऊन बरेंच वितुष्ट पडतें, यांत शंका नाहीं. आणि, हीं भांडणें अशीं असतात कीं, त्यांत सभ्य-पणाच्या वर्तणुकीसंबंधाच्या अगदीं साध्या गोष्टींचा इंग्रज लोकांना विसर पडतो इतकेंच नाहीं, तर हिंदुस्थानांत इंग्रज लोकांचा (सत्ताधारी व सुधारलेले लोक ह्या दृष्टीनें) जो दर्जा आहे, त्याच्या दृष्टीनें विचार केला, तर हिंदी लोकांशीं वागतांना, प्रत्येक इंग्रजानें स्वाभिमान दाखविण्याविषयींची दुप्पट जबाबदारी त्याच्या अंगावर पडते, ह्याहि गोष्टीचा त्यांना विसर पडतो. कित्येक वेळां अशा गोष्टींचा बुद्धिपूर्वक "राईचा पर्वत" करून दाखविण्यांत येत असतो, आणि कित्येक वेळां तर, अशा गोष्टी मुळींच घडल्या नसतांहि, त्यांची रचना करून, लोकांत जाणूनबुजून खोट्या अफवा उठवून देण्यांत येत अस-तात. असे भांडणतंट्याचे बहुतेक प्रसंग रेलवेच्या प्रवासांत आलेले आहेत; आणि, त्यांच्यावर पांघरूण घालण्याची इच्छा नसतां, कोणालाहि वाजवी रीतीनें असें ह्मणतां येईल कीं, यूरोपमध्यें देखील प्रवासांत लोकांच्या हातून पुष्कळ वेळां उद्धटपणाचें वर्तन होतें, तें इतकें कीं, एरव्हीं अशा तऱ्हेचें वर्तन करण्याची त्यांच्या मनाला खास लाज वाटेल. आणखी असेंहि ह्मणतां येईल कीं, हिंदुस्थानच्या उष्ण हवेमुळें जीव अगदीं कासावीस होऊन जात असल्या कारणानें, लांबलांबच्या, रेल्वेंतल्या प्रवसामुळें, माणसाला केव्हां केव्हां इतका त्रास होत असतो कीं, तसा थंड हवेंत कधींच कोणाला होत नाहीं. दुसरी गोष्ट अशी आहे कीं,

कित्येक बाबतींत, नेटिव लोकांच्या चालीरीतींची आम्हांस माहिती नसल्यामुळें, असे दुःखकारक प्रसंग येतात. उच्च वर्गांतील हिंदी लोकांना देखील अशा कांहीं संवयी असतात कीं, त्यामुळें वारंवार दुसऱ्यांच्या मनाला त्रास होतो. थोड्या महिन्यांमागें, एका प्रतिष्ठित व बोलण्या चालण्यांत उत्तम अशा हिंदी गृहस्थाबरोबर, एके रात्रीं, आगगाडींतून प्रवास करण्याची मला पाळी आली होती. जीवजंतु कितीहि ओंगळ असला, तरी सर्व जातींच्या प्राण्यांविषयीं मनुष्यास आदर असला पाहिजे, (ह्मणजे त्यांना मारतां कामा नये), ह्या तत्वाचा ज्या धर्मामध्यें अतिरेक झालेला आहे, त्या धर्माचे हे गृहस्थ होते. आतां, मी हिंदुस्थानास अगदीं परका असतों व इकडील कांहीं लोकांच्या स्वभावांतील असल्या विक्षिप्तपणाची मला माहिती नसती, तर माझ्या डब्यांतील ह्या गृहस्थाच्या कित्येक गोष्टीस मी जोरानें हरकत केली असती, व त्याबद्दल माझ्याकडे दोष आला नसता. आपल्या अंगावरील व कपड्यांतले, कांहीं जातींचे प्राणी शोधून काढण्याकरितां, त्यानीं आपला बराच वेळ खर्च केला, आणि जवळ मुद्दाम बाळगलेल्या, एका रुपयाच्या लहानशा डबींत, ते सर्व प्राणी अगदीं जपून ठेवून दिले. तथापि, ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे कीं, कधीं कधीं नेटिव लोकांशीं विनाकारण इतक्या निर्दयपणाचें, पशुतुल्य वर्तन होतें कीं, त्यामुळें लोकांच्या मनावर अत्यंत शोचनीय परिणाम होतो. मला असे सुशिक्षित हिंदी लोक भेटले आहेत कीं, त्यांच्या स्वतःवर जरी असे मनाला दुःख देणारे प्रसंग आले नव्हते तरी, न जाणो, कदाचित् आपणाशीं असें अपमानकारक व उद्धट-पणाचें वर्तन होईल ह्या भीतीनें, ज्या डब्यांत युरोपियन लोक

असतील, ते चुकवून दुसरीकडे जाऊन बसण्याचें त्यांना आवडतें. उलट पक्षीं, माझ्या स्वतःच्या अनुभवावरून, व ज्यांच्या खरेपणाबद्दल यत्किंचित्‌हि शंका घेण्यास जागा नाहीं अशा लोकांच्या सांगण्यावरून, मी बिलकूल न डगमगतां असें साफ ह्मणतों कीं, आपल्या स्वतःच्या दुर्वर्तनानें, मुद्दाम खाजवून खरूज काढल्यासारखे, असे अनिष्ट प्रकार जाणूनबुजून घडवून आणणारे, दुष्टस्वभावाचे हिंदी लोक, विशेषतः अलीकडेच, आढळून येऊं लागले आहेत. असें करण्यांत त्यांचा हेतु हा कीं, एकतर उलट बाजूला धाकदपटशा दाखवून पैसे उकळतां यावें, किंवा दुसरी गोष्ट अशी कीं, इंग्रज लोकांच्या पशुतुल्य वर्तनापासून आपणांस फार त्रास भोगावा लागला, असा गवगवा करून, राजकीय दृष्ट्या, त्या गोष्टीचा खुब बाऊ करून लोकांस दाखवितां यावा. पण, इंग्रज लोकांकडेच सर्वस्वी दोष असला, तरी देखील अशा बाबतींत वाजवीपेक्षा फाजील सौम्यपणा दाखविण्याची प्रवृत्ति हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांत— विशेषतः बिनसरकारी लोकांत—दिसून येते असें ह्मणावें लागतें. आणि, दैवाचा हा एक विलक्षण खेळ पाहा कीं, जुलमी अधिकाऱ्यांचा एक अतिउत्तम **मासला** ह्मणून ज्या लॉर्ड कर्झन साहेबांस एकट्यासच दोष देऊन, त्यांच्या एकट्यावरच शिव्या-शापांची लाखोली वाहण्याचा क्रम राष्ट्रीय पक्षाच्या वर्तमानपत्र-कारांनीं सतत चालू ठेविला होता, तेच एक व्हाइसराय असे होऊन गेले कीं, जेव्हां जेव्हां ह्मणून, त्यांच्या मतानें, यूरो-पियन लोकांच्या हातून अशा प्रकारची आगळीक होऊन, नेटिव लोकांशीं अन्यायाचें वर्तन घडलें असेल, तेव्हां तेव्हां अगदीं चोख न्याय होण्याविषयीं त्यांची मोठी करडी नजर असल्या-

मुळें, आपल्या देशबांधवाची अप्रियता संपादन करण्याचे त्यांना जसे प्रसंग आले, तसे दुसऱ्या कोणत्याहि व्हाइसरायास आले नाहींत.

दुसरी एक शोचनीय गोष्ट अशी आहे कीं, ह्या दोन लोकांमधील खासगी संबंधाच्या बाबतींत, हिंदी लोकांच्या मनांत जें अतिशय वैषम्य दिसून येतें, त्याचा उगम बहुधा ज्या हिंदी लोकांचें शिक्षण इंग्लंडांत झालें असतें, त्यांच्यापासून असतो. पहिली गोष्ट अशी कीं, अति-उत्तम प्रकारच्या इंग्रज लोकांशीं– पुरुष व स्त्रिया यांच्याशीं– परिचय घडून, त्यांच्या-मध्यें अगदीं मोकळेपणानें वागण्यास सांपडलेले तरुण हिंदी लोक स्वदेशीं परत आले, म्हणजे आपल्या स्वतःच्या लोकांशीं वागण्याची त्यांना अगदींच पंचाईत पडते; पण, त्यांच्यामध्येंच राहून त्यांच्याप्रमाणेंच आयुष्य घालविल्याशिवाय त्यांना गत्यंतर नसतें. स्त्रीजातीविषयींच्या, यूरोपियन लोकांच्या कल्पनांचा मनावर पगडा बसला असतांना, आपल्या आईबापांनीं पसंत केलेली एखादी मुलगी कितीहि चांगली असली, तरी आपणास जशी बायको पाहिजे तशी ही मुलगी नसतांहि, अशा तरुण लोकांस लग्न करण्याचा प्रसंग आलेला पाहून, मनाला विशेषच दयेचा पाझर फुटतो. पण, मनुष्यस्वभावाचा विपरीतपणा असा आहे कीं, अशा मनुष्याला जें दुःख भोगावें लागतें, त्याचें खापर वास्तविक त्यानें आपल्या समाजव्यवस्थेच्या माथ्यावर फोडलें पाहिजे; कारण, तिच्या तडाक्यांत पुनः त्याला सांपडावें लागतें. परंतु, तसें न करितां, ज्या विद्याचारांमुळें आपल्या समाजव्यवस्थेच्या चांगुलपणावरील त्याचा विश्वास उडून गेलेला असतो, तिलाच तो प्रायः दोष देत सुटतो. दुसरी गोष्ट अशी


कीं, कित्येक अत्यंत खोडसाळ हिंदी लोकांस आपल्या स्वतःच्या अकलेच्या जोरावरच विलायतेंत चरितार्थ चालविण्याचा प्रसंग आल्यामुळें व तेथें कोणा चांगल्या लोकांच्या ओळखीदेखी झाल्या नसल्याकारणानें, लंडनांत व इतर मोठ्या शहरांत, त्यांना अत्यंत वाईट परिस्थितींत दिवस काढण्याची पाळी येते; व तेथें असतांना ज्या स्त्रीपुरुषांची व त्यांची ओळख होते, त्यांच्या वर्तनावरून एकंदर इंग्रजसमाजाविषयीं त्यांच्या ज्या कांहीं कल्पना होतात, त्याच ते पुढें इकडे आल्यावर आपल्या देशबांधवांना सांगत सुटतात. इंग्रज लोकांच्या गृहस्थितीच्या नांवास आणि विशेषतः इंग्रज स्त्रियांच्या नीतिमत्तेस काळिमा येईल, अशा तऱ्हेच्या खोट्यानाट्या कंड्या उठवून, इंग्रजलोकांविषयीं सामान्य लोकांच्या [हिंदी] मनांत असणारा आदर व विश्वास नाहींसा करण्याच्या उद्देशानें, राजद्रोही वर्तमानपत्रांतून जो अत्यंत शोचनीय प्रकार चालू आहे, त्याची जबाबदारी बहुधा ह्या वरील लोकांच्या शिरावर येऊन पडते. परंतु, इंग्लंडांत येणाऱ्या तरुण हिंदी लोकांस मदत न करितां व त्यांना योग्य मार्ग न दाखवितां, इंग्रज लोकांच्या समाजरूपी समुद्रांतील खडकांत व लागांत वाहत जाऊन, त्यांतून कधींहि सुटका होण्याची अशा नाहीं, अशा स्थितीला त्यांना आह्मी जोंपर्यंत जाऊं देणार, तोंपर्यंत आमच्या स्वतःवरीलहि जबाबदारी फार मोठी असणार आहे. आमच्यांच जातीचे व काळजीपूर्वक निवडून पसंत केलेले लोक आमच्या साम्राज्याच्या इतर भागांतून इंग्लंडमधल्या कॉलेजांत विद्याभ्यासाकरितां येत असतात; आणि, त्यांनीं सन्मार्गानें वर्तून, व्यावहारिक बाबतींत आपला फायदा करून घ्यावा, ह्मणून त्यांच्यावर देखरेख करण्याकरितां, आह्मीं स्वतंत्र मंडळ्या स्थापन करून,

विशेषरीतीची व्यवस्था केलेली आहे. आज कित्येक वर्षें, तरुण हिंदी लोकांस इकडे येऊन जाण्याची आह्मीं मोकळीक ठेविली आहे. परंतु, सर्वस्वी परकी अशा लोकांत ते येऊन पडले असतां, तेथल्या नानाप्रकारच्या मोहजालांत ते गुरफटून जाऊं नयेत, ह्मणून कोणा जबाबदार मनुष्यानें त्यांना मदत करण्याकरितां आपला हात पुढें केलेला नाहीं. अशा परकी समाजांत, एकलकोंड्यासारखें राहण्याची पाळी यावी, ह्याचा अर्थ मानभंग व वैषम्य, असाच बहुतकरून झाल्याशिवाय राहणार नाहीं.

तथापि, मनुष्य गोरा असो वा इतर रंगाचा असो, मानवी स्वभावाच्या अंगभूत असणारे दोष व परस्परांमध्यें घांसाघीस होण्याचीं अनिवार्य कारणें ह्यांचा विचार केला तर, सर्व दर्जांचे इंग्रज लोक व सर्व दर्जांचे हिंदी लोक ह्या उभयतांमध्यें बहुधा खरोखर साधारणपणें जसा चांगल्या प्रकारचा सलोखा असतो, तसा परस्परांहून इतक्या भिन्न अशा कोणत्याहि दोन लोकांमध्यें इतरत्र आढळून येत नाहीं, असें कोणासहि निर्भयपणें ह्मणतां येईल. परस्परांमधील आडकाठी दूर करण्यास साह्यभूत अशी कांहीं विशेष परिस्थिति उत्पन्न झाली, ह्मणजे हा सलोखा जसा अधिकच दृढ होतो, तसा एरव्हीं कधीं होत नाहीं. दोघांचे अंगस्वभाव एकसारखेच असून, दोघांच्या धंद्यामधलीं संकटें एकसारखींच असल्याकारणानें, देशी लष्करांतील सर्व दर्जांचे शिपाई व त्यांच्यावरील इंग्रज अमलदार, ह्या उभयतांमध्यें पुष्कळवेळां परस्परांविषयीं आदरबुद्धि व ममता उत्पन्न होऊन, उभयतांचीं मनें विलक्षण रीतीनें एकमेकांशीं अगदीं बळकट जखडून जातात; आणि, लष्कर मोहिमेवर असलें, ह्मणजे तर असा प्रकार विशेषच दृष्टोत्पत्तीस येतो. घरीं प्रपंचांत कांहीं विपत्ति आली, किंवा असेंच कांहीं [illegible] संकट

ओढवलें, तर हिंदी लोक, निदान खालच्या वर्गांतले, मदती-करितां त्यांच्यांत राहणाऱ्या इंग्रज मनुष्याकडे बहुधा जसे खुषीनें व निश्शंकपणें धांव घेतील, तसे आपल्या स्वतःच्या लोकांकडे जाणार नाहींत. दीन दुबळ्या, रोगानें ग्रासलेल्या व विपत्तींत पडलेल्या लोकांमध्यें जाऊन, त्यांच्या दुःखाचा परिहार करण्या-करितां, अगदीं अंतःकरणपूर्वक श्रम करणाऱ्या युरोपियन मिशनरी लोकांपैकीं पुष्कळांचें त्यांच्या ह्या उद्योगामुळें विलक्षण वजन बसलें आहे; आणि, कदाचित् अगदीं अलीकडल्यापेक्षां पूर्वींच्या काळीं, उच्च वर्गांतील हिंदी लोकांमध्येंसुद्धां ह्या मिशनरींचें असेंच वजन बसलें होतें. आतां, ह्या-संबंधाचीं उदाहरणें येथें देत बसण्याची मला कांहीं आवश्यकता दिसत नाहीं. साधारण नित्याच्या व्यवहारामध्यें, ह्या उभयलोकांत स्नेह-भाव उत्पन्न होण्यास दोन्ही बाजूनें अडचणी आहेत, ही गोष्ट आपण समजून चाललें पाहिजे. हिंदी लोकांच्या पुष्कळ कल्पना व संवई आह्मांस विपरीत वाटतात; परंतु, आमच्याहि पुष्कळ त्यांना अशाच वाटतात. थोरपणा व आचारशुद्धता ह्यांविषयीं हिंदी लोकांच्या स्वतंत्र कल्पना असून, आमच्या सामाजिक चालीरीतींमुळें ह्या बाबतींत त्यांच्या मनाला वारंवार मोठा त्रास होतो. हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांच्या वस्तीचीं जीं मुख्य मुख्य ठिकाणें आहेत, तेथील यूरोपियन लोकांच्या खासगी चालचर्येंत शिष्टाचार व भारदस्तपणा ह्यांना थोडी अधिक जागा मिळेल ह्या हेतूनें, उच्च दर्जाच्या व अधिका-राच्या इंग्रज गृहस्थांनीं व इंग्रज स्त्रियांनीं आपलें वजन खर्च करून अशी स्थिति आणली, तर ह्या दोन लोकांना परस्प-रांविषयीं चांगली माहिती होऊन, त्यांच्यामध्यें खासगीरीतीचा

सलोखा वाढण्याचा संभव असल्याकारणानें, त्यांच्या (वरील इंग्रजपुरुष व स्त्रिया यांच्या) हातून जसें लोककार्य होईल, तसें ह्या मार्गांत सध्यां ज्या अडचणी आहेत, त्या बळजबरीनें दूर करण्याच्या प्रयत्नांचा कितीहि चांगला हेतु असला तरी, ह्या दोन लोकांच्या (हिंदी व यूरोपियन) आचारविचारांमध्यें जमीनअस्मानाचें मूळचेंच अंतर असल्याकारणानें, ज्या अड-चणी उपस्थित झाल्या आहेत, त्या बळजबरीच्या मार्गानें दूर होणाऱ्या नाहींत.



भाग २६ वा.

हिंदुस्थानसरकार.

२७ जुलै रोजीं, हिंदुस्थानचे नवीन अंडर–सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. मॉंटेग्यु यानीं एक फारच छानदार भाषण करून, हिंदुस्थानच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक कॉमन्स–सभेपुढें (पार्लमेंटापुढें) विचाराकरितां ठेविलें. स्टेटसेक्रेटरी व व्हाइसराय ह्या उभयतांचा परस्परसंबंध काय, ह्या संबंधानें त्या भाषणांत एके ठिकाणीं खुलासा केलेला असून, त्यांत जे शब्द वापरले आहेत, त्यांवरून लोकांचें तिकडे पुष्कळच लक्ष जावें, हें अगदीं वाजवी आहे. स्टेटसेक्रेटरी आणि व्हाइसराय ह्या उभयतांचें सरकारी रीतीनें कोणतें नातें असतें, ह्या बाबतींत वेळोवेळीं प्रश्न उपस्थित होऊन, कधींकधींतर तीव्र स्वरूपाचा मतभेद दिसून आलेला आहे. परंतु, आजपर्यंतच्या वहिवाटी-वरूनच केवळ नव्हे, तर ह्या बाबतींतल्या कायद्याचा वाजवी रीतीनें कसाहि अर्थ केला तरी, स्टेटसेक्रेटरीनां जे अधिकार आहेत असें दिसतें, त्यांपेक्षां, मि० मॉंटेग्यू यानीं वापरलेल्या भाषेवरून फारच अधिक अधिकार आहेत, असें ह्मणण्याचा त्यांचा उद्देश होता, असें ह्मणावें लागतें. “ बिकट कारकीर्द” संपविल्याबद्दल लॉर्ड मिंटोसाहेबांचें अभिनंदन केल्यावर, मि० मॉंटेग्यू ह्मणाले:–

व्हाइसराय व स्टेटसेक्रेटरी ह्यांच्या उभयतांमधले संबंध जवळचे असून, जबाबदारीचे आहेत. पार्लमेंटनें केलल्या कायद्यांत असें सांगितलें आहे कीं, “ ज्या कृत्यांचा, कामांचा व गोष्टींचा संबंध कोणत्याहि प्रकारानें

हिंदुस्थानच्या राज्यकारभाराशीं अथवा उत्पन्नाशीं असेल, तसेंच जीं वतनें, इनामें व नेमणुका आणि सर्व प्रकारच्या खर्चाच्या ज्या इतर बाबी हिंदुस्थानच्या तिजोरींतून व्हावयाच्या असतील, अशा सर्व गोष्टींवर देखरेख ठेवणें, त्यांच्या कामाची दिशा दाखवून देणें व त्यांच्यावर हरएक प्रकारचा ताबा चालविणें, हे सर्व अधिकार स्टेटसेक्रेटरी व त्यांचें कौन्सिल यांच्याच हातीं राहतील." आतां, हे अधिकार किती विस्तृत, किती दीर्घगामी (लांबवर पोहोंचणारे) व किती पूर्ण आहेत, हें कळून येईल. लॉर्ड मिंटोसाहेबांच्या मार्फतीनें, लॉर्ड मोर्ले व त्यांचें कौन्सिल यांनीं काम करून, पुष्कळ गोष्टी सिद्धीस नेल्या आहेत. ... ... आणि माझी अशी पक्की खात्री आहे कीं, ज्या धोरणाचा (हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतील) लॉर्ड मोर्लेसाहेबानीं उपक्रम केला आहे, तें पार पाडण्याकरितां ते अधिकारारूढ राहणार आहेत, ह्याबद्दल सर्व पक्षांच्या लोकांस मोठें समाधान वाटलें पाहिजे.

आपण आपल्या भाषणांत जो उतारा घेत आहों, तो अगदीं बरोबर आहे किंवा नाहीं, हें पाहण्याची मि. मॉंटेग्यू यानीं घ्यावी तशी खबरदारी घेतली नाहीं, ही प्रथम मोठ्या खेदाची गोष्ट आहे. कारण, त्यानीं घेतलेल्या अवतरणाप्रमाणें म्हटलें म्हणजे, त्या कायद्याचा असा अर्थ होतो कीं, हिंदुस्थान सरकारच्या हरएक कामावर स्टेटसेक्रेटरीची वास्तविक देखरेख झालीच पाहिजे. पण, खरोखर म्हटलें असतां, कंपनी सरकारच्या (ईस्ट इंडिया कंपनीच्या) वतीनें विलायतेतून इकडल्या कामावर देखरेख करणाऱ्या बोर्डाच्या ठिकाणीं आतां स्टेटसेक्रेटरी येऊन, सबब्हु बोर्डाला असलेले सर्व अधिकार त्यांना प्राप्त झाले असल्याकारणानें, त्यांच्या हातीं असलेल्या अधिकारांचा त्यानीं मनास वाटल्यास उपयोग करावा, असें होतें. ज्या कायद्याअन्वयें स्टेटसेक्रेटरींना त्यांचे अधिकार प्राप्त होतात, तो कायदा म्हटला म्हणजे, १८५८ सालचा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट (हिंदुस्थानच्या राज्यकारभारां-

विषयींचा कायदा) होय. ह्या कायद्याच्या ३ ऱ्या कलमांत असें सांगितलें आहे कीं, "हिंदुस्थानच्या राज्यकारभाराशीं अथवा त्याच्या उत्पन्नाशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध असणारे असे सर्व आणि ह्याचसारखे अधिकार आणि कामें (कर्तव्यकर्में), आणि ह्या कायद्यान्वयें नेमण्यांत आलेल्या अथवा नोकरींत पुढें राहणाऱ्या सर्व कामगारांवर असे सर्व आणि ह्याचप्रकारचे अधिकार, कीं जे अधिकार व जीं कामें कंपनीला आणि तिच्या वतीनें देखरेख करणाऱ्या बोर्डाला मनास वाटल्यास चालवितां अथवा करितां आलीं असतीं, अथवा त्यांनीं चालवावयास अथवा करावयास पाहिजेच होतीं, ते अधिकार व तीं कामें स्टेटसेक्रेटरीच्या हातीं असलींच पाहिजेत व त्यानीं केलींच पाहिजेत. आणि, ते अधिकार व तीं कामें (कर्तव्यें) १८३३ च्या कायद्यांत (३ व ४ वुइलियम चवथे, भा. ८५, क. २५ मध्यें) खालीं दिलेल्या शब्दांत सांगितलेलीं असून, मि. मॉंटेग्यू साहेबानीं अर्धवटरीतीनें आपल्या भाषणांत जो उतारा घेतला होता, तो घेण्याची त्यांना कल्पना सुचली, ती ह्याच कलमावरून असावीसें दिसतें; सर्व कृत्यें, चालविण्यांत येणारीं कामें व संबंध असलेल्या गोष्टी, ह्यांच्यावर देखरेख करणें, त्यांची दिशा ठरवून देणें, व त्यांच्यावर ताबा चालविणें हे सर्व अधिकार सदरहु बोर्डास (देखरेख करणाऱ्या) असतील व ते चालविण्याकरितां लागणारी सत्ता त्यांच्या हातीं राहील, वगैरे." मँचेस्टर गार्डियन हें पत्र हल्लींच्या प्रधानमंडळावर विरुद्धटीका करणारें नाहीं. ह्या पत्रानें अगदीं बरोबर रीतीनें दाखवून दिलें आहे कीं, "ताबा चालविणें आणि ताबा चालविण्याचा अधिकार असणें ह्या दोन गोष्टींमध्यें, ह्मणजे 'Shall' आणि 'May' ह्या दोन शब्दांमध्यें, फरक आहे.

कायद्यांतील ह्या वरील शब्दांस संक्षिप्त रूप दिलें, तर बरोबर संक्षेप म्हटला म्हणजे 'May' असाच होईल. सर कोर्टने इल्बर्ट यांनीं स्टेटसेक्रेटरींच्या अधिकारांचा जो सारांश काढून प्रसिद्ध केला आहे (गव्हर्मेंट आफ इंडिया, पान १४५ पाहा), त्यांत त्यांनीं हाच शद्ब घातला आहे :— '.... .... ह्या सारग्रंथांतील नियमांस अनुसरून, सर्व कृत्यें, चालविलेलीं कामें व संबंध असलेल्या गोष्टी, ह्यांच्यावर देखरेख ठेवणें, त्यांना दिशा दाखविणें व त्यांच्यावर ताबा चालविणें ह्या गोष्टी स्टेटसेक्रेटरीनें (May) कराव्या, वगैरे.' 'Shall' आणि 'May' ह्या शद्बांमधलि हा फरक साहजिकच फार महत्वाचा आहे. 'Shall' ह्या शद्बानें असा बोध होतो कीं, व्हाइसराय जें जें कांहीं करतात, तें स्टेटसेक्रेटरी त्यांच्याकडून करवून घेतात; आणि, 'May' शद्बानें असें ध्वनित होतें कीं, त्यांना जेव्हां कांहीं पसंत पडणार नाहीं, तेव्हां त्यावर ताबा चालविण्याचा हक्क त्यांनीं आपल्या हातीं केवळ ठेविलेला आहे. 'Shall' शद्ब कमी दर्जाची गुमास्तेगिरी दाखवितो; परंतु, 'May' शद्बामुळें व्हाइसरायांच्या जागेची थोरवी कमी न होतां, राजाच्या व पार्लमेंटच्या अधिकारांचें संरक्षण होतें."

तथापि, ह्या वरील कायद्यांचा जो अर्थ मि. मॉंटेग्यू करितात त्याचें महत्व अधिक आहे. व्हाइसरायांच्या कामासंबंधानें बोलतांना, त्यांनीं गुमास्तेगिरीचें जें तत्व प्रतिपादन केलें आहे, त्याला मूळ तीन मुख्य हरकती आहेत. पहिली गोष्ट अशी कीं, व्हाइसरायांच्या पदाच्या अतिशय महत्वाच्या अंगांपैकीं एक अंग तें मुळींच विचारांत घेत नाहींत. आणि हें अंग [illegible] असें आहे कीं, [illegible] हिंदुस्थानसारख्या देशामध्यें

अत्यंत महत्त्व दिलें जातें. हिंदुस्थानसारख्या देशांत राजाविषयीं जो पूज्यभाव असतो, तो अतिप्राचीन काळापासून सर्व जातींच्या, वर्णांच्या व पंथांच्या लोकांत परंपरेनें चालत आलेल्या समजुतींत बद्धमूल झालेला आहे. व्हाइसराय ह्मटला ह्मणजे खुद्द बादशहाचा प्रत्यक्ष प्रतिनिधी होय; आणि ह्या नात्यानें, स्टेटसेक्रेटरीचा तो "गुमास्ता" आहे, असें ह्मणणें ह्मणजे, कसेंहि झालें तरी, खरोखर अयोग्य आहे. ह्या दृष्टीनें पाहूं जातां, त्यांच्या हुद्याचा दर्जा कमी करण्याचा प्रयत्न कोणींहि केल्यास, बादशहाच्या इभ्रतीस भयंकर धक्का बसण्याकडे ह्या गोष्टीचा संबंध जाऊन पोहोंचेल. आणि, ह्या अशा इभ्रतीची किंमत धरवेल तितकी जरी कमी धरली, तरी ब्रिटिश राज्याचें तें एक अत्यंत मोठें भांडवलच आहे, असें ह्मटलें पाहिजे. आतां, दुसरी गोष्ट अशी कीं, व्हाइसरायांच्या जागेचें जें एक अगदीं स्वतंत्र अंग आहे, व स्टेटसेक्रेटरी आणि व्हाइसराय ह्या उभयतांमध्यें असणाऱ्या नात्याच्या दृष्टीनें ज्याचें विशेषच महत्त्व आहे, तेंहि सदरहूप्रमाणेंच मि. मॉंटेग्यू ध्यानांत घेत नाहींत. आणि, हें असें अंग कोणतें ह्मणाल, तर राज्यकारभार चालविणें व कायदेकानू करणें, अशा दोन्ही प्रकारच्या कामांच्या दृष्टीनें, व्हाइसराय ही केवळ एक व्यक्ति नाहीं, तर ते गव्हरनरजनरल व त्यांचें कौन्सिल मिळून होणारी मंडळी आहे. १८३३ च्या कायद्यांतील महत्त्वाचें कलम मि. मॉंटेग्यू यांनीं आपल्या भाषणांत घेण्याचें गाळलें. हें कलम पुढल्या सर्व कायद्यांत कायम ठेवण्यांत आलेलें आहे. त्यांत असें सांगितलें आहे:—

"हिंदुस्थानांतील, सर्व नमूद केलेल्या प्रांतांच्या व वसुलाच्या बाबींच्या सर्व प्रकारच्या मुल्की व लष्करी व्यवस्थेवर देखरेख करणें, त्यांच्या

[illegible] दिशा लावून देणें व त्यांच्यावर ताबा ठेवणें ह्या सर्व गोष्टींचा अधिकार गव्हरनरजनरल व त्यांचे सल्लामसलतगार यांच्या हातीं राहील, व तसा अधिकार त्यांना ह्या कलमानें देण्यांत आला आहे. गव्हरनरजनरल व त्यांचे सल्लामसलतगार ह्या मंडळीला " गव्हरनरजनरल व त्यांचें कौन्सिल " असें नांव देण्यांत आलें आहे.

व्हाइसरायांची केवळ कायदेशीर पदवी ह्मटली ह्मणजे, गव्हरनरजनरल व त्यांचें कौन्सिल अशीच आहे. आपल्या एकट्याच्याच जबाबदारीवर एखादी गोष्ट करण्याचा अधिकार गव्हरनरजनरलास देण्यांत आला आहे, तो त्यानीं कांहीं विलक्षण प्रसंगींच बजावण्याचा असून, असा अधिकार त्यांनीं बजावल्याचीं उदाहरणें फारच क्वचित् सांपडतात, ह्यावरून गव्हरनरजनरलांचा त्यांच्या कौन्सिलांशीं जो मिलाफ केला आहे, तो किती आवश्यक आहे, हें दिसून येतें.

ह्याप्रमाणें, एक पक्षीं, व्हाइसरायाच्या मार्फत स्टेटसेक्रेटरी काम करितो असें मि० मॉंटेग्यू ह्मणतात, त्यावेळीं बादशहाचा त्यांना विसर पडतो; आणि, दुसऱ्या पक्षीं, व्हाइसराय व स्टेटसेक्रेटरी ह्यांच्यामधील संबंधाविषयीं ते बोलतात. तेव्हां त्यांना गव्हरनरजनरल व त्यांचें कौन्सिल ह्यांचा विसर पडतो. शिवाय, आणखी असें आहे कीं, स्टेटसेक्रेटरीचा [illegible] हुद्दा ह्मणजे 'स्टेटसेक्रटरी व त्यांचें कौन्सिल' असा आहे. कारण, गव्हरनरजनरलप्रमाणेंच, स्टेटसेक्रेटरीलाहि एक कौन्सिल [illegible] असून, आपल्या हुद्याचीं कामें करित असतांना, त्यांचा [illegible] अत्यंत निकट संबंध असावा, अशी कायद्यानेंच [illegible] करून ठेवण्यांत आली आहे. ह्या कौन्सिलास 'इंडिया कौन्सिल' (हिंदुस्थानचें सल्लागार-मंडळ) असें नांव असून, [illegible] सरकार [illegible] करितां [illegible]

तेंतलें हापिस) स्टेटसेक्रेटरीबरोबर तें बसतें. हिंदुस्थानच्या उत्पन्नाच्या पैशाची विल्हेवाट लावणें अथवा तो कोणाला देणें, ह्या बाबतींतच फक्त आपल्या कौन्सिलच्या अनुमोदनाशिवाय स्टेटसेक्रेटरीला एकट्याला कोणतीहि गोष्ट करितां येत नाहीं; व इतर बाबतींत आपल्या कौन्सिलाचा सल्ला विचारण्याची त्यांना गरज नाहीं, आणि, कौन्सिलच्या शिफारशीप्रमाणें चालण्याची तर नाहींच नाहीं. असें जरी आहे, तरी मि. मँटेग्यू यानीं पार्लमेंटच्या ज्या कायद्याचा उल्लेख केला, त्यावरून असा स्पष्ट अर्थ निघतो कीं, ह्या कायद्यानें स्टेटसेक्रेटरीकडे जीं कामें सोंपवून दिलीं आहेत, तीं बजावतांना, त्यानीं साधारणपणें आपल्या कौन्सिलची सल्लामसलत घेऊन व त्यांची अनुमति मिळवून काम चालवित जावें. कारण, हीं कामें त्यांच्याकडे दिलीं आहेत, तीं सेक्रेटरी व त्यांचें कौन्सिल ह्या मंडळीकडेसच जातीनें दिलीं आहेत. (ह्मणजे, एकट्या सेक्रेटरीकडेस दिलेलीं नाहींत.).

आतां, गव्हरनरजनरल आणि त्यांचें कौन्सिल व स्टेटसेक्रेटरी आणि त्यांचें कौन्सिल, ह्या उभयतां संस्थांमधील संबंध वरच्याप्रमाणें कायद्यानें मर्यादित करून दिले आहेत, ते कोणत्या प्रकारचे आहेत, हें पाहूं या. मि. मँटेग्यु यानीं दर्शविलें आहे, त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची शेवटली जबाबदारी स्टेटसेक्रेटरीच्या मार्फत साम्राज्यसरकारावर, आणि ह्मणूनच, शेवटच्या पाळीला, पार्लमेंट सभेच्या मार्फत ग्रेटब्रिटन व आयर्लंडच्या संयुक्त राज्यांतील लोकांवर येऊन पडते, ह्यांत शंका नाहीं.

आतां प्रश्न असा आहे कीं, हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या ह्या "शेवटल्या जबाबदारींतून" मोकळें होण्याचा, तात्विक व व्यावहारिक दृष्ट्या, योग्य मार्ग कोणता? पण, हा प्रश्नच मुळीं असा आहे कीं, त्याचें सप्रमाण उत्तर देतां येणार नाहीं. परंतु, कायद्यांचें मुख्य धोरण व आजपर्यंत चालत आलेली वहिवाट, ह्यांवरून जें उत्तर आपणांस काढतां येईल तें, कंपनीसरकारच्या जुन्या आमदानींत, विलायत सरकारचें काम काय असे, हें सांगतांना जॉन स्टयुअर्ट मिलनें जे शद्ब घातले आहेत, त्याच शद्बांत अजूनहि देतां येईल. मिलचे शद्ब असे आहेतः— "विलायतसरकारचें मुख्य काम ह्मटलें ह्मणजे, राज्यकारभाराच्या तपशिलांत शिरून, काम करण्याविषयीं हुकूम देण्याचें नाहीं; तर, हिंदुस्थानसरकारनें केलेल्या कामाची कसोशीनें चौकशी करणें व त्याची फिरून तपासणी करणें; त्याचप्रमाणें, राज्यकारभाराचीं तत्वें ठरवून देऊन, पुढें काम कसें करावें, ह्याबद्दल सामान्य हुकुम देणें, व विलायतसरकारकडे पसंतीसाठीं पाठविलेल्या मोठमोठ्या राजकीय मसलतींस मंजुरी देणें अथवा न देणें, असें आहे." स्टेटसेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार ह्यांच्यामधील संबंध कंपनीसरकारपासून परंपरेनें चालत आलेले असून, ते ह्याप्रमाणें असावेत, असें निःसंशय दिसतें. आणि, अगदीं अलीकडेपर्यंत हें मत उभय पक्षांस मान्य असून, त्याप्रमाणें कामहि चालत असे. १८३३ चा चार्टर आक्ट, अथवा १८५८ चा गव्हरमेंट ऑफ इंडिया आक्ट, ह्या कायद्यांच्या दृष्टीनें विचार केल्यास, दुसरें कोणतेंहि मत त्यांना धरून असणार नाहीं. ह्या प्रश्नसंबंधाच्या सर्व बाबतींविषयींचीं पहिल्या कायद्यांतील कलमें दुसऱ्यांतहि कायम.

विषयाच्या कलमांस आधार ह्मणून घेण्यांत आलीं असून, पहिल्यांतील तत्वें दुसऱ्यांत कायम करण्यांत आलीं आहेत. सामान्यतः कामाची दिशा दाखवून देऊन, त्यावर ताबा ठेवणें, हें काम स्टेटसेक्रेटरी करितात. तथापि, "करून दिलेल्या कायदेकानूंप्रमाणें व दाखवून दिलेल्या धोरणाप्रमाणें, हिंदुस्थानचा राज्यकारभार करणारें सरकार खुद्द हिंदुस्थानांतच असलें पाहिजे," असें जें मिलनें ह्मटलें आहे, तें कांहीं त्याच्या वरच्या ह्मणण्यापेक्षां कमी जोराचें नाहीं. आतां, हिंदुस्थानसरकार व स्टेटसेक्रेटरी ह्यांच्या मधलें नातें ह्मणजे, मालक व त्याचा गुमास्ता ह्यांच्या मधल्या नात्या-सारखें आहे, असें मि. मॉंटेग्यू ठरवूं पाहण्यास इच्छितातसें दिसतें. परंतु, वरील विवेचनावरून जें उघड ठरतें, तें मि. मांटेग्यू यांच्या मताहून अगदीं भिन्न आहे.

व्हाइसराय व स्टेटसेक्रेटरी ह्या उभयतांमधल्या नात्याची अंडरसेक्रेटरीनीं जी व्याख्या केली आहे, तिच्यावर त्यांच्याकडून विशेष जोर देण्यांत आला होता, ह्याखेरीज इतर कारणांमुळें लोकांचा असा समज होऊन बसला आहे कीं, आपण स्टेटसेक्रेटरीचे प्रतिनिधी आहों, ही जबाबदारी पूर्णपणें ओळखून, अंडरसेक्रेटरीनीं भाषण केलें, त्यावरून आपल्या वरिष्ठाचेंच मत हे लोकांपुढें विचारपूर्वक मांडित होते, असें ह्मटलें पाहिजे. गेल्या पांच वर्षांतील हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या धोरणासंबंधानें, लॉर्ड मोर्ले व लॉर्ड मिंटो ह्या उभयतांनीं कसकसा कार्यभाग उचलला—ह्मणजे ह्या नवीन गोष्टीचा उपक्रम कोणीं केला व त्याची जबाबदारी कोणावर आहे—हें पुढें ठरविण्याचें काम इतिहासकाराचें आहे, व तें आज मी करूं इच्छित नाहीं. मि. मॉंटेग्यू

यांची व्याख्या वस्तुतः हल्लींचे व्हाइसराय व स्टेटसेक्रेटरी ह्यांना बरीच लागू पडते, व हिंदुस्थानामध्यें सिद्धीस नेलेली हरएक मसलत मूळ स्टेटसेक्रेटरीच्या विलायतेंतील हापिसांत जन्मास आली, असा विलायतेंतील व हिंदुस्थानांतील लोकांचा साधारणपणें समज आहे, ती त्यांची कांहींतरी कल्पना आहे असें नाहीं, तर त्यापेक्षां त्यांत कांहीं जास्त आहे. पण, लॉर्ड मोर्ले स्वतः असा कोणताहि हक्क सांगत नाहींत, किंवा लॉर्ड मिंटोस तो मान्यहि नाहीं, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवणें केवळ वाजवी आहे. उलटपक्षीं, आपल्या कारकिर्दींत ज्या मुख्य मुख्य योजना अमलांत आल्या--विशेषतः हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणांची नवीन योजना सिद्धीस गेली —त्या सर्वांत आपला हात आहे, आणि त्यांचा उपक्रम तर खरोखर आपण स्वतःच केला होता, असें व्हाइसराय साहेबानीं कित्येक प्रसंगीं मोठ्या जोरानें सांगण्याचा विशेष प्रयत्नहि केला आहे. तथापि, हिंदुस्थानांतील राजकीय सुधारणेच्या योजनेचें जनकत्व बहुतेक लोक लॉर्ड मोर्ले यांस देत असतात.

स्टेटसेक्रेटरींच्यापुढें व्हाइसरायाचें तेज सर्वस्वी फिकें पडलें, असा जो लोकांचा समज झाला आहे, त्याचें कारण कांहीं अशीं स्टेटसेक्रेटरी हे मोठे पराक्रमी पुरुष आहेत, असेंच असावें. शिवाय, पूर्वीं कधींहि घडलें नाहीं, अशा रीतीनें त्यानीं आपल्या कौन्सिलची (इंडिया कौन्सिलची) प्रभा खरोखरच लोपवून टाकली, ह्यामुळें वरील समजास पुष्टि मिळाली आहे. परंतु, सर्व ठिकाणीं लोकांचा असा समज होऊन बसला आहे, ह्याबद्दल कुरकुर करण्यास लॉर्ड मिंटो

यांस जागा असली, तरी हा समज वाढत जाण्यास त्यानीं देखील मदत केली आहे, ही गोष्ट त्यांना माहीत नाहीं, असें होणार नाहीं. आणि, ही त्यांची मदत कशी झाली ह्मणाल तर, त्यांच्यापूर्वी जे अत्यंत पराक्रमी व्हाइसराय होऊन गेले, त्यांनींसुद्धां आपल्या कौन्सिलास बरोबर घेऊन काम करण्याची आजपर्यंत जशी खबरदारी घेतली होती, तशी त्यानीं घेण्याची हयगय केली.

लॉर्ड मिंटोसाहेबांची स्थिति मोठ्या विशेष अडचणीची होती, ह्यांत मुळींच संशय नाहीं; आणि, मि० मॉंटेग्यू यानीं त्यांची जी अंतःकरणपूर्वक स्तुति केली, ती अगदीं योग्य केली, असें ह्मणण्यांत कोणालाहि संकट वाटावयाचें नाहीं. लॉर्ड कर्झन व लॉर्ड किचनेर ह्यांच्यामध्यें जो मोठा तंटा लागला होता, त्याचे गुणदोष कांहीं जरी असले, तरी अशा महत्वाच्या प्रश्नाच्या बाबतींत, विलायतसरकारानें हिंदुस्थानसरकारावर आपला अधिकार गाजविणें, व लॉर्ड कर्झन यांस आपल्या जागेचा राजीनामा देणें भाग पडलें त्यावेळची स्थिति, ह्या गोष्टींमुळें हिंदुस्थानांतील व्हाइसरायाच्या पदाच्या अधिकारास व इभ्रतीस फारच मोठा धक्का बसला आहे. लॉर्ड मिंटो हिंदुस्थानांत येऊन पोहोंचल्यानंतर थोड्याच दिवसांत, त्यांची नेमणूक करणाऱ्या युनिअनिस्ट पक्षाच्या हातून राज्यकारभाराची सूत्रें जाऊन, ती लिबरल पक्षाच्या हातांत आलीं. त्यामुळें, लिबरल पक्षाच्या धोरणाशीं त्यानीं स्वतः सहानुभूति दाखविल्याशिवाय, आपल्यापूर्वी अधिकारावर असणाऱ्या पक्षाकडून नेमल्या गेलेल्या मनुष्याची कांहीं विशेष भीडमुरवत नवीन अधिकारी पक्ष धरील, अशी कोणासच आशा नव्हती. ह्मणून, लॉर्ड मिंटोसाहे-

यांच्या स्नेहीमंडळीस अगदीं रास्तपणें असें ह्मणतां येईल कीं, नव्या स्टेटसेक्रेटरीबरोबर कोणत्याहि प्रकारची घांसाघीस होऊं नये, ह्याविषयीं ते मुख्यतः फारच जपत असत, व त्यांनीं असें करणें अगदीं यथायोग्य होतें. नाहींतर, दुर्दैवानें मोठा आणीबाणीचा प्रसंग येऊन, त्याचा शेवट लॉर्ड कर्झन यांच्या राजीनाम्यांत झाला, त्याचीच पुनरावृत्ति इतक्या लवकर होऊन, दुसऱ्या एका व्हाइसरायाला आपलें चंबुगवाळें आटोपून परत रस्ता सुधरावा लागला असता. आतां, असा हेतु जर लॉर्ड मिंटोसाहेबांनीं आपल्या नजरेपुढें ठेवला असेल, तर त्यांनीं स्वीकारलेला मार्ग खरोखरच अत्यंत यशस्वी झाला आहे. कारण, व्हाइसरायसाहेबांनीं नेहमीं आपल्याशीं अगदीं मिळून काम केलें असून, त्यांत त्यांची स्वामिभक्ति व मनःपूर्वकता दिसून आली, अशाबद्दल लॉर्ड मोर्लेसाहेबांनीं अनेकवार ग्वाही दिली आहे. तथापि, हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या [illegible]च्या बाबतींत, इंडिया हापिसाकडून (स्टेटसेक्रेटरी व त्यांचें कौन्सिल यांच्याकडून) जी ढवळाढवळ होत असे, तिच्या संबंधानें स्टेटसेक्रेटरी व व्हाइसराय ह्या दोघांचे विचार केव्हांच सारखे असत, असें नाहीं; आणि ही गोष्ट, ता० २४ फेब्रुआरी १९०९ रोजीं, लॉर्डांच्या सभेंत लॉर्ड मोर्ले यांनीं जी एक तार वाचून दाखविली, त्यावरून स्पष्ट दिसून येते. [illegible]चा बंदोबस्त करण्याच्या कामीं, स्टेटसेक्रेटरीकडून [illegible] जोराचा पाठिंबा मिळाला, ही गोष्ट अत्यंत औदार्य[illegible] मान्य करून; त्याच तारेंत व्हाइसरायांनीं [illegible] एक चमत्कारिक गोष्ट उघड करून [illegible]

[illegible] — १ हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतील [illegible]

सेक्रेटरीच्या ताब्याचा प्रश्न असा आहे कीं, राज्यकारभार चालविण्यासंबंधाचीं सर्व सूत्रें एका ठिकाणीं आणून ठेवण्यापासून ज्या अडचणी मागें उत्पन्न होत असत, त्याच आतां पुनः उत्पन्न होणार असल्याकारणानें, ह्या प्रश्नासंबंधानें आपली दोघांची दृष्टी निरनिराळी असण्याचा फार संभव आहे." आपणास जो पक्ष उघडपणें रास्त दिसतो, तो प्रतिपादण्याचा असा प्रयत्न आपल्या मनाला आटोपून धरून, लॉर्ड मिंटोसाहेबानीं अठरा महिन्यांपूर्वीं केला होता. परंतु, हें नाटक चाललें असतां जो एकदां पडदा पडला, तो तेव्हांपासून पुढें कधींच उचलण्यांत न येऊन, आंत काय चाललें आहे, हें लोकांच्या नजरेस मुळींच पडलें नाहीं. आतां, अत्यंत भयंकर अशा राजद्रोही चळवळींचा बंदोबस्त करण्याकरितां जे कायदेकानू करावे लागले, त्यांस स्टेटसेक्रेटरीनीं मोठ्या धैर्यानें पाठिंबा दिला हें खरें आहे; पण लॉर्ड मिंटो यांच्या तारेंत ज्या गोष्टीची फक्त कबुली दिल्याचें लोकांस कळलें आहे, ती गोष्ट ह्मणजे हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतील तपशिलाच्या बाबतींत विलायतेहून होणारी ढवळाढवळ असून, अशा ढवळाढवळीमुळें, वरील कायदेकानूंपासून जसा परिणाम व्हावयास पाहिजे होता, तसा होण्यास कित्येक वेळां हरकत झाली, असें हिंदुस्थानांतील जबाबदार लोकांचें खरोखर मत असल्याबद्दल त्यांनीं पुष्कळदां बोलूनहि दाखविलें आहे.

गव्हरनरजनरल व त्यांचें कौन्सिल यांचें तेज लॉर्ड मिंटोसाहेबांनीं अशा रीतीनें वारंवार फिकें पडूं दिलें नसतें, तर त्यांच्या स्वतःच्या पक्षास अधिक जोर आला नसता, असें मानणें कठिण आहे. लॉर्ड मिंटोसाहेब पदारूढ असतांना,

गव्हरनरजनरलांचें कौन्सिल अगदीं विलक्षण प्रकारचें दुर्बळ असेल; आणि, कौन्सिलची सभासदी मिळाली ह्मणजे हिंदुस्थानांतील सरकारी नोकरीचा अगदीं कळस झाला, असें जोंपर्यंत समजण्यांत येणार नाहीं, तोंपर्यंत गंभीरपणानें विचार करण्यासारखा कांहीं दुबळेपणा कौन्सिलांत नेहमींच राहणार आहे. हल्लीं पुष्कळच वेळां घडून येतें त्याप्रमाणें, कौन्सिलदारी ह्मणजे लेफटनन्ट गवरनरीवर चढण्याची पायरी, अशी जोंपावेतों स्थिति असणार, तोंपावेतों, बढतीच्या आशेमुळें, विचारस्वातंत्र्य व व्यक्तिविषयक जबाबदारीचा उमज हे जे गुण कौन्सिलदाराच्या ठिकाणीं अवश्य असले पाहिजेत, त्यांना कित्येक प्रसंगीं बाध येणार नाहीं, अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. आतां कसेंहि जरी असलें तरी, गव्हरनरजनरल आणि त्यांचें कौन्सिल व स्टेटसेक्रेटरी आणि त्यांचें कौन्सिल, ह्यांच्यामध्यें कायद्यानें जे संबंध ठरवून दिले आहेत त्यांच्या बदला, लॉर्ड मिंटो व लॉर्ड मोर्ले ह्या उभयतांमधील, ठराविक कायदेशीर पद्धतीला सोडून असणारे व खासगी स्वरूपाचे संबंध घालण्याची प्रवृत्ति कलकत्ता व व्हाइटहॉल (लंडनमधली स्टेटसेक्रेटरीच्या हापिसाची जागा) अशा दोन्ही ठिकाणीं दिसून येतें, असा पुष्कळच लोकांचा समज होऊन बसला आहे; आणि, गेल्या कांहीं वर्षांत, कौन्सिलास ग्रहण लागल्याप्रमाणें, तें व्हाइसरायांच्या मागें गुप्त झालें होतें, ह्या गोष्टीनें लोकांचा हा असा समज दूर होईल, असें कोणासहि वाटत नाहीं. लॉर्ड मिंटो व लॉर्ड मोर्ले [illegible] हे असे संबंध कितीहि उत्तम असले, तरी हिंदुस्थानसरकार सामर्थ्यवान् असलें पाहिजे ह्मणून जीं तत्त्वें अवश्य पाळलीं पाहिजेत,

त्यांच्याशीं वरील संबंधांचा मेळ बसविणें कठिण आहे. (ह्मणजे, व्हाइसराय व स्टेटसेक्रेटरी यांचा मोठा स्नेहभाव असला व ते दोघे एकोप्यानें काम करूं लागले, तरी हिंदुस्थानसरकारच्या अंगीं जसें सामर्थ्य असावयास पाहिजे, तसें त्यामुळें राहणें शक्य नाहीं.) परस्परांचे विचार परस्परांस नीट कळण्यासाठीं, खासगी पत्रें व खासगी तारा ह्यांची फारच मदत होते. परंतु, ह्या उभयतांच्या मधला पत्रव्यवहार यथाविधि व यथामार्ग—ह्मणजे, घालून दिलेल्या नियमांअन्वयें दरबारी रीतीनें—चालण्याची जी तऱ्हा आहे, तिच्याबद्दल ही खासगी तऱ्हा सर्वथैव पतकरणें, अथवा तिला वाजवीपेक्षां जास्त आंत घुसूं देणें, हें सुरक्षित नाहीं. दरबारी रीतीनें पत्रव्यवहार चालवावयाचा ह्मणजे, कायद्यानें ठरवून दिल्याप्रमाणें, दोन्ही बाजूंच्या कौन्सिलांच्या सल्यानें व एकविचारानें जो कांहीं खलिता तयार होईल, त्याची पुढल्या दाखल्याकरितां हापिसांत नक्कल ठेवून, नंतर तो पुढें पाठवून द्यावयाचा.

गव्हरनरजनरल व त्यांचें कौन्सिल ह्यांना अर्धवट जरी ग्रहण लागलें, तरी त्यापासून दोन तऱ्हेनें धोका आहे. हिंदुस्थानच्या सर्व ठिकाणांहून, हिंदी व इंग्रज अशा दोन्ही लोकांच्या तोंडूनहि, जी एक गोष्ट मीं फार वेळां ऐकिली आहे; ती अशी कीं, “ आतां पुढें, हिंदुस्थानसरकार ह्मणून कांहींएक राहिलें नाहीं; ” आणि, ह्या ह्मणण्यांत कितीजरी अतिशयोक्तीचा भाग असला, तरी त्यांत कांहीं सत्याचा अंश खास आहे. स्टेटसेक्रेटरीशीं वागतांना, आपल्या कौन्सिलापासून व्हाइसराय जितके अधिक तुटून राहतील, तितका

राज्यकारभारांतील स्थिरपणाचा मध्यबिंदु अधिक ढळूं लागेल, व हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतील हरएक बाबतींत विलायतेहून हात घालण्याचा मार्ग खुला होईल. आणि, अशा ढवळाढवळीस पक्षभेदाच्या दडपणाचा कांहीं नुसता वास येत असेल, तर ह्या स्थितींतून सुटका व्हावी, ह्मणून परमेश्वराचा धांवाच केला पाहिजे, त्याशिवाय सोय नाहीं. आपल्या पक्षांतील जहाल मंडळी अगदीं दांतओंठ खाऊन कडक टीका करित असतांहि तिला न जुमानून, हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्याचीं जीं तत्वें, मोठा खोल विचार होऊन, चांगलीं ह्मणून ठरलीं आहेत, त्यांची लॉर्ड मोर्ले यानीं पुष्कळच वेळां व मोठ्या धैर्यानें तरफदारी केली असून, येथल्या राज्यव्यवस्थेची नवीन रचना करण्याकरितां, मोठ्या मुत्सद्दीपणानें, त्यानीं आपल्या ज्या मोठमोठाल्या योजना अमलांत आणल्या, त्यांत त्यांनीं एकंदरींत मोठा नेमस्तपणा व फार खोल दृष्टि दाखविली आहे; तसेंच, मोठ्या कठिण प्रसंगीं, लॉर्ड मिंटो यानीं मोठी कीर्ति संपादन केली आहे. ह्मणून, अशा स्थितींत टीका केली असतां, ती द्वेषमूलक भासण्याचा संभव आहे. तथापि, हिंदुस्थानचा राज्यकारभार करणारांविरुद्ध, पार्लमेंटांत मोठ्या कावेबाजपणानें प्रश्न विचारण्यांत येत असतां, त्यांना सरकारी रीतीनें मिळणाऱ्या उत्तरांची तऱ्हा—विशेषतः लॉर्ड मोर्लेसाहेबांच्या कारकिर्दींतील पहिल्या कांहीं वर्षांतील अशा उत्तरांची तऱ्हा—हीं प्रश्नोत्तरें कलकत्यास ([illegible]) पाठविण्याच्या कामांत दिसून येणारी इंडिया [illegible] (स्टेटसेक्रेटरींची) तत्परता, तीं इकडे येऊन पोहोंच[illegible], त्यांनीं (हिंदुस्थानसरकाराकडून) खुशीनें मिळणारी

कबुली व सर्व हिंदुस्थानभर त्यांचा मोठ्या ज्यारीनें प्रसार करण्यांत आल्यावर, त्यांचा खंडोबा करून, त्यापासून राजकीय चळवळयांनीं साधलेला आपला डाव, ह्या गोष्टींचा विचार केला, ह्मणजे हिंदुस्थानसरकारची स्थापना ऐश्वर्याच्या तत्वावर झाली पाहिजे, (ह्मणजे, हिंदुस्थानसरकारच्या हातीं खरोखरच सत्ता असली पाहिजे) व असें खुद्द लॉर्ड मोर्ले यानीं कबूल केलें आहे, त्यास वरील गोष्टींमुळें मोठाच धक्का बसतो. कारण, हिंदुस्थानसरकार-विरुद्ध, पार्लमेंटच्या द्वारानें स्टेटसेक्रेटरींकडे अपील करून जय मिळवितां येणार नाहीं, अशी हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत एकहि बाब नाहीं, असा त्यामुळें हिंदी लोकांचा समज होऊन बसला. आतां, लॉर्ड मोर्लें यानीं आणखी कबुली दिल्याप्रमाणें, हिंदुस्थानची पार्लमेंट सभा स्थापून, तिच्या द्वारें येथला राज्यकारभार चालविणें ह्या गोष्टीची जशी कल्पना करितां येत नाहीं, त्याचप्रमाणें, ६००० मैलांच्या अंतरावरील पार्लमेंटांत दुष्टबुद्धिमूलक व अज्ञानजन्य टीकेचा भडिमार सुरू असतां, हिंदुस्थानचा कारभार चालविणें हीदेखील तशीच कल्पनेच्या बाहेरची गोष्ट आहे. स्टेटसेक्रेटरीवरील "शेवटली जबाबदारी" आहे, अशी हमी ज्या कायद्यांनीं दिली आहे, त्यांचा उद्देश अशा तऱ्हेचा पार्लमेंटाचा ताबा ठेवण्याचा निखालस नाहीं. त्याच वेळीं, व्हाइसरायांचें कार्यकारी कौन्सिल निस्तेज झाल्याकारणानें, हिंदुस्थानसरकारच्या समायिक अधिकाराचा जोर कमी पडला; आणि, हा असा अधिकार असल्याशिवाय, हिंदुस्थानसरकारच्या मताचें व्हाइटहॉल येथें (स्टेटसेक्रेटरीजवळ) जसें पुरें वजन पडावें, तसें पडत नाहीं. उदाहरणार्थ, क्रांतिकारक पक्षाचीं वर्तमानपत्रें व राजद्रोहात्मक चळवळींचा

उघडपणें प्रसार करणारे लोक ह्यांच्या तोंडांत लगाम नसल्यामुळें, त्यांनीं जो सांवळागोंधळ घातला होता, तो खात्रीनें कोणत्या थरास गेलाच पाहिजे, हें हिंदुस्थानांतील प्रत्येक अनुभवी इंग्रज अधिकाऱ्याच्या ताबडतोब लक्ष्यांत येऊन चुकलेंच होतें. पण, अशी गोष्ट असतांहि, सहनशीलपणाचा अतिरेक झाल्यामुळें, खुनासारख्या गुन्ह्यांस ऊत येऊन, त्यांचें भरपूर माप आमच्या पदरांत पडून जाईपर्यंत, असल्या गोष्टींचा बंदोबस्त करण्यास समर्थ होतील असे कायदे विलायतेंतील एका (राडिकल) पक्षाच्या आजपर्यंतच्या धोरणाविरुद्ध असल्याकारणानें, स्टेटसेक्रेटरीकडून त्यांना मंजुरी मिळण्यासाठीं, जसें सामर्थ्य हिंदुस्थानसरकारच्या अंगीं असावयास पाहिजे होतें, तसें तें नसल्याचें लॉर्ड मिंटोसाहेबांच्या आमदानींत दृष्टोत्पत्तीस आलें. आणि, जे लोक व्हाइसरायांच्या विश्वासास पात्र असले पाहिजेत व हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें काम व्हाइसरायांच्या हुकमतीखालीं करण्याचें ज्यांच्यावर सोंपविण्यांत आलेलें असतें, [illegible] लोकांनीं पुष्कळ आधीं आपलीं मतें नमूद करून ठेविलीं असतांहि, आपणास जें पाहिजे आहे तें स्टेटसेक्रेटरींनीं करावें ह्मणून त्यांना आग्रहानें सांगण्यास व्हाइसराय जे तयार झाले, ते वरील मंडळींच्या मतांमुळें नसून, राज्यकर्त्या संस्थानिकांच्या मतांचा जोर त्यांच्या मनावर अधिक झाला ह्मणूनच झाले, असें दिसतें.

आतां, इंडिया हापिसांत व कलकत्त्याच्या सरकारी [illegible] लोकोत्तर कर्तृत्वशक्तीचीं माणसें नेहमींच असतील [illegible] विलक्षण बुद्धीचे व कर्तबगारीचे स्टेटसेक्रेटरी व

व्हाइसराय नेहमींच लाभतील), अशी जरी कोणाची खात्री असली तरी— त्यांच्यावर कोणी बाहेरून भीड घालण्या-संबंधाची गोष्ट बाजूला ठेविली तरी— त्यांच्या स्वतःच्या तारतम्यबुद्धींत व स्वभावांत कांहीं दोष असल्यास, त्याचा परिणाम राज्यकारभारावर होऊं नये, ह्याकरितां त्यांच्या कृत्यांस निर्दोषता आणण्याचीं जी कायमची तजवीज, व्हाइसराय व स्टेटसेक्रेटरी यांच्या भिन्न भिन्न कौन्सिलांच्या रूपानें, कायद्यानें करून ठेविली आहे, तिची आम्हांस मुळींच गरज नाहीं, असें त्यांनीं ह्मणून बिनधोक कारभार करूं लागणें, ही गोष्ट अशक्य आहे. प्रथमतः आपण व्हाइस-रायांचेंच उदाहरण घेऊं या. हिंदुस्थानसरकार ह्मणून जी एक **संस्था** आहे, तिचे प्रमुख ह्या दृष्टीनें त्यांचें विलायतेंतील मुख्य प्रधानाशीं व व्हाइसरायांच्या कार्यकारी कौन्सिलाचें इतर प्रधान मंडळीशीं सादृश्य आहे, असें ह्मणतां येईल. राज्यकारभाराच्या मुख्य खात्यांचे प्रमुख अधिकारी ह्या नात्यानें सर्व प्रधानमंडळी मिळून विलायतेंत **क्याबिनेट** (अष्टप्रधान) होते व तिचें अध्यक्षत्व मुख्य प्रधानाकडे असतें. परंतु, व्हाइसरायांना हुशार व अनुभवी सल्लामसलतगारांची जशी गरज असते, तशी विलायतेंत राज्यकारभार करणाऱ्या मंडळींच्या मुख्यास नसते. व्हाइसराय प्रायः हिंदुस्थानांत येतात, तेव्हां ह्या लहानशा खंडासारख्या अफाट देशाची व तेथल्या ३० कोटी लोकांची त्यांना स्वतःला मुळींच माहिती नसते; आणि, बहुधा राज्यकारभार चालविण्याच्या कामाचा कांहींएक अनुभव नसतांहि, जगांतील अत्यंत बिकट व भानगडीच्या अशा एका राज्यशकटरूपी यंत्राचा ताबा त्यांनीं घ्यावयाचा

असून, वरील ३० कोटी लोकांवर पांच वर्षे राज्य करण्याकरितां, फारच मोठाले व लांबवर जाऊन पोहोंचणारे असे अधिकार त्यांच्या हातीं देऊन, त्यांची इकडे रवानगी करण्यांत येत असते. ते इकडे हिंदुस्थानांत येऊन पोहोंचल्यावर देखील ह्या देशाची व येथल्या लोकांची माहिती करून घेण्यास त्यांना खरोखर फारच थोडी संधि मिळते. दरसाल, त्यांचा सहा महिन्यांपेक्षां अधिक वेळ सिमल्यास खर्च होतो. हें ठिकाण आकाशास भेदून जाणाऱ्या एका पर्वतशिखरावर असून, त्या ठिकाणीं स्वभावतःच यूरोपियन लोकांची, आणि तीसुद्धां सरकारी कामदार लोकांचीच वस्ती आहे, आणि, तेथें कोणाचा हिंदी लोकाशीं मुळींच कधीं संबंध येत नाहीं. वर्षांतून चार महिनें व्हाइसरायांचा मुक्काम कलकत्यास असतो. परंतु, कलकत्ताशहर ह्मणजे केवळ कांहीं अंशानें हिंदी आहे; अथवा, निदान इतकी गोष्ट खरी कीं, हिंदुस्थानांत नाना प्रकारचे लोक असून, त्यांचा जीवनक्रम नाना तऱ्हेनें चाललेला असतो, व त्यापैकीं फक्त एकच तऱ्हा कलकत्ता—शहरांत दृष्टीस पडते. उन्हाळयाच्या आरंभास, मोठमोठीं सरकारी खातीं आपला सर्व लवाजमा घेऊन, (ह्मणजे, हापिसचें सामान, कारकूनलोक, शिपाईप्यादे, सरकारी दपतर, अधिकाऱ्यांचें खासगी सामान व त्यांचीं चाकरमाणसें वगैरे सर्व लटांबर बाहेर निघून), कलकत्याहून सिमल्यास जाण्याकरितां निघालीं, ह्मणजे त्यांना तेथें जाऊन बिऱ्हाड लावण्यास एक महिना लागतो. आणि, हिंवाळा लागण्यापूर्वी, हा सर्व गोसाव्यांचा तांडा गिरिकंदरांतून खालीं उतरूं लागतो, व परत कलकत्त्यास येऊन आपली वर्षाची फेरी पुरी करितो. ह्यांत पुनः एक महिना मोडतो. ह्याच

दोन महिन्यांत कार्यतें व्हाइसरायांना वाटेल तिकडे मोकळेपणानें फिरून, त्यांच्या स्वाधीन केलेल्या ह्या अफाट, परावलंबी देशाच्या इतर भागांची माहिती स्वतः करून घेण्यास त्यांना सवड सांपडते. आणि, रेलवेमुळें जरी लांबलांबचीं ठिकाणें जवळ आणल्यासारखीं झालीं आहेत, तरी स्पेशल गाड्यांतून मोठ्या झपाट्याचे प्रवास व प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणीं मोठ्या दरबारी थाटाचे आदरसत्कार, ह्या गोष्टींमुळें देशाची व लोकांची माहिती करून घेण्याची संधि व्हाइसरायांस पूर्वी जशी मिळत होती, तशी आतां मिळत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. आतांसारखी, पूर्वीं आगगाड्यांची वगैरे सोय नसल्याकारणानें, गव्हरनरजनरलांच्या स्वारीचा संचार धिमेपणानें होत असून, क्यांप एका ठिकाणाहून दुसरीकडे जसा जसा हालत जाईल, तसतसें भोंवतालच्या सर्व प्रांतांतील लोकांस लाटसाहेबांना येऊन भेटण्याची परवानगी असे. शिवाय, दुसरी गोष्ट अशी आहे कीं, राज्यकारभाराचें यंत्र प्रतिवर्षीं अवजड आणि घोंटाळ्याचें होत चाललें आहे. आणि, व्हाइसरायांच्या अंगीं जवळ जवळ अमानुष सामर्थ्य व कामाचा उरक असल्याशिवाय, कधींहि न संपणाऱ्या अशा दररोजच्या कामाच्या जाळ्यांत ते स्वतः गुरफटून जाण्याची पाळी यावयाची. बहुतेक वेळां, व्हाइसरायांची विलायतेस नेमणूक होऊन ते हिंदुस्थानांत येतात, तेव्हां त्यांना इकडली माहिती व कामाचा अनुभव नसतो, आणि, कित्येक वेळां तर, आपल्या सर्व कारकिर्दींत त्यांना अशी माहिती व असा अनुभव मुळींच मिळत नाहीं; आणि ह्मणूनच, ही उणीव भरून काढण्याकरितां, त्यांना कार्यकारी कौन्सिल करून देण्यांत आलें आहे. तत्वतः आणि

शक्य तितक्या व्यावहारिकरीत्या, ह्या कौन्सिलाची अशी रचना करण्यांत आली आहे कीं, ह्यांतील निरनिराळे सभासद हे राज्यकारभाराच्या निरनिराळ्या खात्यांतील अगदीं वरिष्ठ अमलदार असून, त्यांना आपआपल्या खात्याच्या कारभाराचा उत्तम प्रकारचा अनुभव असतो. आणि त्यामुळें, एकंदर सर्व सभासद मिळून जी संस्था होते, तिला एकंदर हिंदुस्थानच्या कारभाराची उत्तम प्रकारची माहिती असते. त्यामुळें, सरकारी कामांत, व शिवाय विलायतसरकारानें राज्यकारभाराचें जें धोरण व्हाइसरायांना घालून दिलें असेल तें, हिंदुस्थानची एकंदर स्थिति लक्षांत घेऊन, इकडे अमलांत आणण्याच्या कामीं, चांगल्या वाकबगार लोकांचा सल्ला व मदत व्हाइसरायांना पाहिजे असते, ती ह्या कौन्सिलापासून त्यांना घेतां येते. व्हाइसरायांच्या कार्यकारी कौन्सिलांत एका हिंदी सभासदाची नेमणूक करण्याचीं जीं कारणें लॉर्ड मोर्ले साहेबानीं दाखविलीं, तीं अशींच होतीं. हिंदी सभासदाकडे जें विशेष काम सोपवून द्यावयाचें, तें उत्तम प्रकारें बजावण्याची पात्रता ज्याच्या अंगीं असेल व शिवाय एतद्देशीय लोकांचीं मतें व त्यांचे विचार ह्या संबंधानें ज्याला विशेष प्रकारची व संपूर्ण माहिती असेल, अशाच गृहस्थाची कौन्सिलांत नेमणूक करण्यांत येत जाईल. येथें जातां जातां हें सांगितलें पाहिजे कीं, व्यापार व उद्योगधंदे ह्या खात्याच्या [illegible] मि. क्लार्क यांची जी नेमणूक लॉर्ड मोर्ले यानीं केली आहे, ती वाजवी आहे, असें ह्याच वरील कारणांमुळें म्हणतां येणार नाहीं, असें वाटतें. कारण, विलायतेंतील एका सरकारी खात्यांतील एक खालचा तरुण अधिकारी कितीहि तेजस्वी असला,

तरी व्हाइसरायांच्या कार्यकारी कौन्सिलांतील सभासदाच्या अंगीं हिंदुस्थानच्या कारभाराचें जसें विशेष अथवा सामान्य ज्ञान असावयास पाहिजे, तसें वरील अधिकाऱ्याच्या अंगीं निखालस नाहीं. अशा नेमणुकीपासून हिंदुस्थानसरकारच्या बाजूस जोर येण्याऐवजीं तितकी ती लंगडीच पडणार.

गव्हरनरजनरलांचा आपल्या कौन्सिलांशीं मिलाफ होऊन, हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें काम चाललें पाहिजे, असें ह्मणण्यास जीं कारणें लागतात, त्यांच्यांतच योग्य तो फेरफार केला ह्मणजे, इंडिया हापिसांत स्टेटसेक्रेटरीचे सल्लामसलतगार ह्या नात्यानें इंडिया कौन्सिलाकडे (स्टेटसेक्रेटरींच्या कौन्सिलाकडे) जो कार्यभाग सोंपविण्यांत आला आहे, त्याचें महत्व जाणून ह्या कौन्सिलच्या सल्ल्यानें स्टेटसेक्रेटरीनीं हिंदुस्थानच्या कारभारावर देखरेख ठेविली पाहिजे, ह्या ह्मणण्यास तींच कारणें लाविलीं असतां, त्यांचा जोर कमी होत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल.


आतां मोर्ले–मिंटो कारकीर्दीकडे आपण दुसऱ्या एका दृष्टीनें पाहिलें तर, राज्यकाभार चालविण्याचीं सर्व सूत्रें हिंदुस्थानामध्यें व्हाइसरायांच्या हातांत आणण्याची, व फिरून व्हाइसरायावर स्टेटसेक्रेटरीचा पूर्वीपेक्षां अधिक व प्रत्यक्ष ताबा ठेवण्याची प्रवृत्ति दिसत असून, त्याचवेळीं ह्या दोघा अधिकाऱ्यांच्या कौन्सिलाचे त्या मानानें तितकेंच वजन कमी होत आहे, ही गोष्ट लॉर्ड मोर्ले हे इंडिया हापिसाचे अध्यक्ष असतांनाच घडून यावी, हें पाहून मनाला अत्यंत विस्मय वाटतो. कारण, राज्यकारभार चालविण्याचीं सर्व सूत्रें एका हातीं न आणतां, अधिकारांची वांटणी करून देण्यापासून फार फायदा आहे, असें आपलें ठाम मत असल्याबद्दल, लॉर्ड मोर्ले यांच्यासारखें दुसऱ्या कोणत्याहि मुत्सद्यानें इतक्या उत्कंठेनें

आजपर्यंत जगास जाहिर केलेलें नाहीं, आणि कायद्यामध्यें ज्या कित्येक सुधारणा झाल्या आहेत, त्यांची लॉर्ड मोर्लेवर बरीचशी जबाबदारी आहे. आणि, ह्या सुधारणा कशा ह्मणाल, तर त्यांच्यामुळें हिंदुस्थानसरकाराशीं वागतांना प्रांतिक सरकारांस जोर येईल इतकेंच नाहीं, तर त्यांच्यामुळें अत्यंत महत्वाच्या अशा पुष्कळ बाबतींत, हिंदुस्थान सरकार पूर्वी साम्राज्यसरकारावर जितकें अवलंबून होतें, तितकें तें आतां न राहतां, त्यांच्याशीं अधिक फटकून वागण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानसरकारास प्राप्त होईल; आणि खरें ह्मटलें तर, हिंदुस्थानसरकाराला असें धोरण स्वीकारणें वरील सुधारणांमुळें भागच पडेल. हिंदी लोकांच्या कल्पना लक्ष्यांत घेऊन व त्यांच्या हितसंबंधांचें संरक्षण करून, हिंदुस्थानचा राज्यकारभार करण्याची आमची (इंग्रजांची) जितकी अधिक इच्छा असेल, त्यामानानें, शक्ति, बुद्धि व स्वतःच्या कर्तृत्वशक्तीविषयीं विश्वास असणाऱ्या हिंदुस्थानसरकारावर आपण अधिक भरंवसा टाकला पाहिजे. हिंदुस्थानच्या एकंदर स्थितीचें विशेषस्वरूप लक्ष्यांत घेतलें, तर (इंग्रज लोकांच्या) वसाहतींना जसे स्वराज्याचे अधिकार आहेत, तसे हिंदुस्थानास मिळण्याचा मुळींच संभव नाहीं. 'तथापि, **हिंदुस्थानांतील कौन्सिलांचा कायदा** अशासारख्या गोष्टींमुळें, कायदेकानू करणें व राज्यकारभार चालविणें ह्या दोन्ही कामांत हिंदी लोकांना आतां पूर्वीपेक्षां अधिक वांटा मिळाला आहे, त्यामुळें इकडल्या स्थितींत जो बदल लवकरच होण्याचा संभव आहे, अथवा [illegible] खात्रीनें होणार आहे, त्याला आपण तयार असलें पाहिजे. हें स्थित्यंतर असें कीं, ब्रिटिश लोकांचें राज्य हिंदुस्थानांत कायम राहील असें धोरण संभाळून,

हिंदुस्थानसरकार जें कांहीं ह्मणेल, तें हिंदुस्थानांतील लोकां-पैकीं अति-उत्तम भागाचें मत ह्मणून समजलें गेल्याकारणानें, हिंदुस्थानसरकारच्या मताची किंमत दिवसेंदिवस वाढत जाणार असून, आपल्या अंतर्गत अभिवृद्धीच्या बाबतींतल्या सर्व प्रश्नांसंबंधानें, (ह्मणजे परदेशांशीं व परराष्ट्रांशीं येणाऱ्या संबंधाचे प्रश्न सोडून), स्वराज्याचा पूर्ण उपभोग घेणाऱ्या आमच्या वसाहतींच्या शब्दास विलायतेंत हल्लीं जो मान मिळत असतो, त्यापेक्षां, हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचें धोरण कायम ठरविण्याच्या बाबतींत, हिंदुस्थानसरकारच्या शब्दास कमी मिळ-णार नाहीं, असे दिवस शेवटीं येणार आहेत.

हिंदुस्थानच्या राज्यकारभाराच्या सर्व दोऱ्या न एकव-टतां, अधिकाराची शक्य तितकी वांटणी करून देऊन, एकंदर राज्यकारभारावर गव्हरनरजनरल व त्यांचें कौन्सिल यांची सामान्य, पण लुबरेपणाची मात्र नव्हे अशी, देखरेख व हुकमत ठेविली, तसेंच राजनीतीचीं ठळक ठळक तत्वें सांगून देण्याखेरीज इतर बाबतींत, हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत विला-यतेहून मुळींच ढवळाढवळ न होतां, हिंदुस्थानसरकारला देव-वेळ तितकी मोकळीक देण्यांत आली, तरच ह्या देशाला पुढें चांगले दिवस येतील. राजधोरणाचीं मुख्य मुख्य तत्वें घालून देण्याचें काम साम्राज्यसरकारच्या हातीं, ह्मणजे त्यांच्या वतीनें हिंदुस्थानच्या कारभारावर देखरेख ठेवणाऱ्या स्टेटसेक्रेटरींच्या हातीं, निरंतर राहिलें पाहिजे. आणि, अशाच प्रकारची जर व्यवस्था आह्मीं केली, तरच फक्त मि. मॉंटेग्यू यांच्या एका वाक्यानें सांगावयाचें ह्मणजे, "हिंदुस्थान सरकारसारख्या इतक्या भानगडीच्या व प्रजेला

बेजबाबदार अशा राज्यव्यवस्थेची "खुद्द आमच्या "प्रजा-सत्ताक राज्यव्यवस्थेशीं सांगड घालून देण्यांत" यश मिळ-विण्याची आह्मांला आशा करितां येईल.



भाग २७ वा.

उपसंहार.

हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेण्याकरितां, लॉर्ड हार्डिंग आफ् पेनशर्स्ट हे अशा आणीबाणीच्या प्रसंगीं इकडे येण्यास निघाले आहेत कीं, तसा प्रसंग गेल्या पन्नास वर्षांतील एकाहि व्हाइसरायाच्या नेमणुकीच्या वेळीं आलेला नव्हता. एका बाबतींत मात्र ते आपल्या आधींच्या बहुतेक मंडळीपेक्षां नशिबवान् आहेत ह्मणावयाचें. एकोणिसाव्या शतकाचीं बरींच वर्षें, हिंदुस्थानावर बाहेरून परचक्र येऊन त्याच्या सुरक्षितपणास धक्का बसण्याची व मध्यआशियेच्या शांततेचा भंग होण्याची अनेक कारणांमुळें भीति वाटत होती. परंतु, लॉर्ड हार्डिंगसाहेब रशियाच्या दरबारीं इंग्लंडचे वकील असतांना, त्यानींच ज्या करारनाम्याचा उपक्रम केला होता, तो करारनामा इंग्लंड व रशिया ह्या दोन देशांमध्यें झाल्याकारणानें, वर सांगितलेल्या भीतीचें सर्वांत मोठें कारण आतां नष्ट झालें आहे. तथापि, ह्यापुढें बाहेरून कधींच कांहीं संकट येणार नाहीं अशी खात्री बाळगून, हिंदुस्थानसरकारास अगदीं निर्वेधपणें राहतां येईल, असें मात्र त्यावरून ठरत नाहीं. तिबेटवरील स्वारी व पठाण लोकांचें शासन करण्याकरितां केलेल्या एक दोन लहान मोहिमा खेरिजकरून, सन १८९८ सालांत संपलेल्या तेराई स्वारीनंतर, हिंदुस्थानच्या सरहद्दीवर मुळींच

मोहिमा झाल्या नाहींत. परंतु, वायव्यसरहद्दीवरील अडदांड रानटी लोकांस इराणी आखाताच्या मार्गानें हत्यारांचा पुरवठा होत होता, ह्मणून हा व्यापार बंद करून टाकण्याकरितां फार जरूर असणारे उपाय योजावे लागले. त्यामुळें, वर-चेवर दंगेधोपे करण्याची जी ह्या लोकांची स्वाभाविक प्रवृत्ति, तिला सध्यां जोर आलेला असून, तेथें पुनः अस्वस्थता उत्पन्न होण्याचीं भयंकर चिन्हें दुर्दैवानें दृष्टोत्पत्तीस येऊं लागलीं आहेत. ह्या लोकांची उठावणी प्रत्यक्षपणें काबुलाहून होत आहे, असें मानण्यास आज खात्रीलायक पुरावा नाहीं; तरी-पण, तीन वर्षांमागें, काबूलचे अमीर हिंदुस्थानांत आले होते, त्यावेळीं त्यांचा आदरसत्कार करण्यामध्यें व मानमरातब राख-ण्यामध्यें जो कांहींसा अतिरेक झाला, त्यामुळें त्यांच्या व आमच्या मधल्या स्नेहसंबंधांत कांहीं कायमची सुधारणा झाली किंवा कसें, ह्या प्रश्नाचें उत्तर निदान संशयात्मक आहे. आणि, यद्यपि, रशिया व इंग्लंड ह्यांच्या बाबतींत, दाणे टाकून कोंबडीं झुजविण्याचें सामर्थ्य ह्याउपर त्यांच्या अंगीं राहिलेलें नाहीं, तथापि आफगाणिस्थानच्या कारभारासंबंधानें आमचे रशियाशीं जे करारमदार झाले आहेत, ते आपणास मान्य आहेत, अशी कबुली देऊन सदरहु करारनाम्यावर सही करण्याचा विचार अझून त्यांच्या मनांत येत नाहीं. इरा-णच्या, आणि विशेषतः त्यांतील दक्षिण भागाच्या, अवस्थे-मुळें अशी स्थिति प्राप्त झाली आहे कीं, ती आतां बेसुमार सहन करितां यावयाची नाहीं. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, (यूरोपांतील) तुर्कस्थानच्या पालटलेल्या नव्या मनूंत, सत्ता-कारभाराचीं सूत्रें हातीं असणाऱ्या पक्षाकडून आमचा

करण्याची बुद्धि इराणी आखातांत अनेक ठिकाणीं दाखविण्यांत आली आहे. आतां, मुसलमानी राष्ट्रें व ग्रेट ब्रिटन ह्यांच्यामध्यें कांहीं जरी वैषम्य आलें, तरी हिंदुस्थानच्या मुसलमान लोकांच्या मनास ती गोष्ट केवळ हटकून लागते, ह्मणून होतांहोईल तों गोष्टी विकोपास जाऊं नयेत, अशी जरी आमची अत्यंत उत्कंठा असली, तरी तुर्कस्थानच्या ह्या अशा वर्तनामुळें उभयतांत तेढ वाढून, कांहीं अनिष्ट प्रकार घडून आल्याशिवाय खास राहणार नाहीं. तिबेटांत, आणि वास्तविक ह्मटलें तर आमच्या हिंदी साम्राज्याच्या ईशान्येकडील सरहद्दीवरच्या सर्वच प्रदेशासंबंधानें, चीनकडून अरेरावी होत आहे, त्यामुळें पुढें मागें एक नवीनच संकट उद्भवण्याचा संभव असून, तिकडे हिंदुस्थानसरकारनें दुर्लक्ष करणें सुरक्षित नाहीं. कां, कीं, आमच्या सरहद्दींचें रक्षण करणें हें आमचें कर्तव्य आहे इतकेंच नव्हे, तर नेपाळ व भूतान ह्यांच्या हितसंबंधांचें संरक्षण करण्याच्या कामींहि आम्ही तशीच दक्षता ठेविली पाहिजे. इकडे, सिकीमप्रमाणेंच, तिबेटप्रकरणाची अखेर व दलाई लामाचें पलायन, ह्या गोष्टींमुळें उडालेली गडबड कांहीं लहानसान नव्हती. हिंदी लष्करांत नवीन भरती करण्याकरितां नेपाळप्रांत अत्यंत उपयोगाचा असल्याकारणानें, विशेषतः तेथें चिनी लोकांची छाप बसून, ब्रिटिश लोकांचें हल्लीं जें वजन आहे, त्यास धक्का बसूं देतां उपयोगाचा नाहीं. लॉर्ड हार्डिंगसाहेबांचा पेशा ह्मटला ह्मणजे, भांडणतंटे मोडून शांतता स्थापन करण्याचा असा आहे. आणि, रूसो-जपानी युद्धासारख्या आणीबाणीच्या वेळीं, सेंटपिटर्सबर्ग येथील रशियन दरबारांत ते असतांना, इंग्लंड व रशिया ह्या उभयतां राष्ट्रांमधील

स्नेहसंबंधांत यत्किंचित् बिघाड न होऊं देण्याची महत्त्वाची व नाजूक कामगिरी त्यानीं किती उत्कृष्ट रीतीनें बजाविली, हें त्या वेळचे गुप्त कागदपत्र जेव्हां इतिहासकारास पाहावयास मिळतील, तेव्हांच फक्त पूर्णपणें कळून येणार आहे. हिंदुस्थान देशाच्या सरहद्दीवरील प्रांत अत्यंत विस्तृत असून, अद्यापि तेथले दंगेधोपे मोडून व्यवस्था बहुतेक लागलेलीच नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. त्यामुळें, तेथें केव्हां व कशी गडबड उडून, एका क्षणांत शांतता नाहींशी होईल, ह्याचा बिलकुल नेम नाहीं, ह्या गोष्टीचा आपणांस विसर पडतां कामा नये. आणि, ही अशी एकाएकी गडबड उडण्याचीं कारणें अशीं असतात कीं, त्यांच्यावर अत्यंत शांतताप्रिय अशा व्हाइसरायांचा फारच थोडा दाब असतो— किंबहुना मुळींच नसतो.

शांतता व तिच्याशीं नित्यसंबंध असणारी जमाखर्चाची सुस्थिति, ह्या गोष्टींची हिंदुस्थानास आज जितकी गरज आहे, तितकी ह्यापूर्वीं कधींच नव्हती. कारण कीं, हिंदुस्थानच्या अंतर्गत कारभाच्या प्रश्नांपैकीं एक प्रश्न असा आहे कीं, त्याच्याकडे सर्वांपेक्षां सरकारचें लक्ष अधिक लागलें पाहिजे व त्याची आज सर्वांपेक्षां निकडहि अधिक आहे; आणि, शांतता व सरकारी खजिन्याची सुस्थिति ह्या गोष्टी असल्याशिवाय, वरील प्रश्न सोडविण्याच्या मार्गांतील अडचण अपरिमित वाढणार आहे. असस्थतेचें वादळ कांहींसें थंडावलें आहे हें खरें; परंतु, गेल्या थोड्या वर्षांत, निव्वळ चांगल्या गोष्टींची आशा करणाऱ्या अधिकारी लोकांना जे वारंवार निराशेचे टोले खावे लागले आहेत, ते लक्ष्यांत घेऊनहि, वरील

शांति ह्मणजे देशाची जी मूळची स्थिति ती पुनः कायमपणें त्याला प्राप्त होण्याचें पूर्वचिन्ह आहे, असें छातीला हात लावून पुढलें भविष्य सांगणाऱ्या पुरुषाची उमेद फारच मोठी असली पाहिजे. राज्यशकट चालविण्याकरितां नवीन यंत्र निर्माण करण्यांत आल्यामुळें, (सुधारून वाढविलेलीं कौन्सिलें अस्तित्वांत आल्याकारणानें), राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणण्याप्रीत्यर्थ, सनदशीर चळवळ करणाऱ्या हिंदी पुढाऱ्यांस आपलें काम जोरानें चालविण्यास जरी आतां पुष्कळच वाव मिळाला आहे, तरी पण, त्यामुळें फुटक्या मनाच्या लोकांचें गुटमळणें खात्रीनें नाहींसें झालें आहे काय? आणि, विचारी व कायद्यास भिऊन वागणाऱ्या लोकांच्या पुढाऱ्यांना धीर येऊन, त्यांच्या मनास विश्वास वाटूं लागला आहे काय? कां, लॉर्ड मोर्ले एकदां ह्मणाले त्याप्रमाणें, जो **चांदोबा** देण्याचें आमचें सामर्थ्य नाहीं तो मिळाला पाहिजे, ह्मणून अकांडतांडव करित सुटणाऱ्या, उतावळ्या व निव्वळ कल्पनासृष्टींत भ्रमण करित राहणाऱ्या पुढाऱ्यांच्यामागून ते लोक असेच जात राहणार? (असले पुढारी ह्मटले ह्मणजे, सिकतातैल अंगास लावून, मृगजळडोहांत वंध्यापुत्राबरोबर यथेच्छ स्नान करून, खपुष्पांचा हार गळ्यांत घालून, अमृताचें प्राशन करून, गंधर्वनगराप्रत जाऊन, तेथें मूकगायन ऐकण्याची इच्छा करणारे आहेत!) "दडपशाईचे" उपाय ह्मणून ज्यांच्याबद्दल सारखी हाकाटी चालली आहे अशा कायद्यांमुळें, झुंजण्यास तयार झालेल्या असंतोषरूपी स्वाराच्या हातचा भाला खरोखरीच गळून पडला आहे काय? कां; आपला कोणीं माग काढूं नये, ह्मणून खबरदारी घेणें व आपले ड्रावेषच बदलणें, ह्या गोष्टी करण्याचे केवळ

त्यांना तूर्त भाग पडलें असून, अधिकारी लोक जे अगदीं डोळ्यांत तेल घालून बसले आहेत, त्यांच्या डोळ्यांवर झांपड येण्याची, अथवा इंग्लंडांतील राजकीय पक्षांच्या वर्चस्वाच्या चढउताराची, अथवा राष्ट्राराष्ट्रांमध्यें वितुष्ट पडून कांहीं मोठा आणीबाणीचा प्रसंग येण्याची ते लोक वाट पाहत बसले असून, नवीन संधि सांपडतांच, राजद्रोहात्मक चळवळीचें घोडें पुनः रंगणावर धरण्यास ते टपून बसले आहेत? ह्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांस उत्तर मिळून निर्णय लागण्याच्या कामीं, पुढल्या पांच वर्षांचा बराच उपयोग होणार आहे, यांत संदेह नाहीं. आणि, व्हाइसराय ह्मणजे खुद्द बादशाहाचे प्रतिनिधि व कौन्सिलासह गव्हरनरजनरल ह्मणजे हिंदुस्थानसरकारचे प्रमुख ह्या दोन्ही नात्यांनीं, कायद्यानें घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणें करण्याचीं, राज्यकारभाराचीं जीं कामें लॉर्ड हार्डिंगसाहेबांवर सोपविण्यांत आलीं आहेत तीं बजावतांना, लाटसाहेब जी मुत्सद्दीगिरी, जी सहनशीलता, जो शांतपणा व जो दृढनिश्चय व मनाचा खंबीरपणा दाखवितील, त्यामुळें बऱ्याच अंशीं वरील प्रकारचें उत्तर मिळणार आहे.

एखाद्या डबक्यांत सांचून राहिलेलें पाणी ज्याप्रमाणें निश्चळ असतें, त्याप्रमाणें हिंदी लोकांचा (आम्ही इकडे येईपर्यंत) आयुष्यक्रम होता. परंतु, आतां जी एक मोठी चळवळ सुरू होऊन, जिकडे तिकडे ब्रह्मघोटाळा माजून राहिला आहे, व जो तो बावरल्याप्रमाणें झाला आहे, त्या चळवळीमुळें हिंदी समाजांतील वरील प्रकारचा संथपणा मोडून, त्यांत आतां खळबळ उडून गेली आहे. व ह्या प्रकारच्या चळवळींतल्या कांहीं कांहीं मुख्य लोकां व त्यांतून वाकड्यातिकड्या रीतीनें वाहणाऱ्या इतर लोकां

उगमाचा शोध लावण्याचा प्रयत्न, कितीहि अपुरा असला तरी, मीं केला आहे. ऐरणीवरील सोन्यावर ज्याप्रमाणें सोनाराचा हातोडा सारखा पडत असतो, त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या एका प्राचीन व लुप्तप्राय झालेल्या संस्कृतीवर (विद्याचारांवर) विदेशीय लोकांच्या कल्पनांचे एकसारखे होत राहणारे आघात; ह्या (विदेशीय) कल्पना अगदींच थोड्या लोकांच्या मनांत कमीअधिक मानानें बाणणें; ज्या लोकांच्या, पिढ्यानपिढ्या बसून राहिलेल्या वर्चस्वास ह्या कल्पनांमुळें धक्का बसूं पाहत आहे, त्यांच्या मनांतली त्यांबद्दलची भीति व त्वेष; जुन्या धर्मसमजुतींचा लोप होऊं लागला असतांहि, ह्या मरणाच्या पारीं बसलेल्या धर्मकल्पनांच्या कुडींत पुनः प्राण घालून, नवीन, विदेशीय लोकांच्या संस्कृतीशीं दोन हात करण्यास तयार होण्याचा प्रयत्न; केवळ बुद्धीचा विकास व्हावा अशाच उद्देशानें निर्माण केलेल्या व नैतिक आणि धार्मिक अंगांचा मुळींच संबंध नसलेल्या, अशा कृत्रिम शिक्षणपद्धतीचा निष्काळजीपणानें झालेला प्रसार; विलक्षण दृढ असे एकावर एक थर बसून तयार झालेल्या समाजास पाश्चात्य लोकांतील राज्यव्यवस्थेचीं, राज्यकारभाराचीं व तशींच कायदेकानूंचीं तत्वें लागू करणें; अगदीं बाल्यावस्थेंत असणाऱ्या उद्योगधंद्यांवर व व्यापारावर अलीकडल्या, नवीन तऱ्हेच्या संपत्तिशास्त्राच्या तत्वांचा होणारा परिणाम; जिंकलेले, नाना प्रकारचे लोक व त्यांच्यावर राज्य करणारे परकी लोक, ह्यांच्यामध्यें निरंतर असणारा व समजण्यांत न येणारा परंतु अपरिहार्य असा विरोध; दूरदेशांत होणाऱ्या लढाया व दूरच्या ठिकाणीं सुरू असलेलीं, जातीजातींतलीं द्वंद्वें, यांच्यापासून उठणारी प्रतिगर्जना; अगदीं पूर्वेकडील धर्म

राष्ट्राचा अभ्युदय व उत्कर्ष; दक्षिण आफ्रिकेंतील एशियाटिक लोकांचा मानभंग—ह्या सर्व व इतर आणखी परस्परविरोधी कारणांमुळें, शेवटीं एका लहानशा परंतु अतिशय कार्यक्षम कंपूनें बंडाचें निशाण उभारलें—(ह्मणजे, पाश्चिमात्य लोकांच्या आगमनानें, हिंदुसमाजावर जे अनेक दिशेनें अनेक परिणाम घडून येत होते, त्यांचा प्रतिकार करून, हिंदुसमाजाची मूळस्थिति त्याला पुनः प्राप्त करून देण्याची धडपड सुरू झाली). आणि, हा कंपू कशा लोकांचा आहे ह्मणाल तर, एकीकडे, पश्चिमखंडांतील राष्ट्रांच्या सत्ताधारी प्रजेचे अनुकरण करण्याचें व त्यांची सहानुभूति मिळविण्याचें पुष्कळ वेळां मिष करून, कोणाच्या ध्यानांत न येईल अशा रीतीनें, जुन्या तऱ्हेच्या जातिभेदामुळें समाजांतील लोकांवर होणारा जुलूम व हिंदुधर्मांतील अतिशय मूर्खपणाच्या व वाईट अशा भोळ्या समजुती, ह्यांचें समाजांत पुनरपि प्रस्थ माजविण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होत असतो तर, दुसरीकडे, साधारण मनुष्यांच्या बुद्धीच्या अटोक्याबाहेरील प्रदेशांत यथेच्छ संचार करणारें, उत्कृष्ट तत्वज्ञान व पशुतुल्य वर्तनास व विषयासक्तीस प्रोत्साहन देणारा वाममार्ग, ह्या दोन गोष्टींचे भिन्न भिन्न प्रमाण घेऊन व त्यांचे मिश्रण करून बनविलेलें, पौर्वात्य लोकांचें गुह्यज्ञान ह्या संबंधानें इकडील लोकांत जी विलक्षण उत्कंठा असते, तिच्या हातीं पाश्चिमात्य देशांतील अराजक लोकांच्या अत्याचाराच्या मार्गाचें कोलीत देण्याचा ते लोक प्रयत्न करित असतात.

ब्रिटिश राज्य तात्काळ उलथून पाडण्याचा ह्या चळवळीचा हेतु आहे, तरी त्यासंबंधानें तिला भलतेंच महत्व देण्याची आवश्य

जरूर नाहीं. आतां, दुसरीकडे कोठें ब्रिटिश राज्यावर मोठें भयंकर संकट येऊन गुदरलें असतां, हिंदुस्थानांतील राजद्रोही लोकांस अवसान येऊन, त्यांनीं उघडपणें बंडाचें निशाण उभारलें, तर मात्र गोष्ट निराळी. वास्तविकपणें, हिंदुस्थानांतील आमच्या राज्याची इमारत ज्या पायावर उभारण्यांत आली आहे, त्याची मजबुती खरोखर आहे, त्यापेक्षां कमी समजण्याची प्रवृत्ति पुष्कळ वेळां आमच्या ठिकाणीं दिसून येते. कारण, खरोखर ह्मटलें ह्मणजे, हिंदुस्थान हा केवळ भूगोलशास्त्राच्या दृष्टीनें एक देश आहे; आणि ह्या एकदेशत्वाची कल्पना खरी आहे, असें जें बरेंच अनुभवास येतें, तें येथें आमचें राज्य असल्यामुळेंच होय, व हा प्रकार येथें असाच निरंतर चालत राहणार आहे. हिंदी अमलाखालीं हिंदुस्थानचें संयुक्त राष्ट्र बनेल, असे मनोराज्यांत दंग होऊन जाणारे, कांहीं शेखमहमद हिंदी लोकांत असतील; पण, हा "मनांत मांडे खाण्याचा" आजचा प्रकार ह्मटला ह्मणजे, यूरोपांतील कांहीं सोशियालिस्टांस ज्याप्रमाणें सर्व यूरोपखंडाचें संयुक्त राज्य होईल असा भ्रम आहे; त्याप्रमाणेंच वेडगळपणाचा आहे. कोणीं दुसऱ्यानें स्वारी करून बळजबरीनें एकछत्री अमल बसविल्याशिवाय, यूरोपखंडाचें एकराष्ट्र बनण्यापर्यंत जशी कधीं-काळींहि मजल पोहोंचली नाहीं, तशीच हिंदुस्थानचीहि स्थिति आहे. कारण, पुढें दिल्याप्रमाणें हिंदुस्थानचें यूरोपशीं साम्य आहे. ह्मणजे, भूगोलशास्त्रदृष्ट्या, हिंदुस्थान व यूरोप हीं दोन खंडें असून, तेथील लोकांना अवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी त्यांत भरलेल्या आहेत. परंतु, ह्या दोन्ही खंडांत अनेक राष्ट्रांची (भिन्न भिन्न लोकांची) वसति असून, त्यांचे निरनिराळे जातिसंबंध व धर्मसंबंध, त्यांच्या निरनिराळ्या

चालीरीती व परंपरागत संप्रदाय, ह्यामुळें त्याच्यामध्यें इतकी भयंकर फूट पडते कीं, त्यांचे सर्वांचेच हितसंबंध असणाऱ्या गोष्टीमुळें देखील ही फूट बुजून, त्यांचें सर्वांचें ऐक्य होण्याचा संभव नाहीं. जणूं काय, हिंदुस्थान ह्मणजे एकदेश व हिंदी लोक ह्मणजे एकराष्ट्र, अशी कल्पना करून बोलण्याची आह्मांला फारच संवय लागली आहे. त्यामुळें, यूरोपांत जितक्या अगदींच भिन्न भिन्न भाषा बोलतात, त्यापेक्षां हिंदुस्थानांत पुष्कळ अधिक बोलतात; जर्मन व पोर्तुगीज लोकांमध्यें, किंवा रशियन व इटालियन लोकांमध्यें जातिविषयक (मनुष्यप्राण्यांतील निरनिराळ्या वंशांसंबंधानें) जितका फरक आहे, त्यापेक्षां मराठे व बंगाली लोकांमध्यें, किंवा पंजाबी व तामिली लोकांमध्यें तो अधिक आहे; (जर्मन लोक ट्युटॉनिक वंशाचे, रशियन स्लाव वंशाचे व इटालियन आणि पोर्तुगिज लोक लाटिन वंशाचे आहेत); इतर धर्मांची गोष्ट बाजूला ठेविली, तरी हिंदू व मुसलमान लोकांमध्यें धर्माच्या बाबतींत बहुधा जसा उग्र स्वरूपाचा विरोध आहे, व ते दोघेहि एकमेकांच्या धर्माचा उच्छेद करण्याचा जसा प्रयत्न करितात, तसा प्रॉटेस्टंट व रोमन कॅथॉलिक लोकांमध्यें—फार कशाला, अल्स्टर परगण्यांत (आयर्लंड) देखील—नाहीं; आणि, जातिभेदामुळें हिंदी समाज छिन्नभिन्न होऊन, त्याचे जसे तुकडे तुकडे पडले आहेत तसे, यूरोपांत असून जीव धरून राहिलेल्या जातिभेदामुळें तिकडच्या समाजाचे तुकडे पडणें कधींच संभवनीय नाहीं; ह्या सर्व गोष्टींची आह्मांला फारच वेळां विस्मृति होते, [illegible] एका जातीस दुसऱ्या जातीविरुद्ध उठवून, अथवा एका धर्माच्या लोकांस दुसऱ्या धर्माच्या लोकांशीं भांडण लावून देऊन [illegible] ही [illegible] दिवसांची [illegible]

त्यांना प्रोत्साहन देऊन, —ह्मणजे भेद करून—आह्मी हिंदुस्थानचें राज्य करित आहों, असा आमच्यावर कधीं कधीं आळ घेण्यांत येत असतो; परंतु वास्तविक प्रकार असा नाहीं. आह्मांला येथें राज्य करितां येतें, ह्याचें कारण, आमचें राज्य येथें असल्यामुळेंच, हे असे जुने भेदभाव पहिल्यासारखे पुनः एकवार उघडपणें हातघाईस येऊन, रक्तपात होण्यापर्यंत त्यांची मजल जात नाहीं. हिंदी समाजाच्या ह्या अशा फुटीमुळें, त्याच्यांत आपापसांत जीं वैमनस्यें आहेत, त्यांचें प्राबल्य ब्रिटिश राज्यामुळेंच अत्यंत कमी होतें. सुज्ञ व विचारी हिंदी लोकांचा तरणोपाय देशाच्या सुस्थितींत असल्याकारणानें, त्यांच्यापैकीं बहुतेकांच्या मनाला आमच्या राज्याबद्दल संतोष वाटत असून, त्यास त्यांचा आधार आहे. कारण कीं, एकमेकांशीं स्पर्धा करणाऱ्या इकडल्या जाती व धर्मपंथ ह्यांच्यामधील कलहाग्नि भडकून न जाऊं देण्याचें सामर्थ्य फक्त ब्रिटिश राज्याच्या अंगीं आहे, अशी त्यांची खात्री आहे. आणि, जरकां असा कलहाग्नि भडकला, तर शेवटीं कोणत्या तरी एका जातीचें किंवा धर्माचें वर्चस्व स्थापन होऊन, त्यापासून इतरांवर जुलूम होऊं लागणार हें खास. आणि, आमच्या प्रजेपैकीं पुष्कळच लोक तोंडानें बोलून दाखवित नसले, तरी स्वभावतःच आमच्या राज्यास राजीरजावंत आहेत; ह्याचें कारण असें कीं, त्यांच्या वाडवडिलांस पूर्वीच्या राज्यांत निर्भयता, न्याय व शांतता हीं सुखें जितकीं भोगावयास सांपडलीं, त्यापेक्षां तीं त्यांना आतां पुष्कळ पटीनें अधिक भोगावयास सांपडतात.

ब्रिटिश राज्याऐवजीं आपली सत्ता येथें स्थापन करण्याची;

निदान तें राज्य टिकल्यास, आपलें स्वतःचें वर्चस्व स्थापन करण्याकडे त्याचा उपयोग करून घेण्याची हांव फक्त दोन प्रकारच्या शक्तींत दिसून येते. पहिली शक्ति ह्मटली ह्मणजे, प्राचीन व प्रतिकारी (ह्मणजे क्रिया झाली असतां, तिचा प्रतिकार करण्याकरितां उलट क्रिया करणारी) ब्राह्मणी धर्माची. ज्याला आह्मी हिंदुधर्म ह्मणतों, त्या धर्माच्या लोकांच्या सामाजिक चालीरीतींत व धार्मिक समजुतींत ह्या ब्राह्मणी धर्माचीं पाळेंमुळें गेलेलीं असून, सर्व हिंदुलोकांवर, ह्मणजे हिंदुस्थानच्या लोकसंख्येपैकीं पुष्कळांवर' ह्या धर्माचा अमल चालत आहे. आतां, येथें ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, हिंदुलोकांची संख्या जरी मोठी आहे, तरी हे लोक ह्मणजे केवळ हिंदी लोकांचा एक भाग आहे. दुसरी शक्ति ह्मटली ह्मणजे अर्वाचीन असून, तत्वतः ती पाश्चिमात्य शिक्षणामुळें अस्तित्वांत आली आहे. ह्या शक्तीचा प्रभाव कांहीं अंशानें सर्व हिंदुस्थानभर दृग्गोचर होत आहे, तरी पण, तिचा ज्या लोकांवर असा परिणाम झालेला आहे, त्यांची संख्या एकंदर हिंदी लोकांच्या मानानें केवळ समुद्रांतल्या एका बिंदूप्रमाणें असून, तेहि लोक कांहीं थोड्या विशिष्ट जातींतले आहेत. ह्या वर्गांतील लोक परस्परांशीं बद्ध झालेले असतात, ते त्यांच्या इंग्रजी भाषेच्या व इंग्रजी राजकीय संस्थांच्या ज्ञानामुळेंच असतात. बाकी, हें ज्ञान बहुधा अगदींच वरवरचें तुटपुंजीं असतें. आतां, अलीकडे कांहीं वर्षें, ह्या दोन्हि प्रकारच्या शक्तींच्या तडाक्यांत जे लोक आले आहेत, त्यांच्या मनामध्यें इंग्रजी राज्याविषयींच्या वैषम्याचा प्रादुर्भाव झाला आहे,

तरी त्यांचा बागुलबोवा वाटणाण्यारखें तथ्य त्या दोहोंमध्येंहि आढळून येत नाहीं. पहिली शक्ती अगदींच वृद्धावस्थेंत असून, दुसरी केवळ बाल्यावस्थेंत आहे. परंतु, ह्या दोन्ही शक्तींचा ज्यांच्यावर पुरा अमल बसलेला आहे, अशा लोकांपैकीं ज्यांच्या मनांत बंडावा करण्याची अत्यंत प्रवृत्ति उत्पन्न झालेली आहे, अशा दोन्ही वर्गांतील लोकांनीं भ्रामक **राष्ट्रीयत्वाच्या** पायावर तात्पुरत्या व अस्वाभाविक अशा ऐक्याची इमारत उठवून दिली आहे. पण, वास्तविक पाहिलें तर, अशा **राष्ट्रीयत्वाचें** उदाहरण हिंदुस्थानच्या साऱ्या इतिहासांत कोठेंच नजरेस पडत नाहीं हें खरें; परंतु, पाश्चिमात्य लोकांच्या राष्ट्रीयत्वाच्या बाबतींतल्या कल्पना व त्यांचें (इकडल्या स्थितीविषयींचें) अज्ञान ह्यांच्यावर मात्र त्या **राष्ट्रीयत्वाचा** भयंकर परिणाम होईल, असा अजमास आहे; व तें **राष्ट्रीयत्व** भासविणारांचा हेतुहि तसाच आहे.

हें असें सृष्टिक्रमाविरुद्ध जें **संगनमत** झालें आहे, त्याची कंबर मोडून टाकणें आमच्या स्वाधीन आहे. दुसऱ्या धर्मांवर व संस्कृतीवर तुटून पडणाऱ्या ब्राह्मणी धर्माचा पाश्चिमात्य संस्कृतीशीं (विद्याचारांशीं) आमच्यानें सलोखा करून कदाचित् देववणार नाहीं. परंतु, ह्या धर्माच्या नांवाखालीं, कित्येक दुष्ट कल्पनांचा पगडा लोकांच्या मनावर बसत असून, ही गोष्ट पुष्कळ सुशिक्षित व सुज्ञ ब्राह्मण मंडळीस फार दिवसांपूर्वीं कळून चुकली आहे. आणि, ह्या असल्या कल्पनांचा बींमोड आह्मांस करितां येण्यासारखा आहे. आतां, हा असा बींमोड करण्याचें उत्तम साधन ह्मटलें ह्मणजे, पाश्चात्य शिक्षण व पाश्चात्य विद्याचार (संस्कृति) यांच्याशीं

परिचय घडून आल्यामुळें, आणि ह्या बाबतींत पुष्कळ व्यंगें असतांहि त्यांस न जुमानतां, सुसंस्कृत मनाचे व प्रगतिप्रिय असे जे लोक निर्माण झाले आहेत, त्यांना आपल्या बाजूला आणणें, हें होय. हा हेतु साधण्याकरितां, आमच्या शिक्षण-पद्धतीची सुधारणा अवश्य झाली पाहिजे, व त्या कामांत आह्मांस कितीहि नुकसान सोसावें लागलें, तरी आह्मी कच खाऊन मागें घेतां कामा नये. जीं अरिष्टें दूर करण्याकरितां, आतां आह्मांस उपाय शोधून काढले पाहिजेत, तीं अगदीं साव-काशपणानें वाढत आलीं आहेत, व त्यांचें निवारणहि सावकाशपणेंच होणार आहे. पण, मोठ्या धिम्मेपणानें व सतत प्रयत्न होऊन, मनुष्याच्या शिक्षणांत बुद्धीच्या विका-सांचें जितकें महत्व आहे, तितकेंच निदान नीतिमत्तेच्या बळकट आधारानें त्याचें शील बनण्याचें आहे, ह्या मताला, तात्विक दृष्ट्या, आमच्यापैकीं कोणालाही नांव ठेवतां यावयाचें नसल्याकारणानें, त्याची मोठ्या धैर्यानें व्यवहा-रांत अमलबजावणी आह्मीं केली, तरच वरील अरिष्टांचें निवारण करितां येणार आहे. हिंदुस्थानामध्यें, धर्माचा बळकट आधार असल्याशिवाय, नीतीचाहि बळकट आधार असूं शकत नाहीं. (ह्यांचा अर्थ असा कीं, हिंदुस्थानामध्यें नीति हें धर्माचेंच एक अंग समजलें जातें.)

तथापि, एवढ्यानेंच सर्व संपलें, असें मात्र नाहीं. लोकांच्या अंगच्या चांगल्या गुणांचें संरक्षण करून, त्यांची जोपासना करावयाची असेल, तर त्यांच्या दुर्गुणांचा आह्मीं नायनाट करून टाकला पाहिजे. नुसत्या शब्दांना आह्मीं भिऊन जाण्याचें कांहींएक कारण नाहीं. नव्या प्रेस आक्टा-

मुळें, हिंदी वर्तमानपत्रांची " मुस्कटदाबी " झाली आहे, असें जें कित्येक लोक बोलत असतात, तें निव्वळ वेडेपणाचें आहे. सरकारवर पुरतेपणीं चरचरीत व निर्भयपणानें टीका करितां येण्याचें त्यांचें स्वातंत्र्य पूर्वीं जसें होतें, तसेंच आतांहि कायम आहे एवढेंच नाहीं, तर आणखी असेंहि ह्मणतां येईल कीं, विलायतेंतील निरनिराळ्या पक्षांचीं वर्तमानपत्रें त्या त्या वेळच्या प्रधानमंडळावर (सरकारवर) ज्याप्रमाणें बहुधा नाहक्क टीका करित असतात, तद्वत्च हिंदी वर्तमानपत्रांनाहि करितां येतें. राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनीं चालविलेल्या कित्येक वर्तमानपत्रांतून जे कांहीं उतारे मीं मागें दिले आहेत, त्यांत राज्यक्रांतीचा व खुनाचा तुसडपणानें उपदेश करण्याचें जसें धारिष्ट दिसून येतें, तसें मात्र त्यांना ह्यापुढें करितां यावयाचें नाहीं. राजद्रोही वर्तमानपत्रें, अथवा गुप्त मंडळ्या, अथवा बेकायदेशीर सभा ह्यांच्या बाबतींत " दडपशाही "–चें धोरण स्वीकारण्यांत कांहीं क्रूरपणा व जुलूम असेल तर तो, सर्व शरीरांत ज्याच्यामुळें विष भिनण्याची भीति आहे, अशा दर्दावर शस्त्रप्रयोग करण्यांत जितका क्रूरपणा व जुलूम आहे, त्यापेक्षां खास अधिक नाहीं. आणि, विशेषतः, अर्धवट पाश्चिमात्य बनलेला व अर्धवट शिकलेला असा जो हिंदी समाजाचा एक भाग आहे, त्याच्यासारख्या, अपक्क बुद्धीच्या व शीघ्रपरिणामी मनाच्या लोकांसंबंधानें ह्मटलें तर, असें धोरण स्वीकारण्यांत क्रूरपणा व जुलूम मुळींच नाहीं. हा शस्त्रप्रयोगसुद्धां शांतपणानें एकसारखा करित रहावें लागेल, असा संभव दिसतो. कारण, ह्या रोगाचीं कित्येक अतिदुष्ट बाह्यलक्षणें जरी अकस्मात् आमच्या दृष्टोत्पत्तीस आलीं

आहेत, तरी तो देखील कांहीं एकदम उत्पन्न झालेला नाहीं; आणि, ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन, आम्हांला त्याच्याशीं गांठ घातली पाहिजे. हल्लींची स्थिति फार झपाट्यानें, आमच्या अगदीं अजमासाबाहेर, जरी सुधारत गेली, तरी आम्हीं आपलीं शस्त्रक्रियेचीं हत्यारें फेंकून देतां कामा नये, तर, पुढेंमागें कदाचित् रोग उलट खाईल, म्हणून तीं आम्हीं संभाळून ठेविलीं पाहिजेत. आमच्या स्वतःसंबंधाचें आमचें कर्तव्य काय आहे, इतकेंच ध्यानांत धरून चालावयाचें नाहीं; तर मनामध्यें चांगला हेतु असणाऱ्या परंतु भेकड स्वभावाच्या पुष्कळ हिंदी लोकांस असंतोषरूपी पिशाच्यानें पछाडलेल्या अशा त्याच्या थोड्याशा देशबांधवांकडून नाना प्रकारची भीति दाखविण्यांत येत असून, कपटानें त्यांना त्रास देण्यांत येत असतो, त्यापासून आपलें संरक्षण व्हावें, म्हणून ते लोक आमच्याच तोंडाकडे पाहत असतात, ह्याबद्दलची जबाबदारी तशीच आमच्या अंगावर आहे, हेंहि आम्हीं लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. आमचें उघड रीतीनें शत्रुत्व करणारांची संख्या लहान असेल, पण शंभरापैकीं नव्याण्णव प्रामाणिक लोक मोठ्या धैर्यानें व नेटानें संकटें सोशीत आहेत, त्यांची परवा न करितां, बाकी राहिलेल्या एका पापीपुरुषास आपल्या दुष्कृत्यांचा पश्चाताप होईल किंवा न होईल, असा संशय असतांहि, त्याची मनधरणी करण्याबद्दल आम्ही मोठी काळजी वाहतों, असें म्हणणाऱ्या आमच्या हितचिंतकांची संख्या फारच मोठी आहे.

पाश्चिमात्य तऱ्हेचें शिक्षण मिळालेल्या हिंदी माणसांची आम्हांस गरज आहे. अशीं माणसें आम्हींच तयार केलीं आहेत, आणि आतां आमची इच्छा असली, तरी त्यांना पुनः मूळपदावर

आह्मांस आणतां यावयाचें नाहीं. परंतु, पाश्चिमात्य विद्येचा त्यांच्या मनावर अगदीं उत्तम रीतीचा परिणाम होऊन, खरे सुशिक्षित हिंदी लोक पैदा होत आहेत किंवा नाहींत, हें आह्मीं पाहिलें पाहिजे. केवळ ज्यांना इंग्रजी बोलतां येतें, अथवा प्राचीन काळच्या धार्मिक अथवा सामाजिक अशा जुलमी चालीरीतींस व समजुतींस नवीन रूप देऊन, त्यांचें पुनरुज्जीवन करणें अगदीं वाजवी आहे, असें इंग्रज लोकांस भासवून, त्यांची चकभूल करितां यावी, ह्मणून इंग्रज लोकांस गोड वाटेल अशा रीतीनें ज्यांना भाषणें करितां येतात, असे हिंदी लोक आह्मांला नको आहेत. त्याचप्रमाणें, आह्मीं असेंहि लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, पाश्चिमात्य शिक्षणानें मंडित असा अतिउत्तम प्रतीचा हिंदी गृहस्थ देखील फक्त हिंदुस्थानच्या प्रजेपैकीं फारच थोड्या लोकांच्या वतीनें आज मितीस बोलत असतो; आणि, स्वाभाविकपणें हा गृहस्थ ह्याच लोकांच्या हितार्थ बोलत असतो. परंतु, ज्या लोकांच्या वतीनें त्याला बोलण्याचा अधिकार असतो, त्यांच्याच केवळ हितार्थ जेव्हां तो बोलत नाहीं, तेव्हां आपल्या कोट्यावधी देशबांधवांच्या तर्फे आपणास बोलण्याचा अधिकार आहे, असें त्यानें अद्याप मुळींच दाखवून दिलेलें नाहीं. आणि, हे त्याचे देशबांधव कसे ह्मणाल तर, यूरोपांत ज्याला मध्ययुग ह्मणतात, त्या काळीं तिकडील लोक जसे अज्ञानांधकारांत खुशाल लोळत पडले होते, तशीच अझून हिंदुस्थानांत ह्या लोकांची स्थिति आहे. घर धरून बसणाऱ्या इंग्रजांसच नव्हे, तर हिंदुस्थानच्या मुख्य मुख्य शहरांत कांहीं थोडे दिवस राहून, हिंदुस्थानसंबंधीं वरवर माहिती मिळविणाऱ्या

इंग्रजास देखील, पाश्चिमात्य तऱ्हेचें शिक्षण मिळालेल्या हिंदी गृहस्थापासूनच सर्वांत अधिक माहिती मिळते इतकेंच नव्हे, तर खरोखर पाहतां, त्याच्याच एकट्यापासून अशी माहिती त्यांना मिळते. ह्मणून, इतर वर्गांतील लोकांच्या अथवा आपल्या देशबांधवांच्या प्रचंड समूहाच्या गरजा व इच्छा काय आहेत, हें सांगण्यास त्याला सर्वांत जास्त अधिकार आहे किंवा त्यालाच एकट्याला हा अधिकार आहे, असा आपण आपला गैरसमज करून घेऊन धोक्यांत पडूं नये, ह्याबद्दल, आणखी अशाच कित्येक गोष्टींप्रमाणें, आपण जपलें पाहिजे. मजा अशी असते कीं, जे इंग्रज लोक सामान्य प्रतीच्या हिंदी लोकांत राहून आपलें आयुष्य घालवित असतात, त्यांचा ह्या लोकांशीं जसा दृढपरिचय असतो, तसा वरील सुशिक्षित हिंदी गृहस्थांचा बहुधा पुष्कळ बाबतींत नसतो.

नुकत्याच घडून आलेल्या राजकीय सुधारणेंतील व्यंग ह्मटलें ह्मणजे, त्यांची योजना सर्वस्वी नसली, तरी मुख्यत्वें-करून ह्याच विशिष्ट वर्गाच्या हिताकरितां करण्यांत आली आहे, हें होय. नेमस्त पक्षांतील हिंदी राजकारणी लोकांच्या वाजवी आकांक्षा तृप्त होण्याच्या कामीं त्यांचा जो उपयोग झाला आहे, तितक्या पुरती त्यांची प्रशंसा केलीच पाहिजे; आणि, ह्यासंबंधानें इतक्या लवकर जी कांहीं कल्पना बांधतां येते, त्यावरून ह्या सुधारणा पुढें यशस्वी होणाऱ्या वाटतात. त्यांत अपेश येणार नाहीं. ह्या सुधारणांचा प्रत्यक्षपरिणाम असा झाला आहे कीं, सुशिक्षित वर्गानें चळवळी करून आपलें ह्मणणें सरकारच्यापुढें मांडण्याची संधि दुसऱ्या महत्त्वाच्या समाजांस मिळूं लागली

आहे. हिंदुस्थानांत मुसलमानांची संख्या मोठी असून, त्यांच्या राजकीय बाबतींतल्या आकांक्षा हिंदु—लोकांच्यापेक्षां पुष्कळच निराळ्या असतात व उलटहि असतात. पण, ही गोष्ट जरी बाजूस ठेविली, तरी हिंदुस्थानसारख्या देशांत शेतकीला नेहमींच महत्त्व असणार; व त्याखेरिज उद्योगधंदे व उदीमव्यापार ह्यांचेंहि महत्त्व दिवसेंदिवस वाढत चाललें आहे. आणि, ह्या धंद्यांतलि लोकांचें हित पाहण्याचें काम त्यांचे प्रतिनिधी ह्या नात्यानें, सामान्य–प्रतीच्या हिंदी राजकारणी लोकांच्या हातून योग्य रीतीनें बजावलें जाणार नाहीं. असे राजकारणी लोक मुख्यतः नगरवासी असून, ते ज्या धंद्याचे असतात त्या धंद्यांतील लोकांस शेतकरी, व्यापारी व कारागीर ह्या लोकांच्या स्थितीचें मुळींच ज्ञान नसतें, किंवा असल्यास फारच थोडें असतें, व ह्यांच्या सुखदुःखाची ते लोक मुळींच काळजी वाहत नाहींत. उदाहरणार्थ, राजकारणी लोक पुष्कळच वेळां वकील–वर्गांपैकीं असतात; आणि, आमचें राज्य इकडे स्थापन झाल्यावर, अगदीं सद्धेतूनें प्रेरित होऊन, आमच्या देशांतील कायदेकानू व न्याय देण्याची पद्धत ह्यांच्याच धोरणास अनुसरून, आम्हीं इकडे जे नवीन कायदेकानू केले व न्याय देण्याची जी नवीन पद्धत प्रचारांत आणली, ह्याच गोष्टींमुळें वकील--मंडळीचें उखळ अगदीं पांढरें झालें आहे; परंतु, ह्याच गोष्टींचे अनर्थकारक परिणाम होऊन, उधळ्या व भांडखोर लोकांस कधीं कधीं निव्वळ धुळीचे दिवे खात जावें लागलें आहे. ह्याच कारणामुळें, हिंदुस्थानांतलि वकीललोकांचें व ते ज्या वर्गांतले असतात त्या वर्गांचें वजन वाढविण्याचा झोंक कोणत्याहि राजकीय संस्थांचा असल्यास, शांतस्वभावाच्या व

प्रतिष्ठित अशा पुष्कळच हिंदी लोकांस त्या संस्थांबद्दल संशय येतो व त्या त्यांना पसंत नसतात. ह्मणून, हिंदी लोकांस शिक्षण देणें व राज्यकारभाराचीं कामें करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं आणणें, ह्यांत आमचा हेतु पाश्चात्य शिक्षण मिळालेल्या, ह्या नवीन वर्गांतील लोकांच्या अंगचा उत्साह व कर्तृत्वशक्ति यांचा ओघ देशांतली संपत्ति वाढविण्याच्या मार्गाकडे वळवून, त्यायोगानें त्यांच्या संकुचित दृष्टीचा पल्ला लांबवर नेऊन पोहोंचविण्याचा असावा. त्याप्रमाणें, राजकारणाच्या भानगडींत न पडतां त्यापासून अगदीं अलिप्त राहणारे, परंतु देशांतील सर्व प्रकारच्या द्रव्योत्पादक साधनांची वृद्धि करण्याच्या कामांत आह्मीं त्यांना दिशा दाखवावी व मदत करावी, अशी अपेक्षा बाळगणारे असे फार मोठाले व वजनदार वर्ग आहेत, त्यांच्या हिताकडे आमचें अधिक लक्ष पोहोंचून, त्यास हल्लीं-पेक्षां आह्मीं अधिक उत्तेजन द्यावें, असाहि आमचा हेतु असला पाहिजे. सध्यां आह्मांस त्यांचा आधार आहे; परंतु, तो कायम टिकावा, ह्मणून आह्मांस काय केलें पाहिजे ह्मणाल, तर, राजकीय चळवळीचीच मात्रा कायती सरकारवर बेमालुम लागू पडते व हिंदुस्थान आणि ग्रेटब्रिटन यांच्यामधील संबंधांत—आणि विशेषतः, सर्व प्रकारच्या पैशाच्या संबंधांत—विलायतेंतील राजकीय पक्षांची सोय व त्यांची लहर यांचा खेळ चालून, ह्या धंद्यांतले दोन भागीदार जे हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन त्यां-पैकीं वड्या भागीदाराचा (ग्रेटब्रिटनचा) ज्यांत पैशाच्या दृष्टीनें फायदा असेल, ती गोष्ट नित्यनेमानें घडून यावयाचीच, असा वरील (आमच्या बाजूच्या) हिंदी लोकांचा ग्रह होऊं न देण्याविषयीं आह्मांला फार काळजी घेतली पाहिजे.

[illegible]

राज्यकारभारावर चांगल्या रीतीनें ताबा राहील अशी तजवीज ठेवून, सरकारच्या मुलकी नोकरींत बरेच हिंदी लोक घेण्याची पद्धत आह्मीं सुरू केली असून, ह्यापुढें त्यांची संख्या सावकाशपणें आणखीहि वाढवित गेलें पाहिजे, त्याचप्रमाणें लष्करीखात्यांत त्यांचा हल्लींपेक्षां जास्त शिरकाव होईल, अशी तजवीज करण्यास खरोखर ह्या खात्यांतहि जागा आहे, असें वाटतें. आमच्या कार्यकारी कौन्सिलांतून हिंदी लोकांस नेमण्यास आह्मी कांकू करित नाहीं, पण त्याच वेळीं हिंदी लष्करांत शिरून आपल्या बादशाहाची नोकरी करणाऱ्या शूर वीरांस निव्वळ खालच्या प्रतीच्या अमलदारीशिवाय आणखी वर चढण्यास सवलत नसावी, हा मोठाच चमत्कार आहे ह्मणावयाचा. लष्करी शिक्षणासंबंधानें पाहूं जातां, एतद्देशीय अमलदारांची लायकी वाढविण्याची बरीच तजवीज करण्यांत आली आहे, ह्यांत शंका नाहीं. हिंदुस्थानांतील मोठमोठाल्या जमिनींचे मालक अशा जाहगिरदार, सरदार, इनामदार व इतर सुखवस्तु लोकांचा पिढीजाद धंदा ह्मटला ह्मणजे स्वाऱ्या–शिकाऱ्या करण्याचा असून, अशाच लोकांच्या ठिकाणीं अढळ राजनिष्ठा दिसून येते, असा त्यांचा मोठा लौकिक आहे. तथापि, हल्लींच्या स्थितींत, अशा बड्या व प्रतिष्ठित हिंदी लोकांच्या मनांत, आपण फौजेंत शिरून तरवार गाजवावी व आपली कीर्ति करावी, असें येण्यास कांहीं मार्ग नाहीं. ह्या बाबतींत, इंपिरियल क्याडेट कोअर काढून, लॉर्ड कर्झनसाहेबानीं योग्य दिशेनें थोडी सुरवात केली होती, व ती योजना त्यावेळीं सर्वांस चांगलीच पसंत पडली होती. परंतु, लाटसाहेब हिंदुस्थान सोडून गेल्यांनंतर, त्या योजनेस मुळींच उत्तेजन मिळालें नाहीं, असें ह्मटलें

तरी चालेल. आजच्या मितीला, त्याहिपेक्षां कांहींतरी अधिक करण्याची आवश्यकता आहे. मिसरदेशाच्या सैन्यांतील कांहीं पलटणींवरील सर्वच अमलदार नेहमींच तद्देशीय लोक असतात, तोच प्रकार इकडे हिंदुस्थानांत पुढें सुरू करण्याच्या उद्देशानें, देशी सैन्यांतल्या नेटिव अमलदारलोकांपैकीं चांगले असतील ते काळजीपूर्वक निवडून काढून व त्यांस योग्य शिक्षण देऊन तयार करावेत, व नंतर त्यांस कित्येक पलटणीवरील अमलदारांच्या जागांवर बेतानेतानें चढवून, शेवटीं अशा पलटणींवरचे सर्वच अमलदार एतद्देशीय लोक असतील, अशी व्यवस्था करण्यांत यावी; आणि, असा प्रयोग करून पाहण्यासंबंधानें, कित्येक उत्तम अनुभवीक इंग्रज सेनाधिपतींचें मत अनुकूल आहे, असा माझा समज आहे. हिंदी अमलदारांच्याच सर्वस्वी हुकमतीखालीं असणारें हिंदी सैन्य दृष्टीस पडण्यासाठीं आम्हांला वास्तविकपणें हिंदुस्थानाबाहेर जाण्याचें प्रयोजन नाहीं; कारण कीं, असें उदाहरण देशी संस्थानांतून पाहण्यास मिळत असतें. मीं आतां दाखवून दिली आहे, त्याप्रमाणें एखादी योजना अमलांत आणल्यास, त्याचा सर्वच देशी सैन्यावर फार उत्कृष्ट परिणाम होणार आहे; आणि, हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न जातींचे व धर्मांचे सर्वच लोक एकत्र होऊन आमच्याशीं वैर करूं लागले, तर केवळ तरवारीच्या बळावर हिंदुस्थान ताब्यांत ठेवण्याची आम्हांस कधींच आशा करावयास नको तरी, मध्येंच एकदम [illegible] बंडाचा मोड करण्यास व तसेंच तें होऊं न देण्याची [illegible] सैन्यास; देशी सैन्याचा नेहमींच पहिल्या प्रतीचा [illegible] पाहिजे. या सैन्यास राजनिष्ठेपासून भ्रष्ट [illegible] अनेक वेळां झाली असून, ती क्वचित् प्रसंगीं

अगदींच फळास आली नाहीं असें नाहीं, व ही गोष्ट आतां कांहीं गुप्त नाहीं. ह्या बाबतींत आपण डोळयांत तेल घालून बसलें पाहिजे, ही गोष्ट जरी मोठमोठ्या, अनुभवीक व कर्तबगारीच्या अधिकाऱ्यांस मान्य आहे, तरी त्याचा एवढा बागुलबोवा करून भिऊन जाण्याचें कांहींएक कारण नाहीं, असें त्यांचें मत आहे. आणि शिपायांच्या बंडाच्या आधीं, जुन्या हिंदी पलटणींच्या ठिकाणीं ब्रिटिश अमलदारांची अंधळी भक्ति असून, "राज्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा आहे," ह्मणून राक्षसी प्रधानजीनें अगदीं बेंबीच्या देंठापासून आरोळी मारून, आपल्या राक्षसी राजास स्वस्थ बसण्याविषयीं सांगण्यासारखा प्रकार त्यांच्या हातून घडत असे; परंतु, तशी स्थिति आतां नाहीं, हें फार चांगलें आहे.

एका मुद्याच्या गोष्टीचा इंग्रज लोकांना विसर पडण्याचा संभव असून, नुकत्याच ज्या राजकीय सुधारणा घडून आल्या आहेत, त्यांतहि तिच्याकडे नजर पोहोंचलेली नाहीं, असें ह्मणावें लागतें. हा मुद्दा असा कीं, आमच्या हिंदी साम्राज्याच्या एकंदर लोकसंख्येचा एक पंचमांश भाग— एकंदर प्रदेशाचा तिसरा हिस्सा— हिंदुस्थानसरकारच्या प्रत्यक्ष अमलाखालीं नाहीं, तर तो आपल्या स्वतःचा राज्यकारभार पाहणाऱ्या संस्थानिकांच्या ताब्यांत आहे. ह्या सर्व लोकांचीं घराणीं मोठीं इतिहासप्रसिद्ध असून, त्यांचे हितसंबंधहि फारच मोठाले आहेत; आणि, ह्या अशा गोष्टींकडे आह्मीं दुर्लक्ष केल्यास, आमच्या कर्तव्यपरायणतेस व मुत्सद्दीपणास सारखाच कमीपणा येईल. राज्यव्यवस्थेंत सुधारणा करण्याविषयींची, हिंदुस्थानसरकारची जी मूळची योजना होती, त्यामध्यें बादशाही कौन्सिलच्या रचनेस फार महत्त्व देण्यांत

आलें होतें; आणि, हें कौन्सिल जर अस्तित्वांत आलें असतें, तर ब्रिटिश अमलाखालच्या हिंदुस्थानांतील सरदार, जहागिरदार, इनामदार, दुमालदार वगैरे बड्या लोकांच्या तर्फे प्रतिनिधी ह्मणून हे संस्थानिक त्यांत आले असते. आतां, ही गोष्ट ज्या कारणां मुळें अजीबात गाळून टाकण्यांत आली, तीं कितपत सबळ होतीं, ह्याविषयीं वाटाघाट करण्याचें माझें काम नाहीं. परंतु, ह्या योजनेच्या बुडाशीं असलेली कल्पना सर्वतोपरि निर्दोष होती, ह्याबद्दल प्रश्न नाहीं. आणि, राजद्रोहाला प्रतिबंध कसा करावा, ह्याविषयीं लॉर्ड मिंटोसाहेबांनीं ह्या संस्थानिकांचा सल्ला विचारिला, त्यावेळीं हीच कल्पना त्यांनीं अमलांत आणिली. ह्या कल्पनेस हल्लींपेक्षां नियमबद्ध व कायमचें रूप देऊन ती अमलांत आण-ण्याकरितां, कांहींतरी उपाय शोधून काढावा लागणारच आहे. ह्या मांडलिक राजेरजवाड्यांची निष्ठा व त्याचें सहाय्य, ह्या गोष्टी प्राप्त करून घेण्याचा उद्योग न करितां, जिला लोकसत्ताक राज्यपद्धति ह्मणतात, ती ब्रिटिश अमलाखालच्या हिंदुस्थानांत सुरू करण्याचा प्रयत्न आम्ही करूं, तर हिंदी साम्राज्यांतील एका अत्यंत राजनिष्ठ व पूर्वपरंपरेला चिकटून राहणाऱ्या लोकांचें आमच्यावरील प्रेम नाहींसें करून टाकण्याचें महत्संकट आह्मी आपल्यावर ओढवून घेऊं. देशी संस्थानांचा राज्यकारभार सर्वस्वी एतद्देशीयांच्याच हातीं आहे, हें कारण केव्हां केव्हां पुढें करून; त्याच्या जोरावर हिंदी राजकारणी लोक स्वराज्याची मागणी करित असतात. परंतु, ह्या त्यांच्या ह्मणण्यामध्यें पूर्ण अज्ञान भरलेलें आहे. एक दोन अपवाद सोडून दिले— आणि त्यांतहि खरेपणापेक्षां दिखाऊपणाच फार अधिक आहे— तर; "प्रजा ह्मणजे राजाचीं लेंकरें असून, त्यांचें त्यानें पितृवत् पालन"

केलें पाहिजे," ह्याच तत्वावर देशी संस्थानांचा राज्यकारभार चालत असून, तेथल्या लोकांचा पूर्वेतिहास व त्यांच्या गरजा ह्या गोष्टींचा विचार केला असतां, अशी राज्यव्यवस्था त्यांना सोईची असल्यामुळें, सर्वस्वी पसंत पडण्याचा संभव आहे. तथापि, हिंदी राष्ट्रीयसभेनें ज्या आपल्या इच्छा दर्शविल्या आहेत, (ह्मणजे ह्या संस्थेला जशी राज्यव्यवस्था पाहिजे आहे) त्यांच्यांत व ब्रिटिश मुलखांतील राज्यपद्धतींत जितकें अंतर आहे, त्यांपेक्षां देशी संस्थानांतील राज्यपद्धतींत फारच अधिक आहे. " क्रांतिकारक " पक्षाच्या वर्तमानपत्रांतून राजद्रोहाचा केवळ पूर वाहत होता, त्यास बंधारा घालण्याची सूचना अखेरीस आह्मांला मान्य होण्यापूर्वीं, ब्रिटिश हिंदुस्थानामधून आपल्या संस्थानांत येणाऱ्या राजद्रोही वाङ्मयाचा (पुस्तकें, पत्रें, चोपडीं, चित्रें वगैरे) आपल्या लोकांच्या मनावर फार वाईट परिणाम होत आहे, अशी ज्याप्रमाणें देशी संस्थानिकांची वाजवी रीतीची तक्रार होती, त्याचप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानच्या राज्यशासनपद्धतींत कांहीं मोठी उलटापालट करण्यांत आल्यास, तिचा परिणाम आमच्या स्वतःच्या स्थितीवर व आमच्या प्रजाजनांशीं आमचे जे संबंध आहेत त्यांवर भयंकर रीतीनें होईल, असें त्यांचें ह्मणणें पडून, वरील प्रकारच्या राजकीय स्थित्यंतराचा त्यांना राग येणें अगदीं वाजवी आहे. हिंदी लोकांच्या कल्पनांप्रमाणें येथला राज्यकारभार चालवावा, असें जेव्हां आह्मी बोलतों तेव्हां, एकंदर हिंदीलोकांच्या तर्फेनें बोलण्याचा ज्यांना फार मोठा अधिकार आहे, अशा वजनदार हिंदी लोकांच्या कल्पनांचा आह्मांस अव्हेर करितांच येणार नाहीं; आणि, ह्या कल्पना व्यक्त कर-

ण्याची योग्यता देशी संस्थानिकांच्या अंगीं जशी आहे, तशी दुसऱ्या कोणाच्याच नाहीं. आणखी एक सूचना करावीशी वाटते, ती अशी. देशी संस्थानें खालसा करून टाकण्याचें धोरण फार दिवसांपासून सोडून देण्यांत आलें आहे. आतां, ब्रिटिश हिंदुस्थानामध्यें असे कित्येक जमीनदार आहेत कीं, त्यांच्या ताब्यांतला मुलूख इतक्या महत्त्वाचा आहे व त्यांतील लोकवस्ती इतकी मोठी आहे कीं, तशी स्थिति, ज्यांना आह्मी नेहमींच राज्यकर्ते संस्थानिक असे समजत आलों आहों, त्यांच्यापैकीं पुष्कळांच्या ताब्यांतल्या मुलखाची नाहीं. ह्मणून, आज मितीस प्रश्न असा आहे कीं, वर सांगितलेल्या धोरणाच्या आणखीहि पुढें जाऊन, आम्हीं अशा जमीनदारांपैकीं कांहीं थोडक्या मोठ्या लोकांच्या राजनिष्ठेबद्दल व सच्छीलाबद्दल आमची पुरी खात्री झाली असल्यास, त्यांना आपल्या मुलखाचा राज्यकारभार चालविण्याचे अधिकार देण्यास काय हरकत आहे? अशा प्रकारच्या अगदीं अश्रुतपूर्व योजनेला मोठमोठ्या हरकती घेण्यांत येतील, व कदाचित् त्यांच्यापुढें सरकारला हातहि टेकावे लागतील, हें मी जाणून आहें. ही सूचना अमलांत आणण्यास अगदीं पहिली अडचण ह्मटली ह्मणजे, राज्यकारभाराच्या सोईसाठीं, ब्रिटिश अमलाखालीं त्यावेळपर्यंत असलेलीं, थोडकींशीं देखील खेडीं देशी संस्थानांत सामील करून, मुलखाच्या सरहद्दी पुनः आखून घेण्याकरितां असा फेरफार करण्याची ज्याज्या वेळीं वाटाघाट सुरू झाली, त्यात्या वेळीं लोकांनीं ह्या गोष्टीस आपली नाखुषी दाखविली, असा आजपर्यंतचा अनुभव आहे.

ज्या राजकीय सुधारणांशीं लॉर्ड मिंटोसाहेबांच्या कारकिर्दीचें [illegible], त्यांचा अनुभव पाहण्याची आतां

कोठें नुकतीच सुरवात झाली आहे. ह्या सुधारणांपासून पुढें फायदा होईल, असा रंग दिसत आहे, एवढेंच त्यांच्यासंबंधानें आजच्या तारखेला बिनधोक ह्मणतां येण्यासारखें आहे; आणि, त्यांचें धोरण ज्या बाजूला आहे, तिकडेच निर्भयपणें आणखी पुढें जाणें वाजवी आहे किंवा नाहीं, व जाणें असल्यास केव्हां जातां येईल, ह्या संबंधानें आजच पुढचें भविष्य सांगणें अविचाराचें होईल. ह्या सुधारणांच्या बरोबरच जन्मास आलेल्या "दडपशाही" कायद्यांमुळें, राजद्रोहाचा जो कांहीं बीमोड झाला असेल तो बाजूस ठेविला, तर राजद्रोहाच्या लाटेस निदान तूर्तातूर्ततरी थांबवून धरण्याच्या कामीं, ह्या सुधारणांचें कितपत सहाय्य झालें आहे, हें सांगणेंसुद्धां आणखी कांहीं दिवस कठीण आहे. ह्या नवीन लावलेल्या झाडांचीं फळें पिकल्यावर तीं गोड आहेत कां कडू आहेत, हें समजण्यास कांहीं काळ लोटला पाहिजे. हल्लींच्या अस्वस्थतेंतील फक्त राजकीय स्वरूपाच्या भागाशीं जरी त्यांचा संबंध आहे, तरी हिंदुस्थानच्या हिताचे जे सांपत्तिक व सामाजिक प्रश्न आहेत, ते सोडविण्याचें काम त्यांच्यामुळें सोपें जाईल, अशी आशा करावयास हरकत दिसत नाहीं. हिंदुस्थानच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं मुख्यतः ह्याच प्रश्नांकडे आतां लक्ष दिलें पाहिजे, अशी त्यांना फारच मोठी निकड लागली आहे. हल्लीं शिक्षणाभोंवतीं अनिष्ट व लोकहितास बाधक अशा गोष्टींचें कडें पडलें आहे, त्यांतून त्याचें संरक्षण करणें व त्याला वरच्या पायरीस नेऊन त्याची व्यावहारिक उपयुक्तता वाढविणें; सुशिक्षित हिंदी लोकांस आपल्या बुद्धीचा उपयोग ज्यांत करितां येईल, अशीं नवीन स्थळें निर्माण करण्याच्या हेतूनें, हिंदु-

स्थानच्या उद्योगधंद्यांच्या व उदीमव्यापाराच्या वाढीस उत्तेजन देणें; जुनीं प्रेमबंधनें बळकट करणें, व आपलें स्वतःचें हित कशांत आहे, ह्या गोष्टीचें सम्यग्ज्ञान होऊन, हिंदी समजांतील प्राचीन परंपराप्रिय व त्याचप्रमाणें अर्वाचीन प्रगतिप्रिय अशा दोन्ही प्रकारचे लोक प्रेमरज्जूनें ब्रिटिशराज्याशीं बद्धच होतील, अशा प्रकारचीं नवीन प्रेमबंधनें अस्तित्वांत आणणें, ह्या गोष्टी सावकाशपणें होणाऱ्या व श्रमसाध्य असून, त्या घडवून आणण्याच्या कामीं जसा धिमेपणा व जशी सतत एकसारखी मुत्सदगिरी लागते, तशी राज्यव्यवस्थेंत एकदम मोठमोठे परंतु धोक्याचे फेरफार करून टाकण्यास लागत नाहीं. परंतु, हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्ता कायम टिकण्याकारितां, येथील राजेरजवाडे व अनेक प्रकारचे लोक राजनिष्ठ व राजीरजावंत राहिले पाहिजेत; आणि, हीं वर सांगितलेलीं महत्कार्यें सिद्धीस नेण्याच्या कामांत जर आह्मीं यश संपादन केलें, तरच केवळ ह्या गोष्टींची आह्मांला अपेक्षा ठेवतां येईल.

राजाविषयीं पूज्यबुद्धि हा गुण हिंदुस्थानांतील सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांत सर्वत्र आढळण्यांत येत असून, त्याचीं पाळेंमुळेंहि त्यांच्या अंतःकरणांत खोलवर गेलेलीं आहेत. सामान्येंकरून सर्व लोकांच्या ठिकाणीं दृष्टीस पडणारा असा कदाचित् हाच एक गुण परंपरेनें आलेला असावा. विक्टोरिया महाराणीविषयीं तर अशी पूज्यबुद्धि आपोआप स्वाभाविकपणें त्यांच्या मनांत उत्पन्न झाली होती. महाराणीसाहेबांचें वृद्धपण व आपल्या प्रियपतीच्या निधनानंतरचा त्यांचा एकांतवास, ह्या गोष्टींचा हिंदी प्रजाजनांच्या मनावर असा कांहीं विलक्षण परिणाम झाला होता कीं, त्यांच्या

अशा स्थितीबद्दल करुणा येऊन लोकांचें मन गंभीर होऊन जाई, व त्यांच्याविषयीं अधिकच आदर व प्रेम वाटूं लागे. इंग्रजी राष्ट्राच्या दोघां युवराजांचे पाय हिंदुस्थानाला लागून, त्याचा दोन वेळां असा गौरव झाल्याकारणानें, ते लोकांच्या प्रत्यक्ष दृष्टीस पडले, व त्यामुळें त्यांना अभिमान वाटून, राजाविषयींच्या त्यांच्या प्रेमांत चांगलीच भर पडली. परलोकवासी बादशहांची भेट जुन्या पिढींतील लोकांच्या स्मरणांतून अद्यापि गेलेली नाहीं; आणि, सध्यां सिंहासनारूढ असलेले बादशहा व त्यांच्या दयाळू सहधर्मचारिणी महाराणीसाहेब ह्या उभयतांच्या भेटीची आठवण तर अझून सर्वांस अगदीं ताजी आहे. चार वर्षांपूर्वी, ह्मणजे ज्यावेळीं बंगालप्रांतांतील राजकीय चळवळ बहुतेक उघडपणें राजद्रोही बनण्याच्या बेतांत आली होती त्यावेळीं देखील, त्या प्रांतांत प्रिन्स ऑफ वेलस व त्यांच्या पत्नी यांच्या आगमनानें, थोडा वेळपर्यंत कां होईना, पण जो फारच विलक्षण शांतपणा आला होता, त्यावरून हिंदुस्थानांतील राजेरजवाडे व नानाप्रकारचे लोक ह्यांच्या मनावर राजवैभवाचा पगडा किती जोरानें बसला होता, ह्या गोष्टीचा चांगलाच प्रत्यय आला. त्याचप्रमाणें, एडवर्ड बादशहांच्या निधनाची वार्ता अकस्मात् आकाशाची कुऱ्हाड एकदम कोसळल्याप्रमाणें कानीं पडतांच, आलेला दुःखाचा उमाळा मनांतल्या मनांत दाबून ठेवल्यामुळें, सर्व हिंदुस्थानभर जी स्तब्धता दिसून आली, त्यामुळें यंदां पुनः एकवार त्याच गोष्टीची प्रतीति आली. ह्या शोचनीय प्रसंगामुळें लोकांच्या मनावर जो गंभीर व खोल असा परिणाम झाला होता, तो नाहींसा करण्याचा प्रयत्न करण्याची छाती टिळकांचें जुनें पत्र "केसरी" ह्यासारख्या, पिसाळलेल्या

कुऱ्याप्रमाणें तऱ्हा करणाऱ्या वर्तमानपत्रांनींच फक्त केली होती; आणि, त्या पत्रानें जो असा प्रयत्न केला व जो अगदीं विफल झाला, तो फक्त असा कीं, बादशहांचा दर्जा व खुद्द ती व्यक्ति आणि पाश्चात्य प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेंत त्यांच्या हातून झालेलें काम, ह्या गोष्टींची अज्ञानानें व द्वेषबुद्धीनें किंमत कमी करून टाकण्याच्या हेतूनें त्या पत्रांत लेख आले होते.

पट्टाभिषिक्त राजाची इभ्रत परंपरागत चालत आलेली असली तरी, आमच्या देशबांधवांच्या ठिकाणीं अथवा सातासमुद्रांपलीकडे राहणाऱ्या आमच्या जातभाईच्या व जातगोताच्या ठिकाणीं ज्या प्रकारच्या राजनिष्ठेची आम्ही अपेक्षा करितों, त्या प्रकारची राजनिष्ठा हिंदुस्थानच्या लोकांच्या मनांत असली पाहिजे, अशी इच्छा वाजवी रीतीनें आह्मांस करितां यावयाची नाहीं. एकंदर ब्रिटिश साम्राज्यांत जितके ह्मणून आमच्या वंशाचे लोक आहेत, तितक्यांचा पूर्वेतिहास, तितक्यांतील जातिसंबंध, सामाजिक संस्था, चालीरीती व धर्मसमजुती ह्यासंबंधानें जसा ऐक्यभाव आहे, तसा इंग्रजलोक व हिंदीलोक यांच्या दरम्यान असणें केव्हांहि शक्य नाहीं. मनुष्यांच्या मनोवृत्ती सारख्याच असल्या, ह्मणजे त्यांचीं मनें परस्परांशीं जखडून टाकणारीं बंधनें आपोआप उत्पन्न होतात; तीं कृत्रिम उपायांनीं कधींहि बनवितां येत नाहींत. ह्मणून त्यांच्या अभावीं, आम्हीं आपल्या जातिबांधवांच्या मोठमोठ्या समूहांस [वसाहतींस] स्वराज्याचे जसे हक्क खुषीनें दिले आहेत, तसे हक्क कधींकाळीं आमच्या हातून हिंदुस्थानास मिळण्याची गोष्ट अशक्य कोटींतली आहे. शिवाय, दुसरें एक कारण असून, तें कमी जोरदार आहे, असें मुळींच ह्मणतां येत नाहीं. पृथ्वीच्या पाठीवरील एकंदर मनुष्यवस्तीपैकीं पांचवा

हिस्सा लोक हिंदुस्थानांत असून, त्यांत नाना जाती व नाना पंथ आहेत. आणि, शांतता व सुरक्षितपणा ह्यांपासून प्राप्त होणारीं जीं सुखें त्यांना मिळत आहेत, तीं आमच्या राज्यामुळें आहेत, हेंच आमच्या येथल्या वास्तव्याचें सबळ कारण आहे. हिंदुस्थानास स्वराज्य देण्याचा उपक्रम करणें ह्मणजेच बलवानाच्या हातीं सर्व सत्ता देणें होय. [ह्मणजे, हिंदुस्थानाला स्वराज्य मिळालें कीं, " बळी तो कान पिळी, " असा प्रकार येथें सर्वत्र सुरू झाल्याशिवाय राहणारच नाहीं.] ज्या संकेतानें आम्हीं हिंदुस्थान आपल्या ताब्यांत ठेविलें आहे, त्यामुळेंच केवळ आह्मांस असें करण्यास आडकाठी आहे; आणि, गुदस्तां, **इंडियन कौन्सिलस् आक्टाच्या** समर्थनार्थ भाषण करितांना, असल्या सभांपासून पुढें कधीं-काळीं हिंदुस्थानांत लोकप्रतिनिधी-सभा (पार्लमेंट) स्थापन होऊन, तिच्यामार्फत येथला राज्यकारभार (विलायतेसारखाच) चालू लागेल, अशी अपेक्षा करणें अगदीं व्यर्थ आहे, असें जें लॉर्ड मोर्ले यानीं मुद्दाम बजावून सांगितलें, त्यावरून त्यांच्या मनांत त्या वेळीं हाच विचार घोळत असला पाहिजे, असें वाटतें. ह्या गोष्टीचा चांगला खुलासा जितक्या लवकर होईल तितकें चांगलेंच. परंतु, ज्याअर्थीं हिंदुस्थानांत ब्रिटिश राज्य राहील, तोंपावेतों, आपला सर्व राज्यकारभार आपणांसच चालवितां येण्यासारखें स्वराज्य हिंदीलोकांस देण्याची कल्पनाहि मनांत आणावयास नको, त्याअर्थीं ह्याच कारणास्तव स्वराज्याचे हक्क भोगणाऱ्या आमच्या वसाहतींकरितां ज्या गोष्टी करण्याचा आम्ही मुळींच यत्न करित नाहीं, अशा अनेक गोष्टी हिंदुस्थानाकरितां क[illegible] याची विशेष जबाबदारी आह्मांवर येऊन पडत आहे इत-

केंच नाहीं, तर सदरहु वसाहतींवर ज्या गोष्टी लादण्याची कल्पना आमच्या कधीं स्वप्नींहि येत नाहीं, त्या हिंदुस्थानावर न लादण्याची खबरदारी आम्हीं घेतली पाहिजे, व ब्रिटिश लोकांचें सांपत्तिक हित असणाऱ्या गोष्टींचा हिंदुस्थानशीं अतिनिकट संबंध आहे असें दिसल्यास, त्या वेळीं विशेषच काळजी घेतली पाहिजे, ह्या गोष्टीची जाणीव आमच्या ठिकाणीं असली पाहिजे. ब्रिटिश राजछत्राखालील देशांपैकीं हिंदुस्थान हा अतिमोठा देश आहे असें समजून, आम्हीं तेथला कारभार चालू ठेवला पाहिजे. परंतु, तो चालवितांना, कायद्यास भिऊन वागणाऱ्या सर्व लोकांस समतेनें व अगदीं निःपक्षपातानें वागविणें, त्यांचें विशिष्ट हित कशांत आहे हें मार्मिकपणानें ओळखणें, आणि ब्रिटिश राज्य हिंदुस्थानांत कायम राहील व त्याच्या सुरक्षितपणास मुळींच धोका येणार नाहीं, अशा रीतीच्या त्यांच्या सर्व मनोरथांविषयीं खरोखर आदर दाखविणें, इत्यादि गोष्टी करून, आम्ही जसें त्यांच्यावर राज्य करित आहों, तसें त्यांच्यापैकीं कोणासहि करितां आलें नसतें, अशी सर्व वर्णांच्या, जातींच्या व धर्मांच्या हिंदी लोकांची खात्री करून देण्याच्या कामीं, आम्ही आपली पराकाष्ठा केली पाहिजे.

[illegible] मजकूर [illegible] पाठविण्यांत येत असतांनाच, [illegible] अधिकारसूत्रें सोडून दिल्याचें [illegible]

जाहिर झालें आहे. ही बातमी ऐकून, विलायतेंतील पुष्कळच लोकांस खरोखर अगदीं मनापासून वाईट वाटत आहे. त्यांच्या कारभारांतील कित्येक बाबी व बाजवा ह्यासंबंधानें जरी टीका झाली आहे, तरी त्यामुळें, आमच्या हिंदी बादशाहीच्या इतिहासांतील एका मोठ्या आणीबाणीच्या बिकट प्रसंगीं, त्यांच्या अंगची उच्च दर्जाची कर्तव्यपरायणता व उदारबुद्धीची आणि धैर्याची मुत्सद्दगिरी सर्वदां दिसून आली, ह्या गुणांचा वाजवी रीतीनें गौरव करण्यांत कोणत्याहि प्रकारें व कधींच कमतरता झाली नाहीं. हिंदुस्थानांतील ज्या ज्या लोकांना ब्रिटिश राज्याच्या भवितव्यतेविषयीं आणि आह्मां ब्रिटिश लोकांच्या हवालीं केलेल्या असंख्य लोकांच्या हितानहिताविषयीं अगदीं मनापासून कळकळ वाटत असेल, त्या सर्वांस ही वार्ता ऐकून इंग्लंडांतील लोकां-इतकेंच वाईट वाटेल, ह्याबद्दल खात्री आहे. हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांच्या इतिहासांत लॉर्ड मोर्ले यांची कारकीर्द चिरस्मरणीय राहील. हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें तारूं त्यानीं एका नवीनच दिशेस हाकारलें आहे; दोन वर्षांखालीं, इंडियन सिविल सर्विसमधील लोकांपुढें, त्यानीं आपल्या विशेष प्रकारच्या मनोहर वाणीनें जें भाषण केलें, तें अत्यंत समंजसपणाचें होतें, ह्मणून तें जर आह्मीं आपल्या डोळ्यांसमोर नित्य ठेविलें, तर ह्या नवीन दिशेनें तें तारूं पुढेंहि तसेंच जाऊं देण्याच्या बाबतींत आमच्या मनाला अधिकाधिक धीर वाटूं लागेल. लॉर्ड मोर्ले ह्मणाले कीं:— "आतांच्या घटकेला जो देखावा आमच्यापुढें आहे, तो आकाशांत काळेकुट्ट ढग आल्याप्रमाणें भयानक आहे. आह्मी ह्या प्रसंगांतून पार पडूं— परंतु आह्मीं आत्म-निग्रह करून आपलें मन ताब्यांत ठेविलें पाहिजे; आणि

वैदूगिरी व मानभावी बोलणें यांचा अवलंब करितां कामा नये. मग, ती शांततेच्या आवडीचें सोंग आणणाऱ्या अंधळ्या दडपादडपीची वैदूगिरी असो, वा तें ज्ञानापासून सुटलेल्या व वस्तुस्थिति शांतपणानें ध्यानांत न घेणाऱ्या, अविवेकी व अयोग्य मनोवृत्तीचें मानभावी बोलणें असो." (ह्याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थानांतील हल्लींची स्थिति फार भयंकर असून, तिच्याशीं आपल्याला तोंड द्यावयाचें आहे. आपण ह्या प्रसंगांतून नीटपणें निभाऊन ज़ाऊं. पण ते केव्हां ह्मणाल, तर आह्मीं ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं बिलकूल न घाबरून जातां, आपलें मन ताब्यांत ठेवून, आलेल्या संकटाशीं लढलें पाहिजे. हिंदुस्थानांत राजद्रोह पसरत चालला आहे, त्याचें उच्चाटन करण्याची व शांततेचें साम्राज्य स्थापन करण्याची आपणांस फार आवड आहे असें ढोंग करून, सर्वत्र दडपादडपीचें व दांडगाईचे उपाय योजले पाहिजेत, असा कित्येक लोक सल्ला देतात, तो अविचाराचा व अज्ञानमूलक आहे. ह्मणजे, नाकाडोळ्याचा वैदू वाटेल तो रोग आपणास बरा करितां येतो असें सांगून, आपल्या पोतडींतून एकच मुळी काढून, ती कोणत्याहि भयंकर रोगावर उगाळून देण्यास सांगतो. पण, त्या औषधाचे खरोखर परिणाम काय होतील, हें त्याला मुळींच कळत नसतें. तोच प्रकार हे वरील सल्लागार करित असतात, म्हणून त्यांचें ऐकणें उपयोगी नाहीं. उलट पक्षीं, कित्येक लोक हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीचें यथार्थ ज्ञान नसतां व वस्तुस्थितीचा [illegible] विचार न करितां, कांहींतरी पोकळ बोलणीं बोलून, [illegible] शब्दांचें छत पसरून, व विलायतेंतील राज्य-[illegible] तत्वें आणून हिंदुस्थानास लागू करून, इकडील

राजद्रोहास हटविण्याचा उपाय सुचवित असतात. म्हणून, अशा लोकांचें बोलणें मानभावीपणाचें आहे, असें समजून आपण तिकडे दुर्लक्ष केलें पाहिजे.)



भाषांतरकारांकडून खुलासा

हिंदुस्थानांतील अस्वस्थता ह्या पुस्तकाचा पहिला भाग कांहीं दिवसांपूर्वी आह्मीं प्रसिद्ध करवून, त्याच्या प्रती महाराष्ट्रांतील मुख्य मुख्य वर्तमानपत्रांकडे व कित्येक विद्वान् गृहस्थांकडे अभिप्रायार्थ पाठवून दिल्या होत्या. त्याप्रमाणें, कित्येक वर्तमानपत्रांतून अनुकूल-प्रतिकूल टीका आली असून, शिवाय कित्येक सद्गृहस्थांनीं आपले अभिप्रायहि आमच्या विनंतीस मान देऊन आमच्याकडे पाठविले आहेत. त्याबद्दल आह्मी त्या वृत्तपत्रकारांचे व सद्गृहस्थांचे फार फार आभारी आहों.

आमच्या भाषान्तरासंबंधानें मुख्यत: दोन आक्षेप घेण्यांत आले आहेत. त्यांपैकीं पहिला आक्षेप असा आहे कीं, आह्मीं आपल्या पुस्तकांत टिळकाच्या नांवाचा उल्लेख एकेरी शब्दांत केला आहे, हें बरोबर नाहीं. कारण, टिळक जरी राजद्रोहाबद्दल गुन्हेगार ठरून बंदिवास भोगित आहे, तरी त्याची विद्वत्ता, बुद्धिमत्ता, स्वार्थत्याग वगैरे गुण वाखाणण्यासारखे असल्याकारणानें, त्याच्या नांवाचा आह्मी बहुमानार्थी उल्लेख करावयास पाहिजेच होता. दुसरा आक्षेप

आमच्या प्रस्तावनेसंबंधानें आहे. ह्मणजे, पेशवे, नानाफडणवीस वगैरे ऐतिहासिक महापुरुषांवर आह्मीं जातिद्वेषानें प्रेरित होऊन विनाकारण तोंड टाकिलें असून, पूर्वींचीं भांडणें उकरून काढून, समाजांतील दुही मोडण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं आह्मी ती वाढवितच आहों. आतां, ह्या दोन्ही आक्षेपांस समर्पक उत्तर देण्याचें हें स्थळ नव्हे. कदाचित् तसा योग जमून आल्यास, ह्या व असल्याच प्रश्नांचा स्वतंत्रपणें विचार करण्याचा आमचा मानस आहे, तो परमेश्वरकृपेनें सिद्धीस जाण्याचा बराच संभवहि दिसत आहे.

आज येथें पहिल्या आक्षेपाविषयीं इतकेंच सांगणें जरूर आहे कीं, मूळग्रंथांत ज्या ज्या लोकांच्या नांवांपूर्वी **मिस्टर** असें उपपद नाहीं, त्यांच्याच नांवाचा उल्लेख भाषांतरांत एकेरी शब्दानें केलेला आहे; व तसें केलें नसतें, तर भाषांतर बरोबर झालें नसतें, असें आमचें मत अद्यापहि कायम आहे. सावरकर, कान्हेरे, टिळक, शामजी कृष्णवर्मा वगैरे लोकांच्या नांवांपूर्वी मिस्तर उपपद नाहीं, हें पाहिजे त्यानें पाहून घ्यावें. दुसरी गोष्ट अशी कीं, टिळकानें आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेच्या भरीस पडून, एकंदर देशाचें इतकें नुकसान केलें आहे कीं, त्याच्या अंगीं इतर कांहीं गुण असले, तरी ते आमच्या दृष्टीनें मातीमोल होऊन गेले आहेत. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, टिळकाच्या भगतांप्रमाणें आह्मांला त्याच्याविषयीं यत्किंचितहि आदरबुद्धि नाहीं, हें आह्मी अगदीं प्रांजळपणें सांगतों. दुर्योधन कांहीं कमी पराक्रमी नव्हता; पण त्याच्या दुष्टबुद्धीमुळें, त्याच्या अंगच्या सर्व गुणांवर कसें पाणी पडलें होतें, हें कोणास सांगावयास नको.

दुसरा आक्षेप पेशवे वगैरे ब्राह्मण लोकांविषयींचा. "मागल्या जखमा खरवडून काढित बसूं नये," हें तत्व दिसण्यांत मोठें मोहक दिसतें, व त्याप्रमाणें सर्वांनीं वागावें, असें आमच्या कित्येक सुशिक्षित ब्राह्मणबंधूंस अगदीं प्रामाणिकपणें वाटतहि असतें इतकेंच नव्हे, तर स्वतः त्यांची त्याप्रमाणें वागणूकहि असते, ही गोष्ट आह्मांस मान्य आहे. पण एकंदर ब्राह्मण समाजांत असे खऱ्या दिलाचे लोक किती आहेत? **डेक्कन एज्युकेशन सोसायटी व सर्व्हंटस ऑफ् इंडिया सोसायटी** ह्या दोन संस्थांतली मंडळी सोडून दिली, तर इतर सुशिक्षित ब्राह्मणलोकांत असे खऱ्या अंतःकरणाचे कितीसे लोक सांपडतील! फारच थोडे, असा आमचा वीस वर्षांचा अनुभव आहे. आह्मी येथें एवढेंच सांगतों कीं, महाराष्ट्रांतील सुशिक्षित

म्हणविणाऱ्या ब्राह्मण लोकांत बरेचसे **चिंतामणी** व **विश्वपती** उत्पन्न न होऊन, महाराष्ट्राच्या इतिहासाचें खरें स्वरूप बदलून टाकण्याची त्यांना अयोग्य हांव न सुटती, तर आह्मीहि असल्या भानगडींत खास न पडतां, सर्वांशीं गुण्यागोविंदानें वागूनच देशाचा उद्धार करण्याच्या कामीं झटलों असतों. परंतु, वस्तुस्थिति अशी आहे की, ब्रह्मदेवाशीं स्पर्धा करून विश्वामित्रानें ज्याप्रमाणें प्रतिसृष्टि निर्माण केली, त्याचप्रमाणें हे ब्राह्मण इतिहासकार ग्रांट **डफ**–प्रभृति इंग्रज इतिहासकारांशीं स्पर्धा करून व महाराष्ट्राचा **प्रति-इतिहास** निर्माण करून, अज्ञान ब्राह्मणेतर हिंदूंच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा निंद्य उद्योग करित आहेत. ह्या लोकांना महाराष्ट्राचा इतिहास ह्मणजे आपल्या हातांतील **मेणाचा गोळा** अशी घमेंड वाटत असते. ह्मणून, हा त्यांचा कावा ओळखून, त्यांच्या राष्ट्रहितविघातक प्रयत्नास यश येऊं नये ह्मणून, आह्मांला सध्यांचा मार्ग पतकरणें भाग पडलें आहे, अशी आमची समजूत आहे. आतां, 'ही खरोखर चूक आहे', असें जर आमच्या निदर्शनास येईल, तर तो मार्ग तात्काळ सोडून देण्यास आमची एका पायावर तयारी आहे.

